१९.२-७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ५१७६
REFBK-0003421

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3429

मुंबई येथील त्रिशतसांवत्सरिक शिवजन्मोत्सव प्रसंगीं

# शिव-संस्मृति.

वैशाख शुद्ध २ शके १८४९.

किंमत ८ आणे.

REFBK-0003421

संपादकः—गो. स. सरदेसाई

मुद्रक—चिंतामण सखाराम देवळे,
मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, गिरगांव–मुंबई.

प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, गिरगांव मुंबई

# संपादकीय निवेदन.

[ गो. स. सरदेसाई ].

त्रिशत सांवत्सरिक शिवोत्सव करण्याचें मुंबईकरांनीं योजिलें तेव्हा महाराष्ट्रेतरांस उपयोगीं पडेल, असा एक संशोधनात्मक ग्रंथ आणि महाराष्ट्रांतील लहान मोठ्या सामान्य वाचकांस उपयोगी पडेल, असा दुसरा एक मनोरंजक ग्रंथ, अशीं दोन पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा संकल्प ठरला. परंतु हा संकल्प कृतींत उतरण्यास पुरेसा अवधि बिलकूल नसल्यामुळें, योजिलेलें काम मनाजोगतें सिद्धीस जाऊं शकलें नाहीं. या दुसऱ्या ग्रंथांत विद्यार्थ्यांचे लेख, होतकरू कवींचीं कवनें व ऐतिहासिक चरित्रें वगैरे अनेक विषय देण्याचा विचार होता. परंतु अशा प्रकारचे उपयुक्त लेख बाहेरून फारसे आलेच नाहींत. शिवकालीन व्यक्तींचीं चरित्रें व गोष्टी पुष्कळच देण्याजोग्या आहेत परंतु संपादकीय मंडळाचा वेळ पहिल्याच ग्रंथाच्या रचनेंत सर्वस्वीं गेल्यामुळें, दुसऱ्याकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत आली नाहीं. उत्सवाचा दिवस तर आगाऊच नक्की झालेला. त्या वेळींच दोन्ही पुस्तकें बाहेर न आलीं, तर त्यांचे सौरस्य रहात नाहीं. अशा अनेक प्रकारच्या पंचाइतींत जेवढा कांहीं पाक समयास सिद्ध होऊं शकला, तेवढाच पुढें ठेवून तो केवळ शिवरायाचा प्रसाद समजून, सर्वांनीं आदरानें ग्रहण करावा अशी संपादकांची आणि समस्त उत्सव-मंडळाची वाचकांस विनंति आहे.

या पुस्तकांतील विषय जरी थोडे असले, तरी ते बहुविध व मनोरंजक आहेत. श्री० नाथ माधवाच्या गोष्टींत नेताजी पालकराचें विचित्र चरित्र सुंदर रीतीनें गोवलेलें आढळेल. श्री० भास्करराव जाधव यांनीं संपादिलेला श्री शिवछत्रपतींचा पोवाडा अनेक दृष्टींनीं अप्रतिम वाटेल. त्यांनीं दिलेली शाहीरांची माहिती फारच उपयुक्त असून, पोवाड्यावरील त्यांच्या टीपाही मार्मिक आहेत. त्यांच्या जवळ अशा पुष्कळ उपयुक्त माहितीचा अपूर्व ठेवा असून, केवळ अवधि नसल्यामुळें ती माहिती वाचकांस आताच मिळूं शकत नाहीं याबद्दल मला फार वाईट वाटतें. सुप्रसिद्ध गुर्जर कवि नानालाल दलपतराम यांचा भारतीय इतिहासावरील लेख त्यांच्या

स. ५

# शुद्धिकार्य

( लेखक –श्री. नाथमाधव. )

( १ )

**" दिल् नहि काबुमें तो क्या, मेरि खता है । शानें खुदा है "**
**रूठोंगे अगर तुम् तो मनालेंगे तुमे हम् । उसका जरा नही गम ॥**
**आषकको छेडके, माशुक को शुबा है । शानें खुदा है ॥१॥ दिल्०॥**

झेब्बुन्निसा-शहाजादी आपल्या महालांत गझल् गात होती—गुणगुणत होती ! त्या गुणगुणण्यात ती स्वतःला, जगाला, इतकेंच नव्हे तर संपूर्ण विश्वाला विसरून गेली होती. झेब्बुन्निसेला गाण्याची आवड विलक्षण ! स्वतः कवयित्री. बापाची अतिशय लाडकी ! शहानशहा औरंगजेबाला जितका गाण्याचा तिट्कारा तितकीच शहाजादीला गाण्याची आवड ! एवढा करडा औरंगजेब कीं, ज्यानें 'गायनकला मेली आहे' असें कोणी सांगितलें तर त्याला 'तिला इतकी खोल पुरा कीं तिनें पुन्हा केव्हाही वर येऊं नये,' असें सांगावें, त्यालाच तो आजारी असतांना शहाजादीनें त्याच्या उराशीं बसून कुराणाचा सहवास गोड गळ्यानें ऐकवून आपण त्याच्याकडून शाबासकी व मोठें बक्षीस मिळविलें होतें

तीच ही झेब्बुन्निसा आज स्वतःच्या करमणुकीखातर, जीवरंजनाकरितां भावी प्रियकराची मूर्ति कल्पनाचक्षूपुढें आणून सुरवातीचा गझल् गात होती. तें तिचें प्रेम-गाणें होतें, वेडगाणें होतें त्या गाण्यांत ती तदाकार तल्लीन झाली होती. ती स्वतः, तिचें तें प्रणयगीत, आणि तिचा कल्पनाचक्षूपुढें खेळणारा प्रियकर, एवढ्याचीच जेम-तेम जाणीव तिला होती.

**" दिल् नहि काबुमें— "**

या पदाचें तिचें घोकून घोकून गाणें चालू असता तिच्या सभोंवताली असें कांहीं वातावरण तयार होत होतें कीं, त्या वातावरणाचा स्पर्श ज्याला ज्याला होईल त्याला

थोर विद्वत्तेस साजेल असाच उद्बोधक आहे. या लेखाचें मराठींत अवतरण करण्याचें बिकट काम रा. श्यामसुंदर यशवंत मराठे या होतकरू अभ्यासकानीं केलेलें आहे. तसेंच कांहीं शिवकालीन अल्प पत्रें व अफझलखानाची मोहीम हीं वैचित्र्योत्पादक असून इतिहासाध्ययनाला मार्गदर्शक होतील. तसेंच शिवजन्म–तिथीच्या वादासंबंधानें शहाजी व शहाजहान या दोन ऐतिहासिक व्यक्तींचा खेळ विचारणीय असून, पुढें त्यांच्या सुप्रसिद्ध पुत्रांनीं केलेल्या खेळाचीच पूर्ववृत्ति होय असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. श्रीयुत सावरकर यांची शिवचरित्राची स्फूर्ति प्रत्येक महाराष्ट्रीयाचें अंतःकरण हालवून सोडणारी आहे. सारांश, जनतेच्या उत्साहास अनुसरून आम्हीं सर्वांनीं जी ही शिवरायाची अल्प सेवा केली आहे, तीं सर्व वाचक गोड करून घेतील अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| | | पृ. |
| १ | शुद्धिकार्य ... .... ... ... | १ |
| २ | भारतीय इतिहासाचें वैशिष्ट्य ... ... ... | ४९ |
| ३ | शिवकालीन पत्रें ... ... ... ... | ७३ |
| ४ | श्रीशिवाजी महाराजांचा पोवाडा ... ... | ७९ |
| ५ | देशाचा पालनवाला ... ... ... | १२१ |
| ६ | शिवचरित्र स्फूर्ति ... ... ... ... | १२२ |
| ७ | प्रतापगडची मोहीम ... ... ... | १३१ |
| ८ | शहाजीचा पूर्वायुःक्रम .. ... ... | १३८ |

# शुद्धिकार्य

( लेखकः–श्री. नाथमाधव. )

( १ )

**" दिल् नहि काबुमें तो क्या, मेरि खता है । शानें खुदा है "**
**रूठोंगे अगर तुम् तो मनालेंगे तुमे हम् । उसका जरा नही गम ॥**
**आषकको छेडके, माषुक को षुबा है । शानें खुदा है ॥१॥ दिल्०॥**

झेब्बुन्निसा-शहाजादी आपल्या महालांत गझल् गात होती—गुणगुणत होती ! त्या गुणगुणण्यात ती स्वतःला, जगाला, इतकेंच नव्हे तर संपूर्ण विश्वाला विसरून गेली होती झेब्बुन्निसेला गाण्याची आवड विलक्षण ! स्वतः कवयित्री बापाची अतिशय लाडकी ! शहानशहा औरंगजेबाला जितका गाण्याचा तिट्कारा तितकीच शहाजादीला गाण्याची आवड ! एवढा करडा औरंगजेब कीं, ज्यानें ' गायनकला मेली आहे ' असें कोणी सांगितलें तर त्याला 'तिला इतकी खोल पुरा कीं तिनें पुन्हां केव्हांही वर भेटूं नये,' असें सांगावें, त्यालाच तो आजारी असताना शहाजादीनें त्याच्या उराशीं बसून कुराणाचा सहवास गोड गळ्यानें ऐकवून आपण त्याच्याकडून शाबासकी व मोठें बक्षीस मिळविलें होतें

तीच ही झेब्बुन्निसा आज स्वतःच्या करमणुकीखातर, जीवरंजनाकरितां भावी प्रियकराची मूर्ति कल्पनाचक्षूपुढें आणून सुरवातीचा गझल् गात होती. तें तिचें प्रेम-गाणें होतें, वेडगाणें होतें त्या गाण्यांत ती तदाकार तल्लीन झाली होती. ती स्वतः, तिचें तें प्रणयगीत, आणि तिचा कल्पनाचक्षूपुढें खेळणास प्रियकर, एवढ्याचीच जेमतेम जाणीव तिला होती.

**" दिल् नहि काबुमें— "**

या पदाचें तिचें घोळून घोळून गाणें चालू असतां तिच्या सभोंवताली असें कांहीं वातावरण तयार होत होतें कीं, त्या वातावरणाचा स्पर्श ज्याला ज्याला होईल त्याला

त्याला त्याच्या सुखसंवेदना व्हाव्यात. ते स्वरच असे वातावरणांत उठत होते कीं, त्यामुळें शुद्ध भावनेच्या, खऱ्या प्रीतीच्या, हृदयतारा आपोआप छेडल्या जात होत्या

" आषकको छेडके माषुकको षुवा है ! "

शहाजादी हें चरण म्हणत होती. तें म्हणताना तिच्या मुखचंद्रावर तिला न कळत हास्याचें–मधुर हास्याचें–नितांत प्रेमळ हास्याचें, तेज झळकत होतें ती कल्पनेच्या दृष्टीसमोरच्या प्रियकर मूर्तीला लडिवाळपणानें छेडीत होती, तशीच उलट ती कल्पना-मूर्तीही पण शहाजादीची तारंबळ उडवून देत होती

गझल् गात असतां शहाजादी एकाच ठिकाणीं बसली नव्हती तिच्या मनोव्या-पाराप्रमाणें शरीराचीही हालचाल एकसारखी चालली होती. केव्हां गुणगुणत महालांत येरझारा हलक्या पावलांनीं घालाव्यात केव्हां खिडकींत शून्य दृष्टीनें–चिकाच्या पड-द्यातून–कुठें तरी पहात किती वेळ तरी उभें राहावें. किती वेळां उघड्या सौधावर जाऊन यमुना नदी दिसे, तिकडे पहात असावें. तोंडानें गुणगुण चाललेलीच आहे.

अशा रीतीनें झेब्बुन्निसा आज नेहमींपेक्षां गझल् गात असतांना जास्तच बेहोष झाली होती. इतकेंच नव्हे तर तिच्या त्या गुणगुणण्याच्या मधुर स्वरानें तेथें आणखी एक व्यक्ति बेहोष होत चालली होती.

झेब्बुन्निसेचें सभोंवतीं लक्षच नव्हतें पण दुसरी व्यक्ति अजून तितकी बेभान झाली नव्हती. झेब्बुन्निसेच्या हालचालीवर, गुणगुणण्यावर, तिच्या चेहऱ्यावर, क्षणाक्ष-णाला बदलणाऱ्या प्रेमाच्या लहरीवर त्या व्यक्तीची दृष्टि खिळून राहिली होती! झेब्बुन्निसा शहाजादी गात गात डोलत होती दुसरी व्यक्ति ऐकत ऐकत डोलत होती.

शहाजादी गाण्याच्या तंद्रेंत—" दिल् नहि काबुमे तो क्या " या पालूपदावर आली आणि काय झालें कोणास माहित, दुसरी व्यक्ति या वेळीं आवर न राहून ' खुद् 'कन् हंसली ! ती हंसायला आणि शहाजादी वळून तिच्या जवळ यायला एकच गांठ पडली. शहाजादीच्या कानीं तिचें खुद्कन् हंसणें गेलें. प्रफुल्लित मुख तिच्या दृष्टीस पडलें शहाजादी तेथेंच थबकली. त्या व्यक्तीकडे स्थिर दृष्टीनें तिनें रोख लावला. सर्वत्र प्रेममय वातावरण पसरलें होतें. शहाजादीला त्या वेळीं राग येणें शक्य नव्हतें, तर त्या दुसऱ्या व्यक्तीला शहाजादी आपल्यावर रागवेल अशी बिलकुल भीति वाटत नव्हती!

गुणगुणणें थांबलें आणि शहाजादीनें त्या व्यक्तीला विचारलें,

" काय ग अमिने हंसलीसशी ? "

" बंदगी सरकार !—आपलं उगीच हंसू आलें. " अमिनेनें कांहीं तरीच सांगितलें.

" उगीचच ? छे ? मला नाहीं खरं वाटत. तूं कांहीं तरी लपवितेस. खरं सांग, का हंसलीस ? " शहाजादीनें पुन्हा विचारलें.

" खरं सांगूं ? "

" हं ! "

" सरकार रागवणार नाहींत ना ? "

" वेडी कुठली ! अमिने, मी तुझ्यावर आजवर कधीं रागावलें आहें ? "

" सरकारांचा दिल आज विशेष खूष आहे असं दिसलं न् हसूं आलें ! सरकारांचं सुन्दर संगीत ऐकतांना असं वाटतंय्—"

" काय वाटतय् ग ? " अधीर होऊन शहाजादीनें पृच्छा केली.

" कीं सरकारांच्या हृदयसिंहासनावरची मूर्ति त्यांच्या समोर खेळत आहे ! " अमिनेनें हंसत मुरडत सांगितलें.

" चल चहाटळ कुठली ? " शहाजादींच्या गालाला किंचित् खळी पडली. लाजेची गुलाबी लकेर चमकन् गालावरून चमकली. खोट्या रागानें शहाजादीनें अमिनेचें बोलणें फेटाळून लावलें.

" सरकारांना माझ्या बोलण्याचा राग आलाच वाटतं ! " अमिना हिरमुष्ट आवाजांत उद्गारली. " चूक झाली, कसूर माफ असावी सरकार ! "

" वा· ! " शहाजादी अमिनेला बिलगून, तिच्या पाठीवर हलकेच एक हात ठेऊन आणि दुसऱ्या हातानें अमिनेच्या गालावर मृदू टिचकी देत म्हणाली, अमिना, बरीच कीं ग आहेस ! म्हणे, माझ्या हृदयसिंहासनावरची मूर्ति ! कोण ग माझ्या सिंहासनावर बसलं आहे ? "

" सांगूं का ? "

" सांग ना ? "

" फिरून सरकाराना राग येईल ? "

" मुळींच नाहीं ! अमिने, राग तर रहूंच दे. पण शहाजादीच्या हृदयाचा कब्जा घेऊं पाहणारा—त्या सिंहासनावर विराजमान होणारा—शहानशहा कोण आहे ओळख बरें ! ओळखलस तर मी खरें म्हणेन आपखी अमिनेला बक्षीस बहाल करीन ! " शहाजादीनें आश्वासन दिलें. अमिनेला याही वेळीं हंसूं आलें. ती आपलें हंसें दाबीत

मिनतवारीनें म्हणाली, " गरीबपरवर बोलून चालून गरीब माणूस ! मी काय सांगणार आणि कसं सांगणार ? पण आज्ञाच होते आहे तर सांगतें बापडी ! "

" सांग तर ! जलदी सांग " शहाजादी फारच अधीर होऊन गेली.

" परवां शहानशहांनीं खास वैभवाचा दरबार ज्यांच्याकरितां भरविला, शहानशहांनीं त्या दरबारात कमी दर्जाच्या सरदारात उभे राहावयाला सांगून ज्यांचा अपमान केला, त्या अपमानानं चिडल्यानं ज्यांचा तेथेंच तरवारीला हात गेला, आणि साऱ्या दरबाराला ज्यांचा शब्द घनगर्जनेसारखा गंभीर वाटून सारा दरबार चित्रासारखा क्षणभर तटस्थ झाला, ज्याला गडबडून जाऊन शहानशहांनीं सध्यां नजरकैदेंत–रामसिंगाच्या वाड्यात ठेविलं आहे, त्या दख्खनच्या वीरसिंहाची–शिवाजीराजाची मूर्तीच सरकारांच्या डोळ्यासमोर सरकारांचं गाणं उभी करीत होतं ! " अमिनेनें आपल्याला वाटलें तें जसेंच्या तसेंच सांगितलें. अमिना बोलत होती, शहाजादी ऐकत होती, शिवाजी महाराजांसबधीं एकेक वाक्य जसजसें अमिना उच्चारूं लागली, तसतशी आनंद, सौख्य, लज्जा, उत्सुकता, शालीनता, वगैरेंची मारे एकच गर्दी शहाजादीच्या मुखावर उडून राहिली. तें सुदर दृश्य अमिना पहात होती, तर उलट शहाजादी आपलें प्रतिबिंब जसेंच्या तसेंच अमिनेच्या चेहऱ्यावर न्यहाळीत होती ! अमिनेचा चेहरा खुलून येत होता. प्रफुल्लित होत होता.

" होय ! होय अमिने ! शहाजादीच्या दिलाचा दिलवर तोच ! तूं बरोबर ओळखलंस ! खरी प्राणसखी आहेस तूं माझी ! अमिने कसं ग तूं हें ओळखलंस ? " शहाजादीनें तिच्याकडे मदनाच्या कैफानें धुद झालेल्या डोळ्यांनीं पहात विचारलें.

" सरकार ! आपलं गाणंच इतकं सुन्दर होतं. त्या गाण्याचा झंकारच असा होता कीं, कोणाही प्रेमी जीवाचा प्रियकर पुढं उभा राहावा ! त्यावरनं मी ओळखलं ! आणखी—" अमिना मध्येंच थांबली.

" आणखी काय अमिने ? " शहाजादीनें विचारलें, " आणखी काय ! "

अमिनेनें या वेळीं सांगत असतांच आपलें मुख अवनत केलें. तिच्या गालावर लज्जेची शराब सांडल्याचा भास झाला. त्याही स्थितींत शहाजादीला कांहीं तरी निराळें वाटलें. " कोणाही प्रेमी जीवाचा प्रियकर पुढं उभा रहावा " असें अमिना म्हणाली, इतकेंच नव्हे, तर त्याच वेळीं तिच्या गालावरचा गुलाबही फुलला ! शहाजादी किती चतुर, हुषार, चाणाक्ष ! तिच्या लक्षांत ती गोष्ट आल्या खेरीज कशी राहाणार ?

" अमिने " शहाजादीनें अमिनेच्या हनुवटीला हात लावून वर करून, आपल्याकडे पहावयाला तिला भाग पाडून म्हटलें, " कोणाही प्रेमी जीवाचा प्रियकर पुढं उभा राहावा म्हणजे ग ? माझ्या गाण्याच्या झंकारानं माझं जस झाल, तसच तुझं झालं का ? हो, झालच आहे ! झालंच आहे. मी ओळखलं ! अमिने, बरीच कीं ग आहेस ! माझ्यापासून देखील दडवून ठेवलस ना ? तुझ्या जीवाचा प्यार ! माझ्या जिवलग अमिनेचा आशक–कोण बरं ? "

शहाजादीच्या या बोलण्यानें बिचाऱ्या अमिनेची काय गत झाली ! एकाद्या महान् अपराध्याची अपराध शाबीद झाल्यावर जी स्थिति होत असेल तीच हुबेहुब अमिनेची झाली. आपलें बिंग ओळखलें असें वाटून अपराधाची क्षमा मागण्याकरिता अमिनेनें शहाजादीचे झट्दिशीं पाय धरले आणि म्हटलें, " सरकार, अपराधाची माफी करावी. चूक होऊ नये पण झाली. अमिनेचा अपराध पोटात घालावा !–सरकाराप्रमाणेंच माझी अवस्था झाली आहे. "

" वेडी नाहीं तर ! " अमिनेच्या गालावर हलकीच चापट मारीत शहाजादी म्हणाली, " त्यांत अपराध कसला ? कुणावर तरी प्रेम करण्याचा–जीव कुर्बान करण्याचा जर शहाजादीला हक्क आहे, तर तो अल्लाच्या कृपाछत्राखालीं अमिनेलाही आहेच ! अमिने, शहाजादीच्या जिवाचा बादशहा तूं ओळखलास, पण तुझ्या जिवाचा राजा मला ओळखता आला नाहीं, तर तूंच सांग तुझ्या जिवाचा कलिजा कोण हें कळल्यानं शहाजादीला आनंदच होईल ! "

शहाजादीच्या या शब्दानीं अमृतधाराचा वर्षावच आपल्यावर होत आहे असें अमिनेला वाटलें. तिला धीर आला. भीति मावळली मग तिनें आढेवेढे घेतले नाहींत '

"सरकार ! काय सांगूं, दख्खनचे वीर भारीच खट्याळ असतात हो ! ' अमिना.

" म्हणजे ग ? "

" आमची मन खुशाल चोरून नेतात ' आणखी वाटेल तसे मग आमचे हाल करतात ! बोलत नाहींत, चालत नाहींत, भेटत नाहींत, चांगलं का हें ? " अमिना म्हणाली.

" अस्सं ! अमिने, किती चाणाक्ष आहेस तूं ! " शहाजादी दिल्खुषीनें म्हणाली, किती थोडक्यात सगळं सांगितलस ग ' तुझा आशक दख्खनचा वीर

आहे पण तो तुझ्याकडे पहात नाहीं, बोलत नाहीं, भेटत नाहीं. अग, वा ग वा ! इतकं सांगितलंस, पण नाव नाहींच सांगितलंस !—"

" सरकार विचारतातच तर सांगतें. दख्खनच्या शिवाजी राजांचा उजवा हात— त्यांचं नांव म्हणे कायसंसं—नथुजी का ने—ता—जी—असं—" अमिना पदराशीं खेळत खालीं पहात सांगत होती.

नांव ऐकलें ! शहाजादीला आनंद झाला ! अमिनेनें शिवाजीच्या उजव्या हाताची निवड केली, हें तर तिला फारच आवडलें. या क्षणीं दोघींची स्थिति मात्र एकसारखीच होती शहाजादीला श्रीशिवाजी महाराजांना प्रत्यक्ष भेटण्याबोलण्याची इच्छा होती, पण तसा प्रसंग आला नव्हता ! नेताजी व अमिना यांचेंही असेंच होतें. शुद्ध-प्रेमाचा प्रभाव काय असतो, हें शहाजादीला समजलें होतें, अमिनेच्यामुळें तें पटलें होतें. आतां अमिनेच्या प्रेमाचा साठा तिचा तिला मिळो, दुसऱ्याचें बरें चिंतलें म्हणजे आपलेंही बरें होतें, असेंच शहाजादीच्या मनात येत होतें.

ती आतां कांहीं प्रीतीचें विशेष गुज अमिनेजवळ करूं लागली. अमिना 'हूं' म्हणून ऐकत होती आपलें गुपित कळलें तरी तें शहाजादीला आवडलें या जाणीवेनें तिला भारीच आनंद झाला होता. ती बोलत असतां मध्येंच अमिनेचें बाहेर लक्ष गेलें. तिचा हुंकार थांबला. तें झेब्बुन्निसेच्या ध्यानांत आलें, तिनें बाहेर पाहिलें, तों रस्त्यानें नेताजीच चालला होता. त्याच्यावर अमिनेचें लक्ष खिळलें होतें, हें तिच्या ध्यानांत आलें. ती हंसली, हलकेंच तिच्या पाठीवर शहाजादीनें हात ठेवीत म्हटलें, " अमिने, अझून नेताजी तुझ्याशीं बोलले नाहींत ना ? मी सांगतें, जा, तूं त्यांची आज भेट घे. ते तुझ्याशीं खात्रीनें बोलतील शहाजादीच्या प्रीतीचा साक्षात्कार तुझ्या मनाप्रमाणें आज घडवील बघ तर खर !—"

" अन् सरकार !—"

" अग अगोदर तूं सुखी—मागून माझं सुख आहेच ! " शहाजादी म्हणालीं अमिनेला केवढा आनंद झाला ! शहाजादीला कुर्निसात करून तिचा आशिर्वाद घेऊन खरोखरीच ती त्या पावलींच राजवाड्यांत कांहीं कामानिमित्त येणाऱ्या नेताजीच्या भेटीसाठीं निघाली ! तिच्या जाण्याच्या वाटेकडे पहात शहाजादीचें फिरून गुणगुणणें सुरू झालें " दिल् नहिं काबुमें तो क्या०—"

× × × ×

श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराजाना दिल्लींत—आगऱ्यांत अटक झाल्या वेळचा हा प्रसंग ! औरंगजेब बादशहानें अनेक युक्त्याप्रयुक्त्या करून, गोड गोड बोलणीं लावून, आश्वासनें देऊन, पेंचांत पकडून, मिर्झाराजाची शक्ति खर्चून, शिवाजी महाराजांना दिल्लीस आणविलें. वैभवशाली दरबार भरवून शिवाजी महाराजाना भेटीला बोलावून त्यांचा तेथें मुद्दाम अपमान केला. महाराज संतापले हात तरवारीकडे गेला. अपमानाची कृति सहन केली जाणार नाहीं, अशी गंभीर गर्जना बादशहाला ऐकविली. महाराज दरबारांतून परत रामसिंगाच्या वाड्यांत आले महाराजाना बादशहानें केलेला अपमान सहन झाला नाहीं. नखशिखांत त्यांच्या अंगाची लाही झाली दोन तीन दिवसांनींच शिवाजी महाराजांना कळलें कीं, आपण ज्या वाड्यांत राहिलों आहोंत, त्या वाड्याच्या सभोंवतीं बादशहाच्या शिपायाचा नंग्या समशेरींचा पहारा आहे आणि आपण बादशहाच्या कैदेंत आहोंत '

हें असें होणार, महाराजाना दगा फटक्याचा संशय होताच ! मासाहेबांनीं पण दक्षिणेंतून निघतांना तसेंच भविष्य वर्तविलें होतें. पण प्राप्तकर्तव्य म्हणूनच महाराजांनीं कांहीं शेलकी मंडळी बरोबर घेऊन दिल्लीस येणें केलें होतें. महाराज आले शेवटीं व्हावयाचें तें झालेंच ! बादशहानें महाराजांना अटक केली आणि बादशहा निश्चिंत झाला. आतां शिवाजीनें आपलेंच ऐकलें पाहिजे, नाहींतर जीवात्मा असेपर्यंत दख्खनचें तोंड शिवाजीला वर्जच, अशी बादशहाची खातरजमा होऊन पर्यायानें त्यानें शिवाजीला तसें सुनाविलें

बादशहाच्या मतानें झाली ही गोष्ट सर्वोत्कृष्टच झाली होती. तो त्याच खुषींत होता. पण त्याला माहितही नव्हतें कीं शिवाजीच्या आपल्या दरबारीं येण्यानें, आपण त्याला आणण्यानें, काय काय अनर्थांच्या गोष्टींचीं बीजें आपण आणून ठेविलीं आहेत ? जो राजकारणाचा डाव बादशहा शिवाजीशीं खेळून गेला होता, तो आपल्या पुढेंमागें बेमालूम अंगलटीसही येईल अशी त्याला कल्पनाही नव्हती भवितव्यता ती हीच !

आपण अटकेंत आहोंत आणि बिनतोड अटकेची बेडी तोडून बेमालूमपणानें दक्षिणेंत सही सलामत पसार झालेंच पाहिजे, जिवावरचा प्रसंग स्वतःच्या कर्तबगारीवरच पार पाडला पाहिजे, या विवंचनेंत शिवाजी महाराज होते, तर त्यांच्या सिद्धीसाठीं त्यांच्या तानाजी, नेताजी, वगैरे बरोबर आलेल्या मंडळींसह एकसारख्या मसलतीच्या बैठकीही चालल्या होत्या. मिर्झाराजांच्या आश्वासनावरून आणि त्यांचा मुलगा रामसिंग याच्या आधारावरच मुख्यतः महाराजांनीं दिल्लींत पाऊल

टाकलें होतें, व बादशहांच्याकडून जसें बोलावण्यात आलें, तसेंच परत पाठवावयाला लावण्याची जबाबदारी रामसिंगावरच होती. शिवाजी महाराज आपापल्या मंडळींत सुटून जाण्याच्या मसलती ज्या काहीं करावयाच्या त्या करीतच होते, तरी वेळोवेळीं रामसिंगाच्या पाठीशीं त्याचा लकडा चालूच होता. औरंगजेबाचा स्वभाव रामसिंगाला माहित नव्हता असें नाहीं, परंतु त्यानें महाराजांच्या सुटकेसाठीं प्रामाणिक प्रयत्न चालविले होते. मोठमोठ्याचे वशिले लाव, महाराजाच्याबद्दल बादशहाचें निश्चित मत काय आहे, याचा ठाव घेण्यांत रामसिंग गुतला होता.

पुढें काय होणार आहे, कसा प्रसंग प्राप्त होणार आहे, याचा अंदाज सध्यां कोणालाच नव्हता जो तो आपापल्या परीनें विचार व सुचेल तशी खटपट करींत होता इतकेंच !

दरबारच्या दिवशीं—दरबारांत शिवाजीमहाराज आल्यावेळीं सर्व दरबार क्षणभर तटस्थ झाला. शिवाजी महाराजांच्या साध्यासुध्या पोषाकापुढें पण तेजस्वितेपुढें बादशाचें अतुल वैभवही फिकें पडल्याचा भास झाला त्या वेळींच सौंदर्याची खाण, सद्गुणाची मूर्ति, पावित्र्याची केवळ पुतळी अशी जिची ख्याती, ती शहाजादी झेबुन्निसा शिवाजी महाराजांना पाहून बेहोष झाली त्याच्या विषयीं तिच्या अंतःकरणांत प्रेमोद्भव झाला. आजवर कधींही न शिवलेली कल्पना तिच्या ठिकाणीं जन्माला आली. शिवाजी महाराजांच्या दर्शनानें, दरबारातील त्यांच्या बाणेदार वर्तनानें शहाजादी दिवाणी झाली ! तिनें मनोमन मन आणि जान महाराजांवरून कुर्बान करून टाकली.

दख्खनचा राजा आपला व्हावा, आपण त्याचें व्हावें, असा सारखा ध्यास शहाजादीला लागला महाराजांची भेट कशी व्हायची ? झाली तर त्यांच्याशीं काय बोलायचें ? ते आपल्याशीं काय बोलतील ? शहाजादीला याच्याशिवाय दुसरें काहीं सुचेनासें झालें. ती आतां स्वतःची राहिली नाहीं ती मनानें महाराजाची झाली. पण बाह्य जगांत तसें खरोखर व्हावयाला किती पर्वताच्या अनुल्लंघनीय अडचणी आहेत, याची तिला मुळींच कल्पना नव्हती महाराजांचा एकच ध्यास शहाजादीला लागला होता. तितक्यांत बादशहानें महाराजांना अटक केल्याचें वर्तमान तिला कोणीसें सांगितलें. शोधाअंतीं रामसिंगाच्या वाड्यांतच कैद झाली आहे असें तिला समजलें.

जसें शहाजादीचें वजन औरंगजेबाजवळ तिच्या पवित्र वर्तनानें होतें, तसेंच रामसिंगालाही औरंगजेब त्याच्या चोख सेवातत्परतेमुळें मान देत असे त्यामुळें प्रसं-

गोपात्त राजवाड्यांत कुठेंही रामसिंगाला जाण्याची पाळी आली तर तो जाई. व झनानखान्यांतून सुद्धां कामानिमित्त त्याला बोलावणें येई.

चालू धामधुमींत शहाजादीची व रामसिंगाची भेट शहाजादीच्या महालातच कारणानिमित्त पडली महाराजांच्या भेटीची तिनें इच्छा दर्शविली रामसिंगानेंही— हिच्या मार्फत बादशहापर्यंत वळण बांधून महाराजांच्या सुटकेबद्दल रदबदली करतां येईल, असा कयास बांधून शहाजादीच्या इच्छेला मान दिला, व शिवाजी महाराजाची गाठ होऊं देण्याची संधि तिला मिळावी, असें सर्व महाराजांच्या कानावर घालून त्यांचेंही आश्वासन मिळविण्याचें त्यानें कबूल केलें

रामसिंगामुळें झेब्बुन्निसेला महाराजांच्या भेटीस जाणें सोपें झालें शहाजादीची भेटण्याची इच्छा, तिचें बादशहावरचें विलक्षण वजन, तिचा सुटकेच्या कामीं बादशहाजवळ शब्दानें होणारा खात्रीचा उपयोग, वगैरे नीट समजावून देऊन रामसिंगानें महाराजांचें मन शहाजादीच्या भेटीला तयार केलें आणि मग भेट घडविण्याची व्यवस्था केली

शहाजादी आपल्याला भेटावयाला येणार आहे असें कळल्यावर व आपणही तिला भेटीला येण्याची परवानगी दिल्यावर, महाराजांचें मन तिच्या भेटीला येण्याच्या कारणाचा शोध करूं लागलें ' ती आपल्याकडे का येत असेल ? तिचा भेटण्यांत हेतु काय ? बादशहाच्या चिथावणीनें कीं प्रोत्साहनानेंच येत आहे ? बादशहा तिला पाठवीत आहे, कीं ती होऊनच यावयाला तयार झाली आहे ? का येत आहे ? आम्हांला अधीकच पेंचात आणण्याचा बादशहाचा हा नवा कांहीं डाव आहे कीं काय ? ' महाराज बाहेरून नेहमींप्रमाणेंच शांत दिसत होते, पण आंतून त्यांचे विचार वरीलप्रमाणें चाललेले होते. शहाजादीच्या पावित्र्याबद्दलची ख्याति महाराजाच्या कानीं होती, त्यामुळें तिला भेटावयास महाराज नाखुष मात्र नव्हते. कसाही प्रसंग असो, आई भवानी निभावून नेणार अशा दृढविश्वासानेंच महाराजांनीं कारभार चालविला होता.

ठरल्याप्रमाणें ठरल्यावेळीं शहाजादी महाराजाच्या मुलाखतीला मोठ्या बंदोबस्तानें आली आंत वर्दी मिळाली. संकोच वाटूं नये म्हणून महाराजांनीं जवळच्या मंडळींना पलिकडच्या बैठकींत जावयाला सांगितलें मंडळी गेली. जरा वेळानें शहाजादी झेब्बुन्निसा आंत आली.

महाराजांच्या समोर येताच "दख्खनच्या राजाचा विजय असो!" अशी झंकारयुक्त वाणीनें घोषणा करीत शहाजादीनें महाराजांना नम्र कुर्निसात केला. शहाजादीला तिच्या इतमामाप्रमाणें योग्य उत्थापन देऊन सत्कार करीत त्यांनीं म्हटलें, "शहाजादी दख्खनच्या राजाचा विजय इच्छिते?"

"होय. त्याला काय हरकत आहे?"

"पण जो दख्खनच्या राजाचा विजय, तोच शहाजादीच्या पित्याचा पराजय आहे. शहाजादीला हें मंजूर कसें आहे?" महाराज म्हणाले.

"जें परवरदिगारला मंजूर तेंच शहाजादीला मंजूर!" शहाजादी म्हणाली. महाराज स्वस्थ बसले. शहाजादीच्या येण्यांत बादशहांचें अंग असावें ही त्यांची शंका शहाजादीच्या उत्तरानें निर्मूल ठरली. आतां तिच्या येण्याचा उद्देश हुडकण्याच्या हेतूनें त्यांनीं विषय बदलून सुरवात केली, "बरं, शहाजादीनें इतकी तसदी कां घेतली आहे?"

"दख्खनच्या राजाच्या दर्शनाकरितां!" तावडतोब उत्तर मिळालें

"दख्खनचा राजा शहाजादीच्या पित्याचा कैदी आहे हें माहित आहे ना शहाजादीला? मग अशा स्थितींत दर्शनाला येणं म्हणजे पिंजऱ्यातल्या प्राण्याला चिडविण्याकरितांच नव्हे काय?" महाराज म्हणाले!

"मुळींच नाहीं अल्लाची कसम?" शहाजादी झट्‌दिशीं तोंडावरची ओढणी बाजूला करून महाराजाच्या पुढें बैठक घेऊन म्हणाली "शहाजादीच्या प्राणाचें फूल दख्खनच्या राजांच्या पायावर वाहाण्यासाठीं आलें आहे!"

शहाजादीच्या मुखावरचें नितांत पावित्र्य व तिचे बोलण्यांत तफावत नव्हती. महाराजाना तें पटलें, पण त्याबरोबर ते आश्चर्यचकितही झाले. राजकारणाच्या दृष्टीनें शहाजादीच्या भेटीचा शेवट कसा काय होतो व कसा काय, करावयाचा, याचा विचार त्यांचें मन करीत असतां शहाजादीनें अनपेक्षित असें भलतेच उद्गार महाराजाना ऐकविले आणि महाराजानाही क्षणभर दिङ्मूढ केलें. महाराज आश्चर्यानें तिच्याकडे पहात आहेत अशा वेळींच शहाजादी बेहोष होऊन पुढें म्हणाली,

"परवाच्या दरबारांत शहाजादीला दख्खनच्या राजानींच घायाळ केलें आहे. त्या जखमेला दुरुस्त करण्याचा दवा शहाजादी राजाच्याकडेच मागावयाला आली आहे!"

"अरेरे!" महाराजांनीं एक दीर्घ सुस्कार सोडला!

“ काय झालं ? — दासीच्या विनंतीचा अनादर नाहीं ना केला ? ” शहाजादीनें महाराजांच्या सुस्काऱ्याचा अर्थ न कळून विचारलें.

महाराजांनीं चालू प्रसगाची पूर्ण कल्पना मनापुढें आणिली. त्याचें महत्व–गैर महत्वाचा चट्कन् साधकबाधक विचार केला आणि शहाजादीशीं बोलायला सुरवात केली.

“ शहाजादी, ”

“ सरकार ! ”

“ शहाजादी, तुझ्या पावित्र्याचा डंका सर्वत्र वाजत असतो, हें आम्हीं ऐकलें आहे. तुला स्वरूपसुंदर करून तुझ्या अल्लानं तुझ्यावर खैर केली आहे हें जितकें खर, तितकेंच सद्गुण आणि पावित्र्यही तुला बहाल करण्यांत अल्लानें कसूर केलेली नाहीं, हें मला मान्य आहे ” महाराज किंचित् थांबले.

शहाजादीला आपला स्वीकार होणार अशी आशा वाटू लागली

“ शहाजादी, तुझ्या पित्याच्या कैदेंत हा शिवाजी आहे त्याच्या डोक्यावर संकटाची नंगी समशेर लटकविली आहे, अशा स्थितींत शहाजादी आपल अंतःकरण शिवाजीपुढें खुलें करीत आहे, यावरून शहाजादीच्या शुद्ध प्रेमाविषयीं, पावित्र्या--विषयीं, निर्मळ मनाविषयीं, शिवाजीला शंका नाहीं. उलट शिवाजी स्वतःला धन्यच समजत आहे !—”

“ धन्य शहाजादी ! ” शहाजादी मध्येंच म्हणाली

“ पण ऐक शहाजादी ! हें तुझ पवित्रप्रेम, पावित्र्य, पाक मन तुला या जन्मांत जसंच्या तसच शाबूद राखल पाहिजे. ” महाराज म्हणाले. तें ऐकून शहाजादीला कसेंसेंच झालें. तिच्या आशेचा उंच मनोरा डळमळू लागला

“ शहाजादी, आम्ही तुझ्या पित्याचे उघडाउघड शत्रु आहोंत. म्हणूनच आम्हावर हा प्रसंग आहे. त्याच्या आमच्यांत हा धर्मांचा झगडा आहे बादशहाला आपला धर्म प्यार आहे. आम्हांला आमचा धर्म प्राण आहे ! तुझ्या पित्याप्रमाणेंच तुला तुझा धर्म प्यार असला पाहिजे. तुझ्या पावित्र्याला लांच्छन लागलं, तर तुझ्या धर्माला मंजूर होणार नाहीं. तीच गोष्ट आमच्या धर्माची आहे ! ”

शहाजादीची पुरी निराशा झाली ! तिच्या मनाचा मनोरा ढासळला ! शिवाजी स्वीकार करीत नाहीं, हें तिला स्पष्ट कळलें. तिच्या डोळ्यांत अंतःकरण कढून येऊन

उष्णाश्रू आले. आपण अभागी आहोंत, असें तिला वाटलें करुणापूर्ण भरल्या नजरेनें तिनें महाराजाकडे पाहिलें. झेब्बुन्निसेचें मन पवित्र होतें प्रेम निरपेक्ष, उच्च, आणि शुद्ध होतें म्हणून तिनें महाराजांचा नकार ऐकतांच सूडाच्या भावनेनें दात करकचले, नाहींत, अगर ती संतापली नाहीं. किंवा कठोर बोलली नाहीं, व्याकुळ मात्र झाली!

महाराजानाही तिच्या व्याकुळ स्थितीची कींव आली पण ते तरी काय करणार? बाकी औरंगजेबासारख्याच्या पोटीं असें रत्न निपजावें याचा महाराजांना अचंबा वाटला वाईट वाटण्याचा पहिला आवेग ओसरला होतें नव्हतें तेवढें किल्मिष पाण्याच्या रूपानें बाहेर पडलें' तिची स्थिति महाराज पूर्ण जाणत होते तेही हलके हलके तिला समजुतीच्या गोष्टी सांगत होतेच.

काहीं वेळानें तिचें मन स्थिर झालें घडला एवढाच महाराजाचा सहवास. आतां पुन्हां नाहीं केव्हांही नाहीं आपल्याला हवा होता, तसा पति आपल्या नशिबीं नाहींच नाहीं. असें नक्की ठरलें' पण शहाजादीचें प्रेम महाराजाच्या चरणीं स्थिर झालें तें झालें! तिथून तें परतणें अगदीं अशक्य होतें महाराजाच्या मंगलनामाचा जप आणि मूर्तीचें ध्यान करीत उभा जन्म घालवावयाचा, असा सत्संकल्प मनाला करावयाला लावून शहाजादीनें महाराजांचा निरोप घेतला महाराजांनींही सत्कारपूर्वक निरोप दिला. जातांना शहाजादीनें "बादशहापासून सावध रहाव" असा इशारा मात्र देण्यास ती विसरली नाहीं!

शहाजादीची आणि महाराजांची भेट संपली शहाजादी आली तशी निघून गेली येताना काय विचार करीत ती आली होती आणि जातांना कोणते विचार करीत गेली?

दिव्यत्वाच्या सहवासानें चकीत झालेले महाराज क्षणभर आपण राजकारण, धर्माधर्म, सुखदुःख, इहपर, आपपर, याच्या अतीत झालों होतों, असेंच कांहीं तरी पुटपुटले! त्याचा अर्थ काय असेल?

× × × ×

रानदांडगा नेताजी सहज चालला असला तरी दाण्‌दाण् असा आवाज दुमदुमत असे. राजवाड्याच्या कुठच्याही भागात तर फरसबंदीमुळें तो आवाज अधिकच घुमायचा. नेताजीला कुठली त्याची कदर? आग्र्यांत देखील त्याचें चालणें वागणें अगदीं बेगुमान असायचें. कसलीही भीति नाहीं, कीं डर नाहीं स्वतः आपले महाराज नजरकैदेंत असल्यासारखे आहेत, राबता बंद झाल्यासारखा झाला आहे तरी

त्याची गुमान कुणाला होती ? " हूं " म्हणूनच जो तो पुढें जात होता. बादशहाच्या हातावर तुरी देऊन तेव्हांच पसार होऊ असें प्रत्येकाला खात्रीनें वाटत होतें. आग्र्यांतून राजरोस हिंडणें फिरणें महाराजांच्या लोकांचें चाललेंच होतें !

नेताजी कसल्याशा कामाला राजवाड्यांत निघाला होता अमिनेचें लक्ष त्याच्याकडे गेलें. शहाजादीच्या ती गोष्ट लक्षांत आली त्याच दिवशीं शहाजादीचा सकेत महाराजांची भेट घ्यावयाचा ठरला होता. त्या आनंदांत ती गझल गात होती त्या वेळींच अमिनेच्या आषकाचा तलास शहाजादीला लागला होता महाराजांशीं बोलावयाला शहाजादीला आज मिळणार होतें, त्या आनंदाच्या भरांतच अमिनेलाही तिच्या आषकाला भेटण्याची परवानगी शहाजादीकडून मिळाली होती. तिचा आषक तिच्या प्रीतीच्या सवालाला प्रेमाचा जबाब देईल, असा आशिर्वाद सुद्धां अमिनेला मिळाला होता म्हणून नेहमींपेक्षां शतपट उत्साहानें, उल्हासानें अमिना आपल्या आषकाला हटकावयाला निघाली

त्या दिवसापासून अमिना नेताजीचें आपल्याकडे लक्ष वेधावें, त्यानें थाबावें, आपल्याशीं बोलावें, म्हणून नाना युक्त्या योजीत असे पण का कोण जाणे, अजूनपर्यंत तिच्या प्रयत्नाला यशच आलें नव्हतें नेताजीच्या जाण्यायेण्याच्या ठरावीक रस्त्यावर त्या वेळी आपण मुद्दामच जवळ कुठें तरी असावें मुद्दाम त्याच्या समोरून, पुढूनपुढून, किंवा पाठीमागून चालण्याची संधि साधावी, मुद्दामच थबकावें. पण अहं ! नेताजीचें तिच्याकडे लक्ष जाईल तर शपथ ! त्या सरळ शिपाईगड्याला आपला नेहमीं नाकासमोरचा रस्ता दिसावयाचा ! इकडेतिकडे लक्षच मुळीं जायचें नाहीं असें नेहमीं चाले अमिना अगदीं कंटाळली होती आपला आषक आपल्याकडे पहात सुद्धां नाहीं म्हणून ती अल्लाला शिव्या देण्याच्या बेताला आली होती. तोंच आज तिच्या धनीनीचा तिला आशिर्वाद मिळाला होता. तिला आज केवढा हुरूप आला किती जलदीनें ती नेताजीच्या पाठोपाठ गेली. वेडी वाकडी, अधूनमधून, घाईघाईनें ती नेताजीच्या वरीच पुढें गेली एका खांबाच्या आड उभी राहिली. वरचेवर चोरून खांबाच्या आडून नेताजी किती जवळ आला आहे हें पाहूं लागली पायाचा दाण्‌दाण् आवाज जवळ जवळ येऊं लागला अमिनेचें हृदय धडधडूं लागलें नेताजी झपाझप पावलें टाकीत पुढें चालला. आतां ? अमिनेनें काय करावें ? तिनें नेताजीचें लक्ष वेधण्यासाठीं ज्या खांबाआड ती लपून उभी होती त्या खांबावर टिचक्या जोरजोरानें मारल्या. पण त्याच्या पावलाच्या त्या दणदणाटापुढें टिचक्यांचा

आवाज कसा ऐकावयाला जाणार ? नेताजी पुढें तसाच झटकला ! अमिना किंचित् निराश झाली पण पुन्हां तीही निघाली. खांबामधून मधून जात जात आणखी नेताजींच्या पुढें आली. आतां तिनें निराळीच युक्ति योजिली. खांबाच्या आड उभें राहावयाचें, टिचक्या वाजवावयाच्या, खांकरायचें, शिंकरायचें वगैरे सोडून धिटाईनें ती नेताजीच्या समोर आली. आणि झट्‌दिशीं पायाला कायसेंसें बोचल्याचें निमित्त करून वाटेंतच तिनें बैठक घेतली अमिना वाटेंतच बसली इतक्यांत नेताजी तेथें धडकला ! तो जवळ येतांच त्वरा करून अमिना उभी राहिली. बाजूस मात्र सरली नाहीं नेताजीचें पुढचें पाऊल पुढें आणि मागचें मागें, असाच त्याचा पवित्रा राहिला. नेताजीकडे अमिनेनें अशा कांहीं गहिऱ्या नजरेनें निमिषमात्र पाहिलें कीं, नेताजीला आपण जागे नसून स्वप्नांतच आहोंत असा त्या निमिषातच भास झाला ! त्यानें आपलें डोकें झडझडून हलविलें व स्वतःला जागें केलें खराच तो जागा झाल्यासारखा झाला, तरी वस्तुस्थिति तीच ! अमिना पुढें उभी आहेच ! वाटेंतच उभी असल्यामुळें नेताजीला तिला विचारणें भाग पडलें, " कोण तूं ? "

" अमिना " ? मंजुळ आवाजांत नांव सांगितलें.

" अमिना ? कोण अमिना ! "

" शहाजादीसाहेबाची दासी ! "

" असेल ! बरें मग ? "

" मग ? " मग काय ? अमिनेनें काय सांगायचें ? शहाजादीचा आशिर्वाद खरा झाला होता, यातच ती गारीगार झाली होती.

" सरदारसाहेबांच्या पायाजवळ एक अर्जी आहे गरिबाची ! "

" माझ्या जवळ ? अर्जी ? कसली ? काय सबंध ? " नेताजीची तर त्रेधाच उडाली. अमिना कांहीं कमी सुन्दर नव्हती, कीं कमी चतुरही नव्हती. तिचा आषक तिला भेटला. तिच्याशीं बोलूं लागला. आतां ती त्याला जाळ्यांत गुंतवल्याखेरीज कशी राहील ? स्त्रिया जात्याच चतुर आणि धाडसी असतात. प्रेमाच्या संबंधांत तर त्यांचे हे गुण चांगलेच निदर्शनाला येतात. एकदां त्यांनीं एकादी बाब आपलीशी करावयाची म्हटलें कीं, त्या सहसा ती गोष्ट घडून येईपर्यंत तिचा पिच्छा सोडावयाच्या नाहींत. अमिनेनें असेंच केलें नेताजीला गाठलें. त्याला आपल्याशीं बोलायला भाग पाडलें इतकेंच नव्हे तर त्याला चांगलेंच गोंधळांत पाडलें उपटसुंभ शिपाई तो. त्याला काय स्त्रियांचे पाचपेंच माहित अमिनेनें समोर येऊन नेत्रकटाक्षानें नेताजीला खरो-

खरीच घायाळ केलें. काय झालें हें नेताजीला समजलें नाहीं. आजवर कधींही न आलेली कल्पना त्याच्या डोक्यात चमकून गेल्याची जाणीव मात्र त्याला झाली !

" कसली अर्जी आहे तुझी ? " नेताजीनें अमिनेला विचारलें.

" माझी एक चीज चोरीला गेली आहे ! "

" बरं मग ? "

" एका दख्खनच्या सरदाराच्या हातीं ती गेली आहे ! "

" काय दख्खनच्या–आमच्यापैकीं सरदाराच्या हातीं तुझी चीज ? "

" होय !"

" मग मी काय करू ? "

" ती माझी चीज तरी मला त्या सरदाराकडून परत मिळवून द्यावी नाहीं तर—"

" नाहीं तर काय ?—"

" त्या सरदाराला तरी आमच्या स्वाधीन करावा. हीच अर्जी आहे माझी ! "

" पण तुझी चीज काय आहे ? आणि आमच्यापैकीं कोणचा सरदार ? "

" काय सांगूं सरदारसाहेब ! आपण अर्जीचा विचार करीत असाल, तर सांगण्याचा उपयोग ? सरदारसाहेब विचार करतील काय ? "

" पण सांगशील तर अगोदर ! "

" अगोदर नाहीं. मला सरदार साहेबांच्या आश्वासनाच वचन पाहिजे. " अमिनेच्या गोड गोड बोलण्याला नेताजी भाळला–भुलला ! त्यानें वेड्यासारखें आश्वासनाचें वचन सुद्धां त्या भरांत देऊन टाकलें. शिपाई हे असेच !

" हं, बोल जलदी तुझी मर्जी ! मला उशीर होतो आहे आणखी. " आश्वासनाचें वचन दिल्यावर नेताजी घाई करूं लागला.

" पण सरदारसाहेब—"

" आणखी काय तुझं म्हणणं ? "

" माझी चीज परत द्यायला लावतांना किंवा सरदारसाहेबांना माझ्या स्वाधीन करतांना त्या सरदाराच्यावर रागावयाचं नाहीं बरं का ? जपूनच वागवावयाच ! "

" काय चमत्कारिक आहेस तूं ! त्या सरदारावर रागावूं नका म्हणे ! मी त्याला कसाही वागवीन. त्याच्याशीं तुला काय करावयाचें आहे ? तुझी चीज चोरणाऱ्या सरदाराला जपून वागवायला सांगायचं तुला कारण ? " नेताजीनें गडगडत विचारलें.

आवाज कसा ऐकावयाला जाणार ? नेताजी पुढें तसाच झटकला ! अमिना किंचित् निराश झाली. पण पुन्हां तीही निघाली खांबामधून मधून जात जात आणखी नेताजीच्या पुढें आली. आतां तिनें निराळीच युक्ति योजिली. खांबाच्या आड उभें राहावयाचें, टिचक्या वाजवावयाच्या, खांकरायचें, शिंकरायचें वगैरे सोडून धिटाईनें ती नेताजीच्या समोर आली. आणि झट्‌दिशीं पायाला कायसेंसें बोचल्याचें निमित्त करून वाटेंतच तिनें बैठक घेतली अमिना वाटेंतच बसली इतक्यांत नेताजी तेथें धडकला ! तो जवळ येतांच त्वरा करून अमिना उभी राहिली बाजूस मात्र सरली नाहीं. नेताजीचें पुढचें पाऊल पुढें आणि मागचें मागें, असाच त्याचा पवित्रा राहिला नेताजीकडे अमिनेनें अशा कांहीं गहिऱ्या नजरेनें निमिषमात्र पाहिलें कीं, नेताजीला आपण जागे नसून स्वप्नांतच आहोंत असा त्या निमिषांतच भास झाला ! त्यानें आपलें डोकें झडझडून हलविलें व स्वतःला जागें केलें खराच तो जागा झाल्यासारखा झाला, तरी वस्तुस्थिति तीच ! अमिना पुढें उभी आहेच ! वाटेंतच उभी असल्यामुळें नेताजीला तिला विचारणें भाग पडलें, " कोण तूं ? "

" अमिना " ! मंजुळ आवाजांत नांव सांगितलें.

" अमिना ? कोण अमिना ! "

" शहाजादीसाहेबांची दासी ! "

" असेल ! बरें मग ? "

" मग ? " मग काय ? अमिनेनें काय सांगायचें ? शहाजादीचा आशिर्वाद खरा झाला होता, यांतच ती गारीगार झाली होती.

" सरदारसाहेबाच्या पायाजवळ एक अर्जी आहे गरिबाची ! "

" माझ्या जवळ ? अर्जी ? कसली ? काय संबंध ? " नेताजीची तर त्रेधाच उडाली. अमिना कांहीं कमी सुन्दर नव्हती, कीं कमी चतुरही नव्हती तिचा आधक तिला भेटला तिच्याशीं बोलू लागला. आतां ती त्याला जाळ्यांत गुंतवल्याखेरीज कशी राहील ? स्त्रिया जात्याच चतुर आणि धाडसी असतात. प्रेमाच्या संबंधांत तर त्याचे हे गुण चांगलेच निदर्शनाला येतात. एकदां त्यानीं एकादी बाब आपलीशी करावयाची म्हटलें कीं, त्या सहसा ती गोष्ट घडून येईपर्यंत तिचा पिच्छा सोडावयाच्या नाहींत. अमिनेनें असेंच केलें नेताजीला गांठलें. त्याला आपल्याशीं बोलायला भाग पाडलें इतकेंच नव्हे तर त्याला चांगलेंच गोंधळांत पाडलें. उपटसुंभ शिपाई तो त्याला काय स्त्रियांचे पाचपेंच माहित अमिनेनें समोर येऊन नेत्रकटाक्षानें नेताजीला खरो

खरीच घायाळ केलें काय झालें हें नेताजीला समजलें नाहीं. आजवर कधींही न आलेली कल्पना त्याच्या डोक्यांत चमकून गेल्याची जाणीव मात्र त्याला झाली!

" कसली अर्जी आहे तुझी ? " नेताजीनें अभिनेला विचारलें.

" माझी एक चीज चोरीला गेली आहे ! "

" बरं मग ? "

" एका दख्खनच्या सरदाराच्या हातीं ती गेली आहे ! "

" काय दख्खनच्या—आमच्यापैकीं सरदाराच्या हातीं तुझी चीज ? "

" होय !"

" मग मी काय करू ? "

" ती माझी चीज तरी मला त्या सरदाराकडून परत मिळवून द्यावी नाहीं तर—"

" नाहीं तर काय ?—"

" त्या सरदाराला तरी आमच्या स्वाधीन करावा. हीच अर्जी आहे माझी ! "

" पण तुझी चीज काय आहे ? आणि आमच्यापैकीं कोणचा सरदार ? "

" काय सांगूं सरदारसाहेब ! आपण अर्जीचा विचार करीत असाल, तर सांगण्याचा उपयोग ? सरदारसाहेब विचार करतील काय ? "

" पण सागशील तर अगोदर ! "

" अगोदर नाहीं. मला सरदार साहेबांच्या आश्वासनाच वचन पाहिजे " अभिनेच्या गोड गोड बोलण्याला नेताजी भाळला—गुंगला ! त्यानें वेड्यासारखें आश्वासनाचें वचन सुद्धां त्या भरांत देऊन टाकलें. शिपाई हे असेच !

" हं, बोल जलदी तुझी मर्जी ! मला उशीर होतो आहे आणखी. " आश्वासनाचें वचन दिल्यावर नेताजी घाई करू लागला.

" पण सरदारसाहेब—"

" आणखी काय तुझं म्हणणं ? "

" माझी चीज परत द्यायला लावतांना किंवा सरदारसाहेबाना माझ्या स्वाधीन करतांना त्या सरदारांच्यावर रागावयाचं नाहीं बरं का ? जपूनच वागवावयाच ! "

" काय चमत्कारिक आहेस तूं ! त्या सरदारावर रागावूं नका म्हणे ! मी त्याला कसाही वागवीन. त्याच्याशीं तुला काय करावयाचें आहे ? तुझी चीज चोरणाच्या सरदाराला जपून वागवायला सांगायचं तुला कारण ? " नेताजीनें गडगडत विचारलें.

" कारण ? दख्खनी सरदार मला फार आवडतात ! मला फार प्यार असतात ! मी दख्खनच्या सरदाराना फार चाहतें ! " अमिनेनें आपली जिभली अगदीं सैल सोडली होती नेताजीवर आपली छाप पडत चालली आहे हें ओळखल्यावर ती वाटेल तशी बोलायला कां कमी करील ?

" खर सांगतें सरदारसाहेब, दख्खनच्या सरदारासारखे दख्खनीच सरदार ! त्याची सर दुसऱ्या कुणाला नाहीं यायची ! " अमिना ह्मणाली.

" अरे वा ! मग काय एकाद्या दख्खनी सरदाराबरोबर निका तर लावायचा तुझा विचार नाहीं ? " नेताजीनें तिची थट्टा केली काय थट्टा केली पण आपण ! असें वाटून आपणच खोखो करून तो हंसला अमिना मनाशीं पुटपुटली, " तीच तर अल्ला-जवळ विनवणी आहे. "

" हं, आटप सुनाव तुझी अर्जी झटपट ! " नेताजीनें फिरून घाई केली, "कसली तुझी चीज ? कोणत्या सरदारानें लांबीवली आहे ? "

" माझी चीज—ची–ज–सरदारसाहेब, अमिनेचं म–न ! "

" अस्सें ! "

" अन्—"

" अन् काय ? "

" माझं मन चोरणारे सरदार—" अमिना पायाच्या आंगठ्यानें जमीनीवर रेघोट्या काढीत, दांतात पदराचें टोंक चघळीत म्हणते, " नेताजी पालकर म्हणून आहेत ! "

" एँ ? काय ? " नेताजी चकीतच झाला ! बोलतां बोलतां अमिनेनें आपल्याच गळ्यांत घोंगडें आणलें, हें पाहून त्याचा चेहरा पाहण्यासारखाच झाला त्याची तारं-बळ उडाली अमिनेची तिकडे तारंबळ उडाली हसूही आलें. आतां नेताजी झिड-कारतोय् कीं स्वीकारतोय् , याबद्दल तिला कांहींच कळेना म्हणून तिचा जीव खालींवर होऊं लागला.

" तेवढें माझं मन परत द्यायला सांगावं, नाहीं तर नेताजी पालकरांना—त्या सरदारसाहेबांना माझ्या स्वाधीन करावं !—कां ? सरदार साहेबांच्या राग झाला वाटत ? पण माझ्यावर, का नेताजी पालकर सरदारसाहेबांवर ? पण मी अगोदरच त्यांच्या-वर रागावयाचं नाहीं म्हणून विनंति केलीच आहे "

" पण तूं कोण नेताजीची ? " घुस्शानें नेताजीनें विचारलें.

" मी ? नार ! " अमिनेनें बोलण्याचें धाडस केलेंच !

" नार ? वा ! छान ! शाबास ! " नेताजी उपरोधीपणानें म्हणत होता. " अन् तुझा तो कोण ? "

" प्यार ! त्यांनीं होय म्हटलें तर अल्लाची कसम घेऊन सांगतें, मी त्यांच्याशीं मोठ्या आनंदानें निका लावणार आहें. सरदारसाहेब, त्याना सांगा, अमिनेचें मन तरी परत द्या, नाहीं तर अमिनेशीं निका तरी लावा. मी तयार आहें. माझ्या धनींनीची मला परवानगी आहे. मग काय करतां ? " अमिनेनें चांगलीच लगट केली.

नेताजी तर जागच्या जागीं ' काय हें अनपेक्षित झालें ? ' म्हणून थयथय नाचा-यलाच लागला ! शूर शिपाई गड्याला, सरळ उघड्या मनाच्या माणसाला, सुन्दर तरुणी अशाच हाताबोटावर सारख्या नाचवीत असतात ! नेताजीला आता स्वतःचा स्वतःला राग आला होता एका मोंगल तरुणीच्या पकडींत आपण बेछूट अडकलों आहोंत, याची त्याला आतां आठवण झाली ! काय करणार बिचारा ! इकडे आड तिकडे विहीर अशी त्याची अवस्था झाली. अमिनेवर त्याला धड रागावयाला सुद्धां येईना ! तिचें सारंच बोलणें गोड गोड ! ती आपल्यावर निस्सीम प्रेम करते आहे. आपण होऊन प्रेम बोलून दाखवीत आहे. आणि असें असतां आपण तिच्यावर रागा-वायचें ? आपण तिला धुडकावयाचें ? नेताजीला हें शक्य तरी कसें होतें ?

" काय ग अमिने, तूं नेताजीवर प्रेम करतेस तें त्याला पाहून कीं पाहिल्या-खेरीजच ? " मध्येंच नेताजीनें विचारलें.

" तें का ? मी कितीदा तरी पाहिलें आहे ! "

" त्याच्यावर प्रेम करण्यासारखं त्याच्याजवळ काय वाटलं तुला ? ओबडधोबड बाभळीच्या लाकडाच्या ओंड्यासारखा तो ! "

" होय. पण ते दख्खनच्या राजाचे उजवे हात आहेत. शूर आहेत, वीर आहेत. त्यांच्या रूपाला काय करायचं आहे ? त्यांच्या डोळ्यांतली जादु तर अशी आहे. " अमिनेनें एवढें म्हणून एकदांच डोळ्याला डोळा देण्याकरितां किंचित् वर पाहिलें, दृष्टीला दृष्टि भिडली. स्वतःची निंदा स्वतःच केली, म्हणून नेताजीला ओशाळल्या-सारखें झालें आपल्यावर अमिनेचें खरें खरें प्रेम आहे, हें ओळखल्याशिवाय नेताजी राहिला नाहीं, आपल्याला अमिना पूर्ण ओळखते यांतहीं नेताजीला संशय उरला नव्हता मग तो नेताजी म्हणून कशाला सांगण्याचा फार्स करणार ?

अमिनेसारखी मोगल सुन्दरी आपण होऊन आषक्त झाल्यावर तिला दूर करणें सामान्य काम नव्हे ! तें एकाद्या शिवाजीलाच साध्य ! बाकी कोणाचीही त्रेधातिरपीटच उडावयाची. नेताजी त्याला अपवाद कसा होणार ? पोपट प्रेमाच्या पिंजऱ्यांत अडकला हें तर अमिनेनें ताडलेंच पण खरें करून घेण्यासाठीं ती विचारतेच, " हं, मग गरीबाच्या अर्जीचा काय विचार झाला ? "

" अमिने, वेडी आहेस जा तूं ! आम्हीं दख्खन सोडून इकडे आलों आहोंत, ते काय इष्कबाजी करायला ? " नेताजी बोलला

" छे ! छे मी कुठें तसं म्हणतें " अमिना बोलली, " मी तसं बोलू द्यायची, कीं तसं कांहीं करूं देखील द्यायची नाहीं. मी प्रेमाचा निका लावायची गोष्ट बोलतें आहें ! "

" अग पण तुझा धर्म मुसलमानी आहे ! "

" अन् सरदारसाहेबांचा हिंदु धर्म आहे ! "

" मग कसं बरं बोलतेस ? "

" पण सरदारसाहेब, माणसाकरितां धर्म का धर्माकरितां माणूस ? शिवाय प्रीतीच्या आड यायला धर्माला तरी काय अधिकार आहे बरं ? खरं म्हटलं तर दिलादिलाच्या जमाईच्या आड कोणत्याच धर्मानं येऊ नये " अशा प्रकारें अमिनेनें नेताजीला निरुत्तर केलें नेताजीला काहींच सुचेना शेवटीं काहीं तरी पळवाट काढावयाची म्हणून तो म्हणाला, " अमिने, आमचे शिवाजी महाराज इथें बादशहाच्या कैदेंत अडकले आहेत, त्यांच्या खटपटींत, विवंचनेंत आम्हीं आहोंत. तें सोडून आपले भलतेच विचार करायचे म्हणजे काय ? "

" तरी भलतेंच कसं होईल ? म्हटल मी शहाजादी झेब्युन्निसेची खास दासी आहें. शहाजादीचं बादशहावर केवढं वजन आहे माहित नाहीं का ? माझ्या सरदारांनीं मला फर्मावायच, मी शहाजादीच्या पायाजवळ ' माझ्या सरदारांच काम झालं पाहिजे असा हट्ट धरून बसायच, शहाजादींनीं माझ्या सुखाकरितां बादशहांना गळ घालायची,—असं झाल्यावर मग काय होणार नाहीं ? " अमिनेनें त्यावरही तोड काढलीच.

" असें झाल्यावर आमच्या महाराजांची सुटका होईल ?" नेताजी उत्सुकतेनें म्हणाला.

" झाल्यावर नव्हे केल्यावर !—मग, आधीं नाहीं ! " अमीना बोलली.

"अमिने, आमच्या महाराजांच्या सुरक्षित सुटकेकरितां मी वाटेल तें दिव्य करायला तयार आहें. पण त्याबद्दल अगोदर निखालस महाराजांचा सल्ला घेतलाच पाहिजे आणि मी तो घेईनही ! तूं काय करतेस ?"

"मी शहाजादींना विचारतें.'

"विचारच तर ! मग पाहूं काय होतं तें !" नेताजी म्हणाला हें त्याचें खरें बोलणें होतें. अमिनेला तेंच पाहिजे होतें. तिच्या मनासारखें झालें. शहाजादींचा आशीर्वाद पूर्ण फळाला असा आला. पुढें तिची सारी मदार तिच्यावरच होती. ती तिलाच सांगायला–पुन्हा भेटण्याचें वचन देऊन, बिजलीसारखी तिथून पसार झाली नेताजी 'ऑ' वासून जागच्या जागींच किती तरी वेळ उभा होता !

\+ + + +

रामसिंगाच्या बाबतींत महाराज व महाराजांची मंडळी बहुतेक निराशच झाली होती. इतकेंच काय, पण स्वतः रामसिंगही निराश झाला होता. बादशहा आपला हेतु कांहींच कळू देत नाहीं महाराजांना मोठी मनसबदारी देऊन इकडेच कायम ठेवावयाचें म्हणतो, त्यावरून बादशहाचा महाराजांच्या विषयीं बरा हेतु नाहीं हें त्याला उघड दिसून आलें होतें. झेब्बुन्निसेकडून कांहीं प्रयत्न होईल, झेब्बुन्निसा आपण होऊन कांहीं करील, असें त्याला वाटलें होतें, पण महाराजांची आणि तिची भेट होऊन गेली तरी त्यांतून फलनिष्पत्ति कांहींच झाल्याचें दिसून आलें नाहीं.

हें पाहून आतां महाराज आणि महाराजांची मंडळी आपापल्या विचाराला लागली होती. प्रत्येक जण आपापल्यापरी विचार–कृति सुचवीत होता. महाराज प्रत्येकाचें म्हणणें समग्र ऐकून घेत, त्यावर साधकबाधक विचार करीत, त्या विचारांनीं वागण्यांत फायदे कोणते आहेत, अडचणी कोणत्या येतील, याबद्दल चौकसपूर्वक चर्चा करीत, आणि त्यांत कांहीं तथ्य नाहीं, असें पूर्ण विचारान्तीं ठरल्यावर तो विचार बाजूला सारीत. अशा प्रमाणें सध्यांचा कार्यक्रम चालला होता. खुद्द महाराजांचेही विचार चालू होतेच पण त्यांचेंही निश्चित कांहीं ठरत नव्हतें. तानाजीनें आपली हिकमत सांगितली निराजी आवजीनेंही आपल्या डोक्याला ताण देऊन शक्कल काढली त्रिंबक सोनदेव यांनीं आपला मनसुबा पुढें मांडला बाळाजी आवजींनीं आपली बहुत बुद्धि चालविली. जिवा महालाही आपलें डोकें चालवूं लागला. प्रत्येकाच्या विचारांत कांहीं कांहीं ग्राह्यांश होता, व त्याचा समन्वय करण्याचें कार्य महाराजांची बुद्धि करीत होती.

अमिनेसारखी मोगल सुन्दरी आपण होऊन आषक झाल्यावर तिला दूर करणें सामान्य काम नव्हे! तें एकाद्या शिवाजीलाच साध्य! बाकी कोणाचीही त्रेधातिरपीटच उडावयाची नेताजी त्याला अपवाद कसा होणार? पोपट प्रेमाच्या पिंजऱ्यांत अडकला हें तर अमिनेनें ताडलेंच. पण खरें करून घेण्यासाठीं ती विचारतेच, "हं, मग गरीबाच्या अर्जीचा काय विचार झाला?"

"अमिने, वेडी आहेस जा तूं! आम्हीं दख्खन सोडून इकडे आलों आहोंत, ते काय इष्कबाजी करायला?" नेताजी बोलला.

"छे! छे मी कुठें तसं म्हणतें" अमिना बोलली, "मी तस बोलूं द्यायची, कीं तसं कांहीं करूं देखील द्यायची नाहीं. मी प्रेमाच्या निका लावायची गोष्ट बोलतें आहें!"

"अग पण तुझा धर्म मुसल्मानी आहे!"

"अन् सरदारसाहेबांचा हिंदु धर्म आहे!"

"मग कसं बरं बोलतेस?"

"पण सरदारसाहेब, माणसाकरितां धर्म का धर्माकरितां माणूस? शिवाय प्रीतीच्या आड यायला धर्माला तरी काय अधिकार आहे बरं? खरं म्हटलं तर दिलादिलाच्या जमाईच्या आड कोणत्याच धर्मानं येऊं नये" अशा प्रकारें अमिनेनें नेताजीला निरुत्तर केलें नेताजीला कांहींच सुचेना शेवटीं कांहीं तरी पळवाट काढावयाची म्हणून तो म्हणाला," अमिने, आमचे शिवाजी महाराज इथें बादशहाच्या कैदेंत अडकले आहेत, त्याच्या खटपटींत, विवंचनेंत आम्हीं आहोंत. तें सोडून आपले भलतेच विचार करायचे म्हणजे काय?"

"तरी भलतेंच कसं होईल? म्हटल मी शहाजादी झेब्बुन्निसेची खास दासी आहें. शहाजादीच बादशहावर केवढं वजन आहे माहित नाहीं का? माझ्या सरदारांनीं मला फर्मावायच, मी शहाजादीच्या पायाजवळ 'माझ्या सरदारांच काम झालं पाहिजे' असा हट्ट धरून बसायचं, शहाजादींनीं माझ्या सुखाकरितां बादशहाना गळ घालायची,–अस झाल्यावर मग काय होणार नाहीं?" अमिनेनें त्यावरही तोंड काढलीच.

"असें झाल्यावर आमच्या महाराजांची सुटका होईल?" नेताजी उत्सुकतेनें म्हणाला.

"झाल्यावर नव्हे केल्यावर!–मग, आधीं नाहीं!" अमीना बोलली

"अमिने, आमच्या महाराजांच्या सुरक्षित सुटकेकरिता मी वाटेल तें दिव्य करायला तयार आहें पण त्याबद्दल अगोदर निखालस महाराजाचा सल्ला घेतलाच पाहिजे आणि मी तो घेईनही ! तूं काय करतेस ?"

"मी शहाजादींना विचारतें."

"विचारच तर ! मग पाहूं काय होतं तें !" नेताजी म्हणाला. हें त्याचें खरें बोलणे होतें. अमिनेला तेंच पाहिजे होतें तिच्या मनासारखें झालें. शहाजादीचा आशीर्वाद पूर्ण फळाला असा आला. पुढें तिची सारी मदार तिच्यावरच होती. ती तिलाच सांगायला—पुन्हां भेटण्याचें वचन देऊन, बिजलीसारखी तिथून पसार झाली नेताजी 'ऑ' वासून जागच्या जागींच किती तरी वेळ उभा होता !

\+ + + +

रामसिंगाच्या बाबतींत महाराज व महाराजांची मंडळी बहुतेक निराशच झाली होती. इतकेंच काय, पण स्वत रामसिंगही निराश झाला होता बादशहा आपला हेतु कांहींच कळू देत नाहीं. महाराजांना मोठी मनसबदारी देऊन इकडेच कायम ठेवावयाचें म्हणतो, त्यावरून बादशहाचा महाराजांच्या विषयीं बरा हेतु नाहीं हें त्याला उघड दिसून आलें होतें. झेब्बुन्निसेकडून काहीं प्रयत्न होईल, झेब्बुन्निसा आपण होऊन कांहीं करील, असें त्याला वाटलें होतें, पण महाराजाची आणि तिची भेट होऊन गेली तरी त्यांतून फलनिष्पत्ति काहींच झाल्याचें दिसून आलें नाहीं.

हें पाहून आतां महाराज आणि महाराजांची मंडळी आपापल्या विचाराला लागली होती. प्रत्येक जण आपापल्यापरी विचार—कृति सुचवीत होता महाराज प्रत्येकाचें म्हणणें समग्र ऐकून घेत, त्यावर साधकबाधक विचार करीत, त्या विचारांनी वागण्यात फायदे कोणते आहेत, अडचणी कोणत्या येतील, याबद्दल चौकसपूर्वक चर्चा करीत, आणि त्यांत कांहीं तथ्य नाहीं, असें पूर्ण विचारान्तीं ठरल्यावर तो विचार बाजूला सारीत. अशा प्रमाणें सध्यांचा कार्यक्रम चालला होता. खुद्द महाराजांचेही विचार चालूं होतेच पण त्यांचेंही निश्चित काहीं ठरत नव्हतें तानाजीनें आपली हिकमत सांगितली निराजी आवजीनेंही आपल्या डोक्याला ताण देऊन शकल काढली. त्रिंबक सोनदेव यांनीं आपला मनसुबा पुढें मांडला बाळाजी आवजींनीं आपली बहुत बुद्धि चालविली. जिवा महालाही आपलें डोकें चालवूं लागला. प्रत्येकाच्या विचारांत कांहीं कांहीं ग्राह्यांश होता, व त्याचा समन्वय करण्याचें कार्य महाराजांची बुद्धि करीत होती

महाराज एक वेळ एकटेच विचारमग्न होते. विचार नक्की सुटकेचा मार्ग शोधण्या-बद्दलचेच चालले होते. इतक्यांत नेताजी त्यांच्याजवळ आला. महाराज एकटेच भेटा-वयास त्यांना हवे होते. त्याप्रमाणें ते एकटेच पाहून तो पुढें आला. तो आपली युक्ति महाराजाना सांगणार होता. त्याला पाहून महाराजांनीं चालू असलेल्या विचारासंबधींच पहिला प्रश्न केला, " काय नेताजी, तूं काय आपल्या सुटकेबद्दल विचार सुचवतोस ? सगळ्यांचें ऐकून झालं आतां तुझंच ऐकायचं राहिलं आहे. बोल काय सांगतोस ? "

" महाराज, " नेताजीनें नम्र मुजरा करीत महाराजांना सांगायला सुरवात केली. आपण जें सांगायला आलों, तोच प्रश्न महाराजांनीं अगोदरच विचारला, याबद्दल नेताजीला आश्चर्य वाटलें आणि शकूनही वाटला म्हणून त्याला आपला धाडशी विचार सांगावयाला एक प्रकारचा हुरूप आला, व आपल्या सुटकेचा मला एक मार्ग सांपडला आहे—"

" कोणता तो ? बोल, तोच आम्ही विचारतों ! "

" महाराज, मार्ग आहे, पण चमत्कारिक आहे. विचित्र आहे. कठीण आहे. ! "

" पण साग तर अगोदर कसाही असला–आणि योग्य असला, तर आपल्याला त्याचा विचार केलाच पाहिजे. "

" महाराजांना तो मार्ग कितपत पसंत पडेल याची शंका वाटते म्हणून—"

" नेताजी, शिपायाचा मुत्सद्दी केव्हां झालास ? तूं शंका कुशंका काढायला लाग-लास ! " महाराजांच्या या बोलण्यानें नेताजी ओशाळला. आतां त्याला आपलें म्हणणें एकदम सांगणें भागच झालें.

" महाराजांनीं माफी करावी ' नेताजी एकदम सांगूं लागला, " अमिना नांवाची एक राजवाड्यात स्त्री आहे. ती म्हणते कीं, आपल्या मनासारखं झालं तर महारा-जांच्या सुटकेची हमी आपल्याकडे आहे. "

"अस्सं!"महाराजांनीं नेताजीला आपादमस्तक न्याहाळीत मान हालवून उद्गार काढला.

" नेताजी, तुला वाड्यांतली स्त्री भेटली आणि ती आपली सुटका करण्याची हमी घेते, म्हणतोस ? "

" होय महाराज !—बादशहाच्या वाड्यातली ती एक शक्ति आहे ! " नेताजीनें सांगितलें. " बरं ! तिच म्हणण काय ? तिच्या मनाप्रमाणें झाल पाहिजे म्हणजे काय ? " जरा निराळी कल्पना येऊन महाराजांनीं विचारलें. महाराजांच्या प्रश्नानें

नेताजीला काय उत्तर द्यावें याची किंचित् पंचाईत पडली, पण लगेच तो छातीठोक बोललाच, " महाराज, ती म्हणते, मी तिच्याशीं निका लावला पाहिजे. "

" मला वाटलंच तें महाराज एवढेंच म्हणाले जरा थांबले. महाराजाच्या मुखावरून त्यांचें त्यावर उत्तर काय हें नेताजीस कळणें शक्य नव्हतें. तो नुसताच त्यांच्या तोंडाकडे पहात होता.

" नेताजी, अशा वेळीं तूं काय करावें म्हणतोस ? "

" महाराज आज्ञा फर्मावतील तें करण्यास माझी तयारी आहे ! "

" हिंदूचा मुसलमान होणार तूं ? "

" महाराज फर्मावतील तर ? महाराजाच्या कामीं देह पडत असेल तर ! "

" नेताजी—"

" महाराज—"

" नेताजी माझ्यावरही असाच प्रसंग आला मला एक बाड्यातली प्रसिद्ध स्त्री भेटली. तिचा मी उपयोग करून घ्यावयाचं मनांत आणलं असतं तर—"

" छेः महाराज ! महाराजाच्या जिवाकरितां आमचे सर्वांचे प्राण आहेत महाराज उभ्या महाराष्ट्राचे आहेत महाराज सुखरूप महाराष्ट्रात परत जायला पाहिजेत त्यांच्या-करितां आम्हीं आमच्या जिवाची सुद्धां पर्वा करीत नाहीं. महाराजांनीं केलं असेल तें योग्यच केलं असेल पण आमची गोष्ट निराळी आहे. " नेताजी म्हणाला

नेताजी मोगल सुन्दरीच्या जाळ्यांत अडकला कीं काय, अशी महाराजांना शंका आली. त्यांच्या सहजवृत्तीला त्या शंकेनें नेताजीबद्दल राग आणला, पण लगेच झेबुन्निसेची सात्विक मूर्ति त्यांच्या डोळ्यापुढें उभी राहिली आपली प्राप्त परिस्थिति त्यांना आठवली. अशा परिस्थितींत झेबुन्निसेसारख्या केवळ प्रेमाला वाहिलेल्या स्त्रिया भेटल्या, तर त्यात कोणाचा अपराधच आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं, हाही विचार महाराजाच्या मनात आला त्याबरोबरच नेताजीच्या बोलण्याचा झोंक लक्षात घेतला, तर तो केवळ आपल्या सुटकेकरितांच काय वाटेल तें करण्याचें धाडस करावयाला तयार आहे, अशाच तऱ्हेचा दिसला. म्हणून महाराजाना त्याच्या म्हणण्याचा विचार गंभीरपणानेंच करणें भाग पडलें.

" नेताजी, आपण हिंदुत्व कायम ठेवण्याकरितां या संकटात पडलों आहोंत बाटण्या-करितां नाहीं ! "

" होय महाराज ! बाटावेंच असा माझा आग्रह तरी कुठें आहे ? पण वेळ आहे, बखत आहे. वक्ताला जें पडेल तें केलं पाहिजे. समजा, मी सांगतों त्या बाईनें जरी हमी घेतली, तिच्या प्रयत्नामुळें महाराजाची सुटका सुखरूप झाली, तर आम्हां मराठ्यांचा शब्द, दिलेला शब्द परत कसा घेतां येईल ? दिलेल्या शब्दाची किंमत मराठे लोक प्राणापेक्षां जास्त समजतात असा महाराज, आपला लौकिक आहेना ? मग ? "

" पण आपण असं भलत वचनच देऊं नये कुणाला. "

' वचन दिल्याशिवाय काम होत नाहीं असें दिसलें तर ?"

' नादच सोडून द्यावा. "

" म्हणजे आपल्या सुटकेचा एक दरवाजा आपण होऊनच बंद करावा, असच महाराजांचं म्हणणं ? वचन दिल्याशिवाय काम व्हायचं नाहीं—"

" काम झाल्याशिवाय वचन देऊं नये. "

" हें कोण ऐकणार, महाराज ? माझी सारी धडपड, सारे प्रयत्न महाराजांच्या सुटकेकरतां आहेत दैवयोगानें महाराजांच्या सुटकेचा मार्ग माझ्या हातीं अशा विचित्र प्रकारानें आला आहे. त्याचा उपयोग करणें न करणें महाराजाच्या मर्जीवर अवलंबून आहे महाराज देतील तो हुकूम अक्षरश अमलात आणणें हेंच नेताजीचे काम आहे "

नेताजी स्वस्थ बसला महाराजही विचारमग्न झाले दोघांच्यामध्यें किती तरी वेळ गभीर शांतता पसरली होती महाराजांचा कोणता एक विषय अजूनही कायम होत नव्हता. नेताजीला मिळालेला मार्ग कितीही विलक्षण असला, धाडसी असला, तरी तो चिंतनीय आहे, विचारांत घेण्यासारखा आहे, असें महाराजांना खात्रीपूर्वक वाटत असलें पाहिजे. नेताजीचा काय उत्तर द्यावें, आपल्या सुटकेकरतां नेताजीला त्या प्रकारानें बळी द्यावा कीं काय ? आपल्याकरितां आगींत उडी घेण्यास प्रत्येक जण तयार आहे. नेताजी जाणूनबुजून हिंदुधर्माच्या सरक्षणासाठीं, आपल्या जीवितरक्षणासाठी प्रसंगीं मुसलमानी धर्मही स्वीकारण्यास तयार आहे. ह्याबद्दल महाराज जितका जितका विचार करीत तितके तितकें त्यांचें मन अधीकच गभीर होत होतें.

होता होतां महाराजाचा कांहीं तरी एक निश्चय झाला, आणि ते नेताजीला म्हणाले, " नेताजी, तुझा सर्व विचार मी ऐकला. आतांपर्यंत सुटकेकरतां आपआपल्यापरी प्रत्येकानें कांहींना कांहीं मार्ग शोधून काढलेच आहेत तूही मार्ग दाखविला आहेस. तूं आमच्याकरितां इमानें इतबारें वाटेल ती गोष्ट करशील, अशी आमची खातरजमा

आहे. म्हणूनच आम्हीं पूर्ण विचारान्तीं अशी सल्ला देतों कीं, शक्य तोंवर आपण शुद्ध पवित्र राहून करता येईल तें करूं. नाहीं तर एकाच देवाच्या घरचीं लेंकरें आपण आहोंत ही खात्री बाळगूं. प्रसगातून सही सलामत निघण्याकरितां तुझ्यासारख्या एखाद्या मोहऱ्याला धर्मांतर करावं लागल तरी हेतू ध्यानांत धरून त्याच्याकडे परवानगीच्या नजरेनेंच पाहिलें पाहिजे. तुझ्यासारखा एकनिष्ठ कुठेंही गेला, कसाही परिस्थितींत राहिला कसाही वागला तरी एकनिष्ठतेच्या मार्गापासून तो अणूमात्रही ढळावयाचा नाहीं. अशी आमची पूर्ण खात्री आहे. म्हणून जें तुला योग्य दिसेल, प्रसगीं विनतोड म्हणून कालाला जशी कलाटणी द्यावी लागेल, तसें करण्यास तुला आमची पूर्ण परवानगी आहे. येवढेंच सागतों कीं प्रसग पूर्ण ओळखावा, आणि मग पुढें पाऊल टाकावें ”

महाराजांच्या या बोलण्यानें नेताजीला बरें वाटलें. स्पष्ट नाहीं तरी आपल्याला महाराजानीं धर्मांतराची सुद्धा मुभा देऊन टाकली हें पाहून त्याला मूठभर मांस आल्यासारखें झालें, अगात जोम चढला आता शक्य तितकें अमिनेला भरीं घालून महाराजाची सुटका करण्याचें काम हां हां म्हणतां सुखरूपपणानें पार पाडावयाचें आणि तें होणारच असें त्याचें मन त्याला बोलूं लागलें आपण मुसलमान होऊ ? होय कदाचित् होऊ ही ! महाराज परिणामाकडे लक्ष देऊन त्याबद्दल बोलणार नाहींत हें झालें पण एवढ्यानें नेताजीचें समाधान झालें नाहीं. प्रसगानें जर आपल्याला मुसलमान बनविलें तर महाराजांचे पाय आपल्याला कायमचे अतरणार त्याची वाट काय ? जन्मभर मुसलमान होऊन अमिनेचा ससार थाटावयाचा कीं सापडलेल्या आगीपासून परावृत्त होऊन महाराजाच्या पायाला चिकटून रहावयाचें ? अमिना कीं महाराजांचे पाय ? एकनिष्ठ नेताजीला चांगलाच पेंच पडला महाराजांनीं आपल्याकडून निकाल दिला नेताजीनें आवंढा गिळत विचारलें “ महाराज, समजा मी मुसलमान झालों.— ”

“ प्रभूची मर्जी ! त्याला काय करणार? ”

“ तसं नव्हे महाराज—आपले पाय मला कायमचेच अंतरणार ! ”

“ होय, तस होईल खरें ! ”

“ जन्मभर ? ”

“ अर्थात् ? ”

“ महाराज, माझी विनंति आहे प्रसगानें मी मुसलमान झालों तरी जन्मानें,

हाडानें, रक्तानें हिंदु आहें. आणि महाराजांचे पाय मला फिरून दिसले म्हणजे महाराजानीं मला हिंदु म्हणूनच पाठीवरून हात फिरवून जवळ घेतलं पाहिजे "

" जरूर " महाराजांनीं तावडतोब आश्वासन दिलें. नेताजीच्या मनचा संशय फिटला. आनंदित होऊन महाराजाना मुजरा करून त्यानें निरोप घेतला. तो तडक आमिनेची गांठ घेण्याकरितां चालू लागला.

नेताजी काय करणार ? मुसलमान होणार काय ? महाराजांच्या मनांत नेताजी विषयीं हेच विचार येत होते. दुसरी मडळी आली. महाराजांचे व्यवधान मडळीच्या बोलण्यांत लागलें. आपोआपच नेताजीचा विषय सपला. मडळींना महाराजांनीं आपल्या स्वतःच्या सुटकेविषयीं एक नामी युक्ति सुचविली. महाराजांचीच युक्ति ती ! अनेक साधकबाधक वळसेवेलाट्याच्या आडचणींतून तावून सुलाखून त्याची ती युक्ति निघालेली. मग ती कोणाला कां पटणार नाहीं ? लगेच त्या युक्तीची अम्मलबजावणी करण्यास आरंभ करण्याचें ठरलें. त्यांत रामसिंगालाही ओढणें भाग होतें म्हणून महाराजानीं रामसिंगाला तावडतोब बोलावणें पाठवून आणविलें. रामसिंग येतांच महाराज हंसले " काय रामसिंग, आमच्या सुटकेचा राजमार्ग तुमच्या हस्तगत झाला नाहींच अखेर ना ? असो. जाऊंदे. ऐकलेंत. आतां आम्हींच सागतों. रामसिंग, हा दख्खनचा राजा उद्यापासून आजारी पडणार आहे काय समजलांत ? हकीम, वैदू, कोणीही आमच्याकडे न येतांच, येरझारा घालताहेत, अशी हूल आंत बाहेर उठणार आहे. सरदार, दरकदार, खानबहादूर, बादशहाचे जवळ बसणारे, सल्लामसलत देणारे यांच्यामध्यें आमचे रामसिंग, आम्ही आजारी असल्याबद्दल शिताफीनं कंडी पसरून देणार आहेत. आमच्या आजाराच्या नाटकाचा हा पहिला अक कसा कसा वठत जातो आहे, तुम्हीं सारे जण तो कसा काय वठवून नेत आहांत हें पाहून मग पुढच्या अकाची बतावणी कशी काय सजवावयाची तें सांगून टाकूं. तानाजी वगैरे मंडळीनीं आतांपासूनच एकएकट्यानें जमेल तसें काढता पाय घेण्याची संधी साधण्यास आमची हरकत नाहीं. आम्हीं व शंभुराजे बादशहाचा आपल्या सभोंवतालचा पेंच अधिक घट्ट होण्याच्या आंत आम्हीं बादशहाच्या हातावर तुरी देणार हें भवानीच बोलून चुकली आहे "

युक्ति निघाली, महाराजानीं ती काढली. महाराजांची युक्ति सतरा आणे ठरली. ठरल्याप्रमाणें दुसरेच दिवशीं महाराज आजारी पडले. राबता बंद झाला. महाराजाच्या

इच्छेप्रमाणेंच महाराजांना भेटावयाचा मंडळी येऊं जाऊं लागली. एक, दोन तीन दिवस गेले आठ दिवस झाले व कधीं चढ कधीं उतार असा महाराजांच्या प्रकृतीचें मान असल्याबद्दल महाराजाच्या लोकात आंत बाहेर बोलणें ऐकू येऊं लागलें. आतां महाराजांना आराम वाटूं लागला. ज्या हकीम वैद्यांचा महाराजांच्या आजारामध्यें आराम पडण्यास उपयोग झाला त्या हकीम वैद्यांच्याकडे महाराजांच्याकडून मेवा-मिठाईंचे पेटारेच्या पेटारे नजरनजराण्यादाखल, जाण्याला सुरवात झाली, नंग्या सम-शेरीचे पहारेवाले पेटारे उघडून पाहूं लागले एकदां, दोनदा, तीनदा, मेवामिठाईशिवाय कांहीं नाहीं अशी खात्री झाल्यावर त्या अल्लाच्या लालांनीं पेटारे उचकटण्याची तसदी घेतली नाहीं. महाराजाची युक्ति याप्रमाणें व्यवस्थित रीतीनें फळाला यऊं घातली. सर्वांचा पेटाऱ्यावर विश्वास बसला. त्यांतल्यात्यांत एखाद्या बड्या बादशहाच्या आवडत्या सरदाराकडे पेटारा जावयाचा आहे, असें ऐकिलें म्हणजे पेटाऱ्याकडे कोणी ढुंकूनही पाहीनासे झाले. इतकें झाल्यावर आपल्या मनासारखी परिस्थिति तयार झाली असें पाहिल्यावर एक दिवस एका पेटाऱ्यांत स्वत महा-राज व दुसऱ्या पेटाऱ्यांत शभुराजे असे बसून, सर्वांच्या हातावर तुरी देऊन दिल्लीच्या बाहेर सहीसलामत बाहेर पडले. शिवाजी महाराजांनीं स्वतःची अशी सुटका करून घेतली त्यांच्या जागीं ओलीस म्हणून निजलेला माणूस औषध आणण्याचा बहाणा करून राजरोस पसार झाला. याप्रमाणेंच बाकी मडळी पटपट साधेल तसें साधून पसार होऊं लागली. आणि आपला नेताजी ?

\+ + +

" अमिने "

" कोण सरदार साहेब, आपण ? "

" होय, अमिने महाराजांची परवानगी घेऊन आलों आहे बोल महाराजांच्या सुटकेसाठीं काय करणार ? महाराजांच्या सुटकेचं वचन आणलंत ? "

" होय केव्हांच ! "

" मग उद्योगाला केव्हा लागणार ! "

" सरदार साहेब माझे झाल्यावर !–झाले सरदार साहेब माझे ? "

" अगदीं महाराजांच्या परवानगीनं " अमिनेच्या गालावर गुलाबी लाली आली. पौर्णिमेच्या चांदण्यातलें हास्य चमकलें ! " काय सरदार साहेब माझे झाले ? मग आतां

तशी अगोदर बेगम साहेबाच्याकडे जातें. माझा सुखाचा घडा मला मिळाला आपला आशीर्वाद फळाला आला असं सांगून बादशहाच्याकडे बेगमसाहेबाकडून तुमच्या महाराजांच्याच सुटकेसाठीं रदबदली करावयाला भाग पाडीन. बेगमसाहेब माझें खात्रीनें ऐकतील. त्यानीं कबूल केल्या शिवाय मी त्यांचे पायच सोडणार नाहीं. पण खरंच सरदार साहेब माझे झाले ना ?"

" आतां काय सागावं मी तुझा झालों, अन् तूं माझी–कशा वरून माझी झालीस ? मी अडाणी मराठागडी, सरळ शिपाईगडी, आपण एकमेकानीं एकमेकांच व्हायचं म्हणजे काय हें कांहीं मला तितकें कळत नाहीं आमच्याकडचे शास्त्री, पंडित, शाहीर असें सांगतात कीं एकमेकानीं एकमेकांचें व्हायच म्हणजे एकमेकांच्या जवळ जाऊन.........

अमिनेनें नेताजीचा भाव ओळखला तिच्या चेहऱ्यावर मृदु स्मित पसरलें त्याच्याकडे टक लावीत ती म्हणते " हं, ओळखल, मी तेंच म्हणतें. तेवढ्याकरतांच निका लावयाचा. मीं नको म्हटलय कां पण ?"

" अस ! आहे तुझी तयारी ? झालीस माझी ? मग आपल्याला असें जवळ येऊन तुला भेटलें पाहिजे बुवा............" नेताजी बोलला, स्वतःच मोठ्यानें हंसला, आणि पुढें जाऊन त्यानें तिला आलिंगन दिलें. अमिनेनें नाहीं म्हटलें नाहीं. नेताजीनें केलेल्या क्रियेंत आमिनेला काय आढळून आलें ? नेताजी सच्चा आहे. एकनिष्ठ आहे, प्रेमाचा मोबदला प्रेमानें देणारा आहे. अमिनेला आनंदच झाला तिनें प्रेम देऊन प्रेम खरेंखुरें प्रेम मिळविलें नेताजीनें आलिंगन दिलें–त्यांत त्याला काय आढळून आलें. शिवाजी महाराजाच्या सुटकेसाठीं आपण हें करीत आहोंत,आपण हें केलें, या भावनेच्या पलीकडे काहींतरी न मांगता येण्यासारखें असें अननुभूत आपण अनुभविलें असे त्याला वाटलें प्रेम म्हणून काहींतरी चीज जगात असते त्याचा दाखला त्याला आज आला. अमीना आणि तिचें आलिंगन एवढ्या दोनच गोष्टी त्याच्यापुढें किती तरी वेळ खेळत होत्या. नेताजी आपला झाला त्याच्याकरितां आपण आता वाटेल तें केलें पाहिजे असें तिचें मन तिला सांगूं लागलें.

" अमिने काय करणार तूं ?"

" मा आतां शहाजादीकडे जातें. "

" आणखी ?"

" आपली गमतजंमत सागतें "

" वा ! गंमतजंमत सागणार, गमतीजमती पुरतच आपलं हें वाटतं येवढ्या-पुरतच का आयुष्य सगळ ? आमिने काय बायका स्वार्थी असतात ! "

" आणखी पुरुषाना बायकांचा स्वभाव कळत नाही. माझं पुरत ऐकून घेतल्या खेरीज बोलला नसतां तर हें म्हणायची पाळीच आली नसती मी असें म्हणत होतें कीं बेगम साहेबाना आपली गमतजंमत सागणार ती ऐकून त्या खूष होतील. खूष झाल्यावर सागणार माझ्या सरदारांचं काम झालं पाहिजे प्रेमाकरतां खूष झालेल्या बेगम साहेब तशा बादशहाकडे जातील, आणखी सरदार साहेबांच्या महाराजाची त्याच क्षणीं सुटका करतील. मी अस्सं करणार असं सांगणार होतें तों मधेंच काही तरी बोलायचं झालं झाली कीं नाहीं फजीति आतां ! '

" बरं बुवा चुकलों आम्ही माझा मुद्दा हा आहे, आमचे महाराज सुटले पाहिजेत " नेताजी म्हणाला. आमिनेनें आपल्याला फसविलें, चकविलें, प्रेमानें भुलवलें, म्हणून नेताजीला आनंद झाला. ओशाळल्यासारखेंही झालें. आमिनेकडे तो नुसता पहातच राहिला होता. अमिनेला आज अस्मान ठेंगणें झालें होतें. प्रेमानें प्रेमाला जिकलें आनंदानें आनंदाला मिळविलें जिवानें जिवाला ओळखलें. नेताजीचें एकच आलिंगन पण त्यानं नेताजीच्या सच्च्या हृदयाची ओळख तिला पटली अमिना स्वत:ला धन्य समजूं लागली या जगांत प्रेमाची बात काहीं न्यारी आहे. प्रेम जात, गोत, धर्म, वय, कुरूपता कांहीं एक जाणत नाहीं तो आमिनेकडे जितका जितका रोखून पहात होता, तितका तितका तो स्वत:लाही विसरून जात होता. अमीना आपलें काय करणार अमिनेमुळें महाराज आपल्या देशीं परत जाणार ? केवढा नेताजीचा आनंद तो ! ! ' आपले प्राण आमिनेला प्रेमाच्या मोबदल्यात विकत देऊन आपण महाराजाच्या चरणाची सेवा केली आपल्या देशाला महाराजांना परत देऊन यथाशक्ति देशसेवा केली बस्स आपल्या हातून इतकंच व्हावयाचं होतं महाराजाच्या चरणाची सेवा झाली, आणखी व्हावयाला पाहिजे होती नशिबात असेल तर होईल. आज अमिना आपलं काम करणार, आणि आपण आपले प्राण अमिनेच्या स्वाधीन करणार इतकं खास

नेताजीच्या आलिंगनाचा गोड स्वाद, मधुर स्पर्श, आमिलेला अजूनही जाणवत होता. राकट नेताजीच्या उरमट चेहऱ्याकडे पापणी हालविल्यावाचून किती वेळ तरी पहात

राहू, ती प्रेमसमाधीचा अनुभव घेत होती. मध्यंतरीं कशानें तरी विक्षेप आला. अमिनेची प्रेमसमाधि भंग पावली नेताजीनें आठवण देण्याच्या आंतच अमिनेनें त्याचा निरोप घेतला. आणि ती शहाजादीकडे जावयास निघाली. अमिनेचा झालेला नेताजी ती परत येण्याची वाट पहात त्याच ठिकाणीं येरझारा घालू लागला. सध्याकाळीं अमिना शहाजादीकडून आश्वासन घेऊन येणार आणि आपण ती आनदाची बातमी कळविणार, या विचारात नेताजी बेहोष होता.

अमिना निघाली ती बेगमच्या पुढें येऊन उभी राहिली. झेबुन्निसा सुखांत आहे कीं दुःखांत आहे, आनंदांत आहे कीं उदास आहे, स्थिर आहे कीं चंचल आहे, हें पहाण्याचें भान अमिनेला होतें कुठें ? ती स्वत आनंदांत होती. तिला वाटत होतें, आपल्याप्रमाणेंच अलम दुनिया आनंद अनुभवीत आहे. आपण खूष आहोंत, बेगमही खुषींत आहे. मनुष्यस्वभावच असा असतो. स्वत च्या मनाच्या विकारविचारांचा आरोप मनुष्य सभोंवतालच्या सृष्टीवर लादीत असतो अमिना त्याला अपवाद कशी राहणार अमिना आली. बेगमच्या कोमल चरणाला तिनें स्पर्श केला बेगमचें लक्ष आमिनेकडे गेलें.

" कोण अमीन ' काय ग ! "

" बंदगी सरकार मीच ती "

" कां खुशींतशी दिसतेस ? तुझ्या जीवाचें प्यार झाल वाटतं ! दख्खनचा पोपट अमिनेच्या प्रेमाच्या पिंजऱ्यात पकडला गेला वाटतं ? "

अमिना लाजली खालीं पाहूं लागली. लज्जेनें तिचें कपोल आरक्त झालें. झेबुन्निसेनें तें ओळखलें. तिला फार आनद झाला. तिच्या गालावर मधुर टिचकी मारीत झेबुन्निसा म्हणाली, " अमिने, भाग्यशाली आहेस तूं ! झालं तुझ्या मनासारखं ? आतां काय तुझं ह्मणणं ? "

" सरकार, पोपट पिंजऱ्यात अडकला पण तो उडून जायची चिंता आहेच त्याच्या मनासारखें झाल नाहीं तर पोपट पळाल्याशिवाय राहणार नाहीं. "

" तें कसं ? पळाला तर तो तुझा दोष, त्याला कोण काय करणार ? "

' त्याला उपाय सरकारानीं आतां करायला पाहिजे "

" म्हणजे ? "

" सरदारांच्या महाराजाची सुटका इथून जर झाली नाहीं, तर सरकार, सरदार कांहीं माझे राहणार नाहींत हो ! या अटीवरच पोपट पिंजऱ्यात अडकला गेला आहे.

सरकार, सरदाराच्या महाराजांची सुटका आपल्या हातून नाहीं का होण्यासारखी ? सरकाराच्या भरवंशावर मी येथें सरदाराना आश्वासन सुद्धा देऊन टाकलें आहे. सरकारानीं येवढं केलं आतां तेवढं केल्याशिवाय––"

झेबुन्निसा हंसली ! "काय विचित्र योगायोग तरी ! अमिनेच्या कायमच्या सुखासाठीं दख्खनच्या राजाच्या सुटकेचा मी प्रयत्न करायचा ? अमिनेनें आपल्याला विनंति करायची ? दख्खनचे महाराज आपले कुणीच नव्हत का ? आपण होऊनच महाराजांच्या सुटकेकरतां कांहीं खटपट करण, बादशहाच्या पुढें जाऊन रदबदली करणं, आपलं काहीं कर्तव्य नाहींच का ? दख्खनच्या राजाला–झेबुन्निसेच्या हृदयसिंहासनाच्या राजाला–झेबुन्निसेनें बादशहापासून सावध रहा एवढं सांगितलें, म्हणजे झेबुन्निसेचें कर्तव्य संपलं का ? यापेक्षा दख्खनच्या राजाकरतां आपल्याला कांहींच करतां येऊं नये काय ? दख्खनचा राजा बादशहाच्या आपल्या बापाच्या कैदेंतून सुटला पाहिजे. आपल्याला सोडविता आला पाहिजे. निदान आपण खटपट केली पाहिजे असे एकसारखे झेबुन्निसेच्या मनात विचार येत होते शिवाजी, शिवाजींचें रूप, शिवाजीचा रुबाब, बोलणें, चालणें, बेत याशिवाय झेबुन्निसेला आपल्या दृष्टीच्या व मनाच्या जगांत दुसरा विषय नव्हता. झेबुन्निसा महाराजांच्या भेटीस गेली भेट झाली. मोजके शब्द ती बोलली. मोजके शब्द महाराजही बोलले. ती भेट अजरामर झाली. महाराजाची मूर्ति झेबुन्निसेच्या पवित्र नेत्रांत खेळत होती. त्याची मधुरवाणी कानांत गुणगुणत होती. आणि त्याच महाराजांच्या सुटकेसाठीं–आपल्या प्रेमाचा विषय शाबूद रहावा म्हणून कां होईना–तिची लाडकी दासी अमिना तिचे पाय धरून बसली होती अशा स्थितींत झेबुन्निसेचें मन काय झालें असेल ? अशा प्रसगाची कविता एकादा कवि जर लिहिता, तर त्या कवितेंत बेगमच्या हृदयांतल्या भावनांची गुंतागुंत कशा तऱ्हेनें रंगविता ? हृदयातले भाव चेहऱ्यावर उमटलेले पाहून एकादा चित्रकार आपला कुशल कुंचला कसा चालविता ? बेगमची चिंतना तीच चालली होती तिचें हृदय तिला तोच जबाब विचारीत होतें. अमिनेच्या विनंतीचा जबाब बेगमला तोच प्रश्न करीत होता शिवाजी महाराजांची सुटका बादशहाच्या पुढें आपण जाऊन विनंति केली तर बादशहा ऐकेल का ? राजकाजाच्या पकडींत अडकविलेल्या राजाला बादशहा कसा सोडील ? आपण हट्ट घेऊन बसलों, तर बादशहाला आपला संशय भलताच येणार नाहीं का ? आपल्याबद्दल बादशहाचें मन कलुषित झालें, तर आपल्या विनंतीचा अनादर होईल तो होईल, आणि त्याला भर म्हणून दख्खनच्या

राजाचे अधिक हाल करण्यासही बादशहा चुकणार नाहीं त्याची वाट काय ? अमिनेला तिच्या प्रेमाचा विषय मिळाला तो तिला कायमचा टिकवावयाचा आहे म्हणून दख्खनच्या राजाची सुटका करावयाची मला माझ्या प्रेमाचा विषय मिळाला नाहीं व मिळणारही नाहीं तरी पण आपल्या पवित्र प्रेमाच्या विषयाकरितां आपल्याला वाटेल तें केलेंच पाहिजे आणि आपण तें करणार."

शहाजादीचे विचार चालू होते ती गप्प होती इकडे अमिनेचा जीव खालींवर होत होता आपण आपल्या सुखाकरितां बेगमला भलतीच गळ घालत आहोंत, असें तिला क्षणभर वाटलें. पण लगेच तिला ज्याला सोडविण्याची आपण शहाजादीला विनंति करीत आहोंत तोच प्रत्यक्ष बेगमच्या प्रेमाचा विषय आहे, मग आपण विनंती करायलाच कशाला पाहिजे. बेगम स्वतःकरतां ती खटपट करणारच, किंवा आपल्याप्रमाणें दख्खनच्या राजाला प्रेमाच्या पिंजऱ्यांत पकडून ठेवणारच. कसेंही झालें, तरी आपल्या फायद्यावरच आहे. हें अमिनेच्या ध्यानात आलें आणि त्यामुळें तिच्या मुखावर हास्याची लकेर येऊन गेली.

" अमिने का ग हंसलीस ? " बेगमेनें विचारलें.

" सरकार, माझी विनंति माझ्याकरितां आहेच पण सरकारांच्याकरितांही आहे माझे सरदार, मिळाले अन् सरकार, दख्खनचे राजे— "

" अमिने, ती गोष्ट अवश्य आहे. तुझ्या धनिनींचें हृदयसिंहासन या जन्मांत तसंच सुनं रहायच आहे. "

" म्हणजे काय सरकार ? मला माझ्या प्रेमाचा विषय मिळाला. आतां सरकारांच्या प्रेमाचा विषय सरकारला मिळालाच पाहिजे. "

" होय, मिळेल, पण पुढील पल्ल्यांत "

" भलतंच कांहीं तरी. हें काय सरकारांच बोलणं ? "

" जाऊ दे तें. ' अमिने, दख्खनच्या राजाची सुटका करून तुझ्या प्रेमाचा विषय कायमचा होण्याकरितां शहाजादी झटेल यापेक्षां दुसरं तूं काहीं विचारू नकोस. मला कांहीं सागतां येणार नाहीं. शहाजादीच्या प्रेमाचा पोपट या जन्मीं शहाजादीला पिंजऱ्यांत अडकवितां येणार नाहीं शहाजादी अडकविणारही नाहीं "

शहाजादी बोलत होती, पण तिच्या जिवाला जरासे कष्ट होत होते. तिनें एक दीर्घनिश्वास सोडला. अमिनेला तें पाहून कसेंसेंच झालें. ह्या तिच्या एकाच दीर्घ निश्वा-

सात 'आपणाला प्रेमाचा सन्यास करावा लागला आहे. आपण प्रेमाची फकीरीण झालों आहोंत,' असें शहाजादी दाखवीत होती म्हणून मग अमिनेनेंही त्या बाबतींत जास्त बोलून शहाजादीला अधिक कष्ट द्यावयाचे नाहींत, असें ठरविलें. तिनें बोलण्याचा विषय बदलला. आणखी किती तरी दोघींचीं बोलणीं झालीं.

महाराजाच्या सुटकेसाठीं आपण काय काय करणार आहोंत, हें उद्या सांगूं म्हणून अमिनेजवळ झेब्बुन्निसा म्हणाली. अमिनेला हवें होतें तें आश्वासन मिळालें. अमिना आपल्यापरी निश्चिंत झाली मोठ्या उत्साहानें तें वर्तमान सांगण्याकरितां अमिना नेताजीकडे निघाली शिवाजीची सुटका शहाजादी करणार आणि नेताजी कायमचा आपला होणार, एवढेंच विचार अमिनेच्या डोक्यांत खेळत होते. झेब्बुन्निसा अमिनेचें प्रिय करण्यात आपल्या सात्विक सुखाचा समावेश करून घेत होती. लोकोत्तरत्व हें असेंच असतें

मध्यें कांहीं तरी,एक कीं दोनच दिवस गेले असतील नसतील ! कुठून तरी झेब्बुन्निसा आपल्या उद्योगाला सुरवात करणार होती. इतक्यात शिवाजीमहाराज दिल्लींतून पसार झाल्याची बातमी दिल्लीशहरभर पसरली जो तो आश्चर्यचकित झाला ! काय झालें कसें झालें, याबद्दल लोकात बोलणें ऐकूं येऊ लागलें. बादशहा आणि त्याचे कडे सेवक खवळून गेले शहाजादीला मनांत समाधान झालें महाराज स्वत:च्या हिकमतीनें सुटून गेले याचें तिला जास्त भूषण वाटलें.

महाराजाच्या पसार होण्याची बातमी जेव्हां अमिनेच्या कानीं आली तेव्हां ती आणि नेताजी महाराजांविषयींच बोलत होतीं. शहाजादीची योजना ती नेताजीला नक्की समजावून देत होती. पण अरेरे ! तिच्या डोळ्यांदेखत ज्यांनीं महाराज पसार झाल्याचें सांगितलें त्यांनींच बादशहाच्या सक्त हुकुमावरून नेताजीला तेथल्या तेथेंच एकदम गिरफ्दार केलें ! शिवाजीचे लोक जेथें, ज्या स्थितींत असतील, तेथें, त्या स्थितींत गिरफ्दार करावयाचे, त्याचे हाल हाल करावयाचे, असा सक्तीचा हुकूम सुटला होता. त्याप्रमाणें झालें. नेताजीला अमिनेच्या देखत बादशहाच्या नोकरानीं गिरफ्दार केलें ! अमिना मूढ होऊन पहातच राहिली !

\+ \+ \+

शिवाजी महाराज सुटले. आपले महाराज सुटले. बादशहा आणि त्याचे लोक 'काफर सुटला काफर भाग गया. पकडो, छाटो' असा एकच गिल्ला करीत आपापल्या ठिकाणीं मनगटें चावीत होते, तर महाराजांची मंडळी हें शुभवर्तमान ऐकून

जागच्याजागीं आनंदात मर्क झाली होती. कसे सुटले, कसे पळाले, याच्याबद्दल पुष्कळांना कळलेंही नाहीं. नेताजीसारख्याची तर फारच धांदल उडाली. त्याच्या सुटकेचा तो प्रामाणिक प्रयत्न करीत होता. त्याच्या प्रयत्नाला यशही येत चाललें होतें इतक्यात महाराज पसार झाल्याचें त्यानें ऐकलें.

" नेताजी आणि अमिना यांच्या भोंवतीं नेताजीला पकडण्याकरितां बादशहाच्या सेवकांनीं गराडा घातला

" पकडो ! पकडो ! " कांहीं जण ओरडले.

" शिवाजी काफर भाग गया– " दुसरे कांहीं जण ओरडले.

" काय ? आमचे महाराज पळाले ! शाबास ! " नेताजीनें ओरडून एक आनदानें उडी मारली.

" पहाडका चुवा–भाग गया !–जंगलके जानवरने हमकू दगा दिया–सैताननें सताया ! और हमकू फसाया ! "

" शाबास ! शाबास ! वाहवा ! " नेताजी नाचूं लागला

" ए बी बदमाषकू कैद करो ! उसके पावमें दो मणका लंगर चढावो ! " असें एक जण ओरडला. नेताजीवर कांहींनीं चाल केली. लगट केली. नेताजीनें हंसत हंसत दोन्हीं हातांच्या सहज कोपरखळ्या मारल्या. त्यासरसे ते बावळट बहादूर कोलमडून पडले ! एकटा नेताजी आणि ते लोक किती तरी !

नेताजी धिप्पाड, सशक्त आणि त्यांतून महाराज सुटल्याच्या आनंददायक वार्तेनें फुरफुरलेला ! मग काय विचारता ? कितीही ते शेंदाड शिपाई चालून आले, तरी त्याला त्याची थोडीच गुमान असणार ! कोलमडून पडलेले लोक धडपडून उठत, दांत ओठ खात अंगावर चवताळून येत, नेताजीला पकडण्याचा प्रयत्न करीत–नेताजी एक दोन धक्क्यांनीं, थपडांनीं, गचांड्यांनीं आणि हुलकावण्यांनीं हबेलंडी उडवून देत होता.

अमिना भयभीत झाली होती. भयचकित दृष्टीनें समोर चाललेला प्रकार पहात होती. शेंदाड शिपायांचे हातीं राजसत्ता होती, तर नेताजी स्वयंभू होता अमिनेला काय करावें हें समजेना जागचें हालण्याचेंही सुचेना.

शिवाजी सुटला. नेताजीचें पुढें काय होणार ? हें तिला कळेना महाराज सुटले, आतां सभोंवारच्या बाजारबुणग्यांना चुटकीसरसे लोळवून आपणही मार्ग काढावा

असा विचार त्याच्या मनांत येणें अपरिहार्य होतें त्या विचारानें तो भोंवतालच्या मंडळींशीं जोमानें झुंजूं लागला

बादशहाच्या लोकांच्या आरडाओरडीनें मदतीला अधिक अधिक राजसेवक येऊं लागले. दोघांदोघांनीं, तिघांतिघांनीं मिळून चिकाटी धरून नेताजीच्या एकेका दंडाला—एकेका पायाला पकडून नेताजीला कह्यात घेण्याचा प्रयत्न चालविला. " दीन दीन " ते सैतान ओरडत होते !

" जय भवानी ! जय शंभू महादेव ! " ओरडत नेताजी धक्काधक्की करीत होता. त्या सैतानांनीं लोखंडी लंगर आणविले हात जखडून टाकले. आतां काफर पुरा पकडला म्हणून ते सैतान जरा बेफिकीर झाले, थोडे त्याच्यापासून दूर झाले, तर तेवढ्या अवधींत अजस्र ताकदीच्या नेताजीनें एका जोराच्या हिसक्यानेंच त्या लगरांतून आपली मुक्तता करून घेतली !

सैतान ऑ वासून पाहूं लागले. पण फिरून त्यानीं त्याला पकडलेंच. पहिल्यापेक्षां आतां ते त्याच्यावर जास्त चिडले. हा आता असातसा ऐकत नाहीं, लगरालाही जुमानीत नाहीं, तेव्हां त्याच्याकरितां अधिक कांहीं तरी बंदोबस्त पकडण्याकरितां केला पाहिजे आणि बादशहापुढें त्यास नेऊन त्याला आतांच्या वागण्याबद्दल जास्तींत जास्त कठोर शासन दिलें पाहिजे, असें त्यांच्यांत बोलणें चालू झालें.

हा काफर पिंजऱ्याशिवाय हातीं लागावयाचा नाहीं, असें कोणीसें म्हटलें लगेच पिंजरा आणण्याची तजवीज झाली. जिवावर उदार होऊन—खटपट करून नेताजीला एकाद्या सिंह-वाघाप्रमाणें त्या सैतानांनीं पिंजऱ्यांत कोंडलें आणि संतापाच्या भरांत तो पिंजरा राजरस्त्यानें फरफटत चालविला.

अशा प्रकारें पकडल्यामुळें नेताजीचा आता मात्र नाइलाज झाला. आपलें पुढें काय होणार ? हेंही त्याला कळून चुकलें तरी पण तो बेफिकीरच होता. 'महाराजांची सुटका झाली. बस्स झालें. आतां आपलें काहीं का होईना,' या विचाराच्या तो मागें लागला.

याप्रमाणें त्या क्रूर लोकांनीं नेताजीचा पिंजरा रस्त्यानें फरफटत चालविला, तर इकडे अमिनेची काय अवस्था झाली ? तिचा प्यार—जिवाचा जिवलग, अशा रीतीनें बादशहाचे लोक नेत असतांना ती डोळ्यानें पहात होती तिला काय वाटलें ? तिच्या जिवाचें काय झालें ? तिला रडतां भुई थोडी झाली ! ' दैव देतं आणि कर्म नेतं ' हें तिच्या प्रत्ययाला येत आहे, असें वाटूं लागलें. व्हायचें होतें काय ? होत होतें काय ? ' आपल्या प्रीतीचे असेच धिंडवडे पाहण्याकरितां का आपल्याला अल्लानं जन्माला घातलं आहे ? ' असा बोल ती अल्लाला लावूं लागली.

घडी घडी निघून जात होती. दरबारांत नेताजीला नेण्यात येत होतें. बादशहापुढें नेल्यावर आपण अमुक करूं, तमुक करू, असे ते सैतान बोलत होते; बादशहा असें करील, तसें करील, हेंही कोणी म्हणत होते.

नेताजीची भवितव्यता त्याला ओढून नेणारे सैतान ठरवीत होते, तो स्वत ठरवीत होता, लवकरच बादशहालाही ठरवावी लागणार होती

अमिना रड रड रडली अगदीं दमली. तिच्या निःसीम प्रेमानेंच दमून गेल्यावर मार्ग दाखविले तिच्या प्रेमानें फिरून शहाजादीकडे जाऊन तिचे पाय धरण्याची सल्ला दिली तत्काळ ती उठली आणि शहाजादीकडे चालायला लागली.

नेताजीला ज्या वेळीं बादशहाच्यापुढें नेऊन उभें केलें असेल, त्याच वेळीं इकडे अमिना येऊन झेब्बुन्निसेचे पाय धरून बसली अमिनेनें आपल्या तोंडून सांगण्याच्या आधींच नेताजीबद्दलची विपरीत बातमी बेगमेच्या कानांवर येऊन धडकली होती.

"गरीब परवर !—"

"अमिने, समजलंय् सारं मला !"

"गरीब परवर, मी काय करू आतां ?"

"काय करणार अमिने ?"

"बादशहा सरदारसाहेबांचा काय शेवट करतील हो ?"

अमिनेचा शब्द अडखळला. शहाजादीचें सर्वांग थरारलें ! बादशहा काय करील, हें कल्पनाचित्र तिच्या डोळ्यापुढें स्पष्ट दिसू लागलें, आपण दुर्दैवी, तर आपल्या बरोबर अल्लाच्या मनात अमिनेलाही दुर्दैवीच ठेवावयाचें आहे काय ? अमिनेकरितां तिच्या सरदाराबद्दल शहानूशहाजवळ आपल्याला कांहींच कां शब्द टाकतां येणार नाहीं. आपला लाल सही सलामत बादशहाच्या कचाटींतून निसटला, म्हणून एका डोळ्यांत आनंदाश्रु तर अमिनेचा प्यार बादशहाच्या कोपाला बळी पडणार, म्हणून दुःखाश्रु. शहाजादीची स्थिति अशी झाली विचार करू लागली. या जगांत एका प्रेमी जोडप्याला आपण सुखी केलें, तर अल्ला आपल्याला पुढल्या जन्मीं तरी अखंड सुखी केल्याशिवाय राहणार नाहीं ठरलें. नक्की ठरलें काय वाटेल तें करीन प्राणाचें मोल देईन, पण अमिनेच्या प्याराला वांचवीन. मनांत आलें, त्याबरोबर आत्मविश्वासानें तिचें मुखही खुलून आलें हाताला धरून उठवीत शहाजादी अमिनेला म्हणते, "उठ, अमिने, उठ, भिऊ नकोस. तुझा सरदार मी तुला परत मिळवून देतें निश्चिंत रहा. ही अशीच बादशाहाच्याकडे जातें आणि तुझ्या सरदाराना घेऊन येतें." शहाजादी तशीच

दरबाराकडे निघाली दरबारात बादशहासमोर नेताजीचा पिंजरा आणला होता. एकेक जण राईचा पर्वत करून नेताजीचा प्रत्येक अपराध बादशहाच्या पायांजवळ सुनावीत होता. नेताजी शांत, धीर, गंभीर सागराप्रमाणें स्थिर होता बादशहाच्या नजरेला नजर भिडविण्याची संधि तो मुळींच दवडींत नव्हता. त्याचे अपराध जसजसे बादशहाच्या कानावर येत, तसतसा बादशहा अधिक अधिकच क्रुद्ध होत असलेला नेताजीला दिसत होता प्रत्येक क्षणीं त्या धिप्पाड पुरुषाला, नव्हे काफराला, जंगली जनावराला खाऊ का गिळूं, असें बादशहाला होत असावें. त्याचे सर्व अपराध बादशहानें ऐकून घेतले आणि मग बादशहानें नेताजीला एकदम शिक्षा फर्मावली " जा, या काफराला एकदम सुळावर चढवा " एकच वाक्य ! बादशहाचा, क्रूर औरंगजेबाचा, एकाच वाक्यांतला तो हुकूम उच्चारला गेला. तेवढाच काय तो औरंगजेब चेहऱ्यावरून रागीट दिसला. हुकूम फर्मावला. एका काफराला अल्लाच्या घरीं पाठविण्याचें फर्मान सोडलें शतकृत्य केलें. बादशहा निखालस थंड झाला. बादशहाच्या आज्ञेप्रमाणें नेताजीला तेथून नेण्याकरिता त्याचा पिंजरा बादशाहाच्या नोकरांनीं उचलला. इतक्यांत—

" खामोश ! " दरबारात एक गंभीर शब्द सर्वांच्या कानीं पडला. सर्व जण शब्द येणाऱ्या दिशेकडे पाहूं लागले. औरंगजेबाची लाडकी कन्या झेबुन्निसा तेथें हजर होती आणि राजसेवकांना नेताजीला तेथून न हालण्याबद्दल तिनें फर्मान सोडलें होतें सेवक जागच्याजागीं थबकले. बादशहानें आपल्या शहाजादीकडे पाहिलें मंद पावलांनीं शहाजादी बादशहाजवळ येऊन उभी राहिली. शहाजादीला पाहून आणि विशेषत आपल्या हुकुमावरही दुसरा हुकूम देऊन शहाजादीनें आपल्या सेवकांना अडविलें, थांबविलें. तरीही न रागावतां किंचित हंसून बादशहानें म्हटलें, " काय बेटा, काय तुझं म्हणण आहे ? "

" बादशहांनीं काय सजा केली आहे ? "

" शहाजादीला काय करायचं आहे ?—काफराला योग्य अशीच शिक्षा दिली आहे

" पण काय दिली आहे तरी ? "

" सुळावर चढविण्याची. "

" शहान्शहा त्यापेक्षां काफराला आपला करून घेतला असता तर—घेतला तर—? पहा शरीर कस आहे, ताकद आहे आपली दीक्षा दिली, तर मला वाटतं शहान्शहाच्या विस्तीर्ण राज्याचा विस्तार—संरक्षण करायला, याच्याइतका उपयोगी आपल्यापैकीं कोणी पडेल का ? "

बादशहा पुन. हंसला त्याला शहाजादीची कल्पना अधिक पसंत वाटली काफ-राला मारण्यांत काय हंशील ! आपल्या धर्मांत घेतले तर जास्त चांगलें त्यानें शहा-जादीला म्हटलें, " बेटा, तुझं म्हणणं बरोबर आहे. हा काफर आपला धर्म स्वीकारील, तर बादशहा त्याला जरूर जीवदान देईल पण हा काफर ही गोष्ट कबूल करणार नाहीं."

" पण, शहान्‌शहानें चौकशी तरी केली का ?

" नाहीं "

" मग मी करूं का ? "

" जरूर ! " बादशहानें शहाजादीला परवानगी दिली. शहाजादीचें अर्धे अधिक काम झालें आपला शब्द खर्च करण्याकरितां शहाजादी स्वत· नेताजीजवळ येऊं लागली. सर्व सभा आश्चर्यचकित होऊन पुढें काय होणार हें पाहात होती "

" सरदारसाहेब, " नेताजीला उद्देशून झेब्बुन्निसा अतिशय मधुर शब्दांत बोलूं लागली. " आपण कोणत्या प्रसगांत आहात, बादशहानें आपल्याला कोणती शिक्षा फर्मावली आहे, ती समजली आहे ना ? " नेताजी नुसताच हंसला. शहाजादीचें म्हणणें काय आहे, हें त्याच्या लक्षात येणें शक्य नव्हतें.

" बरं मग ? " अशा अर्थी नुसतेच त्यानें झेब्बुन्निसेकडे पाहिलें.

" सरदारसाहेब, तुम्हांला जगावंस वाटत नाहीं ? "

" वाटून उपयोग काय ? "

" मी सागतें तसे वागलात तर जगालही ! "

" बेगमसाहेब काय सांगणार आहेत ? "

" तुम्हीं जर आमचा धर्म स्वीकारला—"

" काय जगण्याकरतां—? "

" आणखी तुमच्या आवडत्या अमिनेकरतां आपण धर्मांतरही करू असं वचन अमिनेला दिलेल विसरलां नसालच कसें का होईना, तुमचे दख्खनचे राजे इथून सुटले आहेत. तुमचा हेतु सफळ झाला आहे. मग आता निष्कारण प्रेमाला व प्राणाला कां मुकतां ? मग धर्मांतर करणार का जीवांतर करणार ? शहाजादीच्या शब्दाला जर किंमत देत असाल, तर शहाजादीची इच्छा आपण प्रेमाकरता धर्मांतर करावें अशी आहे. "

काय असेल तें असो. शहाजादीच्या बोलण्याचा विलक्षण परिणाम नेताजीवर झाला. त्याला शहाजादीचें म्हणणें पूर्णपणें पटलें. सात्विक प्रेमाची पुतळी अमिना त्याच्या डोळ्यापुढें उभी राहिली. अशा रीतीनें वेडेपणानें बादशहाच्या हुकुमाला बळी

पडून प्राण गमावण्यात काय हंशील आहे ? जगलों वाचलों, आयुष्यांत कधींकाळीं आपल्या महाराजाच्या दर्शनाचा सुयोग लाभला, तर पुढें आपण महाराजांचेंच आहोंत. मग अविचार करण्यात तरी काय अर्थ ? शहाजादीच्या शब्दाला मान देऊन प्राण व प्रेम दोन्हीही मिळवावयाला कोणती हरकत आहे ? कोणतें पाप आहे ? कसला अविचार आहे ?

" मग काय ठरलं, सरदारसाहेब ? " बराच वेळ नेताजी बोलत नाहीं असें पाहून, शहाजादीनें पुन्हां विचारलें.

" जशी बेगमसाहेबांची मर्जी बेगमसाहेबाच्या आज्ञेबाहेर मी नाहीं "

" मुसलमान व्हायला तयार आहात ? "

' अमिनेकरतां, बेगमसाहेबाच्या माझ्यावरील उदार औदार्याकरतां, काय वाटेल तें करण्याची माझी तयारी आहे. पण त्याबरोबर एक अटही आहे. "

" बाकी तुमच्या सर्व अटी आम्हांला मान्य आहेत. " असें म्हणत शहाजादी झट्दिशीं मागें वळून बादशहाकडे गेली. तिचें हंसरें मुख पाहूनच बादशहाला कळलें कीं, काफर मुसलमान व्हायला तयार आहे. त्यालाही आनंद झाला. हास्याची त्याच्या वृद्ध गालावर ठराविक सुरकुती पडली. शहाजादीनें बादशहाला हवें होतें तेंच ऐकविलें. लगेच बादशहाचा फेर हुकूम सुटून नेताजी बंधमुक्त झाला. बादशहानें आता त्याला मुद्दाम जवळ बोलावलें. आपला धर्म स्वीकारल्याबद्दल अतःकरणपूर्वक त्याचा गौरव केला आपल्या डाव्या हाताकडे बऱ्याच मानाच्या उच्च पदवीच्या जागीं त्याला मुद्दाम बसविलें. मोठी थोरली मनसब त्याच बैठकींत बादशहानें नेताजीला बहाल केली. शिवाजी नाहीं तर नाहीं, त्याचा उजवा हात नेताजी आपल्या धर्मात आला, यामुळें बादशहाला खरोखरीच फार फार धन्यता वाटली बादशहाला धन्यता वाटली. नेताजी आपल्या धर्मांत आला म्हणून, शहाजादीला समाधान वाटलें. आपल्याला अमिनेचें प्रिय करितां आलें म्हणून, नेताजीला काय वाटलें असेल कोण जाणे ! शहाजादीकडून जेव्हां नेताजी मुसलमान होण्याच्या अटीवर सोडून दिला, इतकेंच नव्हे, तर त्याला बडी मनसबदारी दिली, असें अमिनेला कळलें, तेव्हा अमिनेला काय वाटलें असेल, त्याचा तर्कच केलेला बरा.

## ३

रायगडावर यावयाला शिवाजीमहाराजाना जवळजवळ एक वर्ष लागलें अनेक अडचणींतून, अनंत संकटांतून, विलक्षण काट्याकुट्यांतून महाराजांनीं रायगड गांठला.

कनोजपर्यंत महाराजांनीं शंभुराजाना बरोबर वागविलें. परंतु पुढें एकत्रित येणें, दरघडी धोक्याचें आहे, अशी खातरजमा होऊन चुकली जागजागीं संशयपिशाच्च महाराजांच्या व महाराजांच्या मंडळींच्या पाठीशीं हात धुवून लागत होतें. राजरोस प्रवास करणें मुष्किलीचें होऊन गेलें होतें परिवारासह पुढें पाऊल टाकणें अशक्यप्राय झालें. वेषांतर, रूपांतर तर कित्येक वेळेला धर्मांतराच्याही स्वरूपाखालीं महाराजांना अनेक गांव पाठीमागें टाकणें भाग पडत होतें. जागजागीं महाराजांच्याबद्दल सहानुभूतीनें किंवा गैरसहानुभूतीनें पृच्छा केली जाई त्या पृच्छेचा परिणाम हटकून अमुकच होईल हें सांगता येणें दुरापास्त असल्यामुळें, सामान्य प्रवाशाप्रमाणेंच महाराज रहात असत गांवोगावचे चौक्या पहारे बिनबोभाट ओलांडणें, ज्या गावीं मुक्काम करावा लागेल, त्या गांवच्या स्थानिक अधिकाऱ्यांच्या स्वार्थलंपट कचाटींतून बिनबोभाट बाहेर पडणें, हें महाराजांना प्रतिक्षणी सावधानता राखून करावें लागत असे.

महाराजांनीं कनोज मुक्कामीं बाळ शंभुराजाना एका ब्राह्मणाच्या हवाली केलें. ब्राह्मण विश्वासू पाहिला, त्याची आपल्या ठायीं निरतिशय भक्ति असल्याचें अजमावलें आणि मग बाळराजांना एका वाटेनें पावता करण्यास त्या ब्राह्मणाला सांगून आपण दुसऱ्या वाटेनें वेषांतर करून मार्गक्रमण चालविलें. ठिकठिकाणीं यात्रा संपादिल्या; लोकस्थिति निरीक्षिली अवघा देश मुसलमानी सत्तेनें गांजलेला आहे, कोणी त्राता मिळेल काय, या विवंचनेंत आहे; कोणी पुढारी मिळाल्यास त्यानें उभारलेल्या सवत्या सुभ्याखालीं हा हां म्हणतां बृहन्महाराष्ट्र यावयास सज्ज आहे, हेंच महाराजांना ठिकठिकाणी दिसून येत होतें.

प्रवासांत कोण्यावेळीं कोणता प्रसंग येईल, कसें वागावें लागेल, केवळ जीवितरक्षणाच्या आशेनेंच नव्हे, तर भावी भाग्यावर नजर देऊन सुटलेल्या प्रसंगांतून जी युक्ति सुचेल तिचा अंगिकार करून बचाव करावा लागे हें तत्व शिवाजी महाराजांनीं स्वतः स्वीकारलें होतें, तसें त्यानीं आपल्या बरोबरीच्या मंडळींनाही स्वीकारण्याची मुभा दिली होती. यात्रेच्या निमित्तानें महाराजानीं आपल्या दाढीला व डोईवरच्या केसानाही रजा दिलेली होती महाराज रायगडावर आले त्यावेळीं निकटच्या मंडळींनींच काय, पण खुद्द मासाहेबांनी देखील महाराजांना त्यांच्या वेषपरिवर्तनामुळें क्षणभर ओळखिलें नाहीं. महाराजांनी पुढें होऊन प्रेमभरानें मासाहेबांना दंडवत घातला, त्यावेळीं " हं माझा शिवबा अन् हें काय ? " मासाहेबांनीं पाठीवरून हात फिरवीत गद्‌गद् कंठानें म्हटलें, " केवढा हा फरक झाला आहे ! "

" होय मासाहेब फरक झाला नाहीं, करावा लागला आहे पण मासाहेब, बाहेर फरक झाला म्हणून अतरंगांत थोडाच्च होणार आहे ! बाहेरून का माणसाची पारख करावयाची असते ? वाहेरचा देखावा बदलावा लागला म्हणून मासाहेबांचा शिवबा नव्हे, असं थोडंच ठरणार आहे ? "

" कोण म्हणत पण तसं ? " मासाहेब किंचित हंसत् म्हणाल्या

" मासाहेब, " महाराज प्रवासांतल्या गंमती म्हणून मासाहेबांच्या जवळ सांगावयाला पुढें सरसावले " आम्हीं सारे जण दिल्लीहून निघाल्यापासून कोणकोणत्या वेषानें कोणकोणत्या रूपांतरानें निघालों आहोंत, याचा नीटसा पत्ता सुद्धा नाहीं. आमच्यापैकीं कित्येक बैरागी बनले आहेत, कित्येक सन्यासी झाले आहेत, कित्येकांनीं दाढ्या वाढविल्या आहेत, तर कित्येक दाढ्या काढून आपली जान बचावीत आहेत. मला वाटतं, कित्येकाना प्रत्यक्ष वाहेरून धर्मांतराचं सुद्धां नाटक करावं लागल असेल अजून आमची सगळी मंडळी यावयाचीच आहेत. आल्यानंतर प्रत्येकाच्या प्रवासाची हजेरी घेतली तर अशा कितीतरी गंमती निखालस आपल्याला आढळून येतील म्हणून काय ती मंडळी लोक समजावयाची आहेत ? " त्यांना न ओळखून दूर ठेवून कस चालणार ? "

" बरोबर आहे शिवबाच म्हणणं राजकर्त्यांनीं वागतांना असच धोरण दूरदर्शीपणानं ठेवावं लागत. वागणाऱ्याच्या हेतूकडे लक्ष्य पुरवल म्हणजे सगळं काहीं नीटनेटकं करतां येत " याप्रमाणें मासाहेबांनीं महाराजांच्या मुद्याला पाठिंबा दिला.

प्रवासांत महाराजांची मजा वरीलप्रमाणें झाली, तर बाळ शंभूराजे यांच्या संबंधांत निराळीच मजा उडाली. ज्या ब्राह्मणाच्या हवालीं महाराजांनीं बाळराजाना केलें होतें, त्या ब्राम्हणावर त्याच्या गांववाल्या अधिकाऱ्यानी सशयावरून डोळा ठेवला. सरकारांत वर्दी दिली सरकाराचे लोक त्या ब्राह्मणाच्या घरीं आले शभुराजाबद्दल चौकशी चालविली ब्राह्मणाला पंचाईत पडली. पण तो एकनिष्ठ पडला. प्रसगाचें महत्त्व त्याला कळत होतें. त्यानें शभुराजे ब्राह्मणाचा मुलगा आहे, असें बेधडक त्या अधिकारी माणसांना सांगून दिलें.

राजतेज तर दिसतें आणि हा ब्राह्मण सागतो कीं, हा ब्राह्मणाचा मुलगा आहे ! सशयनिवृत्ति करून घेण्याकरितां त्या अधिकाऱ्यानीं त्या ब्राह्मणाला 'शभुराजे व तुम्हीं ' एका ताटांत जेवा, असें सांगितलें एका ताटात जेवल्यानें ब्राम्हण बुडतो, धर्म रसातळाला जातो, असें समजणाऱ्यापैकीं तो ब्राह्मण नव्हता. एवढ्या क्षुल्लक खुळ्या परीक्षेवर महाराष्ट्राच्या युवराजावरचें अरिष्ट टळतें आहे, असें पाहिल्यावर कोणतो

मनुष्य म्हणविणारा भलतीं बंधनें—भलत्या अडचणींमध्यें आणील? सरकारी अधिकाऱ्यांना त्या ब्राह्मणानें शंभुराजाना ताटात घेऊन बिनदिक्कत जेवून दाखवून त्यांचें शंका निरसन केलें.

त्या एकत्र जेवणामुळें ब्राह्मणाची जात बाटली नाहीं, त्याला कोणी वाळींत टाकलें नाहीं, कीं कोणी तो जातीबाहेर पडला असेंही समजलें नाहीं. प्रवासात शंभुराजाच्यावर हा प्रसंग येऊन गेलाच त्यांना त्या ब्राह्मणानें बहुत बंदोबस्तानें रायगडावर आणविलें.

दिल्लीला जाऊन तेथें विपरीत अनुभव भोगून बादशहा व त्याची वृत्ति प्रत्यक्ष पाहून महाराज परत आले. पूर्वींच्या आणि आतांच्या महाराजात बराच फरक पडला. जशास तसें का वागावयाचें व कसें वागावयाचें, याबद्दल महाराजांनीं मनाशीं कांहीं ठाम विचार करून ठेवले आपल्या पश्चात् बादशहानें पाताळयंत्रीपणा करून आपण मिळविलेल्या प्रातावर परस्पर जाळें पसरण्याचा जो व्याप चालविला होता, तें जाळें तोडून टाकून भराभर ते ते प्रांत काबीज करावयाचे, असें महाराजांनीं ठरवून त्याप्रमाणें उद्योगाला आरंभही केला

महाराजांच्या बरोबर गेलेली मंडळी एक, एक, एक अशी अजूनपर्यंत येतच होतीं. त्या ब्राह्मणानें शंभुराजाना रायगडावर आणून दाखल केलें. महाराजांनीं व मासाहेबांनीं त्या ब्राह्मणास नेकीबद्दल व कामगिरीबद्दल बहुत संतोषित केलें आणि परप्रांतांत नेकीचा जिव्हाळा वाढीस लावला. राजकारण, धर्मकारण आणि समाजकारण, या तीहींचीही सागड यथायोग्य रीतीनें, अधिकारानें, सोज्वळ अतःकरणानें, राष्ट्राच्या भावी उत्कर्षावर नजर देऊन, मासाहेबांनीं सल्ला व भवानीचा आशीर्वाद या जोरावर घालण्याचें व्रत चालविलें होतें आपला माणूस दिल्लीहून केव्हाही आला, कशाही परिस्थितींत आला, कशाही वेषांत आला तरी महाराज त्याची पूसतपास करीत, कमी अधिक चौकशी करीत, आपलेपणानें भेट देत आणि ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें त्याच्यावर स्वराज्याची योग्य ती कामगिरीही संपवीत. असा महाराजांचा कार्यक्रम रायगडावर येऊन दाखल झाल्यापासून चालू झाला होता.

\+ + +

दोन वर्षें झालीं नेताजी बाह्यत तरी पूर्ण मुसलमान झाला होता. आमिनेवरील प्रेमांत त्यानें कधींही कसूर केली नाहीं. बादशहाचीच कामगिरी पत्करल्यानंतर त्यांत अगचोरपणा चुकूनही केला गेला नाहीं. कामगिरीच्या वेळीं कामगिरी, राहिल्यावेळीं अमिना व आपण येवढेंच नेताजीचें जग होऊन राहिलें होतें. बादशहा नेताजीच्या कामगिरी-

वर, नेताजीच्या तडफेवर, नेताजीच्या शौर्यावर बेहाय खूष होता काबूल-कंदाहारकडे बंडाळी माजली, बादशहाला तिकडे बंदोबस्ताकरितां सैन्य रवाना करणें जरूर झालें. नेताजीनें स्वखुशीनें तिकडची कामगिरी आपल्या शिरावर घेतली प्रेमानें एकजीव झालेली अमिना नेताजीपासून दूर रहावयाला क्षणभरही राजी नव्हती तिनें एकटीनें रहावें आणि आपण मुलुखगिरीला जावें, असाही हट्ट नेताजीनें केव्हांच धरिला नाहीं. प्रेमानें एकरूप झालेलें तें दांपत्य लढाईवर जावयाचें झालें तरी बरोबरच जावयाचें! काम-गिरी चोख होत आहे असें पाहिल्यावर, त्या प्रेमी जोडप्याची ताटातूट कोण करणार ? त्यांनीं तसें न वागावें म्हणून कोण अडथळा आणणार ? अमिना आपल्या प्रियकराच्या सहवासांत पूर्ण सुखी झाली होती नेताजी बरोबर असल्यावर, आपल्या प्रेमाचा विषय अष्टौप्रहर आपल्या नजरेच्या टापूंत असल्यावर, अमिना सुखी कां असणार नाहीं ? तिच्या प्रीतीला आतांपर्यंत दोन सुंदर फुलें सुद्धां फुलली होती नेताजीच्या सहवा-सांत अमिना राजवाड्याच्या सुखसावलींत जितकी सुखी, तितकीच काबूल-कंदाहा-रच्या रखरखलेल्या उन्हांत नेताजी बरोबर भटकतानांही सुखीच होती.

काबूल-कंदाहारच्या स्वारींत नेताजीनें बादशहाला यश मिळवून दिलें. अमि-नेच्या जवळ जसा प्रेमाचा, तसाच बादशहाच्या दरबारांत नेताजीच्या दांडग्या विजयाचा बोलबाला घुमूं लागला. अग्नि किंवा पाऊस आपआपलीं कार्यें करितांना जसा आपपर भाव ठेवीत नाहींत, तसाच नेताजीच्या शौर्याचा मामला असल्यामुळें नेताजी बादशहाच्या दरबारांत, बादशहाच्या सर्व सरदारांपेक्षां सरस ठरूं लागला. नेताजीच्या दिनचर्येकडे पाहिलें, बादशहाची हुकमत आणि स्वतःची हिकमत याचा उपयोग करून नेताजी आपला लौकिक दर दिवस वाढवीत होता हें पाहून, त्याच्याबद्दल कित्येक जळफळत होते, तर कित्येक त्याचें मनःपूर्वक कौतुक करीत होते

अमिनेच्या प्रेमाच्या संसाराकडे पाहून शहाजादी झेबुन्निसा, इला एक प्रकारचें सात्विक समाधान वाटत असे. अमिना, नेताजी, त्याची मुलें, एकत्र गुण्या गोविंदानें कालक्रमण करीत आहेत, असा देखावा पाहून शहाजादीचें मन रिझत होतें, रमत होतें, डुलत होतें

अशाच एके दिवशीं हे प्रेमी जीव एकत्र बसले होते काबूल-कंदाहारकडची स्वारी संपली होती. बडा विजय मिळवून दिल्याबद्दल बादशहानें खास दरबार भरवून नेता-जीचा गौरव केला होता. नेताजीच्या पायांवर संपत्ति लोळण घेत होती नेताजीच्या मस्तकावर बादशाही कृपाछत्र विराजत होतें. नेताजीच्या कंठात अमिनेच्या कोमल

कराच्या रूपानें प्रीतिदेवता मिठी घालून बसली होती अशा स्थितींत नेताजीला काय उणें होतें ? त्याच्या दृष्टीनें काय असेल तें असो, पण अमिनेच्या, बादशहाच्या आणि सगळ्या जगाच्या दृष्टीनें नेताजीला कांहींच कमी नव्हतें.

सहज बोलतां बोलतां अमिनेला काय वाटलें कोण जाणे ? नेताजीची मस्करी करण्याची तिला लहर लागली. एका मुलाला नेताजीनें आपल्या मांडीवर घेतलें होतें. दुसरें मूल अमिनेच्या कडेवर होतें नेताजीनें मांडीवरच्या मुलाचा, तसाच अमिनेच्या कडेवरच्या मुलाचाही प्रेमानें मुका घेतला अमिना हंसली

" कां हंसलीस ? " नेताजीनें तिला विचारलें. त्याला तिचें या वेळचें हंसणें निराळें वाटलें.

" प्रेमाच्या पायीं माणूस स्वतःला सुद्धा किती विसरतं तरी ? " अमिना म्हणाली, " आपण पूर्वी कोण होतां, आणखी आता कोण असायचं, याची आठवण तरी होते का कधीं ? "

" म्हणजे काय ? मी नाहीं समजलों. "

" हेंच तें मी म्हटल, आपणाला कुणी दख्खनचे सरदार म्हणून ओळखील कां ? स्वतःच्या तरी ध्यानांत आहे का ? "

" अमिने, आम्हीं बोलून चालून शिपाई गडी ! एक मार्ग धरला कीं तोच सरळ काटीत जायचं, एवढच आम्हांला माहीत त्यात कधीं कसूर झाली आहे का ? "

" मुळींच नाहीं आणखी कधीं होऊंही नये. "

" तें कांहीं सांगता येणार नाहीं "

" म्हणजे काय ? "

" तूं विसरली असशील, पण मी कसा विसरेन ? जर कधींकाळीं आमच्या महाराजाचे पाय मला दिसले—"

हें म्हणायला आणि खुद्द बादशहाचें नेताजीला बोलावणें यायला एकच गांठ पडली बोलणें तितकेंच राहिलें. उभाउभी जाऊन येतों, म्हणून नेताजी बादशहाच्या भेटीस गेला.

दरबार होता. दरबारांत दक्षिणेंत शिवाजीनें भयकर बंडाळी माजविल्याची बातमी आल्यावरून त्याचा बंदोबस्त करण्यास काय योजना करावी याचा खल चालला होता. खलांत शेवटीं शिवाजीच्या पारिपत्यासाठीं कोणी तरी इकडून पाठवावयाचें ठरलें बादशहानें नेताजीचीच योजना मुक्रर केली. नेताजी मूळचा दख्खनचा शूर लढवय्या. तिकडचा प्रांत, त्यांतल्या खाव्याखुबा–वगैरे सर्व

त्याला माहीत आणि इकडे त्याचा एकनिष्ठपणा दृष्टोत्पत्तीस आलेला म्हणून बादशहानें त्याचीच योजना केली. नेताजीनें पटकन् त्याला मान्यता दिली. आपल्याला दक्षिणेंत, आपल्या मायभूमीकडे, आपल्या महाराजांच्या चरणांजवळ जायला मिळणार, याचा त्याला विलक्षण आनंद झाला. त्यानें त्याच हेतूनें दख्खनची कामगिरी अंगावर घेतली. बादशहाच्या दरबारात नेताजीच्या तोडीचा दुसरा कोणी पाठवावयाला नव्हताही बादशहाची योजना नेताजीनें मान्य केली, म्हणून बादशहालाही फार समाधान वाटलें. काट्यानें काटा आपोआप निघणार शिवाजीचाच माणूस शिवाजीवरच चालून जाणार, हें काय बादशहाला थोडें समाधान होतें ?

नेताजी परत दरबारांतून आला. अमिनेनें येतां क्षणीं विचारलें,

" कशाला दरबारांत बोलावल होतं ? "

" दख्खनच्या स्वारीवर माझी योजना बादशहानें केली आहे, हें सागण्याकरितां ?"

" म्हणजे ? " नेताजीच्या तोंडचे शब्द ऐकून अमिना गडबडूनच गेली

" बादशहांचा तसा हुकूम झाला ? '

" हो ! "

" आणखी ? '

" मी तो मान्यही केला ! "

" काय ? मला टाकून जाणार ? " अमिनेच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले कंठ रुद्ध झाला. नेताजी जाणार, दख्खनकडे जाणार, आपल्या महाराजांकडे जाणार, असें झाल्यावर पुन्हा ते आपल्याला कधींही दिसणार नाहींत गेलेलें आयुष्य स्वप्नवत् झालें. वाईट मनांत यावयाला आणि वाईट व्हावयाला एकच अशी गाठ पडली ? अमिनेनें तितकेंच बोलणें थांबविलें. जाऊं नका असें नेताजीजवळ सांगावयाला तिला तोंडच नव्हतें तिनें शहाजादीकडे धांव घेतली अडल्या घडीचा त्राता अमिनेचा शहाजादीच होती शहाजादीनें अमिनेचें म्हणणें ऐकून घेतलें. शहाजादीनें बादशहाला गळ घातली, पण यावेळीं बादशहानें शहाजादीचें म्हणणें ऐकिलें नाही. तिचा युक्तिवाद बादशहानें खोडून काढला या वेळीं दक्षिणेंत शिवाजीवर नेताजीलाच पाठविणें कसें योग्य आहे, हें बादशहानें समजाऊन दिलें. शहाजादीचा निरुपाय झाला. शहाजादीनें आपल्या कर्तव्याची शिकस्त केली परत येऊन अमिनेजवळ खुल्या दिलानें आपला दुबळेपणा शहाजादीनें व्यक्त केला योगायोग टळत नाहीं, आलेलें संकट चुकत नाहीं, आपल्या प्रेमाचा पोपट पिंजरा उघडून पसार होणार हें निश्चित ठरलें ठरलेलें

बदलावयाला अफाट दुनियेवर, अनत अस्मानाखालीं, आतां कोणीही समर्थ नाहीं अल्लाच्या मनांत आपल्याला एवढंच सुख द्यावयाचें होतें आपली कुरकुर अल्लासुद्धां ऐकणार नाहीं, असें आमिनेला पक्कें कळून चुकलें. विचार करितां आमिनेला शेवटीं मनाची तयारी अशीच करावी लागली कीं, नेताजींनीं आपल्यावर चालू घडीपर्यंत प्रेमाचा पाऊस पाडला. त्याना बोल लावावयाला तिळमात्र जागा राहिली नाहीं. शक्य तोंवर प्रयत्न करावयाचा पण आडवावयाचें नाहीं, दुखवावयाचें नाहीं, पाय-गुंता करावयाचा नाहीं, त्याच्या इच्छेच्या, त्याच्या सुखाच्या, त्याच्या कर्तव्याच्या, त्यांच्या पुरुषार्थाच्या, त्यांच्या स्वातन्त्र्याच्या, त्यांच्या ध्येयाच्या आड आपण याव-याचें नाहीं, असें अमिनेनें ठरविलें; मनाला आवर घातला ती नेताजीजवळ गेली, प्रेमानें त्याच्या खांद्यावर हात ठेवला, प्रेमानें टक लावली, आणि विचारलें, " दक्षि-णेंत जाणारच ! "

" होय, जाणार ! तूं मला अडवणार का ? "

" नाहीं " जीव मुठींत धरून अमिनेनें उत्तर दिलें

" शाबास अमिना ! मी तुजवर आजवर निःसीम प्रेम केलें. त्या प्रेमाची खरी पारख तूं केलीस. त्या प्रेमाला साजेल असेंच उत्तर तूं दिलेंस मला फार आनद झाला मला माझ्या महाराजांचे पाय दिसणार या कल्पनेनें कितीही आनंद झाला असला, मी जावयाला कितीही उतावीळ झालों असलों, तरी तुझ्याकरिता जातां जातां तुला सुख व्हावें असें मी काय करूं ? तूं सांगशील तें मी करीन मग तर झालें. "

अमिनेला गहिंवर आला. किती वेळ तरी तिच्या तोंडांतून शब्दच फुटेना केवढें उदार अतःकरण ! किती निःसीम प्रेम ! ! अफाट, अथांग सागराचीच उपमा याला योग्य. थोड्या वेळानें अमिना स्वतःला सावरून कर्तव्यतत्पर होऊन, प्रफुल्लित होऊन नेताजीला म्हणाली. " आपला माझा ऋणानुबंध इतकाच होता ! आपण इतका वेळच एकत्र असावें, असाच अल्लाचा हेतू होता घडल्या सहवासात, प्रेमांत अतर नाहीं; लोभांत कसूर नाहीं, मायेंत फरक नाहीं, प्रीतींत बदल नाहीं परवर, मी आपल्याला इतउत्तर बांधीत नाहीं लोभांत गुतवीत नाहीं. जा, आपण खुशाल आपल्या दख्खन-च्या राजाच्या पायांच्या दर्शनाला जा. "

" पण जातां जातां मी तुझ्याकरितां काय करूं ? "

" काय सागू ? "

" काय हवें तें सांग ! "

" जायचं केव्हा ? "

" उद्या "

" मग असं करायचं ! " अमिना विचार करीत म्हणाली. " किनई, आपण एक-मेकांच्या समोर अशीं बसू या. रात्रभर बसूं. उजाडेपर्यंत बसूं. मला आपल्याजवळ कांहींएक बोलायच नाहीं. बोलायला माझ्याजवळ आतां शब्दच राहिले नाहींत. आपल्याला बोलायचं असलं तर खुशाल बोला. माझे कान ते शब्दाचे माणिक मोतीं सांचवून ठेवतील. आपलं रूप माझ्या डोळ्यात सांचून राहूं दे. इतके दिवस पहात आलें, तरी डोळ्यांची तृप्ति होत नाहीं. कानांची तृप्ति होत नाहीं. कान शब्द ऐकतील. डोळे रूप पाहात राहातील वाचा मुकी झाली आहे. जीभ लुली पडली आहे. मी उद्यां आपल्याला आपण निघतांना प्रेमानं ओंवाळीन. प्रेमाचा निरोप देईन ! माझ्या नशिबांत एवढच सुख होत. "

अमिना बोलत होती. नेताजी देहाचे कान आणि मनाचें भान करून ऐकत होता. प्रत्यक्ष प्रीतिदेवता अमिनेच्या रूपानें त्याच्याशीं बोलत होती मग त्याला भान कुठून राहणार ? त्यानें अमिनेचें म्हणणें कबूल केलें.

खरोखरीच तीं दोघें समोरासमोर चित्राप्रमाणें त्या साऱ्या रात्रीं बसून होतीं त्यांच्या मनात दुसऱ्या कोणत्याही अन्य कल्पना शिरत नव्हत्या. अमिनेच्या दृष्टीचा विषय नेताजी आणि नेताजीच्या दृष्टीचा विषय अमिना, असेंच खरोखर झालें होतें. जग विसरलें होतें दोघाची प्रेमसमाधि लागली होती. रात्र सपत आली. पहांटेचा गार वारा अंगाला लागू लागला नगारखाना सुरू झाला उजाडल्याच्या घंटा वाजू लागल्या.

नेताजी उठला. आसन ढळलें. अमिना उठली. कुलस्त्रीला साजेल अशी तिनें पंचारती थाटली. नेताजीला ओंवाळलें. नेताजीला तिनें निरोप दिला. नेताजीनें तिला प्रेमभरानें आलिंगन दिलें.

निरोप घेतला. नेताजी बाहेर पडला ! सैन्याचें सेनाधिपत्य पत्करून दख्खनचा रस्ता नेताजीनें सुधारला. कालचा-गेल्या दोन अडीच वर्षांतला नेताजी आतां नव्हता. दख्खनच्या रोखानें निघालेला या वेळचा नेताजी अत करणांत काय आठवीत होता ? त्याच्या डोळ्यापुढें काय नाचत होतें ?–त्याच्या अंतःकरणात श्रीमच्छत्रपतींची मूर्ति अधिष्ठित होती. तेंच चित्र त्याच्या डोळ्यांपुढें खेळत होतें तो जोरानें घोड्याला टांच मारीत होता, ती महाराजांचें दर्शन शक्य तितक्या लवकर व्हावें म्हणूनच !

प्रेमाच्या साम्राज्यांत गुरफटलेल्या नेताजीचा अवतार संपून शिवाजी महाराजांचा

उजवा हात नेताजी या नात्यानें तो शिवाजी महाराजांच्याकडे लगबगीनें निघाला. त्याचा सत्कार तेथें कसा काय होणार ?—तेंच आता पाहू या !

## ४

बादशहाच्या ताब्यांत असलेल्या एका किल्ल्याला स्वत शिवाजी महाराजांनीं जातीनिशीं वेढा घालून आतलें माणूस आंत, बाहेरचें माणूस बाहेर, रसद बंद, अशी स्थिति करून तो किल्ला आणि त्याबरोबर त्यासभोंतालचा प्रात काबीज करण्याच्या बेतात आणिला होता गेलें सबध वर्ष शिवाजीमहाराजांनीं किल्ल्यामागून किल्ले, प्रातामागून प्रात, मुलुखामागून मुलुख, काबीज करण्याचा एकसारखा सपाटा चालविला होता बादशाही मुलुखात याप्रमाणें महाराजांनीं वाटेल तसा धुमाकूळ चालविला होता. आज अमुक प्रात काबीज केला, तिकडे तमुक किल्ला सर झाला, अशा प्रकारच्या वातम्या दर दिवशीं बादशहाच्या कानावर येत होत्या. बादशहाची तळ पायाची आग मस्तकाला पोंचत होती शिवाजीला खाऊ की गिळूं असें होऊन गेलें होतें. पण करणार काय ? सरदारापाठीमागून सरदार शिवाजीमहाराजाच्या पारिपत्यासाठीं तो पिटाळीतच होता. कोणाही सरदाराला महाराज आता भीत नव्हते, भीक घालीत नव्हते आलेल्या सरदारांचा पाठलाग करून मागें झोडपीत दे माय धरणी ठाय करावयाला लावीत होते

सध्यां किल्ल्याला वेढा पडला होता. किल्ला हस्तगत व्हावयाला एकदोन दिवसांपेक्षां जास्त दिवसगतीची जरूर नव्हती. अशावेळींच दिल्लीहून कोणी सरदार आपल्या पारिपत्यासाठीं येत आहे, अशी बातमी येऊन थडकली. दरकूच दरमजल करीत खरोखरच एक सरदार घाईघाईनें येत होता. अगदीं जवळ आला महाराजांचे लोक हुशार होते. त्यांनीं चांगलीच पाळत ठेवली होती. सरदार व सैन्य जवळ येत चालल्याची क्षणाक्षणाला महाराजाना वर्दी पोंचत होती. महाराज निर्भय होते.

इकडे येणारा सरदार—दुसरा तिसरा कोणी नसून नेताजीच होता, हें सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं तो नेताजीच होता. तो अतिशय त्वरेनें महाराजांच्या रोखानें येत होता मात्र त्याची त्वरा महाराजावर तुटून पडण्यासाठीं नसून त्याच्या पुण्यपावन दर्शनाकरितां होती नेताजी जसजसा जवळ जवळ येऊं लागला, तसतसें त्याला त्याचें बरोबरचें सैन्य जड वाटूं लागलें हें सैन्य आपल्या व महाराजांच्या भेटींत अडथळा आणावयाला कारणीभूत होणार, अशी त्याला सकारण भीतिही वाटूं लागली क्राहीं तरी युक्ति करून हाताखालच्या माणसाच्या ताब्यांत ती सैन्याची तुकडी द्यावी आपण अदाज काढण्या—करण्याचा बहाणा करून एकटेंच पुढें जावें, असेंही त्याच्या मनांत येऊं लागलें वरीच मनाशीं भवति न भवति करून शेवटीं

शिवमय झालेल्या नेताजीच्या मनानें एकटेंच पुढें जावयाचें ठरविलें. सैन्य हाताखाल-च्या माणसाच्या स्वाधीन करून, 'इषारा दिल्यावर पुढें या,' असें सांगून तें दूर ठेऊन आपण एकटाच पुढें सटकला !

सैन्य जावो नाहींतर राहो, त्याचें कांहीं होवो, इतउत्तर त्याचा आपला संबंध नाहीं. संबंध ठेवावयाचाही नाहीं, या कल्पनेनेंच त्यानें तेथेंच सैन्याला सोडलें आणि जेथें श्रीशिवाजी महाराजांची छावणी पडली होती, तेथें येऊन स्वारी दाखल झाली.

श्रीशिवाजीच्या तळावर येऊन घोड्यावरून खालीं उतरताच नेताजीच्या अंगावर रोमाच उमे राहिले आपण आपल्यात आलों, घरांत आलों, बांधवांत आलों, आईच्या मांडीवर खेळण्याला आलों, असेंच नेताजीला वाटलें त्याचें हृदय प्रेमानें भरून आलें त्यानें स्वदेशाला, श्रीशिवाजी महाराजाना प्रेमभावानें वंदन केलें ! क्षणभर जागच्याजागीं तो थबकला चौकी-पहारे ओलांडण्याचें, महाराजांच्या पर्यंत शिरकाव करावयाचा, सहजा-सहजीं ह शक्य नाहीं, असें त्याचें त्यालाच वाटू लागलें. आपलें आपल्यालाच नखशिखांत त्यानें न्याहाळलें. दुसऱ्याला न दिसणाऱ्या आपल्या अंत:करणाशिवाय हिंदुत्व आपल्या जवळ राहिलें आहे कोठें ? आपल्याला आंत जावयाला मज्जाव होणार खास. मग ? मग म्हणून थांबावयाचें थोडेंच. हलके हलके नेताजीनें पुढें घुसावयाला सुरवात केली ठरल्या प्रमाणें त्याला अडथळा झाला. अत्यंत उत्कंठित शब्दांनीं नेताजी पहारेवाल्यास विनवूं लागला. “ मला महाराजांना भेटावयाचें आहे. ”

“ चल हट. मुसंडा कुठला ? महाराजांची भेट व्हावयाची नाहीं.

“ मुसंडा ! कुठचा मुसंडा ? मी मुसंडा नाहीं

“ मुसंडा नाहीं ! मग कोण हिंदु आहेस तर ?” पहारेवाल्यानें खो खो हंसत म्हटलें. तो इतक्या दांडग्यानें हंसला कीं, इकडे तिकडे फिरत असलेले इतर लोक त्याचें हंसणें ऐकून जवळ आले. “ काय आहे ? कोण आहे ? ” म्हणून कोणीसें म्हटलें ! त्यावर पहारेवाला म्हणतो “ हा पाहिलात का दाढीवाला बोकड ? हिंदु आहे म्हणून म्हणतो व महाराजांची भेट मागतो ! त्या अफझुलखानाचा हा नवा अवतार दिसतो ! आंत गेलास तर महाराज त्या अफझुलखानासारखा या अफझुलखानांचाही कोथळा फोडल्याशिवाय राहणार नाहींत समजलास का?” पहारेवाला पुन्हां हंसला तमासगीरही हंसले. नेताजी रागावला नाहीं, संतापला नाहीं, त्याला अशा रीतीनें वागविण्यात आलें नसतें, तर मात्र त्याला खरा राग आला असता तो गंभीरपणें म्हणाला, “ दोस्त हो, महाराजांच्या या नेताजीला येथें कोणीच का ओळखीत नाहीं ? ”

“ काय नेताजी ? ’ कोणीशी पृच्छा केली

"तुम्ही ओळखलें नाहीं, तरी महाराज मला ओळखतील. वाटेल तर महाराजाना वर्दी द्या त्यानीं सांगितलें तर मला आंत घ्या. मग तर झालें ? पण महाराजांचें दर्शन मला अगोदर घडवा "

पहिल्यादा त्याचें कोणी ऐकलें नाहीं, तरी त्यानें चिकाटी सोडली नाहीं होय नव्हे करिता करिता आपल्या शंकेसुद्धां महाराजाच्या कानावर हकीकत पोंचवावयाचें ठरलें. पहारेवाल्यानें तंबूंत वर्दी पोंचविली, नेताजींचें नांव ऐकतांच महाराजांना फार आनंद झाला. जातीनिशीं महाराज उठले आणि बाहेर आले. बाकीचे लोक विसरले असतील, पण महाराज नेताजीला—आपल्या उजव्या हाताला कसे विसरणार ? " नेताजी आलास ? " महाराजानीं प्रेमभरानें हाटकलें. नेताजीनें महाराजांच्या पायीं लोळण घेतलें. महाराजांनीं नेताजीला उचलून हृदयाशीं कवटाळलें. सभोंवतालची मंडळी आश्चर्यानें थक्क झाली सभोंवतालच्या मंडळीकडे पहात महाराज म्हणतात, " मंडळी, आपल्या या नेताजीला ओळखलं नाहींत तुम्हीं ? नेताजी, तूं अगदीं शुभ वेळेला आलास. बादशहाकडचा अवघड किल्ला उद्या आमच्या हातीं येणार, याची ग्वाही द्यायला आज बादशहाकडे अडकलेला आमचा फाकडा शिपाई नेताजी आम्हांला येऊन मिळाला. याकरिता आणखी शुभ शकुन कोणता पाहिजे ?

महाराजानीं हृदयाशीं धरलेल्या नेताजीला या वेळीं केवढा आनंद झाला होता ! किती कृतकृत्यता वाटत होती ! ! जन्माला आल्याचें सार्थक आज झाल्यासारखें त्याला वाटतच असल्यास नवल काय ?

\+ + +

नेताजीची दिल्ली कडची हकीकत महाराजांनीं ऐकली. लोकानांही ती कळली. तो मुसलमान झाला होता. आतां तो आपल्यांत येणें शक्य नाहीं, त्यानें येऊं नये, अशीही कुरकुर कित्येकांनीं केली, परंतु शिवाजी महाराजांनीं—त्या राष्ट्रपुरुषानें अतिशय दूरदृष्टीनें, सर्व बाजूनें सांगोपांग विचार करून, शास्त्रीपंडितांची सल्ला घेऊन नेताजीला शुद्ध करून स्वधर्मांत घेतलें आणि नेताजीसारखा शूर शिपाई स्वदेशाच्या कार्यास सर्वतोपरी उपयोगी केला.

\+ + +

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमच्छत्रपति शिवाजी महाराज यांना आपल्या राष्ट्राकरितां शुद्धिसमारंभ घडवून आणावे लागत होते इतिहासाची पुनरुक्ति आज होत असल्यास तिच्याकडे सुज्ञ म्हणविणारांनीं त्याचें दृष्टीनें पहावयास नको काय ?

# भारतीय इतिहासाचें वैशिष्ट्य

[ श्रीयुत नानालाल कवींच्या गुजराती लेखाचा अनुवाद. ]

**ले.–श्यामसुंदर य. मराठे**

भारतीय इतिहास म्हणजे मानवजातीची एक अद्भुत कथा आहे. या कथेचा इतिहास जितका गहन, तितकाच चमत्कृतिपूर्ण आणि बोधप्रद आहे. अभ्यासकास तो सागराप्रमाणें अगाध आणि आकाशाप्रमाणें अनंत भासतो. परंतु जसजसा त्याचा अभ्यास होत जातो, तसतसें त्या इतिहासाचें नवरस-मिश्र-स्वरूप पाहून अभ्यासकास परमानंद होतो. असा हा भरतखंडाचा अपूर्व इतिहास आहे. प्रस्तुत प्रसंगीं या विषयाचें अफाट क्षेत्र पाहून मति कुंठित होत आहे आणि कविश्रेष्ठ कालिदासाप्रमाणें

**क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः**
**तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ।**

अशी माझी स्थिति झाली आहे. तथापि कालिदासाचें अल्पमतित्व रघुवंशच काय, पण शाकुंतलमेघदूतासारखीं काव्यनाटकें निर्माण करून त्रिखंडीं धन्यता पावलें मंदबुद्धि कवीनें कीर्तीचें सारें गगन विनयशीलपणानें आक्रमावें, ही एक भारतीय इतिहासांतील चमत्कृतीच होय. तात्पर्य, खऱ्या विनम्रतेनें विश्वाला कसें मोहून टाकावें ही कला कालिदासास जशी अवगत होती तशी मात्र मला नाहीं. कारण अल्पबुद्धीच्या क्षुद्र होडक्यांत बसून मी भारतीय इतिहासाचा अफाट सागर तरण्याचा हेका धरिला आहे. तथापि " आपुलिया बळें नाहीं बोलवत । सखा कृपावंत वाचा त्याची " या सदुक्तीप्रमाणें मी आजच्या विषयाचा प्रपंच करणार आहें. हंसकाकीयकनाथकाप्रमाणें माझी केवळ फडफडच ठरली, तरी हंसाशीं स्पर्धा केली, हें काय कमी धाष्ट्यांचें आहे ?

असो आपणांस आक्रमावयाचें क्षेत्र विस्तृत असल्यामुळें आपण धिमेपणानेंच सुरुवात केली पाहिजे एक तर भारतीय इतिहास हें जणूं एक काव्यच असून, तें इतकें अद्भुत आणि चित्तवेधक आहे कीं, एकाद्या नीरस आणि रूक्ष इसमासही या काव्यवातावरणात वावडीप्रमाणें स्वैरविहार करावासा वाटेल. मात्र मी ही वावडी शक्य तोंवर अविरत फडकत ठेवण्याचा प्रयत्न करीन.

इतिहासाचें उच्च आणि पवित्र ध्येय मानवजातीचें कल्याण साधणें हें असलें पाहिजे. भारतीय इतिहासांत ह्याची व्याप्ति एवढी मोठी आहे कीं, त्यांत मोठमोठे संत आणि गोढ तत्त्वज्ञसुद्धां रंगून गेले आहेत परंतु मी मात्र एक ससारशास्त्राचा अभ्यासक आहें.

तर आतां 'इतिहास म्हणजे काय? येथूनच आपण विषयारभ करूं. इतिहास म्हणजे मानवजातीची महाकथा! विधात्याच्या अदृश्य लेखणींतून उतरलेलीं अनुभवसूत्रें! कालानें सृष्टिपटावर केलेली अक्षयची आंकडेमोड!!! इतिहास म्हणजे ब्रह्मांड-महासागरावर अविरत हेलावणाऱ्या तरंगावलींनीं सजलेले अक्षरलेखच! इतिहास म्हणजे विश्वप्रकृतीच्या चलनास आवश्यक अशा महासत्याचें काव्य आणि अशा महाकाव्याचें सत्य!'

इतिहासात कल्पनेच्या आवांक्याबाहेरची अद्‌भुतता भरलेली आहे! कलाविधायक विधात्यानें रचिलेलें महाकाव्यच तें! रामायण, महाभारत, इलियड, शहानामा हे त्या महाकाव्याचे एक एक सर्ग!! इतिहास म्हणजे सत्तत्त्वाची रम्य लीला होय.

जगाचा इतिहास हें एक महावर्तुळ आपण कल्पिलें, तर भारतीय इतिहास त्याचा मध्यबिन्दु होय हें महावर्तुळ म्हणजे शिकंदरापासून कोलबस, वास्को डी गामा, नेपोलियन आणि कैसरपर्यंतचे साऱ्या जगत्-सशोधक-जगत्साम्राज्यवादी स्वप्नसचारकाचा स्वप्नसर्ग!!

व्रजवनांत धुंडीत असतां श्रीकृष्णाला जशी त्याची लाडकी सखी राधा गवसली, त्याप्रमाणें भारतवर्षाच्या शोधकाला अमेरिकाखड गवसलें. आजच्या धनसमृद्ध युरोपला कांहीं धन अमेरिकेनें अर्पिलें, कांहीं भारतवर्षानें दिलें आणि बाकीच्यांची किंबर्लीसारख्या सोन्याच्या खाणींनीं भरपाई केली आहे.

आंबा मोहरावा, त्याला कैऱ्या लागाव्या, त्यांचीं आम्रफळें पक्व झाल्यानतर पानें गळून पडावीं पुनरपि वसंत यावा, पुनरपि आंबा मोहरावा, कैऱ्या याव्या आणि त्यांचीं आम्रफळें पक्व व्हावीं आणि फिरून सारीं पानें गळून पडावीं. म्हणजे त्याची ती पर्णहीनता आणि ते नवपल्लव, तें त्याचें बहरणें आणि वठणें, ती त्याची वैभवनष्टता आणि पुनरुज्जीवन-'वासांसि जीर्णानि यथा विहाय-' या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें युगांयुगींचे नवावतार, भारतीय इतिहासकथेचीं हीं सारीं स्थित्यंतरें व स्वरूपें अभ्यासिण्याजोगीं आहेत

युरोपीय इतिहासशास्त्रवेत्ते म्हणतात कीं, मध्यआशिया हें मानववंशाचें आद्यजन्मस्थान, ( Cradle of mankind ) होय कॉकेशस पर्वत,-कीं जेथून पंच

महानद दिशोदिशीं फैलावले आहेत,—तेंच आर्यांचें मूलवसतिस्थान. आर्यवंशाचें, आर्यसंस्कृतीचें लघुतर क्षुद्र स्वरूप म्हणजेच आजची भारतीय आर्यप्रजा व भारतीय आर्यसंस्कृति.

जगाच्या इतिहासात सेमेटिक, मोगल, ताम्र इत्यादि बहुत वंश आहेत. त्या सर्व वंशांत आर्यवंशाचा इतिहास हा अत्यंत उज्ज्वल आहे

द्रौपदीचे पाच पती, श्रीकृष्णाच्या अष्टनायिका, रामाचें एकपत्नीव्रत, सीतेचें पातिव्रत्य, सुभद्राहरण आणि अर्जुनाचा राक्षसविवाह, सीता, द्रौपदी, संयुक्ता यांचे स्वयंवर-प्रसंग, पित्याची आज्ञा प्रमाण मानणारा श्रीराम आणि पित्याची बेछंद आज्ञा गुंडाळून ठेवणारा प्रल्हाद, सरस्वतीदेवीचें कौमार्यव्रत, तारामंदोदरींचे पुनर्विवाह, समुद्रवलयांकित पृथ्वीचे एक एक चक्रवर्ति, राज्यहीन राजांचा प्रजाशासनाचा अधिकार, सत्यवादी हरिश्चंद्र, राज्याची उलथापालथ लीलेनें करणारा चाणक्य, अखिल राजमंडळात मेरू-प्रमाणें शोभणारा प्रतापकीर्ति अशोक, राजराजेश्वर अकबर; लावण्यलतिका शकुंतला, संयुक्ता, नूरजहान, मुम्ताजमहाल, समरांगणीं विद्युल्लतेप्रमाणें चकाकणाऱ्या लक्ष्मीबाई, अहिल्याबाई आणि चांदबिबी, कुंती आणि जिजाबाईसारख्या भाग्यशाली राजमाता, चित्रकला, संगीत, नाट्य, कवित्व आणि स्थापत्यसौंदर्याचा सर्वांगीण विकास, सात सात वस्त्रें पेहरूनही शरीर भाग दाखवणारी डाक्याची मलमल, सौंदर्यमोहिनी आजही तितक्याच तोऱ्यानें वागडते आहे अशी अमदावादी किनखाब, मेघदूत आणि शाकुंतल यांसारखीं बुद्धिरम्य काव्यें, रामायण आणि महाभारत, दिलवाड्यांतील मंदिरांत संगमरवरी दगडावर कोरलेली कविता, ताजमहालातील प्रिया—प्रियकराचें आलेखित काव्य, गोकुळवृंदावनांतील गोपींचीं गाणीं, बुद्धासारखे नवधर्मसंस्थापक, कपिल, कणाद, पतंजलि याच्या सारखे महाभाष्यकार, काशीच्या विख्यात विद्वानांचीं महाविद्यालयें आणि वादसभा, ब्रह्मवर्तीचें ब्राह्मतेज, चितोडचें क्षात्रतेज क्षत्रियाचें प्रखर वीर्यतेज आणि क्षात्रपत्न्यांचें स्वासुत्यागी जोहार ! ! ! हे सर्व विविध प्रकार भारतवर्षीयाच्या इतिहासांतच आढळतात पर्वाच्या युद्धांत इंग्लंडला बाल्डविननें कांहीं संपत्ति दिली तर त्यास प्रधानपदीं स्थापून त्याचा बहुमान करण्यांत आला, पण प्रतापसिंहाच्या पायीं भामाशहानें आपलें सर्वस्व अर्पिलें होतें असे भामाशाह, तोडर-मल, जगडुशाह, वस्तुपाळ, तेजपाळ यांसारखे विख्यात दानवीर वैश्य संन्यासी व राजसंन्यासी, मनुस्मृति आणि ऐने अकबरी यांसारखे स्मृतिग्रंथ, राजतरंगिणी आणि अकबरनामा, बाबरचें आत्मवृत्त, यासारखे आत्मचरित्रपर ग्रंथ, कादंबरीसारखी पूर्व-

जन्म वा जन्मान्तरवृत्त लिहिलेली महाकथा, समुद्र ओलांडून गुजराथ प्रांत हीच आपली जन्मभूमि ठरविणारे पारशी, पहिल्या किंवा दुसऱ्या शतकात मलबारांत वसाहत करून राहिलेले ख्रिस्ती, इत्यादिकानीं मिळून जणूं काय जागतिक इतिहासांतील एकेक अद्भुत आणि महत्तर कथा-ग्रथन करूनच विधात्यानें हा भारतीय इतिहास लिहिला आहे असें वाटतें. कारण भारतीय इतिहास म्हणजे जगाच्या इतिहासाची गुरुकिल्लीच !

जगाच्या इतिहासांत कांहीं वादग्रस्त प्रश्न आहेत भारतीय इतिहासातही असेच कांहीं प्रश्न विद्यार्थ्यांस अडवितात.

रोमनांनीं ग्रीकास जिंकिलें. इतिहासकार म्हणतात कीं, ग्रीकानीं रोमनांस जिंकिलें. ग्रीक संस्कृतीनें रोमन सस्कृति आत्मसात् केली, कीं रोमनसस्कृतीनें ग्रीकसस्कृति आत्मसात् केली, हे प्रश्न वादग्रस्त पण महत्त्वाचे आहेत. कारण सस्कृतीचे जयापजय वा उच्चनीचत्व म्हणजेच इतिहास होय.

'ब्रिटिश लोक कधींही कोणाचे गुलाम होणार नाहींत !' अशी इंग्रजांची जिद्द आहे. भविष्यवाणीच्या मंगल सुरांत सूर मिळवून आपण सर्वच एकदिलानें असें म्हणूं कीं, पृथ्वीवरील कोणत्याही लोकांस गुलामगिरीची पाळी येऊ नये ! हें मंगलाचरण ऐतिहासिक सत्य म्हणून स्वीकारण्यापूर्वी रोमच्या बाजारहाटातील पोप ग्रेगरीचा प्रसंग इतिहासपटावरून धुवून काढला पाहिजे. अजमासें इ. स. १०१४ त म्हणजे सोरटी सोमनाथावरील स्वारीच्या प्रसगापूर्वी किंवा एक दशक आगेमागें मुलांना गुलाम म्हणून विकण्यांत येऊं नये हा कायदा ब्रिटननें केला. आजच्या विसाव्या शतकांत सद्धां गोऱ्या गुलामांच्या व्यापाराची चर्चा मावळली नाहीं आणि अजून तन्निषेधक कायदे-कानू करण्यांत येत आहेत !

भारतीय इतिहासांतही असेच कित्येक बिकट मुद्दे आहेत.

भारतवर्ष म्हणजे उत्तर हिंदुस्थान, विंध्य, हिमालय, हिंदुकुश, काराकोरम, हाला आणि सुलेमान या पर्वतानीं मर्यादित एवढाच प्रदेश, असें काहीं विद्वान मानितात. पण ती चूक आहे. त्रेतायुगीं श्रीरामचद्र व तत्पूर्वी अगस्त्यमुनि विंध्य ओलांडून दक्षिणप्रांतीं आले आणि त्याबरोबरच आर्यसस्कृतिही दक्षिणेंत आली तेव्हापासून दक्षिणेचाही आर्यदेशांत समावेश झाला. तरीसुद्धां मनूच्या आर्यदेशाच्या चतुःसीमेची व्याख्या इतिहासास पुसून टाकतां आली नाहीं. म्हणून शालिवाहन, पुलकेशी, साव-

णाचार्य, विजयनगर, विजापूर, चांदबिबी, शिवाजी, पेशवाई वगैरे व्यक्ति आणि व्यक्तिनिविष्ट राज्ययंत्रें, हीं भारतीय इतिहासातून वगळणें इष्ट होणार नाहीं गोवळकोंड्याच्या खाणीसुद्धां आपल्या इतिहासांत अंतर्भूत केल्या पाहिजेत, कारण त्यातील हिरे हेही आमच्या इतिहासाचे देदीप्यमान पुंज आहेत.

भारत म्हणजे कलहाचें मैदान, आणि भारतीयाचीं राजकुलें म्हणजे कौरवपांडव आणि पृथ्वीराजजयचंद भारतीयांचें भिन्न जातीयत्व आणि भिन्नधर्मीयत्व म्हणजे परस्परांचा प्राणघात, असा एक कुत्सित प्रवाद हिंदेतरात आहे.

सत्य त्रिवार सत्य. पण कोणत्या देशांत या गोष्टी घडत नाहींत ? रशिया, जर्मनी, ईंग्लंड यांमधील पर्वांचें युद्ध म्हणजे आपसांतील यादवीच नव्हे तर काय ? आजच्या विसाव्या शतकात भारताची बाराव्या शतकातील समाजस्थिति दाखविणारीं नाटकें युरोपला पाहावीशीं वाटतात जैन, पारशी, ख्रिस्ती धर्माचार्यांस बोलावून अकबर ज्या वेळीं सर्व धर्मीयाचा समन्वय करण्याचा अट्टाहास करीत होता, त्याच वेळीं इंग्लंडांत एलिझाबेथ ही राणी धार्मिक मतभेदानीं अंध होऊन आपल्याच बांधवास तुडवीत होती, कबीर आणि नानक धर्मोधर्मांतील उच्च तत्त्वसंग्रह करण्यांत जेव्हां गुंतले होते, त्याचवेळीं युरोपात परस्परविरोधी वातावरण उत्पन्न झालें होतें इ स. १६४८ वेस्टफेलियाच्या तहापूर्वीं मतभेद आणि त्यासाठीं अत्याग्रह यानीं सारा युरोप कलहाच्या वणव्यानें होरपळून निघत नव्हता काय ?

यावनी पातशाही म्हणजे अधःकारयुग असें कित्येक म्हणतात पण पंधरा वर्षांच्या अवधींत दोनदोनदां समरकंदावर स्वारी करणारा बाबर, अठराव्या वर्षी पानिपतची लढाई करणारा हुमायून, तेराव्या वर्षी हिमूस जीत करून राज्य चालविणारा अकबर, सहा वर्षेपर्यंत हल्दीघाटात युद्ध करण्यास तगणारा सलीम, पंचवीस वर्षांत अमरसिंह आणि मलिक अंबर यास जिंकणारा शहाजहान, बावीस वर्षें झुजूनही जेरीस आल्यानतर तलवार म्यान करून नमाज पढणारा औरंगजेब,—आग्रा, दिल्ली आणि फत्तेपूर येथील भव्य आणि विशाळ मंदिरें, इमारती व जयस्तंभ,–तानसेन सूरदासासारखे संगीताचार्य, तोडरमलासारखे असाधारण मंत्री, नानक, कबीर, मुबारक, अकबर, यासारखे सर्वधर्मसंग्राहक, दुर्गादास, शिवाजी, गुरुगोविंद यासारखे यवनसत्तेचे उच्छेदक, अशीं अत्यंत तेजःपुंज नररत्नें ज्या कालात होऊन गेलीं, त्यास अधःकारयुग म्हणणाऱ्याची इतिहासदृष्टीच आंधळी झाली, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं

इतर कालखंडांप्रमाणें यावनी पातशाहींचा कालखंडही अंधःकारमय नव्हता तो द्युतिमय होता.

भारतवर्षात स्त्रियांची हीनदशा होती, हा आक्षेप नेहमींचाच आहे. लीलावती, सरस्वती, सीता, दमयंती, या पौराणिक स्त्रिया सोडून दिल्या तरी यशोधरा, संयुक्ता, कर्मादेवी, जिजाबाई, अहिल्याबाई लक्ष्मीबाई, गुलबदन, बानू बेगम, सुलताना सलीमा बेगम, नूरजहान, मुम्ताजमहाल, रोशन आरा, जहान आरा, झेब्बुन्निसा बेगम; चांदबिबी, वगैरे स्त्रीरत्नें ज्या देशात चमकलीं, त्यांतील स्त्रियांची हीन दशा असती तर अशी निर्मिति झाली असती काय ? परंतु आक्षेपकांची दूषित दृष्टि निवळली, तर त्यांसही या गोष्टी सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट दिसतील मात्र तशा निष्किल्मिष दृष्टीनें पाहण्याची इच्छा असली म्हणजे झालें ! हिंदुयुगांत काय किंवा इस्लामी अमलांत काय, स्त्रियांचें तेज चंद्रकलेप्रमाणें प्रभापूर्णच होतें

वरील आक्षेप ज्यानी घेतले, त्यानीं भारतीय इतिहास काहींतरी वाचला पण त्यांतील हृद्गत ओळखिलें नाहीं, असें म्हणता येईल. तथापि कांहीं विद्वानांनीं ' भरतखंड हा देश नेहमीं परतंत्र आणि परकीय सत्तेखालींच असावयाचा ' अशी एक कायम ठशास योग्य अशी व्याख्या करून विधात्यावरही ताण केली आहे. पण जगांत कोणता देश परतंत्र नव्हता ? जर्मनी, फ्रान्स, कीं इंग्लण्ड ? रोमन, अँगल्स, सॅक्सन, डेन्स, नार्मन या परकीयांनीं इंग्लण्डवर स्वाऱ्या करून तेथें आपली सत्ता गाजविली आहे. मग हिंदुस्थानालाच परतंत्रतेचा एकुलता एक बनविण्यांत काय हंशील आहे ? साऱ्या जगभरच हा स्वसत्ता व परसत्ता यांचा चक्रनेमिक्रम अखंड चालू आहे परंतु गुन्हा उघडकीस येईपर्यंत सारेच साव असतात, त्याचप्रमाणें सांप्रत हिंदुस्थान परसत्तेखालीं मान वाकवीत आहे, म्हणून आक्षेपकांस अशा सिद्धातांचे उमाळे येतात. असो.

भारतीय इतिहासाचे तीन ठळक कालखंड पाडता येतात ( १ ) हिंदुयुग ( २ ) इस्लाम किंवा यवनयुग आणि ( ३ ) युरोपीय युग.

सन ११९२ त स्थानेश्वरच्या रणसंग्रामांत पृथ्वीराज चव्हाणचा पराभव झाला, तेथपर्यंतचें हिंदुयुग

सन १७०७ सालीं औरंगाबादेंत औरंगजेबाचा आणि त्याबरोबरच इस्लामीवर्चस्वाचाही दफनविधि झाला, तेथपर्यंतचें इस्लामयुग

सन १७४८ त त्रिचनापल्लीच्या वेढ्यापासून किंवा सन १७५७ च्या प्लासीच्या लढाईत ब्रिटिशानीं तोफांचा गडगडाट करून इस्लामयुग संपल्याची ग्वाही दिली आणि

सन १८५८ त ईस्ट इंडिया कंपनीनें ब्रिटनच्या राजावर राजछत्र धरिलें, तेव्हांपासून भारतवर्षांत ब्रिटनचें चक्रवर्तित्व प्रस्थापित झालें, म्हणजेच युरोपीय युगाची सुरुवात

भारतीय इतिहासाचे हे तीन भिन्न भिन्न खण्ड होत भारतीयानीं, यवनांनीं व युरोपीयांनीं आपापल्या कालखडात काय कामगिरी केली व त्यावरून त्यांची योग्यता काय हें ठरवावयाचें आहे. युरोपीय युगाची सांगोपांग चर्चा तूर्त करतां येणार नाहीं. तथापि सामान्यपणें क्षेत्रीं आलेल्या यात्रेकऱ्यांप्रमाणें त्या प्रत्येकाच्या इतिहासकुंडात अवगाहन करण्यास कांहीं हरकत नाहीं.

प्रथमत आपण शेवटचें युग म्हणजे युरोपीय युग घेऊं. त्यांच्या सत्तेचीं तीन केंद्रें म्हणजे कलकत्ता, मद्रास आणि मुंबई, हीं होत. या केंद्रांमधूनच युरोपीयांची अथवा विवक्षितपणें बोलावयाचें तर इंग्रजांची सत्ता फोफावत गेली कलकत्ता हें त्या सत्तेचें आद्यपीठ होतें

राजकीय दृष्टीनें या इतिहासाकडे पाहिलें असतां त्याचें अर्धेअधिक इंगित कळतें. खेरीज सांप्रत आपण त्याच युगात नांदत आहों. राजकीय पक्षाभिमान अगर फाजील देशाभिमान यांच्या योगानें दृष्टि दूषित होऊं न देता प्रस्तुतच्या इतिहासाकडे पाहिलें पाहिजे. नाहींपक्षीं फ्रूड, मेकॉले, हंटर याचा अप्रस्तुत एकांगीपणा पदरीं येईल आणि खऱ्या इतिहासकाराची निष्पक्षपाती दृष्टि मात्र आधळी बनेल सकृद्दर्शनींच क्लाइव्ह, हेस्टिंग्ज, डलहौसी, कर्झन, डायर हे पुरुष झाल्याचें दिसून येईल पण त्यांच्याचबरोबर जोन्स, टॉड, फोर्ब्स, ह्यूम, मॅक्समुल्लर, एडविन् आर्नोल्ड हे पुरुष सुद्धा लक्षात घेतले पाहिजेत इतिहासात तीनही प्रकृतींचा समावेश होणें जरूर असतें.

आत्माराम भूषण याची पेढी आफ्रिकेंत केवळ व्यापारउदीमासाठीं स्थापन झाली. परंतु पुढें तिनें व्यापारच काय पण आफ्रिकेचें राज्यसुद्धां बळकाविलें अबब ! काय हो ही तुमची कमालीची कादंबरीरचना ? असे उद्गार आजचा युरोपसुद्धां काढील पण विधात्यानें कलम हातीं घेतलें कीं त्याचें सारें लिखाण सत्य आणि सारीच कादंबरी ! चित्रकाराच्या पुष्पाहून निसर्गाचें पुष्प अधिक रंगदार असतें

महमद घोरीनें हिंदुस्थानांत घुसण्याचा सहा वेळां प्रयत्न केला. सातव्या खेपेस स्थानेश्वरच्या रणसग्रामांत मात्र तो विजयी झाला. बाबर, हुमायून, बहिराम यानींही निरनिराळ्या प्रसगी हिंदुस्थानास हतवीर्य करून आपापलीं स्थानें अधिक दृढ केलीं. शेवटीं स. १७६१ त कोण विजयी झाला ? पानपतानें हिंदूंस आणि यवनास काय

निकाल दिला ? मुसलमानांचा विजय म्हणावा तर आधींच खचत चाललेल्या इस्लामी सत्तेचा पाय अधिकच खोलात गेला. हिंदूंचा विजय म्हणावा, तर पुढील २५ वर्षांतच त्या विजयाची पुरी नामोशी झाली. हिंदुस्थानाचे हे जयापजय खरे नव्हते. कारण त्यांस कसोटीस लावून पाहणारी सत्ता याच वेळीं उदयास येत होती. त्या वर्धिष्णु सत्तेनें स. १७४८ पासून तों स. १८५८ पर्यंत आपलें सार्वभौमत्व कणश: आणि क्षणशः स्थापून जयापजय हे शब्द कोशात धुंडाळून काढण्याइतके अप्राप्य केले. स. १८७७ त त्याच सत्तेनें सार्वभौमपदाचा जाहीर उच्चार करून, युरोपीय युगाची आक्रमणशक्ति स्थिर झाली असल्याचा नगारा वाजविला.

मद्रास, कलकत्ता आणि मुंबई या त्रिस्थळीं इंग्रजांनीं प्रस्थान ठेविलें. आणि आजला वामनासारखें त्रिखंड पादाक्रांत केलें वामनावतारीं बळी पाताळात गेला. पण प्रस्तुतच्या अनामिक अवतारात बळी भूमीवरच असून गाडल्यासारखा झाला आहे. जग बळीच्या औदार्यापेक्षा वामनाचीच प्रतिष्ठा गातें आणि शुक्राचार्यांच्या एकाक्षाची मात्र टवाळी करितें.

हिन्दुकुश, काराकोरम, हाला, सुलेमान हे भरतखंडाचे अभेद्य पर्वतदुर्ग यवन जेत्यानीं सुगम केले. मलबार आणि कारोमंडल हे दुस्तर–सागरांकित किनारे युरोपीय जेत्यांनी सहजीं पादाक्रान्त केले. जगात अजेय, दुस्तर आणि दुर्गम असें काय आहे ?

सर्व भूतांचे ठायीं वसणारा आत्मा मात्र अजेय आहे, अव्यय आहे आणि अक्षर आहे.

या युरोपीय नवयुगांत भरतखंडाचीं कपाटें खुलीं झालीं. भारतीय आर्य जगांतील इतर लोकांशीं दळणवळण करूं लागले. समुद्रवलय आणि पर्वतदुर्ग यांच्या सुरक्षित चक्रानें इतके दिवस ते जगाहून अलग होते. या नवयुगात हीं सारीं द्वारें मोकळीं झालीं पृथ्वी, जल व वायुमार्गांनीं भारतीयाचा जगाशीं, अधिकाधिक संबंध येऊं लागला, तसतसे त्याचे हितसंबंध जगाशीं अधिकच निगडित झाले

भरतखंडात सार्वभौम राजे येतात आणि जातात. भरत, अशोक, अकबर, औरंगजेब यांसारखे चक्रवर्ती होऊन गेले, तरी पण प्रस्तुत कालासारखे हिंदुस्थानांत भिन्नभिन्न प्रांतीयांचे हितसंबंध कधींही संबद्ध झालेले नव्हते

‘ दैवासुरप्रकृति ’ म्हणून ज्या तत्त्वाचें वर्णन आपल्याइकडे केलेलें आहे, तेंच तत्त्व Modernism या शब्दानें अर्वाचीन जगाला चालू युगानें दाखविलें आहे. ध्वनि–प्रतिध्वनींचें साम्प्रतचें युग आहे. युरोपात ध्वनि उमटला कीं त्याचा पडसाद

( प्रतिध्वनि– ) इकडे उठतो गांधीजींची आजची स्वराज्यघोषणा हीसुद्धा युरोपच्या ध्वनीचा पडसादच आहे असें म्हणता येईल.

प्रस्तुतच्या नवयुगात 'प्रतिकारी हिंदुत्वा'चा ( Militant Hinduism ) जन्म झाला आहे. या तत्त्वाचा झकार प्रथम सन १८७७ त दयानदांनीं दिल्लीदरबारात 'श्रीमन्महा'च्या घोषानें केला, सन १८९३ त अमेरिकेंतील 'विश्वधर्ममहासभे' पुढें विवेकानंद या भारतसुपुत्रानें याच प्रतिकारी हिंदुत्वाचा संदेश तारस्वरानें उच्चारिला, आणि हिंदुस्थानापासून निघालेल्या जगत्संदेशांत त्यानेंच संजीविनी ओतली सम्राट अशोकाचे वेळीं असाच प्रणवघोष बौद्धांनीं धर्मसभेपुढें करून, आपले प्रचारक बुद्धभिक्षु जगभर संचारार्थ पाठविले, आणि फिरून तोच प्रसग पण निराळ्या स्वरूपांत दोन हजार वर्षांनंतर घडून आला. आत्मविकास या भावनेचा अमेरिकेंत पुनरुद्भव झाला. प्रस्तुत नवयुगाचा वृत्तांत म्हणजे तीन राक्षसांची एक कथाच जल, वायु, वाफ आणि तिचीच सख्खी बहीण विद्युल्लता यांची कुळकथा, म्हणजेच वर्तमान युगाचा इतिहास.

आजची दृश्य सस्कृति म्हणजे सुद्धा या चार राक्षसांची अमानुष लीलाच नव्हे तर काय ? या दीर्घसूत्री जनकांपासून निर्माण झालेल्या आगगाडी, तारायत्र, आगबोट, विमान, जलांतर-सचारिणी नौका या साऱ्या त्राटिका त्रिखडीं थैमान करीत आहेत.

गुर्जरकवि दलपतराम यांच्या अमर शब्दांत सांगावयाचें म्हणजे, आजचें सुधारणायुग म्हणजे हुन्नरखानाची चढाईच होय

प्रस्तुत युगात जगास लघुत्व आलें. मात्र हिंदुस्थानचा अधिक विस्तार झाला. कारण हिंदुस्थानची दृष्टि हिमालय आणि हिंदी महासागर ओलाडून त्रिखड धुडाळण्याइतकी विशाल झाली. मात्र एवढ्याच साठीं त्याला केवढी जबर किंमत द्यावी लागली आहे ! हिंदुस्थानांत राबून पिकविलेल्या कापसाची किंमत अमेरिका सागणार आणि दर्याकिनारीं पाण्यांत बुड्या मारून, जिवाचें पाणी करण्याइतके श्रमसायास करून, काढलेलीं पाणीदार मोत्यें पारिस स्वत च्या मापानें पारखणार ! !

यावनी युगात भारत–लक्ष्मी भारतवर्षांतच नादत होती. आज मात्र तिला ही नांदणूक न आवडून स्वच्छदीपणानें ती भरतभूमि सोडून इतस्ततः उनाडत आहे.

सन १७५७ च्या त्रिचनापल्लीच्या वेळ्यांत भारतीय वीरानीं स्वत पेज पिऊन, सत्वपूर्ण भात ब्रिटिश सैनिकांस बंधुत्वानें दिला. आजही तीच स्थिति आहे. मात्र देवाणघेवाणाची पद्धत आणि बुद्धि यांत महदंतर आहे. असो अशक्तपणांत युगाचें कळ-

निकाल दिला ? मुसलमानाचा विजय म्हणावा तर आधींच खचत चाललेल्या इस्लामी सत्तेचा पाय अधिकच खोलात गेला. हिंदूंचा विजय म्हणावा, तर पुढील २५ वर्षांतच त्या विजयाची पुरी नामोशी झाली हिंदुस्थानाचे हे जयापजय खरे नव्हते. कारण त्यांस कसोटीस लावून पाहणारी सत्ता याच वेळीं उदयास येत होती. त्या वर्धिष्णु सत्तेनें स. १७४८ पासून तों स. १८५८ पर्यंत आपलें सार्वभौमत्व कणश: आणि क्षणश: स्थापून जयापजय हे शब्द कोशात धुंडाळून काढण्याइतके अप्राप्य केले. स. १८७७ त त्याच सत्तेनें सार्वभौमपदाचा जाहीर उच्चार करून, युरोपीय युगाची आक्रमणशक्ति स्थिर झाली असल्याचा नगारा वाजविला

मद्रास, कलकत्ता आणि मुंबई या त्रिस्थळीं इंग्रजानीं प्रस्थान ठेविलें आणि आजला वामनासारखें त्रिखंड पादाक्रांत केलें वामनावतारी बळी पाताळांत गेला पण प्रस्तुतच्या अनामिक अवतारात बळी भूमीवरच असून गाडल्यासारखा झाला आहे. जग बळीच्या औदार्यापेक्षां वामनाचीच प्रतिष्ठा गातें आणि शुक्राचार्यांच्या एकाक्षाची मात्र टवाळी करितें.

हिन्दुकुश, काराकोरम, हाला, सुलेमान हे भरतखंडाचे अभेद्य पर्वतदुर्ग यवन जेत्यानी सुगम केले. मलबार आणि कारोमंडल हे दुस्तर–सागरांकित किनारे युरोपीय जेत्यांनीं सहजीं पादाक्रान्त केले जगात अजेय, दुस्तर आणि दुर्गम असें काय आहे ?

सर्व भूतांचे ठायीं वसणारा आत्मा मात्र अजेय आहे, अव्यय आहे आणि अक्षर आहे.

या युरोपीय नवयुगांत भरतखडाचीं कपाटें खुलीं झालीं. भारतीय आर्य जगातील इतर लोकांशीं दळणवळण करूं लागले. समुद्रवलय आणि पर्वतदुर्ग याच्या सुरक्षित चक्रानें इतके दिवस ते जगाहून अलग होते या नवयुगात हीं सारीं द्वारें मोकळीं झालीं पृथ्वी, जल व वायुमार्गांनीं भारतीयांचा जगाशीं, अधिकाधिक संबंध येऊं लागला, तसतसे त्याचे हितसंबंध जगाशीं अधिकच निगडित झाले.

भरतखंडांत सार्वभौम राजे येतात आणि जातात. भरत, अशोक, अकबर, औरंगजेब यांसारखे चक्रवर्ती होऊन गेले, तरी पण प्रस्तुत कालासारखे हिंदुस्थानात भिन्नभिन्न प्रांतीयांचे हितसंबंध कधींही संबद्ध झालेले नव्हते

‘ दैवासुरप्रकृति ’ म्हणून ज्या तत्त्वाचें वर्णन आपल्याइकडे केलेलें आहे, तेंच तत्त्व Modernism या शब्दानें अर्वाचीन जगाला चालू युगानें दाखविलें आहे. ध्वनि–प्रतिध्वनीचें साप्रतचें युग आहे. युरोपांत ध्वनि उमटला कीं त्याचा पडसाद

( प्रतिध्वनि– ) इकडे उठतो. गांधीजींची आजची स्वराज्यघोषणा हीसुद्धा युरोपच्या ध्वनीचा पडसादच आहे असें म्हणतां येईल.

प्रस्तुतच्या नवयुगात 'प्रतिकारी हिंदुत्वा'चा ( Militant Hinduism ) जन्म झाला आहे. या तत्त्वाचा झंकार प्रथम सन १८७७ त दयानदांनीं दिल्लीदरबारात 'श्रीमन्महा'च्या घोषानें केला, सन १८९३ त अमेरिकेंतील 'विश्वधर्म-महासभे' पुढें विवेकानंद या भारतसुपुत्रानें याच प्रतिकारी हिंदुत्वाचा संदेश तारस्वरानें उच्चारिला, आणि हिंदुस्थानापासून निघालेल्या जगत्संदेशांत त्यानेंच संजीविनी ओतली. सम्राट अशोकाचे वेळीं असाच प्रणवघोष बौद्धांनीं धर्मसभेपुढें करून, आपले प्रचारक बुद्धभिक्षु जगभर संचारार्थ पाठविले, आणि फिरून तोच प्रसंग पण निराळ्या स्वरूपात दोन हजार वर्षांनंतर घडून आला आत्मविकास या भावनेचा अमेरिकेंत पुनरुद्भव झाला. प्रस्तुत नवयुगाचा वृत्तांत म्हणजे तीन राक्षसाची एक कथाच जल, वायु, वाफ आणि तिचीच सख्खी बहीण विद्युल्लता यांची कुळकथा, म्हणजेच वर्तमान युगाचा इतिहास

आजची दृश्य संस्कृति म्हणजे सुद्धां या चार राक्षसांची अमानुष लीलाच नव्हे तर काय ? या दीर्घसूत्री जनकापासून निर्माण झालेल्या आगगाडी, तारायत्र, आगबोट, विमान, जलांतर-सचारिणी नौका या साऱ्या त्राटिका त्रिखडीं थैमान करीत आहेत.

गुर्जरकवि दलपतराम यांच्या अमर शब्दांत सांगावयाचें म्हणजे, आजचें सुधारणा-युग म्हणजे हुन्नरखानाची चढाईच होय

प्रस्तुत युगांत जगास लवुल आलें मात्र हिंदुस्थानचा अधिक विस्तार झाला. कारण हिंदुस्थानची दृष्टि हिमालय आणि हिंदी महासागर ओलांडून त्रिखड धुडाळण्याइतकी विशाल झाली. मात्र एवढ्याच साठीं त्याला केवढी जबर किंमत द्यावी लागली आहे ! हिंदुस्थानात राबून पिकविलेल्या कापसाची किंमत अमेरिका सांगणार आणि दर्याकिनारीं पाण्यात बुड्या मारून, जिवाचें पाणी करण्याइतके श्रमसायास करून, काढलेलीं पाणीदार मोत्यें पारिस स्वत·च्या मापानें पारखणार ! '

यावनी युगांत भारत–लक्ष्मी भारतवर्षांतच नादत होती. आज मात्र तिला ही नादणूक न आवडून स्वच्छंदीपणानें ती भरतभूमि सोडून इतस्तत· उनाडत आहे

सन. १७५७ च्या त्रिचनापल्लीच्या वेढ्यांत भारतीय वीरांनीं स्वत पेज पिऊन, सत्वपूर्ण भात ब्रिटिश सैनिकांस बंधुत्वानें दिला. आजही तीच स्थिति आहे. मात्र देवाण-घेवाणाची पद्धत आणि बुद्धि यांत महदंतर आहे. असो अशक्तपणांत युगाचें कळ-

णच शक्तिवर्धक म्हणून उपयोगी पडतें. वर्तमानयुग म्हणजे सुवर्णयुग. सोन्याचा शोध करीत फिरताना युरोपियन लोक अमेरिकेंत गेले, आणि तेथून जेथें जेथें म्हणून सुगावा लागत गेला, तेथें तेथें म्हणजे, आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया या खंडातून सोनें आणि जवाहिर याची युरोपनें सवणी केली. मूल्यवान वस्तूंची खरी किंमत किती लोकानीं ओळखिली आहे, आणि ओळखल्यानंतर कितीकांनीं त्याचा संचय केला आहे ? २० व्या शतकातील युरोपची सपत्ति–समृद्धता आणि पंधराव्या शतकांतील सपत्ति–समृद्धता यांची वजाबाकी करून राहिलेलीं ५ शतकें म्हणजेच युरोपीय संस्कृतीचा जगाचा इतिहास होय. सस्कृत वाङ्मयाचें पुनरुज्जीवन करून घरोघर त्याची वाटणी करणारे या नात्यानें युरोपीयांचे उपकार हिंदुयुग व यावनीयुग यांच्या इतिहाससशोधकास कबूल करणें प्राप्त आहे

हिंदुस्थानांत येण्यास निघालेले युरोपियन लोक जगाच्या यात्रा करण्यांत कसे गुंतले, हें कोलबसाच्या जीवनवृत्तांतात आणि सीलीकृत " इंग्लण्ड देशाचा विस्तार " या ग्रंथांत विस्तारानें पहावयास मिळेल. भूमध्य समुद्र, तांबडा समुद्र, इराणचें आखात, या मार्गें हिंदुस्थानचें युरोपशीं व्यापारी दळणवळण चाले. बगदाद, डमास्कस, अलेपो, अलेक्झांड्रिया, वेनिस, जिनिव्हा या बंदरीं हिंदी मालावर जकात आकारींत आणि म्हणून हिंदी माल पश्चिम युरोपला अधीक टक्के देऊन खरेदी करावा लागे. पश्चिम युरोपला हिंदुस्थानास साधणारा सीधा मार्ग मिळेल तर वरील बंदरीं जकात द्यावी लागणार नाहीं, स्वस्ताई होईल आणि त्यास हल्लींच्याहून अधिक फायदा खास मिळेल. पृथ्वी वर्तुळाकार आहे. पश्चिमेकडून प्रयाण आरंभिलें तर पूर्वेस येऊन पोंहोंचू. सागराच्या पृष्ठभागावरून आपण झपाट्यानें प्रवास करीत आहों. पश्चिम युरोपच्या दर्याकिनाऱ्यावरील देशाची आपसातील स्पर्धा विशेष आहे.

प्रथम फिरंग्यांनीं [ पोर्तुगीज, स्पॅनिश ) ही स्पर्धेची पाळ फोडली, नंतर वलंदेज ( डच ), फरासीस ( फ्रेंच ), आणि शेवटीं इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीनें ही फूट पुरी केली

भारतवर्षाच्या अफाट सपत्ति–सागराची गंभीर घोषणा ऐकून पश्चिम युरोप लालचावलें. त्या भरात घिसाडघाईनें हिंदुस्थानास येण्याच्या धांदलींत युरोप ठेंचकळलें, मात्र त्या ठेंचेसरशी त्यास अमेरिका खड सापडलें तथापि अजूनही या स्पर्धेची वावटळ थांबली नाहीं पण आता झांजर पडण्याचा समय आला आहे, आणि जिंकावयाची पृथ्वीही आटोपत आली आहे.

या स्पर्धेच्या वावटळींतच निरनिराळ्या साथींचा प्रादुर्भाव झाला 'Colonization, Industrialism, Capitalism, Imperialism या सर्व साथी निर्माण झाल्या, त्याबरोबरच त्यांचीं औषधेंही तिकडेच निर्माण झालीं. The French Revolution, Socialism, Communalism आणि या विसाव्या शतकातील The League of Nations and Bolshevism या चार राक्षसांनीं अद्भुत सृष्टि रचिली आणि लोकापुढें मांडली.

अटलांटिक महासागरांत आणि हिंदी महासागरात युरोपीय लोक पूर्वी चाचेगिरी करीत होते आणि त्यांच्या परवान्याविना बादशहांच्या बेगमास मक्केची यात्रा करता येत नसे. अकबराच्या आईला आणि मुलीला हाजच्या यात्रेस जाण्यापूर्वी या चाच्याची परवानगी काढावी लागली होती, आणि ती मिळता मिळता एक वर्ष लोटलें. म्हणून एक वर्षभर त्यास आपली यात्राही तहकूब करावी लागली. म्हणजे या चाच्यांची सत्ता, सत्ताधारी बादशहांच्या जनानखान्यापर्यंत जाऊन पोंचली होती

परदेशी युरोपीय व्यापारी प्रथम व्यापार करण्याकरितां परवानगीची याचना करीत होते त्याबरोबरच संरक्षणासाठीं तटबंदी करण्याचीही त्यानीं अशीच मनधरणी केली होती पण काय आश्चर्य पहा कीं, कालांतरानें बचावासाठीं केलेली तटबदी आणि त्यामधील कोठारें यांनाच तख्ताचें व राजवाड्यांचें स्वरूप आलें ' अर्वाचीन युरोपात नवविचार-प्रवर्तन प्रथम फ्रान्स देशांत झालें आणि हिंदुस्थान जिंकण्याची कल्पनाही प्रथम फ्रान्सात डुप्लेच्या डोक्यातून निघाली आणि त्यानें हिंदुस्थान जिंकण्याचीं तीन साधनें उपयोगांत आणिलीं लांब पल्ल्याच्या तोफा, कवाइती पायदळ आणि तैनाती फौजेची पद्धत. कर्नल मॅलिसन म्हणतो कीं, ' सेंट थॉमीच्या लहानशा युद्धांतच युरोपीय शस्त्रपद्धति श्रेष्ठ ठरली ' आणि तिनें हिंदुस्थानचें स्वातन्त्र्य जाणार, जाणार असा धोशा बडविला. डुप्लेच्या राजकारणी दृष्टीनें प्रथम हेंच हेरलें कीं, तैनाती फौजेची शकल हीच हिंदुस्थानास गुलाम करणार आणि त्यास गुलामगिरींत राबवणार ' याच धूर्त कल्पनेचें अनुसरण क्लाइव्ह, वेल्स्ली, आणि हॅव्लॉक यांनीं केलें

सन १८५७ सालचें बंड वा क्रान्ति म्हणजे कंपनी सरकारच्या घोडचुकांच्या ज्वालामुखीचा स्फोट यास भारतीय ऐक्यबंधन किंवा स्वातन्त्र्ययुद्ध म्हणता येणार नाहीं फ्रेंच राज्यक्रांतीप्रमाणें त्याच्या बुडाशीं भावनांचा ओलावा नव्हता तो केवळ हत्याराचा खणखणाट होता. हिंदुस्थानचा देरेक प्रांत आणि विभाग त्यामुळें

झादरून गेला आणि दक्षिण हिंदुस्थानात उन्हाळ्यात डोंगर पेट घेतात, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील अनेक शहरांची रक्षा मात्र झाली. संस्कृतींचा चढता जोमच संस्कृतीला गुलाम बनवतो. क्रान्ति म्हणजे संस्कृतींचा झगडा नव्हे.

प्रस्तुत युगांत प्रामुख्यानें दोन बाबींकडे आपलें लक्ष वेधतें.

पहिली बाब म्हणजे ज्ञानगंगा घरोघरीं उंबरठ्यापर्यंत जाऊन थडकली आहे. पाठशाळा, विद्यालयें, महाविद्यालयें आणि विश्वविद्यालयें वसंतकालीन उद्यानाप्रमाणें बेहोषपणें डवरलीं आहेत.

दुसरी बाब अशी आहे की, यावनी युगाचा छाप काय तो सरकारदरबारींच असे परंतु प्रस्तुतच्या युगांत युरोपीय युगाची छवी घरादाराच्या कोनाकोपऱ्यांतून स्वैरपणें हिंडतांना दृष्टीस पडते. स्वयंपाकघरांत आणि देवघरांतसुद्धां तिला मज्जाव नाहीं !

आपण कलकत्त्यासच फार वेळ रेंगाळत राहिलों आहों तर आपण आतां पुढें जाऊ. पुढचीं मोठीं शहरें म्हणजे आग्रा आणि दिल्ली !—यावनी युगाचीं हीं माहेरघरेंच म्हणावयाचीं !

आग्र्यास तांबड्या फत्तराचा अकबराच्या कारकीर्दीतील किल्ला आणि शहाजहानचें समाधिस्थान आहे. पलीकडे दोन कोसांवर अकबराचें समाधिस्थान आणि पुढें १० कोसांवर दृष्टीच्या आटोक्यात न येणारे फत्तेपूर सिक्रीचें अफाट मैदान. आग्रा म्हणजे यावनी पातशाहीचें अधिष्ठान ' अकबराची कर्मभूमि ' ! खरोखर, भारतीय यवन म्हणजेच ती मोगल पातशाही आणि अकबर बादशहा होय ! ! ! त्याच्या कारकीर्दीत इस्लामी संस्कृति होती, मात्र तेथें कुराण नव्हतें आणि समशेरही नव्हती. परंतु सर्वदेशीय अशी संस्कृति मात्र होती.

सहिष्णुता आणि सवर्णीयता—हिंदुयुगाचा हा महामंत्र किंबहुना साऱ्या नीतिशास्त्रज्ञांचा हा महामंत्र उच्चारतांच भारतवर्षात इस्लामी संस्कृति उत्फुल्ल झाली, आणि ती इतकी कीं, अजूनही जगांत कोठेंही अशी उत्फुल्लता दृष्टीस पडली नाहीं जगाच्या बादशहांच्या मालिकेंत अकबर हाच एक अद्वितीय होऊन गेला त्याचप्रमाणें यावनी सत्तेचा वणवा असाच प्रखर होता वणवा पेटला आणि जगभर पसरला इतिहासांतरीं इतक्या वेगानें अग्निप्रवाह फोफावल्याचा दाखला नाहीं.

फ्रेंच राज्यक्रांतीचा जन्म सन १७८९ त पॅरिसात झाला आणि तिचा अंत रशिया आणि जर्मनींत सन १९१८ त म्हणजे बरोबर १३० वर्षांनीं झाला फक्त युरोपातल्या

युरोपात पसरण्यास या राज्यक्रातीस सव्वा शतक लागलें. हिंदुस्थान अधिकृत करण्यास इंग्लंडला सुमारें ११० वर्षें लागलीं इस्लामचा जन्म स. ६२२ त झाला. स. ७११त इस्लामानीं पूर्वेकडे समर्कंद हस्तगत केलें आणि पश्चिमेस जिब्राल्टर सत्तेखालीं आणलें. आणि अशा रीतीनें इस्लामानें आपले पाय स्पेनमध्यें रोविले. स. ७१२ त दक्षिणेकडे वळून सिंधुनदीकाठच्या सिंधप्रांतावर त्यांची प्रथम धाड आली

सुमारें ९०० वर्षांच्या अवधींत इस्लामानें पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या दिशा व्यापिल्या आणि आफ्रिका, युरोप व आशिया यांचे किनारे त्यानें उध्वस्त करून टाकले. अलेक्झांड्रिया शहरांतील ग्रंथसग्रहाची उद्वेगजनक कथा म्हणजे यावनी मनोवृत्तींचें उत्कृष्ट उदाहरण होय स्वतःखेरीज इतरांस कुचकामी ठरवायचें आणि कुचकामी म्हणून त्यांच्या अस्तित्वावर अगार ठेवावयाचा. यवन योद्धयांची सुद्धां वणव्यासारखीच वृत्ति होती. महंमद गज्नवी, महंमद घोरी, चंगीझखान, हलाकुखान तैमूरलंग, बाबर, नादिरशाह, अहमदशाह अबदाली, सारे एकाच माळेचे मणी. आगीच्या लोळाप्रमाणें जितके ते अवचित येत, तितक्याच अवचितपणें नाहींसे होत.

मध्य आशिया हें एक वावटळींचें जन्मस्थानच आहे. येथेंच सिकदर आणि नेपोलिअन अशांचे जन्म झाले रोमची सत्ता नष्ट करणारे गॉथ आणि वँडल्स हे एॅलॅरिकच्या पितृवंशापैकींच होत.

चीनला शत्रुनिवारणार्थ जगड्व्याळ भिंत बांधावी लागली. भरतखंडाचा हिंदुकुश हा नैसर्गिक कोट अभेद्य ठरला नाहीं. खैबरघाट आणि बोलनघाट हे आजचे राजमार्ग नसले तरी यावनीयुगांत त्यांस तसें स्वरूप आलें होतें.

इस्लामी युगाचा अभ्यास करतांना असा प्रश्न उपस्थित होतो कीं, स. ११९३ त हिंदुत्वाचा ऱ्हास कोणत्या कारणांनीं झाला ?

चितोडाधिपती राजसंन्यासी समरसिंह याचें बलिदान कागर काठीं होऊनही हा ऱ्हास कसा थांबला नाहीं ? मुसलमानी इतिहासकार अगर युरोपीयन इतिहासकार यांचीं प्रमाणें बाजूस ठेविलीं, तरी चदवरदाईचा ' पृथ्वीराजरासा ' या ग्रंथास तरी आपण विश्वसनीय प्रमाण म्हणून मानावयास काय हरकत आहे ? पिथिलाचे शंभर मांडलिक होते. शेवटच्या स्थानेश्वरच्या रणसंग्रामांत लढलेले असे अनुभविक दोघे योद्धे बरोबर घेऊनही पिथिलचा कां पराभव झाला ? त्यांपैकीं एका योद्धयानें तर लोह–शस्त्राला स्पर्श न करण्याची शपथ वाहिली होती.

ट्रॉयच्या अंत म्हणजे हिंदुपद्पातशाहीचा अत आणि सुवर्णलंकेचा विनाश म्हणजेही हिंदुपदपातशाहीचा विनाशच !

कित्येक वेळा पिथलानीं हेलेनचें हरण केलें परिणीत नव्हे, पण कित्येक वाग्दत्त हेलेनाचेंही असेंच हरण केलें. अशा तऱ्हेनें राजकुमारींचें हरण हेंच पिथलाच्या अश्लाघ्य नाशाचें कारण होय ' रासा ' ग्रंथात असें नमूद केलें आहे कीं, चंद्रावतीची राजकन्या, महोबाची राजकन्या आणि कनोजची राजकन्या या पिथलाच्या अश्लाघ्य कृत्यास बळी पडल्या. तरी पण ' रासा ' पिथलाचे गुणवाद गातो त्याच्या यशाचे पवाडे म्हणतो. कारण पिथल नेहमीं विजयीच होई परंतु या विजयांतच त्याचा पराजयही गर्भित होता आणि तो अखेर घडून आलाच त्याच्यासह लढणारे अनेक वीर त्याच्या भव्य आणि मनोरम अशा रंगीन पिसाऱ्यांतील पिसेंच होत तथापि पिसारा अक्षयी भरदार राहील की काय ? पिथलच्या पिसाऱ्यांतून प्रत्येक वेळीं दहापाच पिसें गळून पडत होतीं. सयुक्ताहरणप्रसग म्हणजे महाविजय खरा, तथापि त्यावेळीं पिथलच्या राजपिसाऱ्याचीं रंगदार पिसें मात्र तीनच राहिलीं.

राजकुमारींचें हरण !—हिंदुपदावरील हा एक अक्षयींचा काळाकुट्ट डागच

हेस्टिंग्जच्या सग्रामांत हेरॉल्ड टोस्टीगला जिंकूनही पराभूतच झाला पृथ्वीराज सहा वेळां विजयी होऊनही पराभवच पावला. हिंदुपदानें विजयाच्या भयाण स्मशानांतच कालनिद्रा केली ! हिंदुपदपातशाही खरोखरच संयुक्तेच्या चितेबरोबरच जळून खाक झाली. त्याबरोबरच दुसरा प्रश्न सहाजिकच असा सुचतो कीं, इस्लामी सत्तेनें असें अधःपतन कसें व का झालें ? याचीं उत्तरें देण्यासाठीं स्वतंत्र ग्रंथ लिहिले गेले आहेत. त्या सर्वांचा समवाय ' राजकारणाचें अज्ञान ' या शब्दांनीं करतां येईल पर्वांच्या घोर रणसग्रामात कैसर विजयी कां झाला नाहीं ? मुत्सद्देगिरीच्या अभावीं त्यानें स्वतःच्या कौशल्यपूर्ण पण विनाशिकानौका-संचारानें जगाशीं वैरभाव संपादिला.

औरंगजेबानें काबूल पादाक्रांत करणाऱ्या जयसिंहाच्या उपकाराची फेड अपकारानें केल्यामुळें दुर्गादास हा दुष्मन् पैदा केला. दक्षिणदेश जिंकणाऱ्या जयसिंगाशीं वचनभंग केल्यामुळें शिवाजीसारखा यवनसत्तेचा कट्टा उच्छेदक निर्माण झाला. शीख गुरूंच्या निष्कारण छळ केल्यामुळें सबंध शीख पंथ हा एक कायमचा आणि शेजारचा कडवा शत्रु उत्पन्न झाला. आणि जिझियासारखा जुलमी कर सुरू करून अखिल भारतीयाचीं आणि राणा राजसिंहाचीं मनें बिथरून गेलीं ' ! औरंगजेबाचें राजकीय धोरणाचें अज्ञान अशा तऱ्हेनें दाही

दिशास आग लावण्यास कारणीभूत झालें, आणि त्याच पेटलेल्या खाईंत इस्लामी वर्चस्वाची राखरागोळी झाली हिंदुस्थानांतील इस्लामी सत्तेच्या उत्क्रांतीचा अभ्यास करतांना औरंगजेबाच्या या कृत्याचा अवश्यमेव विचार करावा लागतो. औरंगजेबाच्या ऐवजीं जर दाराशुकोह हा तख्तनशीन होता, तर हिंदुस्थानचा इतिहास,– कोणीं सांगावें ? कदाचित् कुराणात उपनिषदांचा समावेश होऊन हिंदुत्वाच्या इतिहासास निराळेंच वळण मिळालें असतें. दाराशुकोहनें उपनिषदांचें भाषांतर करविलें होतें. तो अकालीं मृत्युमुखीं पडता ना, तर दुसरा अकबरच निर्माण होऊन इस्लामी सत्तेचें जीवित आणखी एक शतकभर कदाचित् लांबलें असतें परंतु कालानें आपला डाव आगाऊच मांडून ठेविला होता, किंबहुना पुराही केला होता. औरंगजेबाच्या कारकीर्दींचें दान कालाच्या हातून पूर्वींच पडलें होतें. इस्लामी युगाचा अंत औरंगजेबाच्या कबरींतच व्हावयाचें ठरलें होतें. औरंगजेबाचे दोष दाखविणारांनो, त्याच्या गुणांची सुरेल तार तुम्ही छेडाल कीं नाहीं ? कीं येथून तेथून साराच बदसुरांचा मामला आहे ? औरंगजेबकालीन दिल्लीचें तख्त म्हणजे एका राजसंन्याशाचें धर्मपीठ होतें. त्याच्या भरल्या दरबारात किंकिणीचें कर्णमधुर लास्य रुमझुमत नव्हतें. त्यानें स्वत:च्या मृतदेह सुशोभनास्तव मुकबराचे महाल बांधिले नाहींत इतकेंच काय, पण स्वत:ची भाकरीसुद्धां तो निढळाच्या घामानेंच कमावून खात असे. समशेरींच्या ऐन खणखणाटात, रणांगणींच्या दीर्घ कोलाहलांत, शत्रूंची फिरती कदर डोळ्यांपुढें दिसत असतांना सुद्धां साऱ्या सेनेला तो नियुक्तकालीं नमाज पढावयास लावी. अशा तऱ्हेचा हा तऱ्हेवाईक बादशाहा राजनीतीच्या चंचल नाचाचा मूढ सूत्रधार होता इस्लामाची आज्ञा तंतोतंत, अक्षरश पाळणारा हा संन्यस्त बादशहा होता इस्लामधर्मस्थापनेच्या नादानें पिंगा घालतांना त्यानें स्वत:च्या बादशाही मसनदीसही लाथ मारली ! म्हणून इस्लामाची पुढील व्याख्या त्याच्या धर्मरक्षकांच्या कृत्यांनींच करावयाची तर असें म्हणता येईल;— सोरटी सोमनाथाची अपार संपत्ती बेगुमानपणें लुटणारा महंमद गज्नवी म्हणजे इस्लामाची मूर्तिमंत दृश्य प्रतिमा–तैमूरलंग आणि नादिरशहा यांनीं केलेली अमानुषपणाची बेहाय कत्तल आणि त्यामुळें शिंपलेले रक्ताचे सडे–इस्लाम म्हणजे चितोडची राखरांगोळी आणि इस्लाम म्हणजेच महमद तुघ्लख, अल्लाउद्दीन खिलजी व प्रेमाच्या पुंगीनें नादावलेली छांदिष्ट रझिया बेगम–इस्लाम म्हणजे जगाच्या पाठीवर सौंदर्याची पेरणी करून मदनाच्या रचनाकौशल्यामुळें लावण्यलतिकेला एकच एक झालेलें ललितकुड्मल,—कीं जें मुलायम दिसलें, कलक्कणिताशीं रुसलें आणि मदनाच्या अंगुलि-

स्पर्शानें हंसलें–त्या चितोडच्या पद्मिनीचा आत्मघात–!!! जातिहृदया, काय सांगूं! अशा कितीक जाईच्या फुलांच्या लाह्या भाजल्या! अशा कितीक पुष्परेणूंचा अधम-रीत्या संहार झाला! हाय! सौंदर्याची निर्मिती कालकूटाबरोबरच झाली आणि लक्ष्मी मात्र कमलांत उभी राहून हंसली!

पण एकाक्ष कावळ्याप्रमाणें एकच बाजू पाहून काय उपयोग? हिंदुधर्मीय चालता-बोलता मनुष्य आहे आणि त्याला दोन्ही डोळ्यांची सूक्ष्म आणि निवळ दृष्टि आहे. असो.

भारतवर्षांतील इस्लामी सत्ता मोगल पातशाहीनें कळसास पोंचविली. या अत्युच्च वैभवाचें सूत्रबद्ध वर्णन "दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा" या पादार्धानें कविवर जगन्नाथ पंडितानें केलें आहे.

इंग्रज ग्रंथकार फर्ग्यूसन म्हणतो कीं, " मुसलमानांचे उद्योग राक्षसाप्रमाणें प्रचंड होते आणि कुशल कारागिरीप्रमाणें कलाकुसर-खचित नाजुक व छानदार होते." अकबर बादशहाची योग्यता वर्णितांना कर्नल मॅलिसन लिहितो कीं, " जगांत दोनच बादशहा झाले. एक रूमशामचा स्वामी मार्कस ऑरेलियस आणि दुसरा दिल्लीपति अकबर." किंबहुना अकबराचें नाव जगांतल्या अमर पुरुषांच्या मालिकेंत गोंवून त्या त्या लेखकांनीं मुसलमानी सत्तेचा यथातथ्य गौरवच केला आहे. म्हणून इस्लामाचें सर्वस्व दिल्ली, आग्रा आणि फत्तेपूर शिक्रींत साठविलें आहे इस्लामी स्थापत्यकला विजापूर, गौर, लखनौ, अमदाबाद येथें आजतागाईत साक्ष देत आहे इस्लाम म्हणजे मोगल पातशाही, आणि या पातशाहीपरंपरेंतील एकामागून एक झालेले सहा बादशहा–अशी अखंड परंपरा कोणत्या राष्ट्रानें देखिली आहे!

मोगलपातशाही म्हणजे तोडरमल आणि ऐने–अकबरी, तानसेन आणि बाजू बावरा; अबुल फजल, बहरामखान आणि खानखानान, गुलाब आणि गुलाबी अत्तर, नूरजहान मुम्ताजमहाल, लालरुखच्या प्रेमकथेची अद्भुत काव्यललकारी, अवलिया कवी, कालवंत, तवारिखकार, तत्त्वज्ञ, सौंदर्यतारका, ताजमहाल, धर्ममंदिर, दांपत्य-प्रेमकथन करणारें ताजमहालाचें काव्य, धर्ममंदिराचें धार्मिक औदार्य, जगातल्या कोणत्या प्रासादांत आपणांस आढळणार आहेत बरें! याच धर्मसभामंदिरात नवविचार-प्रणेता मुबारक याचे दोन दैदीप्यमान पुत्र, इस्लामधर्माचा सनातन कट्टा आग्रही विडोनी, जैनमताचा आद्य प्रस्थापक हरिविजय सूरि, झरतुष्ट्राचा चेला महेरजी राणा, ख्रिस्तधर्मानुयायी इटालिअन पाद्री आक्केव्हिया, आणि हिंदुधर्माचे परमसहिष्णु असे

योगी मांडीस मांडी लावून धर्मांच्या एकीकरणाचा प्रश्न आपापल्यापरी सोडविण्याचा यत्न करीत जणूं या सर्व चकचकणाऱ्या तारकांचा स्वामी—नीलसिंहासनीं विराजणारा सुधांशु, अकबर आपल्या प्रशांत ज्योत्स्नासुधेचा सृष्टीवर वर्षावच करीत असे. धर्मांच्या नांवानें परस्परांस विनाशी होणाऱ्या आजच्या प्रयत्नास त्या ज्योत्स्नेचा कांहीं उपयोग होईल का ? जगाच्या कोणत्या लीला–विलास–महालांत अशा धर्मसभामंदिराचा समावेश झाला आहे ?

भारतवर्षांतील इस्लामी सत्तेचें अत्युच्च शिखर म्हणजेच त्याची पातशाही; त्याही पातशाहीचें शिखर म्हणजे अकबरशाही आणि अकबरशाहीचेंही शिखर म्हणजे धर्मसभामदिर.

अशा रीतीनें अकबराचा इतिहास येथवर निवेदन केला आतां त्याच्या कारकीर्दीतील कांहीं महत्वाच्या मित्या खालीं देतों:—

स १५४२ त हिंदु राज्यांत, हिंदूच्या घरांत, उमरकोट येथें अकबराचा जन्म.

स० १५५६ त केवळ चौदाव्या वर्षीं हिंदूंचा निःपात

स० १५६० त सेनापति व मंत्री बहिराम यांजपासून स्वतंत्र अधिकारारोहण

स० १५६३ त एकविसाव्या वर्षीं जिझिया कराची माफी.

स० १५६२ त विसाव्या वर्षीं युद्धात पाडाव झालेल्यांस गुलाम करण्याची बंदी.

स० १५६४ बाविसाव्या वर्षीं हिंदुतीर्थांच्या ठायीं यात्रेकरूंपासून घ्यावयाच्या डोईपट्टीची माफी आजला द्वारकेंत गोमती स्नानाबद्दल गायकवाड सरकार ही डोईपट्टी वसूल करतें ! जैन लोकांचा मतवाद तर आज आपणास विदितच आहे.

ज० १५६८ त सव्विसाव्या वर्षीं चितोडचा पाडाव. आणि तेथून फकीरवेषानें अजमीरच्या यात्रेस पायीं प्रवास

तारुण्याचा उन्माद भरमसाट आणि मोकाट उधळत असतां राजमद, धनमद, यौवनमद, अधिकारमद, इत्यादि मदांचा दर्या उफाळत असता कोणत्या राजपुरुषाच्या ठिकाणीं धर्म, राजनीति, सहिष्णुता आणि औदार्य इत्यादि गुणसमुच्चय एकवटला आहे ? आणि या राजबिंड्यानें ऐन पंचविशींत वयोवृद्ध शेख सलीमच्या गुंफेस प्रणिपात करून त्याच ठिकाणीं कांहीं काल वास केला. बादशहाच्या अशा राजस वसतीनें जणू त्या ठिकाणीं राजमहालांची आंबराईच मोहोरली असो तर आतांपर्यंत मोंगल

वैभवाचें रंगदार चित्र आपण निश्चळ दृष्टीनें बरेंच निरखिलें. म्हणून आता दुसरीकडे वळूं आणि ब्रिटिशाच्या वैभवाचे थोडेफार देखावे पाहूं.

या इस्लामी सत्तेचा उच्छेद व्हावा म्हणून लाहोर, चितोड आणि पुणें या स्थळीं कांहीं काल प्रतिकाराची जोराची लाट उसळली, तथापि ती तात्पुरतीच होती, असें म्हणणें भाग पडतें कारण एकादी लाट कितीही जोराची असली तरी तिचा तात्पुरताच उपयोग व्हावयाचा होता सारख्या सतत लाटा उसळून एकंदर इस्लामी संस्कृतीस टक्कर देण्याचें सामर्थ्य त्यांत नव्हतें संस्कृतीचीं तीं क्षुद्र शकलें होतीं. संस्कृतीचा केंद्रीभूत झालेला सामर्थ्यवान प्रतिकारी ओघ आर्यसंस्कृतींतून नष्ट झाला होता.

शिवाजी महाराजानीं या वाढत्या आणि प्रतिदिनीं चिघळणाऱ्या शक्तीचा प्रतिकार केला तिला डांबून ठेविली, परंतु त्याचवेळीं आर्यसंस्कृतीची उच्चतर भेरी घुमवावयाला पाहिजे होती, पण तें कार्य शिवाजीच्या शिष्यप्रशिष्यानीं तितकेंसें नेटानें बजावलें नाहीं प्रेरणा, प्रतिकार, आणि प्रभाव हीं तीन विजयाचीं सूत्रें होत. पहिलीं दोन मात्र महाराष्ट्रानें धसास लाविलीं, आणि तिसऱ्यास हात घालण्यापूर्वींच त्याचें ओज कलहव्याधीनें गंजून गेलें.

स. ११९३ त जी दिल्ली क्षत्रिय खड्गांनीं पराभवाच्या भडक्यांत हातावेगळी केली, त्याच दिल्लीवर स १७५७ त मराठ्यानीं भगवा झेंडा रोंविला. खैबर घाटांतून काठी टेकीत आलेल्या तुरुकांनीं जो देशभर हैदोस घातला, त्यास मराठ्यांनीं टाचेखालीं डाबून ठेविलें, हें खरें, पण तें अल्पकाळच पेशवाई म्हणजे ब्राम्हण-राजवंशाची बाहुबलाची शर्थ खरी, पण तशीच चुकाचीही अखंड मालिकाच म्हणून स १७०७ पासून स. १८५८ पर्यंत इस्लामी संस्कृतीची धुगधुगी असताना सुद्धा आर्य-संस्कृतीस बलवत्तर होण्यास अवधि पुरला नाहीं किंबहुना ती तशी पराक्रमी होणें हें अशक्यच होतें. कारण आर्यसंस्कृतीच्या प्राचीन भव्य डोलाऱ्यांत जुनी बळकटी असली, तरी नवचैतन्याची उणीव होती.

इस्लाम हें अशा तऱ्हेचें चैतन्य, अग्नीचें चैतन्य, दावग्नीची ज्वलज्जहालता होती. तथापि अशा चैतन्यास सूज्ञत्वाची शीतळाई आणि गांभीर्य हीं पण अत्यावश्यक असतात काहीं प्रसंगीं जगातील दुबळी मनोवृत्ति उजळण्यास अशा चैतन्याच्या आणि ज्वलज्जहालतेचा उपयोग होतो, नाहीं असें नाहीं.

आतां आपण हिंदुयुगाचें संक्षेपत· सिंहावलोकन करूं. दिल्ली आग्रा येथील इस्लामी सत्तेचें वैभव पडद्याआड केलें कीं, पलीकडे अग्रवन व इंग्लंड दिसूं लागतात. वडाला पारंब्या फुटाव्या आणि कालतरानें त्यांचाही वटवृक्षाला जसा समावेश व्हावा, त्याप्रमाणें इस्लामाच्या पारंब्या निरखिल्या म्हणजे मुळच्या वटवृक्षाची आठवण ताजी होते ती गंगोत्री जवळची हरिद्वार आणि हृषीकेश हीं स्थानें; म्हणजे आपल्या परिभाषेंतलें हिंदुयुग. या युगाचे तीन विभाग पाडतां येतील. पहिला ऐतिहासिक, दुसरा प्राचीन, आणि तिसरा पौराणिक.

हिंदुयुगाची निश्चित झालेली आद्य तिथि म्हणजे इ. स. पू. ५६७ ही सिद्धार्थकुमाराची जन्मतिथि आणि इ. स. ११९३ ही इतिश्रीची तीथ. एकूण १७६० वर्षें ही हिंदुयुगाची आयुर्मर्यादा आतां कौरवपाडवांपासून कालगणना कौरवपाडव व श्रीकृष्ण हे समकालीन होत. श्रीकृष्णाचा काल इ. स. पू. ३२०० वर्षें म्हणजे कौरवपांडवांपासून कालगणना केली, तर २६०० वर्षें प्राचीन युग. येथेंच द्वापारयुगाचीही परिसमाप्ति होते

मॅक्समुल्लरच्या मतें मानव वंशाचा जुन्यातला जुना ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. लोकमान्याच्या मतें ऋग्वेदाच्या ऋचा कमींत कमी दहाबारा हजार वर्षांपूर्वी रचिल्या गेल्या. द्वापार, त्रेता आणि सत्य या युगत्रयाची वर्षगणना केली, तरी पौराणिक युगाची बिनचूक आयुर्मर्यादा ठरवितां येईलच, असें नाहीं म्हणून ठोकळमानानें

| | |
|---|---|
| इ. स पू. ३२०० पर्यंत पौराणिक युग<br>इ. स पू. ५६७ पर्यंत प्राचीन युग<br>इ स ११९३ पर्यंत ऐतिहासिक युग | या युगत्रयास समुच्चयानें हिंदुयुग ही संज्ञा दिली आहे |

वेदकाल, महाभारतकाल, अगर बुद्धजन्मकाल त्यापैकीं कोणत्याही कालापासून कालगणता केली, तरी जगातील कोणतेंही राज्य, अगर वंश, अगर संस्कृति, इतक्या दीर्घ कालपर्यंत तग धरून राहिल्याचें आपणांस आढळणार नाहीं, परंतु येथें नुसताच अधिक काल जगण्याचा प्रश्न नाहीं जें राष्ट्र अगर जो देश एवढ्या पुरातन कालापासून अखंड जिवत राहून एकंदर मनुष्यप्राण्याची किति उन्नती करूं शकतो, मानवजातीच्या अव्याहत होत असलेल्या उत्क्रांतीला तो कितपत साहाय्यभूत होऊं शकतो, या दृष्टीनें कोणत्याही देशाचा श्रेष्ठपणा अजमाविला पाहिजे. नाहींपेक्षां इतिहास हें शास्त्र तरी कशाला अस्तित्वांत आलें ? ज्यापासून तादृश कांहींच फायदा नाहीं त्याची शास्त्रांत गणना होत नाहीं. परंतु इतिहासशास्त्राला कांहींतरी निश्चित उद्दिष्ट

वैभवाचें रंगदार चित्र आपण निश्चळ दृष्टीनें बरेंच निरखिलें म्हणून आता दुसरीकडे वळूं आणि ब्रिटिशाच्या वैभवाचे थोडेफार देखावे पाहूं.

या इस्लामी सत्तेचा उच्छेद व्हावा म्हणून लाहोर, चितोड आणि पुणें या स्थळीं कांहीं काल प्रतिकाराची जोराची लाट उसळली, तथापि ती तात्पुरतीच होती, असें म्हणणें भाग पडतें कारण एकादी लाट कितीही जोराची असली तरी तिचा तात्पुरताच उपयोग व्हावयाचा होता. सारख्या सतत लाटा उसळून एकंदर इस्लामी संस्कृतीस टक्कर देण्याचें सामर्थ्य त्यात नव्हतें संस्कृतीचीं तीं क्षुद्र शकलें होतीं संस्कृतीचा केंद्रीभूत झालेला सामर्थ्यवान प्रतिकारी ओघ आर्यसंस्कृतींतून नष्ट झाला होता

शिवाजी महाराजांनीं या वाढत्या आणि प्रतिदिनीं चिघळणाऱ्या शक्तीचा प्रतिकार केला. तिला डांबून ठेविली, परंतु त्याचवेळीं आर्यसंस्कृतीची उन्नतर भेरी घुमवावयाला पाहिजे होती, पण तें कार्य शिवाजीच्या शिष्यप्रशिष्यांनीं तितकेंसें नेटानें बजावलें नाहीं प्रेरणा, प्रतिकार, आणि प्रभाव हीं तीन विजयाचीं सूत्रें होत. पहिलीं दोन मात्र महाराष्ट्रानें धसास लाविलीं, आणि तिसऱ्यास हात घालण्यापूर्वींच त्याचें ओज कलहव्याधीनें गंजून गेलें.

स ११९३ त जी दिल्ली क्षत्रिय खड्गानीं पराभवाच्या भडक्यांत हातावेगळी केली, त्याच दिल्लीवर स १७५७ त मराठ्यानीं भगवा झेंडा रोंविला खैबर घाटांतून काठी टेकीत आलेल्या तुर्कांनीं जो देशभर हैदोस घातला, त्यास मराठ्यानीं टाचेखालीं डांबून ठेविलें, हें खरें, पण तें अल्पकाळच पेशवाई म्हणजे ब्राम्हण–राजवंशाची बाहुबलाची शर्थ खरी, पण तशीच चुकांचीही अखंड मालिकाच. म्हणून स. १७०७ पासून स. १८५८ पर्यंत इस्लामी संस्कृतीची धुगधुगी असतांना सुद्धा आर्य–संस्कृतीस बलवत्तर होण्यास अवधि पुरला नाहीं किंबहुना ती तशी पराक्रमी होणें हें अशक्यच होतें कारण आर्यसंस्कृतीच्या प्राचीन भव्य डोलाऱ्यांत जुनी बळकटी असली, तरी नवचैतन्याची उणीव होती

इस्लाम हें अशा तऱ्हेचें चैतन्य, अग्नीचें चैतन्य, दावग्नीची ज्वलज्जहालता होती. तथापि अशा चैतन्यास सूज्ञत्वाची शीतळाई आणि गांभीर्य हीं पण अत्यावश्यक असतात कांहीं प्रसंगीं जगांतील दुबळी मनोवृत्ति उजळण्यास अशा चैतन्याच्या आणि ज्वलज्जहालतेचा उपयोग होतो, नाहीं असें नाहीं.

आतां आपण हिंदुयुगाचें संक्षेपत सिंहावलोकन करूं. दिल्ली आग्रा येथील इस्लामी सत्तेचें वैभव पडद्याआड केलें कीं, पलीकडे अग्रवन व इंद्रप्रस्थ दिसूं लागतात. वडाला पारंब्या फुटाव्या आणि कालांतरानें त्यांचाही वटवृक्षांतच समावेश व्हावा, त्याप्रमाणें इस्लामाच्या पारंब्या निरखिल्या म्हणजे मुळच्या वटवृक्षाची आठवण ताजी होते ती गंगोत्री जवळची हरिद्वार आणि हृषीकेश हीं स्थानें; म्हणजे आपल्या परिभाषेंतलें हिंदुयुग. या युगाचे तीन विभाग पाडतां येतील. पहिला ऐतिहासिक, दुसरा प्राचीन, आणि तिसरा पौराणिक.

हिंदुयुगाची निश्चित झालेली आद्य तिथि म्हणजे इ. स. पू. ५६७ ही सिद्धार्थकुमाराची जन्मतिथि आणि इ स ११९२ ही इतिश्रीची तीथ. एकुण १७६० वर्षे ही हिंदुयुगाची आयुर्मर्यादा आतां कौरवपांडवापासून कालगणना कौरवपांडव व श्रीकृष्ण हे समकालीन होत. श्रीकृष्णाचा काल इ. स पू. ३२०० वर्षे म्हणजे कौरवपांडवांपासून कालगणना केली, तर २६०० वर्षे प्राचीन युग येथेंच द्वापारयुगाचीही परिसमाप्ति होते.

मॅक्समुल्लरच्या मतें मानव वंशाचा जुन्यांतला जुना ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय लोकमान्यांच्या मतें ऋग्वेदाच्या ऋचा कमींत कमी दहाबारा हजार वर्षांपूर्वी रचिल्या गेल्या. द्वापार, त्रेता आणि सत्य या युगत्रयाची वर्षगणना केली, तरी पौराणिक युगाची बिनचूक आयुर्मर्यादा ठरवितां येईलच, असें नाहीं म्हणून ठोकळमानानें

| | | |
|---|---|---|
| इ. स पू. ३२०० पर्यंत पौराणिक युग | } | या युगत्रयास समुच्चयानें हिंदुयुग ही संज्ञा दिली आहे |
| इ. स पू. ५६७ पर्यंत प्राचीन युग | | |
| इ स ११९३ पर्यंत ऐतिहासिक युग | | |

वेदकाल, महाभारतकाल, अगर बुद्धजन्मकाल त्यांपैकीं कोणत्याही कालापासून कालगणता केली, तरी जगातील कोणतेंही राज्य, अगर वंश, अगर संस्कृति, इतक्या दीर्घ कालपर्यंत तग धरून राहिल्याचें आपणांस आढळणार नाहीं, परंतु येथें नुसताच अधिक काल जगण्याचा प्रश्न नाहीं जें राष्ट्र अगर जो देश एवढ्या पुरातन कालापासून अखंड जिवंत राहून एकंदर मनुष्यप्राण्यांची किति उन्नती करू शकतो, मानवजातीच्या अव्याहत होत असलेल्या उत्क्रांतीला तो कितपत साहाय्यभूत होऊं शकतो, या दृष्टीनें कोणत्याही देशाचा श्रेष्ठपणा अजमाविला पाहिजे नाहींपेक्षा इतिहास हें शास्त्र तरी कशाला अस्तित्वांत आलें ? ज्यापासून तादृश काहींच फायदा नाहीं त्याची शास्त्रांत गणना होत नाहीं. परंतु इतिहासशास्त्राला काहींतरी निश्चित उद्दिष्ट

आहे. माझ्यामतें हें उद्दिष्ट ' मानवजातीचें आत्यंतिक कल्याण ' यात सांठविलेलें आहे. इतिहासाचें सार तें हेंच आणि या दृष्टीनें पाहिलें असता हिंदुयुगांत या उद्दिष्टाची जेवढी उत्क्रान्ति, उन्नति झाली, तेवढी दुसऱ्या कोणत्याही युगात आणि देशात झालेली नाहीं भारतवर्षानें ही मानवकल्याणाची दृष्टी आपल्या पुढें ठेविली, म्हणून तो आज जिवंत आहे, मानवजातीच्या इतिहासांत हिंदुयुगाचा काल अत्यंत मनोरम, उत्कृष्ट व महत्त्वपूर्ण आहे रामायण आणि महाभारत यांसारखीं महाकाव्यें, शाकुंतल उत्तररामचरित्रासारखीं नाटकें, मेघदूत आणि माघकवीचीं काव्यें, कादंबरी सारखी नवलकथा षट्शास्त्रें, भाष्यकार आचार्य, आणि तत्वज्ञानाचीं विद्यालयें, वैय्याकरणी पाणिनी, पिंगलाचार्य पिंगल ऋषि, योगशास्त्रज्ञ पतंजली, अर्थशास्त्रवेत्ता कौटिल्यमुनि, अलंकारशास्त्र, नाट्यशास्त्र, आणि न्यायशास्त्र- मनुस्मृति, पाराशरस्मृति इत्यादि स्मृति, वेद, ब्राह्मण, उपनिषदें, गीता हीं धर्मशास्त्रें, भर्तृहरी गोपीचंदासारखे राजसंन्यासी, श्रीकृष्ण, बुद्ध, महावीरासारखे धर्मसंस्थापक; चाणक्यासारखे मुत्सद्दी अशोक, विक्रम, शालिवाहनासारखे चक्रवर्ती, भास्कराचार्यांची लीलावती—अंकगणित, बीजगणित आणि भूमिति तक्षशिला आणि नालंदा येथील विद्यापीठें, श्रीशंकराचार्यांचें विद्यापीठ, संस्कृति—सागराच्या या एकाहून एक मोठ्या अशा लाटांची ही गणति झाली परंतु या लाटांसारख्या अगणित लाटा, तरंग आणि लहरी यानीं युक्त असा हा हिंदुयुगाचा महासागर कोणास अजमाविता येणार आहे ?

पोरस ग्रीकाशीं लढतांना पराभूत झाला. पण ग्रीकांचे पाय येथें जेते या नात्यानें तात्पुरतेच रोंवले गेले. जयपाल मुसल्मानी संग्रामांत असाच पराभूत झाला पण मुसलमान या देशांत जेते या नात्यानें ठाणच माडून बसले, ते हलले नाहींत. जयपाळास हा वेगवान प्रवाह अडवितां आला नाहीं. म्हणून त्या वीरानें स्वहस्तें चिता रचिली आणि अग्निकाष्ठें भक्षण केलीं मुसलमान त्या भडकलेल्या आगीच्या लोळांकडे पाहून खदखदा हांसत होते

काशी, कुरुक्षेत्र, हस्तिनापूर, उज्जयिनी ! प्रत्येकाच्या नांवासरसा इतिहासाचा एकेक ग्रंथच दृष्टीपुढें उभा राहतो अयोध्या, गोकुळ, मथुरा, द्वारका, प्रयाग, कपिलवस्तु, गया, जगन्नाथ व रामसेतु ! ! प्रत्येकाचें नांव उच्चारतांच विज्ञानाचा महत्वपूर्ण इतिहास आठवतो

वर्णाश्रमधर्मान्वयें केलेली संसाराची विभागणी व व्यवस्था ब्रह्मचर्य, संन्यास, गार्हस्थ्य, एकपत्निव्रत, पातिव्रत्य, चितारोहण करणारें सतित्व, वीरांचा केशरी पोषाख,

वीरांगनांचा जोहार, वगैरे ससारचक्राचीं प्रमेयें फक्त भारतवर्षांत मनुष्यकृतींनीं आच-रिलीं आहेत. हे उज्ज्वल सिद्धात ग्रथान्तर्गत नव्हत ग्रथातील त्याच्या वर्णनावरूनच पाश्चात्य नीतिशास्त्रवेत्ते, तत्वज्ञ मोहून गेले आहेत परंतु ते असिधाराव्रताप्रमाणें भारतीयांनीं प्रत्यक्ष आचरून मानवी परिपूर्णता अधिकाधिक समीप आणिली आहे मनुष्याचें ध्येय पूर्णावस्थेप्रत जाण्याचेंच जर निःसशय असेल, तर पूर्णावस्था ही आकाशांत सचारणारा कल्पनेचा पतंग नव्हे, हें भारतीय आर्य स्वोदाहरणानें जगास दाखवून देतील.

हिंदुयुगाच्या गंभीर ध्वनीचा केवळ प्रतिध्वनी, अथवा हिंदुयुगाच्या शितळ छायेची केवळ पडछाया, अद्यापि जगातील कोणत्याही देशात उद्भवली नाहीं "The Hindu Superiority' या ग्रंथांत मी म्हणतों त्याचें प्रत्यतर आपणांस पहाण्यास मिळेल.

हिंदुयुगातिल पहिली ढोबळ चूक म्हणजे दस्युभावनेचा उदय पण ही चूक हिंदूंनीं साहिष्णुतेनें आणि औदार्यानें पश्चात् दुरुस्त केली. हिंदूंची हीच विशालदृष्टि आणि समभाव पुढें कैक शतकापर्यंत स्थिर राहिला आणि हिंदूंत वर्णाश्रम व्यवस्थेचा योग्य फेरफार करून हिंदेतरांचा समावेश करण्यांत आला

इस्लामीयुगात यावनीधर्माचा असाच वर्चस्व झाला त्याचेंच फळ आजच्या हिंदुसघटनेच्या आणि शुद्धीच्या चळवळींत परिणत स्वरूपाप्रत पावलेलें आपणास पहावयाचें आहे.

शुद्धि आणि सघटन हीं दोन द्वारें उघडून हिंदुसमाज आजला फिरून जिवंत होऊ पहात आहे. नुसता जिवंत नव्हे,—कारण कित्येक शतकापासून तो जिवंतच आहे पण कार्यक्षम व पुरोगामी होणार आहे हिंदुमुसलमान याचा अभेदत्वानें उच्चार करणारे, कबीर, नानक, अकबर हे होऊन गेले एतावता हिंदुमुसलमानांचा समन्वय न झाला तरी हिंदूनां यापुढें जगांत आपल्या उच्च संस्कृतीचा प्रसार करावयाचा असेल, तर त्यांनी स्वत: बलवान होणें अगत्याचें आहे. स्वोन्नति साधल्याखेरीज जगाच्या उन्नतीचा प्रश्न हातीं घेणें इष्ट नाहीं.

अयोध्या, गोकुळ, कपिलवस्तु, पाटलीपुत्र, उमरकोट, हीं इतिहासांची दीपमंदिरें होत. यातील दीपज्योतींनीं इतिहासाचीं विस्तीर्ण दालनें पाजळलीं. या दीपज्योति ज्यांनीं लाविल्या व अखड तेवत ठेविल्या, त्यांस भारतीय इतिहासांत उच्च स्थान देणें युक्त आहे.

आणि तीं भरतखंडातील स्त्रीरत्नें ! माता, पत्नि, प्रियतमा, स्वरूपसुंदरी, रणरागिणी, राज्ञी, विदुषी, सन्यासिनी, सती, पतिव्रता, जोहारांत स्वतःस जाळून घेणाऱ्या स्त्रिया, अशा प्रत्येक भूमिकेनें स्त्रीजातीस व एकदर मानवजातीस त्यांनीं शोभा आणिली आहे कष्टाच्या ओसाड वाळवंटांत त्यांनीं थंड जलाचे स्वच्छ निर्झर निर्माण केले आहेत

भरतखंडातील वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण या वर्गांनीं आपलीं कर्तव्यक्षेत्रें सुंदर रीतीनें अलंकारिलीं आहेत आणि त्या त्या वर्गांतील व्यक्तींनीं आपल्या यशःपताका अखंड फडकत ठेविल्या आहेत ब्राह्मण आणि वेद या ब्राम्हमुहूर्तापासून तों पृथ्विराज चव्हाणाच्या सायकालपर्यंत हिंदुयुगाचे अनेक कालखंड पडतात. प्रत्येक खडात काहीं व्यक्तींनीं अलोट कर्तृत्व, अतुल स्वार्थत्याग हीं जगाच्या निदर्शनास आणिलीं आहेत. जन्मास येणें आणि मरणें यापेक्षा कायम जिवंत राहणें, ही अवघड पण चारित्र्यपूर्ण वृत्ति भारतीयानीं ठेविली म्हणूनच ते आज अमर आहेत

आजची भारतवर्षाची ओसाड भूमिका पाहून मनास खेद वाटतो. तथापि कोणतीच भूमिका बहरलेली अथवा वठलेली अक्षयीं राहू शकत नाहीं बहरणें आणि वठणें हा निसर्गाचा धर्मच आहे. सांप्रतची अवस्था वठलेली असेल तर भावी बहरलेली अवस्था यावयाची आहे, हें निश्चित होय.

गुर्जरकवि नवलराम म्हणतो

**इतिहासाच्या दर्पणीं । जधीं म्यां पाहिलें नयनीं ।**
**स्थिर न रेणु दिसे, अवनी । करी भ्रमण सर्वदा ॥ १ ॥**

भरतखड दीर्घायुषी, धनकनकसंपन्न, जगत्कल्याणप्रवर्तक, हिमालयासारखा अचल आणि महासागरासारखा विशाल असा असून जगाचीं बहुविध स्थित्यंतरें पहात आलेला आहे मानवेतिहासांत असा हा एकच देश आहे कीं, ज्याकडे पाहून आश्चर्य आणि कौतुक वाटावें ! ताजव्याच्या एका पारड्यांत हिंदुस्थानची व दुसऱ्यांत साऱ्या अवशेष जगाची संस्कृति याची तुलना केल्यास काय बरें दिसेल ! कदाचित् यथार्थपणें बोलल्यास आत्मस्तुतीचा दोष तर लागावयाचा नाहीं ना ? कदाचित् याचें उत्तर भविष्यवादी देतील इतिहासकाराचें हें क्षेत्र नव्हे तथापि एकंदरींत इतिहास म्हणजे तरी काय ? इतिहास म्हणजे संस्कृतीचें वर्चस्व, जयापजय आणि एकीकरण, व इतिहासाचें अंतिम ध्येय मानवजातीचें कल्याण, हें आहे. हें ध्येय आणि हें संस्कृतीचें एकीकरण

भविष्यकालीं कितपत साध्य होणार आहे, हा इतिहासाचा न लिहिलेला भाग आहे. पृथ्वीवर नांदणाऱ्या साऱ्या मानवजातीचें एकीकरण आणि जगदुद्धरणास उपयुक्त अशा सर्व संस्कृतींचें एकीकरण असाच भावी इतिहास बनावयाचा आहे काय ?

विधात्यानें हा संस्कृतीचा झगडा हिंदुस्थानात मांडिला आहे. तिकडे युरोपच्या सुधारणेचा मध्यकाल उलटून गेला आहे. गेल्या महायुद्धानें काय दर्शविलें ? तें सांप्रतच्या सुधारणायुगाच्या परिसमाप्तीचें निदर्शक होतें कीं नवयुगाच्या अवतरणाचें द्योतक होतें ? याचें उत्तर पाश्चात्य संस्कृतीच्या दृढीकरणावर आणि महत्त्वावर अवलंबून आहे, आणि यावरच त्या संस्कृतीचें भवितव्यही अवलंबून आहे.

केवळ सांपत्तिक आणि उपयुक्त सुधारणेच्या दृष्टीनेंच पहावयाचें तर अमेरिकेनें युरोपास केव्हाच ग्रहण लाविलें आहे. कारण, फोर्ड, एडिसन सारखे यान्त्रिक तज्ज्ञ आणि प्रख्यात पनामा कालवा, हीं युरोपात झालीं नसतीं ७ मजली इमारत साधारणमानानें उच्च खरी; पण उंचीची पुरी कल्पना ११० मजली इमारतीशिवाय येत नाहीं. तथापि अमेरिकेच्या या धाडसास आणि करामतीस स्वतंत्र महत्व नाहीं. युरोपनें पेरलेल्या सुधारणायुगांतील अनेक बींबियाण्यापैकीं अमेरिकेच्या सुपीक आणि सकस जमिनींत फोफावलेल्या वृक्षाचें तें एक विशाल स्वरूप होय. स्वतंत्र अस्तित्व नाहीं असें म्हणण्याचें कारण हेंच कीं, युरोपच्या चुका आणि दोष हीं देखील अमेरिकेनें वाढविलीं त्या सुधारणेस निराळें वळण देऊन ती भिन्न करतां आली असती, परंतु तें कार्य करण्यास अद्यापि कोणी अवतरणार आहे व तो भावी कालही अद्यापि यावयाचा आहे

आजच्या उत्क्रांत आणि सुबुद्ध युगातही कैसर, विल्सन, गांधी, लेनिन, मुसोलिनी, यांसारखीं विचारप्रवण माणसें आहेत. एकीकरणाचा प्रयत्न सर्वांस करावासा वाटतो. टागोरनीं तर पूर्व आणि पश्चिम यांचे अभेदत्व सिद्ध करण्याकरितां विश्वविद्यालय स्थापून या प्रश्नाची जागृति केली. तथापि जगाची नियंत्रणा मनुष्याच्या इच्छेनें आणि बुद्धीनें होत नाहीं म्हणून असहकाराचें भूत साऱ्या जगासच पछाडीत आहे. असहकारितेची साथ असंतोषाच्या क्षेत्रांत अधिकच फोफावत जाते. असो

पाश्चात्य सुधारणेची कितीही हेटाळणी केली, तरी अप्रत्यक्षपणें तिचा ताबा आपण पत्करलेला आहे. बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळें, विसकटलेल्या समाजशासनामुळें आणि मनाच्या कमकुवतपणामुळें आपण त्या सुधारणेचे दास बनलों आहोंत. तथापि

हिंदुस्थानच्या पूर्वैभवाची आठवण जोंपर्यंत बुझालेली नाहीं,–आणि ती कदापि बुझा-वयाची नाहीं,–तोंवर त्या सुधारणेचें यथातथ्य स्वरूप ओळखून, आर्यसंस्कृतींत तिचा अंतर्भाव केला पाहिजे त्या सुधारणेचे दोष कोणते आणि आपल्या संस्कृतीचे दोष कोणते याचें सूक्ष्म आलोचन होणें जरूर आहे. हिंदुस्थानची संस्कृति उच्च असूनही ती आज परभृत बनलेली आहे. म्हणूनच ती अधिक कार्यक्षम होणें, हिंदुस्थानच्या कीर्तीस उचित आहे.

भरतखंडा ! तुझें व्यापक स्वरूप पाहून आमचें अंतःकरणही व्यापक बनतें ! तुझी त्रिखंड कीर्ति ऐकून आमचें मन प्रफुल्लित होतें ! ! तुझें आयुर्मान मापण्यास प्रत्यक्ष विधाताच सरसावलेला पाहून आमचें अभिमानी हृदय थरारून जातें ! ! ! काय तुझा महिमा ! तुझ्या यशाचें गुण–गान करण्यास आम्ही जिवंत आहों, हें आमचें केवढें भाग्य ! परंतु अंतर्यामीं एकच हळहळ वाटते कीं, तुझ्या यशाचे कळस आम्ही प्रत्यक्ष पाहणार नाहीं ! त्रिखंडांतील अणुरेणूंस आश्रय देणाऱ्या भरतखंडा, ! हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन्, ज्यू आणि पारसी या साऱ्यांच्या श्रमानें तूं संस्कृतींचा, धर्मांचा व मतांचा मिलाफ करून अखिल जगास तूं एकाच पंथांत समाविष्ट करून परमेश्वराच्या अद्वितीयतेप्रमाणें तूं सुद्धां आपलें स्थान अद्वितीय बनव. तुझें वैशिष्ट्य आज तागाइत कायम आहे तसेंच तें पुढेंही कायमच रहावें, अशीच तुझ्या सुपुत्रांची इच्छा आहे !

# शिवकालीन पत्रें

[ शिवकालीन पत्रें व अन्य लेख ऐतिहासिक साधनग्रंथांत हजारों प्रसिद्ध झाले आहेत, परंतु त्याचा प्रसार सामान्य वाचकांत अद्यापि विशेष झालेला नाहीं सबब शिवजन्म प्रसंगानें निघणाऱ्या या पुस्तकांत केवळ जुन्या पत्रांचा मासला म्हणून त्या वेळचीं पांच पत्रें खालीं दिलीं आहेत.

पत्र १ पंताजी गोपीनाथ यास चांगल्या कामगिरीबद्दल इनाम. हा सखारामबापू बोकिलांचा पूर्वज, अफझल् खान प्रकरणात शिवाजीचा वकील होता

पत्र २ मौनी स्वामीस संभाजीनें करून दिलेली नेमणूक

पत्र ३ सदर

पत्र ४ बाळाजी आवजी चिटणीस यास शिवाजीची सनद.

पत्र ५ शिवाजीचें मालोजी घोरपड्यास पत्र.

या पत्राच्या वाचनानें जुने ऐतिहासिक कागद पाहण्याची अभिरुचि लोकात उत्पन्न होईल अशी आशा आहे.

गो स स. ]

---

## ( १ ) पंताजी गोपिनाथ बोकील यास इनाम

### ता. १४ फेब्रु० स० १६६९.

" अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री हवालदार व कारकून हाल व इस्तकबाल व देशमुखानी व देशपांडियानी, परगणे शिरवळ, प्रति मोरो त्रिमल पेशवे, सुरसन तिसा सितैन अलफ. राजश्री साहेबांचें आज्ञापत्र छ ३ साबान सादर जालें तेथें आज्ञा जे, बनाम पंताजी गोपिनाथ बोकील भले ब्राह्मणाचे भक्त आहेत या निमित्य यावरी साहेब मेहरबान होऊन इनाम जमीन अव्वल चावर २ दोन वितपसील:—

मौजे माडिकी, जमीन चावर १ एक मौजे भवाळी, जमीन चावर १ एक.

येकूण दोनी चावर जमीन, मेहरबान होऊन दिधली असे. यासी दुमाल बाब अजरामऱ्हामती करून दिधले असेत. देखील नख्त याती व महसूल व सैलबैल तर्फे

ठाणें, तर्फ देहाय व पायपोसी व खर्चपट्टी व मोईन सादिल्वार चौबीना व वेठी, बेगार व हर्ली पट्टीया व पेस्तर पट्टिया व खरेदी व फरोख्त व घासकाडी व दुधपट्टी व तूप, कुलबाब, कुलकानू व फर्मास कलमी व कदिमी व नकदी व इस्मी व रस्मी दिल्हे असे. दुमाले करणें. सदरहू प्रमाणें भोगवटा अवलाद व अफलाद चालविणें. यास सदरहू प्रमाणें ठाण्याचें खुर्देखत देऊन जमीन इनामबाब महदूत घालून मशारनिल्हेचे दुमाले करणें हर दरसाल ताजे खुर्देखताचा उजूर न करणें. तालीक लेहून घेऊन अस्सल इनामदार मशारनिल्हेस फिरोन देणें यास इस्कील न करणें, यासी मशारनिल्हे घरींच कीर्दी करतील तरी करूत अगर कुणबी यास लावितील तरी लाऊत. ये बाबे इस्किल न करणें, सदरहू प्रमाणें दोनी चावर इनाम पिढी दरपिढी, लेंकरानें लेंकरीं चालवणें. कोणे बाबे इस्कील न करणें म्हणोन आज्ञा, आज्ञेप्रमाणें तुम्हीं वर्तणूक करणें एक जरा इस्कील न करणें रवाना छ ३ सवाल "

( स. प. पृ १२१ )

---

# ( २, ३ ) मौनी स्वामीस सनद.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ७ रौद्र नाम संवत्सरे आश्विन शु॥ प्रतिपदा इंदुवासर क्षत्रियकुलावतस श्री राजा शंभु छत्रपति याणी राजश्री गणेराम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाळ यासी आज्ञा केली असी जे. तुम्ही हुजूर येऊन स्वामीस विनंति केली कीं राजश्री मौनी गोसावी पाटगांवी राहतात बहुत थोर इस्वर पुरुष आहे. त्यास पालखी आहे परंतु नेहमीं भोई नाहींत. तरी नेहमीं भोई व वाजत्री नेहमी करून देविले पाहिजे. यावरून वरशास भोयास व वाजंत्रियास मोईन होन निशाणी १२५ सवासे करून दिले आहेती यात भोई व वाजत्री ठेऊन देणें. ते सेवा करितील तुम्हीं सदर्हू पैके तुरतगिरी शिष्य गोसावियांचा आहे, त्याजवळ पावीत जाणें ते भोयास व वाजंत्रियास हक पावितील सदर्हू मोईन ई॥ सालमजकुरापासोन केलीं असे यासी वाजत्री तुम्हीं ठेविले आहे भोई ठेऊन देणें आहे येसीयासी वाजत्री ज्या दिवसापासून सालम॥ ठेविलें असाल ते दिवसापासून वाजंत्रियास वरशास पंचवीस होनप्रमाणें पाववणें उरले शंभर होन यासी भोई ज्या दिवसापासून ठेवाल ते दिवसा-

श्री
लक्ष्मीनृसिंहभक्तश्री
निर्णयाब्धि सन्मणेः ॥
प्रल्हादवर्धिनी मुद्रा प्र-
ल्हादस्य विजृंभते

पासून सालमा। चे हक पाववणें पुढें सदहू शभर होन भोयास व पंचवीस वाजंत्रियास याप्रमाणें साल दरसाल पावीत जाणें, आणि धर्मार्थ म्हणून गोसावियाचे नावें खर्च लिहीत जाणें ताजा सनदेचा उजूर करीत नच जाणें गोसावी कुशल असतील तों ठेवीत जाणें असल गोसावियाच्या शिष्यापासी देऊन तालीक सुभा बिले लावणें. सदरहू सवासे होन निवल देविले आहेती यासी वजावाटाव माफ असे.

लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

---

श्री ७४-३-१६८०

राजमान्य राजश्री जावजी कृ॰ण प्रभू हवालदार व कारकून पेठ पाटगाव गोसावी यांसीः—

स्नेहांकित गणोराम सुभेदार व कारकून सुभा परगणे कुडाळ व माहालानिहाय अनुक्रमें विनंति सु ॥ समानीन अलफ पेठ मजकुरीं सात पाच वरसें गलबलियाक-रितां वसात करून नव्हते. हालीं श्री बावा येऊन राहिले यासाठीं पेठ मामूर जाली त्याचेया प्रसाधे दिवाणीचा मामला खोबरे सुपारी खारिका होते त्यास श्री स्वामीस दुकान त्यांच्या नांवे त्यांस दिलियानें विशेष चाल-णार. याकारणें पेशजी तंबाकूचे गादीचें दुकान होते तेथें हालीं गादी नाहीं याबदल ती दुकान स्वामीस देवविले आहे. तें स्वामीच्या स्वाधीन तुरुतगिरीचे हवाले करवणें. ते हरकोणी तेथें ठेवितील बावाचे नावें दुकान चालेल. त्या दुकानास महसूल न घेणें. वेठेऊठ त्याचे दुकानीं जो त्याचा असेल त्याचे न घेणें. हा कागद तालीक लेहोन घेऊन असल देणें. छ ३ माहे रबिलावल.

लेखन
सीमा

---

श्री ९–६–१६७४

## ( ४ ) बाळाजी आवजीस सनद.

स्वस्तिश्री राज्याभिषेक १ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य प्रतिपदा भानुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणीं राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी आवजी प्रभुचिटनीस यासी आज्ञा केली ऐसी जे:—

तुम्ही स्वामीसेवा बहुत निष्ठेनीं करून श्रमसाहास फार केले राज्यवृद्धीचे कामीं आला यावरून तुम्हांवर कृपाळू होऊन अष्टप्रधानातील पद द्यावें, असें मनीं आणिलें असतां, तुम्हीं विनंति केली कीं, आपणाकडे चिटणीसीचा दरख चालत आहे. हा अक्षयी वतनी वंशपरंपरेनें सन्निध व सर्व राज्यातील चालवावा व कारकानिमी व जमेनिसी दोन धंदे राज्यांतील आपले निसबतीस दिल्हे ते अक्षयी असावे. याजवरून कृपा करून चिटनीसी सन्निधानची व सर्व राज्यातील वतनीकरार करून दिल्ही कार-खानी व जमेनिसी राज्यांतील तुम्हाकडे दिल्ही असे. स्वामीचे वंशींचा कोण्ही अन्यथा करणार नाहीं. तरी लिहिलेप्रमाणें सदरहू प्रयोजनाचे व्यापाराची सेवा तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करूनु सुखरूप अनभवणें. जाणिजे छ० बहुत काय लिहिणें ?

---

## ( ५ ) शिवाजीचें मालोजी घोरपडे यांस पत्र.

श्रीमहादेव. मार्च १६७७

राज्यश्री मालोजी राजे घोरपडे यासीः—

छ्र अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य

प्रति राजश्री शिवाजी राजे जोहार उपरि. पूर्वीं निजामशाहींतून आमचे बाप कैलासवासी महाराज इभराईम आदिलशाहा ( मृ. १६२६ ) पादशाहाचे कारकीर्दींत इकडे आले. त्यास इभराईम आदिलशहानें पादशाही कारखान्याचा मदार महाराजांचे सिरीं टाकिला तेव्हां महाराजानें हा विचार केला कीं, पादशाही मदार आपले हातास आला असता आधीं तों आपले जातीचे लोक मराठे. याला हातीं धरून सरदारकी करून पोटें भरितात. ते पादशाही वजीर करावे, पादशाही कामें यांकडून करवून नामोश होय, इज्जती थोर पावेत तें करावें म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदा-रकी करून होते ते आणून पादशहास भेटऊन पादशाही वजीर केले. त्या दिवसापासून तुमच्या बापाच्या हातें व तुमच्या हातें पादशाहीचीं कामें होत आलीं पादशहानीं तुमचें चालविलें ऐशा तीन पिढ्या पादशहाच्या दोनी पिढ्या तुमच्या जाल्या. ऐसी-

यास, महाराजानें तुमच्या बापास इतकें बरें केलें हें स्मरण न धरून, जेव्हां कांहीं मुस्तफाखानें महाराजास दस्त करविलें तेव्हां तुमचे बाप बाजी घोरपडे हरामी होऊन महाराजास दस्त करून मुस्तफाखानाचे हातीं दिलें त्या दिवसापासून तुमच्या घराणियाचा व आमच्या घराणियाचा दावा वाढत चालला. तो कितेक झगडियात तुम्ही आमचे लोक मारिले व आम्हीं तुमचे लोक मारिले आदिकरून तुमचे बाप बाजी घोरपडे त्याला आमचे लोकीं झगडियांत मारिलें ऐसा परस्पर दावा चालिला होता ऐशीयास साम्प्रती राजकारणवर्तमान तरी दक्षणेचे पादशहा तीन, निजामशाह, आदिलशाह, कुतुबशाह. त्यामध्यें निजामशाही पादशाही बुडाली ते समयीं निजामशाही उमदे वजीर होते त्याणीं आदिलशाही दरगाहासी रुजुवाती करून आपणास रोजगारास जागा केला. हालीं आदिलशाही बहलोलखान पठाणीं घेतली, पादशाहा ल्हान लेकरू नांवमात्र, ते आपलें कैदेंत ठेविले आहेत, आणि तख्त व छत्र व विजापुरचा कोट पठाणानें कबज केला आहे, कांहीं गुबारून मिळाला नाहीं ऐसियास, दक्षणचे पादशाहीस पठाण जाला, हे गोष्टी बरी नव्हे पठाण बळावला म्हणजे एका उपरि एक कुल दक्षिणियाची घरें बुडवील, कोणास तगों देणार नाहीं, ऐसें आम्हीं समजोन, हजरत कुतुबशाहा पादशाहा यांसी पहिले पासून रुजुवात राखिली होती, त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशाहांनीं मेहरबानी करून हुजूर भेटीस येणें म्हणून दस्तखत मुबारक व दस्तपंजीयानसी फरमान सादर केला त्यावरून आम्हीं येऊन हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली भेटीचे समयीं पादशहाची आदब आहे कीं, शिरभोई धरावी, तसलीम करावी परंतु, आम्ही आपणावरी छत्र धरिलें असे ही गोष्ट कुतुबशाहास मान्य होऊन, शिरभोई धरणें व तसलीम करणें हें माफ केलें पादशहा तिकडून आले, आम्ही इकडून गेलों पादशहांनीं बहुतच इज्जती होऊन, गळ्याला गळा लावून भेटले आम्हास हातीं धरून नेऊन जवळी बैसविलें कितीएक मेहेरबानी जाहीर केली आम्हींही जैशी रुजुवात करू नये तैसी केली, आणि कुतुबशाहचा व आपला घटीं वरेपणा करून घेतला या उपरी, राजकारणविषयीं हजरत कुतुबशाहानीं महादण्णापंतास व आम्हास एकचित्त करून ऐसा तह केला कीं, जो काय उभयवर्गी तह द्यावा तो आपण कबूल करावाच ऐसा कुलमनसबा व मदारा आम्हावरी टाकिला आहे कीं, आपली पादशाही आम्हा दक्षणीयाचे हातें राहे तें करावें म्हणून, त्यास हा मनसुबा ये प्रसगीं आमचे हातास आलिया उपरि आम्ही हाच विचार केला कीं, जे काहीं आपले जातीचे मराठे लोक आहेती, ते आपल्या कटात घेऊन कुतुबशाहासी त्याची रुजुवात करावी, दौलत देवावी, त्याचे हातें पादशाही काम घेऊन पादशहाची पादशाही दराज करावी, आणि तुम्हा लोकांच्या दौलताही चालेत

घरें राहेत, तें करावें. आपल्या जातीच्या मराठिया लोकांचें बरें करावें, हें आपणास उचित आहे, ऐसें मनावरी आणून, तुमचा आमचा पहिल्यापासून दावा वाढत आला होता, तो आम्ही मनातून टाकून, नि:कपट होऊन, तुम्ही मराठे लोक कामाचे, तुमचें बरें करावें एसें मनीं धरून, हजरत कुतुबशाहासी बहुत रीतीं बोलोन, तुम्हास हजरत कुतुबशाहाचा कौलाचा फर्मान देऊन पाठविला आहे तरी तुम्ही कुलीन, आमचा भरोंसा मानून, देखतपत्र, हरेक उपायें, पठाणापासून निघून मजल दरमजल भागानगरास आम्हापासीं येणें. त्यास तुम्ही तरी स्वार होऊन मजल दरमजल यालव परंतु आपला कुली खुलासा, नेखस्तमुदा व इतबारी हेजीब बहुत सत्वर पुढें पाठवून देणें–कीं, तुम्हांहून पुढें चार दिवस आम्हापासीं यावे ऐसा पाठवून देणें, म्हणजे हजरत कुतुबशाहास आम्ही अर्ज करून दौलतेचें नेमस्म कौलाचा फर्मान दस्त पंजे मुबारक घेऊन, फर्मान व लुगडीं माहेताप तुम्हांस पाठवून देऊन ते घेऊन, येऊन, आमचें हातें हजरत कुतुबशाहास भेटणें. ए प्रसंगीं ऐसें तुमचें दौलतेचें काम मजबूद करून देतों कीं पुढें बहुत बरें केलें ऐसें तुम्हीं आठवावें, तुमचें पुत्रपौत्र आठवीत, व दौलत थोर होए, व हजरत कुतुबशाहाचें काम तुमचें हातें होऊन ये. ऐसा समय असे ऐशीयास, तुम्ही कदाचित् ऐसा विचार कराल कीं, आदिलशाहीचें आपण दों पिढीचे वजीर, आतां विजापुराकडून कुतुबशाहींत राजे याचें बोलें कैसें जावें? तरी जे समयीं खवासखान धरिला, विजापुरचा कोट पठाणें घेतला, विजापुरचा पादशहा धाकटा आहे त्याला कैदेंत ठेविलें, तेच समयीं पादशाही बुडाली. विजापुर पठाणाचें हातास गेलें! आतां आदिलशाही कैंची ' आणि उगीच तुम्ही तेथें आपली आदिलशाही आहे म्हणोन गुंतून राहिले आहां! जरी पठाणाचीच चाकरी करोन राहों म्हणाल तरी पठाण कांहीं तुम्हांस थोर दौलत देणार नाहीं. आणि पठाणास तरी हजरती कुतुबशाहा व आम्हीं तमाम दखणी मिळोन चालोन घेऊन बुडवीतच आहों! तुम्ही मराठे लोक आपले आहा, तुमचें गोमटें व्हावें, म्हणून स्पष्टच तुम्हास लिहिलें असे. जें काय तुम्हास पठाण देतो त्याची दुगुणी आम्ही कुतुबशाहापासून तुम्हांस देवीतच असों. किंवा ह्याहून अधीकही होऊन येईल तरी करून देऊच. सर्व प्रकारें तुमचें गोमटें करून. एविसीं आम्हांपासून अतर पडे तरी, व मागील दाव्याचा किंतु आम्ही मनांतून टाकिला, एविसी, आम्हास श्री देवाची आण असे तुम्ही नि:संदेह होऊन येणें. हेजीब आपला पुढें पाठवणें. त्या हातीं आम्हांसीं घरोबियानें बरें बर्तावें, मागील दाव्याचा किंतु मनातून टाकिला, ऐसें; आपला आराध्य व कुलस्वामी असेल त्याचा शपथ लिहून, पत्र हेजीबाहातीं पुढें पाठवून देणें. आम्ही सर्व प्रकारें तुमचें गोमटें करावयासी अतर पडों ने देऊन. बहुत काय लिहिणें, ' मर्यादेयं विराजते. '

# छत्रपति शककर्ते श्रीशिवाजी महाराज यांचा पोवाडा.

## प्रस्ताव.

संपादकः—**श्री. भास्करराव जाधव**, एम्. ए. एल. एल. बी.

१ सन १८९६ सालानंतर श्री शिवछत्रपतीविषयींचा अभिमान महाराष्ट्रांत जागृत होण्यास सुरवात झाली व ठिकठिकाणीं शिवाजी उत्सव होऊं लागले. कोल्हापूर येथें श्रीशिवाजी क्लब स्थापन होऊन त्याचे मार्फत हा उत्सव होत असे. या उत्सवांत पोवाडे ऐकणें हें एक महत्वाचें अंग होतें आणि त्या साठीं नवीन पोवाड्यास बक्षीसेंही ठेविलीं होतीं. या चढाओढीमुळें बरेच शाहीर पोवाडे लिहीत व गाऊन दाखवीत. अशा एका प्रसंगीं कै. कृष्णराव निळकंठ यानीं हा पोवाडा रचिला व आपले शिष्य सदोबा व नरसिंग पाटील याना साथीस घेऊन म्हणूनही दाखविला. या सालीं हा पोवाडा सर्वांस फार आवडला. त्यानें पहिलें बक्षीस मिळविलें व कोल्हापुरांत तो म्हणणारे पुष्कळ तयार झाले. मूळ हा पोवाडा ३४ चौकांचा केला होता. तो म्हणण्यास फार वेळ लागू लागला व म्हणणाराचा आवाजही टिकेना. करिता तो पुढें ३० चौकाचा केला व नंतर २६ चौकांचा करून म्हणणारांस दिला. हें संक्षेपाचें काम कृष्णराव यांनीच केलें.

२ पोवाड्याचे कर्ते कृष्णराव यांचें पूर्ण नांव कृष्णराव सदोबा नीळकंठ असें होतें. हे जातीचे गुरव असून त्यास दरबारात शिंग वाजविण्याची नोकरी होती. या नोकरी करितां त्यास सांगरूळ तालुके करवीर येथें इनाम जमीन होती. कृष्णराव कैलासवासी झाल्यावर त्यांचे भाऊबंद हें उत्पन्न उपभोगीत आहेत. कृष्णरावाचे मागें त्यांची एक मुलगी फक्त राहिली आहे.

३ कृष्णराव शिंग वाजविण्यांत फार कुशल असत. तोंडानें तर ते शिंग वाजवीतच पण कानाच्या खालच्या बाजूस मानेवर शिंग ठेऊन मानेच्या शिरा फुगवून आवाज काढीत असत. दिसण्यात फारसे भव्य नव्हते, तरी शरीरयष्टि उंच व चांगली कसलेली होती. कुस्ती खेळण्यात ते चांगलेच पटाईत होते. दांडपट्टा, इटा वगैरे मर्दानी खेळांतही

ते प्रवीण होते. या गुणांवरून त्यांस भाऊ नाईकाच्या तालमीचे वस्ताद नेमिलें होतें. त्यांच्या कारकीर्दींत मर्दानी खेळाबद्दल या तालमीनें चांगली कीर्ति संपादिली अझूनही भाऊ नाईकांची तालीम याबद्दल प्रख्यात आहे

४ कोल्हापूर भेदिक गाण्याविषयींही प्रसिद्ध आहे. यांत कलगी व तुरा असे दोन तट असतात. दोघांचेही फड कोल्हापुरास नावाजलेले आहेत व त्यांचे चुरशीचे सामने होतात सृष्टींतील सर्व व्यवहार माया करिते, ईश्वर किंवा पुरुष तटस्थ आहे असें कलगीवाले प्रतिपादितात मायेला घेऊन ईश्वर सर्व करितो असें तुरेवाल्याचें म्हणणें आहे म्हणून कलगीवाले हे प्रकृती म्हणजे माया इला भजतात व तुरेवाले पुरुष किंवा ईश्वर यास भजणारे आहेत. दोघाचीं ही मतें वेदांत शास्त्रास संमत आहेत व दोन्हीही पंथ वेदांतमतानुयायी आहेत. श्लोक आर्या वगैरे अक्षर व गणवृत्तें हीं विद्वानाकरितां आहेत अशिक्षित बहुजन समाजाच्या तीं उपयोगी नाहींत या वृत्तांत कविता करणें व ह्मणणें अशिक्षितांस साधणें कठीण शिवाय या वृत्तांस निरनिराळ्या चाली ही लावतां येत नाहींत. बहुजन समाजाचें गाणें लावणी या छदांत असतें ह्मणून सार्वजनीक शिक्षणाच्या दृष्टीनें याच छदांत कलगी व तुरेवाले यानीं आपआपल्या मताच्या पुष्ट्यर्थ कवनें केली कवि हा शब्द विद्वानांकरितां राखून ठेऊन त्यांनीं आपणास शाहीर म्हणविलें. या पंथांस फडही ह्मणतात.

५ चागले चागले विचार अशिक्षित समाजाला पटतील अशा भाषेंत ऐकवून या फडानीं बहुजन समाजास शिक्षणाचें काम चांगल्या प्रकारें केलें आहे. या फडात किंवा पथांत गुरुपरंपरा आहे. गुरुकडून उपदेश घेऊन व काहीं विशष विधिकरून दीक्षा घ्यावी लागते यात धर्म व जात यांचा भेद मानींत नाहींत हिंदु व मुसल्मान या फडांत बरोबरीनें वागतात. मुसल्मानाचे शागीर्द किंवा शिष्य हिंदूही असतात व हिंदू कोणीतरी गुरू करावा लागतोच. तो वहुधा असतो.

६ गुरूचीं कवनें पाठ करून, त्याचे मार्गे साथ करून, इतराची ऐकून पुष्कळास काव्यस्फूर्ती होई व ते कवनें करूं लागत. वेदात विषयावर दोनी पंथांच्या लोकांकडून केलेल्या लावण्या याप्रमाणें रचल्या गेल्या व गाईल्या गेल्या. या गाण्यास भेदिक गाणें म्हणतात. शृगार विषय यात फक्त उपमा, दृष्टांत, वगैरे रूपानें येईल तितकाच तो केव्हाही भेदीक गाण्याचा प्रधान विषय नसतो. भेदीक गाणेवाले इष्काचें गाणें कधींही गावयाचे नाहींत. कलगी व तुरा या फडाच्या बाहेरचे किंवा हे पंथ सोडून दिलेले लोक इष्काचें गाणे गाऊन तमाशे करूं लागले व रावबाजीच्या कारकीर्दींत त्यांस

राजाश्रय मिळाला आतां बहुजनसमाजाची करमणूक त्या गाण्यानें होत आहे. पण त्याचे योगानें समाजाला शिक्षण मिळत नाहीं समाजाची अवनती मात्र होते.

७ शेतकरी मजूर वगैरे बहुजनसमाजास शिक्षण देणें असल्यास तें या तमाशाचे द्वारा देतां येतें याचा फायदा सत्यशोधक समाजानें घेतला आहे. शेतकऱ्यास शिक्षणाची आवश्यकता, लग्नांतील देजाचा व बुडीत खर्चाचा निषेध, मद्यपानाचे दुष्परिणामाची जाणीव, सावकारीचे दुष्परिणाम, असंमत वैधव्य, पुनर्विवाहाची आवश्यकता, विधवावपन निषेध, त्याचप्रमाणें पुराणांतील ब्राह्मणाचें अवास्तव स्तोम वगैरे विषयांवरील लावण्याच्या द्वारानें जी जागृती होत आहे तिची कल्पना सुशिक्षितांस होण्यास फार दिवस लागतील त्यानीं शेतकरी व मजूर समाजात मिसळून त्यांच्या आकांक्षा व त्याच्या गरजा आणि त्यांचे परिमित शिक्षण याची चांगली ओळख करून घेतली पाहिजे. सत्यशोधक जलसे हे लोकशिक्षणाचें खरें काम करीत आहेत. त्यांच्यांत पुष्कळ दोष आहेत व सुधारणेस पुष्कळ वाव आहे, हें कबूल आहे. सुधारणा झाली पाहिजे. पण सध्यांचे कांहीं विद्वानाचे प्रयत्न या जलशांचा समूळ उच्छेद व्हावा असे आहेत, सुधारणेचे नाहींत, ही खेदाची गोष्ट आहे.

८ भेदिक गाण्याला फारसे विषय राहिले नाहींत, तेव्हां मग पुराणावर या फडांची नजर गेली व पुराणांतील विषयां बद्दल चर्चा व प्रश्नोत्तरें त्यांच्या कवनातून होऊ लागली. कलगी व तुरेवाले यांनीं परस्परांस पुराणातील विषयासंबंधानें प्रश्न घालावे व दुसऱ्या फडानें त्यांस उत्तर द्यावें असा प्रकार चाले. पुराणांचें वाचन व त्याचें मनन यामुळें केवढ्या मोठ्या प्रमाणावर चालत असे व बहुजन समाजास केवळ ऐकून ऐकून किती माहिती मिळत असे याचें अनुमान सहज होईल. हीं उत्तरें प्रश्नाची लावणी ज्या चालीवर असेल त्या चालींतच द्यावीं लागत. पुढें पुढें कांहीं अक्षरें वर्ज्य करणें, कांहीं विभक्ती वर्ज्य करणें वगैरे चतुराईचे प्रकार आले. या सर्व प्रकारांत तावडतोब उत्तर द्यावें लागत असल्यानें शीघ्रकवित्वाचा गुण आवश्यक झाला.

९ कृष्णराव हे कलगीवाले शाहीर होते. त्यांचे गुरु बाळनाथ नावाचे बैरागी होते. त्यांच्या नावाचा उल्लेख प्रस्तुत पोवाड्यांत व कृष्णराव यांच्या बहुतेक कवनांत आहे. कलगी पक्षातर्फे कृष्णरावांनीं पुष्कळ भेदीक लावण्या रचल्या, तसेंच पुराणातील विषयांवर व पुढें चतुराईच्याही त्याच्या शेंकडो लावण्या त्याच्या शिष्यमंडळींत प्रसिद्ध आहेत कृष्णराव हयात असतांना तुरेवाल्यांना यश मिळण्याची आशा फारशी नव्हती. तुरेवाल्यानीं सवालाची लावणी घरून करून आणावी व ती म्हणत असतांच कृष्णरावांनीं

तिचें उत्तर तयार करावें व प्रतिपक्षी खालीं बसल्याबरोबर उत्तरास सुरवात करून उत्तर द्यावें. प्रतिपक्षाला कैक वेळ जिंकून त्यांचीं निशाणें काढून घेऊन त्यांनीं आपल्या डफावर लाविलीं होतीं. त्यांच्या ब्रीदाचें चित्र कोल्हापूर येथून आणाविलेलें या सोबत प्रसिद्ध केलें आहे.

१० कृष्णराव यांस विद्या मुळींच नव्हती ते कसेबसे फक्त लिहिण्यास शिकले होते. जोडाक्षरें त्यांस पुरतीं येत नसत पण त्याची काव्यशक्ति प्रतिभासपन्न असून जबरदस्त होती. आपल्या सात शिष्यांना सभोंवार बसवून एकाच वेळीं प्रत्येकाला निराळी लावणी सांगून आपणही आठवी लिहीत असत. ही गोष्ट पुष्कळानीं पाहिलेली आहे. कृष्णरावाचीं बरींच कवनें त्यांच्या मुली जवळ व शिष्याजवळ आहेत.

कृष्णराव हे सन १९०७ सालीं सुमारें ५५ वर्षांचे वयास कैलासवासी झाले.

११ या पोवाड्याची तीस चौकाची प्रत " माधव " यांचे हातीं आळसुंद–कुंडलचे रा. त्रिंबक रामचंद्र गुळवणी यांचे कडून आली. तिच्या विषयीं "माधव" म्हणतातः—

" ती ( प्रत ) वाचून पाहिल्यावर पोवाडा अत्युत्कृष्ठ असून प्रसिद्ध करण्यासारखा आहे असें माझें मत झालें व आतां तो नवयुगांतून मी तीन हप्त्यानीं प्रसिद्ध करण्यासाठीं देत आहे.—अलीकडे निर्माण होत असलेल्या पोवाड्यांना हा पोवाडा खालीं पहावयास लावील अशी माझी खात्री आहे. " नवयुग वर्ष ९ सन १९२२ पृ. ३८६.

" माधव " यांस कवीविषयीं काहींच माहिती नव्हती. ती नवयुगाच्या सदर वर्षाच्या ५६५ पृष्ठावर चि. बापूसाहेब भास्करराव जाधव यांनीं दिली आहे.

१२ श्रीशिवछत्रपतीच्या त्रिशतसांवत्सरिक जयंतीच्या प्रसंगीं प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयात या पोवाड्याचा समावेश व्हावा असें श्रीयुत गोविंदराव सरदेसाई यानीं ठरविलें तेव्हां त्याची अस्सल प्रत मिळविण्याचा प्रयत्न करावा असें त्यानीं मला कोल्हापुरास असतां पत्र लिहिलें तेथें मला दोन प्रती मिळाल्या. त्यांतील पहिली २६ चौकांची असून दुसरी ३४ चौकांची आहे नवयुग प्रत व २६ चौकाची प्रत या बहुतेक सारख्याच आहेत. ३४ चौकाची प्रत स्वतन्त्र आहे हीच प्रत मुख्य धरून हा पोवाडा छापला आहे. यांत नसलेला मजकूर २६ चौकी प्रतींत व नवयुग प्रतींत आढळला तो [ ] अशा कसांत दिला आहे फक्त नवयुग प्रतींतील मजकूर ( ) अशा कसात दिला आहे. क्षुल्लक शब्दांचे फेरफार दिले नाहींत.



कल्गावाले शाहिराची बिरुदें डफ, तुणतुणें–टोकस कलगी, निशाण पट्टे व डंका.





PHOTO PRINTED AT SHREE LAXMI NARAYAN PRESS, BOMBAY NO 2.

१३ पोवाडा सन १८९८ सालीं रचला गेला. कृष्णराव यांस इतिहासाची माहिती बेताचीच होती. श्री शिवाजी महाराजाचें केळुसकरकृत चरित्र त्यानीं वाचलें होतें व शिवाय श्री शिवकालीन म्हणून ज्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्याही त्यांनीं वाचल्या होत्या व त्यांतील अद्भुत कथानकांचा उपयोग या पोवाड्यांत अनेक ठिकाणीं करण्यात आलेला आहे. या पोवाड्यांतील सर्वच प्रसंग ऐतिहासीक नाहींत. पुष्कळसे असल्या कादबऱ्यांतून भडक रंगांत रंगविलेले घेतले आहेत.

१४ सहावे चौकातील श्रीसमर्थ रामदासांच्या भेटीचा व अनुग्रहाचा प्रसंग, चौदावे व पधरावे चौकातील शिवाजीचें शकर भटाचा वेष घेणें व चांदखानाशी झटापट, सतरावे चौकातील चिमणाजी पंताचा आत्मयज्ञ, एकोणिसावे चौकांतील रघुनाथराव, विसावे चौकांत तानाजीचें हकीम होणें व एकविसाव्यात पुन्हा रघुनाथराव, बावीसावे चौकातील विनायक देव व त्याची कामगिरी, त्याच प्रमाणे तेविसाव्या चौकांतील झटापट वगैरे प्रसंग व व्यक्ति कादबरीकारांच्या कल्पनेनें प्रसवलेल्या आहेत. ऐतिहासिक सत्य या दृष्टीनें हे भाग पाहण्याचे नाहींत. कृष्णराव शाहीरानीं यातले बहुतेक सर्व प्रसंग आपल्या काव्यशक्तीनें चांगलेच नटविले आहेत. बाजी प्रभूची मर्दुमकी, तानाजीचें कोंडाणा घेणे वगैरेचें वर्णन फार बहारीचें आहे.

॥ श्री ॥

# छत्रपति शककर्ते शिवाजीमहाराज यांचा पोवाडा.

**कशी करणी कळा ईश्वरी, तत्र अगोचरी, जसा महीवरी, हिरा जन्मला । महशूर तीन ताळांत, नऊखंडांत, त्यांचा बोलबाला ॥ ध्रु० ॥ अठरा टोपीचे अठरा पगड, राज्य करी उघड, कलींत निर्भीड, बुडविती धर्मा । म्लेंच्छांचें मातलें बंड, मोठें प्रचंड, स्वीकारी अधर्मा ॥ मोठमोठे राजे मोडले, यवन वाढले, त्यांत काढले, मुसलमानि फर्मा । जबरीनें मुंडविती धरून, मुसलमान करून, पढो ह्मणती कल्मा ॥ मोठमोठे राजे रजपुत, वीरांचे सुत, असून मजबूत, पळति चारी धामा । झाले मुसलमान चहूंकडे;**

१ लोकांत २ कीर्ति ३ फर्मान, हुकूम ४ शेंडी काढती ५ दिशांला

करावें काय पुढें, सांभाळी कोण आह्मां ॥ लहान मोठ्या हिंदूंच्या पोरी, जुलुम त्यांच्यावरी, नेउनीया घरीं, लाविती कामा । कोणि दाद घेइना हिंदूंची, गरिब लोकांची बोली काय जमा ॥ गाई ब्राह्मणं गेलीं त्रासून, घेती धासून, जन्म असून, कोणत्या कामा । घेती भवानीशंकराचें नांव, आह्मा करितां धांव, घेई श्रीरामा ॥ ॥ चाल ॥ प्रार्थना करिती ऋषिमुनी भवानीशंकराची ॥ होजी ॥ यवनानें फार त्रासिलें नाहिं गति आमुची ॥ होजी ॥ भूमिवर मेतें पडू लागलीं गाई ब्राह्मणांचीं ॥ होजी ॥ कर्मधर्मयोग चालेना आहुति यज्ञाची ॥ होजी ॥ जाहला भार भूमिवर गति नसे राहण्याची ॥ होजी ॥ चाल दुसरी ॥ त्रासून भूमि प्रार्थना करिती देवाची ॥ जीजीजी ॥ हरिहरा पिडा दुरकरा येऊनी आमुची ॥ जीजीजी ॥ असें ऐकुनिया ध्वनि उठे शीवसांभाची ॥ जीजीजी ॥ भोंसले कुळीं धरीन अवतार वाणी प्रभूची ॥ जीजीजी ॥ वाजली स्वर्गी दुंदुभी देवलोकाची ॥ जीजीजी ॥ चाल तिसरी ॥ [ मूळ पुरुष बाबाजी होते वहिले । वेरुळ गांवीं पाटील ते राहिले ॥ त्यासी मुलगे खरे दोन पहिले । विठोजी मालोजी वाहिले[1] ॥ म्लेंच्छाला भिऊन काय राहिले । त्यांचें वर्णन थोडेसें गाइलें ॥ कपटि म्लेंच्छ हृदयिं नाहिं माइले । ह्मणून देवाला नाहीं साहिलें ॥ ] ॥ मिळवणी ॥ असें बोलून गेले शंकर, धरुनी अवतार, मर्दिले सारे[2], यवन लोकांला। महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत त्यांचा बोलबाला ॥ ध्रु०॥

मूळ पुरुष बाबाजी विठूजी, शंकराला पुजी, बोली नव्हे दुजी, कवन करण्याला । यवनांचा धाक चहूंकडे, करावें काय पुढें, सांभाळी कोण आमाला ॥ दुसरा पुरुष मालोजी आदी, साधुनी संधी, करुनि स्थिरबुद्धि, आणा ध्यानाला । दौलतावाद असे प्रांत, वेरुळ गावांत, विचार पाहण्याला ॥ त्याचे पोटीं नव्हतें संतान, मालोजी नेमान, अवलियाचें ध्यान, करिता तो जाहला । शहाजी शरीफजी मुलगे दोन झाले, बरें वाटलें, सर्व लोकांला ॥ स्नेही

१ नाव ठेविलें २ सारे, सगळे.

जाधवरावाच्या संगतीनें, मालोजी मानानं, निजामशाहींत जाऊन, नोकर तो झाला १ कांहीं दिवसानीं जाधवरावानीं, मराठी धर्मानी, नेलें भोजनाला ॥ सुंदर शाहाजी सरदार, करून शिणगार, घोड्या-वर स्वार, बरोबर नेला । जाधवरावाची मुलगी जिजाबाई, शहाजी संगें तीहीं, लागे खेळण्याला ॥ जाधवरावासी मालोजी बोले, व्याही होणें आलें, वाईट वाटलें, जाधवरावाला । माझी बरोबरी काय करणार, व्याही होणार, बोलूं नये असें मजला ॥ चाल ॥ असें ऐकुनिया मालोजी आले वीरश्रीला । आले ॥ खर्चुनीया द्रव्य धर्म मोठा वाढविला । मोठा ॥ गावोगावीं तलाव धर्मशाळा जागा देवळाला । जागा ॥ ठायींठायीं घालि अन्नछत्र विदित सर्वाला । विदित ॥ मालोजी मोठा धर्मनिष्ठ कळलें बादशहाला । कळलें ॥ ॥ चाल दुसरी ॥ बादशहानें शिफारस करून बोलावणें केलें । जीजीजी ॥ दिले हजार स्वार बरोबर हत्यारबंद पहिले । जी ॥ एक लाखाचा दिला मुलूख राजे नाव ठेविलें ॥ जी ॥ लखुजी जाधवरावासी बादशहानें आणलें ॥ जी ॥ शहाजीस मुलगी देण्याचें खचित ठरवीलें ॥ जीजीजी ॥ चाल तिसरी ॥ [ गावोगावीं पत्र असें लिहिलें । शहाजीचें लग्न ठरवीलें ॥ मोठमोठे मराठी जमवीले । हळदि केळवण जेवण करवीले ॥ अहेर माहेर करून मिरविले । मराठ्यांचें मन भरवीलें ॥ वेदोक्त[2] ब्राह्मण बोलविले । अंतरपाट धरून उभे राहिले ] ॥ मिळवणी ॥ ऐश्वर्य वाढण्याचा ओघ, जमला लग्नयोग, केला संजोग[3], लग्नकार्याला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ १ धृ० ॥

लग्नकार्य जाहलें आनंदान, बादशाहा येऊन, अक्षता टाकून, समारंभ केला । जिजाबाई होती उपवर, गर्भाधान झोर, लवकर ओघ[4] आला ॥ त्यांत भवानीशंकराचा वर, शिवशंकर, धरुनि अवतार, आले पोटाला । तिसरे चवथे मासिं केवळ, लागले

टीप १ शृंगार २ पोवाडा रचला त्यावेळी कोल्हापुरांत वेदोक्ताचा वाद सुरू होत होता. ३ सामानाची जमवाजमव. ४ ओघानें आलें.

डोहाळ, जिजाबाईला ॥ म्लेंच्छांचें करिन मर्दन, समशेर घेऊन, बोले गर्जून, सर्व लोकांला । असे जिजाबाईचे डोहाळ, शहाजी वेळोवेळ, पुरविता झाला ॥ जसे डोहाळे कौसल्यामातेसी, वेळ आली तशी, रामजन्मासी, आनंद बहु झाला । तसे झाले शिवाजीचे वेळ, देव अनुकूळ, शककर्त्याला ॥ जन्मकाळ होण्याचे आधीं, शिवनेरी किल्ल्यामधीं, करुनि स्थिरबुद्धि, ठेविलें जिजाबाईला । नवमास भरले भरपूर, प्रगट झाले वीर, तया ठायाला ॥ जाहला जन्मकाळ शिवाजिचा, पुण्य पुरुषाचा, नऊ ग्रहाचा आशीर्वाद त्याला । शके पंधराशें एकुणपन्नासांत, वैशाख शुद्धांत, पहा द्वितीयेला ॥ चाल ॥ [ जिजाबाईला शिवनेरी किल्ल्यांत प्रसूतिला वाडा । प्रसूतिला ॥ जन्मभूमिचा मान, उपजतां बाळ दिसे केवडा[१] । दिसे केवडा ॥ ] बाळपणीं खेळे शिवाजी करुनिया घोडा ॥ करुनी ॥ बाळमित्र सर्व भोंवत्यालि जमविले झाडा । ॥ जमविले ॥ म्लेच्छांची मुलें ह्मणे सारी बाजूवर काढा । बाजूवर ॥ हाणामारी करुनियां ह्मणती यवनांला तोडा । यवनाला ॥ शिवाजिनें घेउनि हातिं लठ्ठ[२] शिरें ह्मणे फोडा ॥ शिरें ह्मणे ॥ चाल दुसरी ॥ यवनांचा पराभव होतां आनंद बहु होतो । जी जी ॥ असा बाळपणाचा खेळ शिवाजी खेळतो ॥ जी जी ॥ भारत आणि रामायण ग्रंथ ऐकतो ॥ जी जी ॥ युद्धकांड पाहुन लढण्याचा अभ्यास करतो ॥ जी जी ॥ पाचदहा वर्षांपर्यंत असाच खेळतो ॥ जी जी ॥ ॥ चाल तिसरी ॥ [ मल्लयुद्ध करी अगतीनें[३] । यवनांला मारी शक्तीनें ॥ करिं चढतां मान युक्तीने । यवनांस ओढितां मुक्ति न ॥ गोब्राह्मण पाळी भक्तीनं । अनाथांस पाही ममतेनें ॥ अन्नधर्म करी नीतीनें । चालवी यथार्थ जुगतीने ॥ ] ॥ मिळवणी ॥ दहावे सालीं शिवाजीराजाला, बादशापाशीं नेला, सलाम नाहिं केला, त्यांनीं बादशहाला । महाशूर तीन ताळांत, नऊखंडांत, त्यांचा बोलबाला ॥ ३ ॥ ध्रु० ॥

---

१ केवड्यासारखी कांती. शिवाजी महाराज वर्णानें गोरे होते असी साक्ष इतिहास देतो. २ काठी, लाठी. ३ अगत्यानें, हौसेनें.

शिवाजी बापासी बोले, बरें नाहीं केलें, व्यर्थ तुम्ही आणिलें, कचेरीस मजला। अपमान होतो मराठ्यांचा, पाहुन शिवाजीचा, जीव तळमळला ॥ [ दहावे सालीं कसाब नेई गाई, शिवाजी त्यांस पाही, जाऊन त्यासमयीं, सोडविता झाला। शिवाजीनें घेऊन हातीं काठी, यवनांच्या पाठी, फोडता तो झाला ॥ ] त्रासानें फिरे जंगलांत, गरिबासी पहात, साधुसंतांत, बसता तो जाहाला। एके दिवशीं अरण्यांत गेले, कसाब तेथें आले, मारिती गाईला ॥ हें पाहिलें तानाजी मालुसऱ्यानं, येसाजी कंकानं, बाजी फसलकरानं, दिन गाजिवला। घेती भवानीशंकराचें नाव, कसाबांवर घाव, वळल्या गाईला ॥ कसाबांसी मारून जेर केलें, शिवाजीनें पाहिलें, मदत त्यांसि झाले, तया समयाला । सोडविल्या गाई यापरी, मुसलमानांवरी, शकं[1], चालिवला ॥ चाल ॥ ते तिघे, शिवाजी चवथा जमले एके ठायीं ॥ हो ॥ चौघांनीं एक दिल करून करिती पुढें सोई ॥ हो ॥ देणें घेणें लेणें नेसणें शिवाजी त्यांसि देई। हो ॥ आलि वेळ मराठ्यांची, चढति तेथून पुढें पाही। हो ॥ चौघांनीं केला मनसुबा किल्ला घेण्यापायीं ॥ हो ॥ एका शिणेचे[2] जमले सारे लोक दोनशें त्या समयीं ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ गड करून तोरणा किल्ल्यावर सोळावे वर्षीं गेले। जी ॥ सोळावर्षांचे होते वय शिवाजीचें ठरलें। जी ॥ सन सोळाशें त्रेचाळिसांत ( शके पंधराशे पासष्ठांत ) कारण असें झाले। जी ॥ किल्ल्याला मारून मेखा चौघे वर गेले। जी ॥ पागोट्याने शेंदून दोनशें लोक वर नेले। जी ॥ चाल तिसरी ॥ [ किल्ले दाराशी जाऊनी गाठीले। एकांतपणें भेटले ॥ " मराठ्यांचें वैभव लूटलें। यवनांच्या घरीं साठलें ॥ ह्मणुन तुमास गाठलें "। [3]किल्लेदारास खरें पटलें ॥ किल्लेदाराचें मन काढलें[4]। यवनांवर चित्त पेटलें ॥ मिळवणी ॥ किल्लेदारासी केले सामील, जहाला एकदिल, अभय त्यांनि दिलं, एकमेकांला। महशूर तीन ताळांत, नऊखंडात, त्यांचा बोलबाला ॥ ध्रु० ॥ ४ ॥

घातला छापा किल्ला केला सर, आपले चौकीदार, बसविले

१ जोर. २ वयाचे. ३ शिवाजीचें किल्लेदारास सांगणे. ४ मनातलें काढलें.

सारें, बंदोवस्ताला । खोदण्याचा तशांत लावला तंडा, मोहरांचा हंडा, मोठा सापडला ॥ मोहरबंद पर्वता वरचंढ, किल्ला राजगड, लोक बडेबड, सामिल शिवाजीला । हें कळलें दादोजी कोंडदेवा, अपेशाचा ठेवा, येणार वाटे मजला ॥ दादोजी शिवाजीचे गुरू, धैर्याचे मेरू, अढळपदिं ध्रुरु, तसे पाहण्याला । बृहस्पतीसारी अक्षरवटिका, पुण्यवान पक्का, आला उदयाला ॥ सारे जगीं जाहला महशूर, शिवाजी राज्यावर, प्राणाचा प्यार, करुन सांगी त्याला । गाई ब्राह्मणास रक्षावं, जगीं वाढीव नांव, मारावं म्लेंच्छांला ॥ दादोजी आपल्या अंतकाळादिशीं, बोले शिवाजीसी, मराठी धर्मासी, सांभाळून चाला । सुरू करा मराठी तलवार, यवनांवरि वार, बुडवा बादशहाला ॥ चाल ॥ दादोजीनें देह ठेवल्यावर शिवाजी मोठे झाले । हो ॥ सारे मित्र मिळुनियां काम युगतीनें केलें । हो ॥ पुरंदर आणखी कोंडाणे किल्ले घेतले हो ॥ बाजी मोहित्याला मिळवून घेण्याला शिवाजी राजे गेले । हो ॥ बाजी मोहित्यानं ऐकलें नाहीं अमान्य केलें । हो ॥ ही चीड धरून शिवाजी पोस्त मागाया गेले । हो ॥ बाजी मोहित्याला धुळवडी दिशीं वढून मारिलें । हो ॥ चाल दुसरी ॥ सुपे परगण्यावर स्वतां छापे घातले । जी ॥ झांजांतून लढून जंजिरे आपण सर केले । जी ॥ कोंकणपट्टीचे किल्ले सारे घेतले । जी ॥ बादशहानें शहाजीला वर्तमान कळविलें । जी ॥ शिवाजीला समज द्या दंगे मोठे मांडले । जी ॥ त्यानें आमचे किल्ले सारे सर करून घेतले । जी ॥ मानीना कोणासी दंगे मोठे मांडले । जी ॥ [ चाळीस हजार शाहाजी पाशीं सैन्य होते वहिलें । जी ॥ शाहाजीला धरण्याचे यत्न मोठे चालविले । जी ॥ चाल तिसरी ॥ मोठमोठे अमीरसरदार । बादशहाला यवन होते प्यार ॥ भरंवसा सारा त्यांच्यावर । शहाजीला पहा धरणार ॥ बाजी घोरपडे मोठे हुशार । वर्तमान ऐकतां तयार ॥ येऊन बादशहाला केला त्यांनीं जोहार । शहाजीला आह्मी धरणार ]

१ सारे. २ पर्वतापेक्षां उंच. ३ बडेबडे, मोठमोठे. ४ ध्रुव. ५ सारखी. ६ ओढून. ७ लढाऊ जहाजांतून. ८ पाण्यांतील किल्ले. ९ निवडक.

॥ मिळवणी ॥ मोठमोठ्या मानकऱ्यासनी, कळविले बादशानी, शहाजीला धरुनी, जरूर द्या मजला । महाशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥ ५ ॥ धृ० ॥

शिवाजीला आठवले मनीं, करावा गुरु ह्मणे, स्वप्निं येऊनी, अंबा सांगे त्याला। रामदास रुद्र अवतार, करुनिया प्यार, भजावा त्याला ॥ त्यांचा ठिकाणा चाफळगांवा, अनुग्रह घ्यावा, जगीं विसावा, असे सवाला । शिवाजीनें धरुनिया हेत, प्रथम हुडकीत, गेले चाफळाला ॥ निळोजी सोनदेव संग, जिवाचे जिवलग, शत्रूचे वाघ, संगे जाण्याला । आणखी कांहीं लोक त्यापरी शिवाजी बरोबरी, होते जाण्याला ॥ चाफळांतून स्वामी उठले गुहेमध्यें बसले, शिवाजी तिथे गेले, स्वामी पाहण्याला । बैसले, शिवाजी तिथ, स्वामी इतक्यांत, आले चाफळाला ॥ शिवाजीची स्वामी घेइना गांठ, मळविली वाट[1], शिवाजी घेतो हट्ट, तथा समयाला । शिवाजीनें केला निर्धार, प्राण देणार, याच ठायाला ॥ ॥ चाल ॥ असें पाहून शिवाजीला येऊन स्वामी भेटले । हो ॥ शिवाजीचें अंतःकरण खरें वाटलें । हो ॥ ठेविला शिरावरी हस्त प्रसन्न गुरु झाले । हो ॥ लीद, माती, खडे, नारळ शिवाजीस दिले । हो ॥ स्वामीनीं शिवाजी राजास अभयवर दिले । हो ॥ जेव्हां आठवशील तेव्हां भेटेन असें बोलले । हो ॥ चाल दुसरी ॥ स्वामीनी शिवाजीसी पुरा रस्ता दाविला ॥ जी ॥ गांवोगांवीं बांधा मंदिरें स्थापा रामाला ॥ जी ॥ देवळे मारुतीची असावी दरगावाला ॥ जी ॥ मोडुनी जोहार सांगा रामराम सेनेला ॥ जी ॥ हत्तीवरती भगवा जरी पटका लावा अघाडीला ॥ जी ॥ पोटच्या पुत्रासारखे सांभाळा प्रजेला ॥ जी ॥ जसे आपण तसे राखावें सर्व दुनियेला ॥ जी ॥ चाल तिसरी ॥ [शिवाजीनें मान्य तें केलें । हो केलें ॥ गुरुवचना प्रमाणें चालले । हो चालले ॥ देहावर स्थिर राहीले । हो राहीले ॥ कल्पनेचे रंग उडवीले । हो उडवीले ॥ मनीं येईल तिकडे नेले । हो नेले ॥ मनाचे हट्ट पुरवीले । हो पुरवीले ॥

---

१ चाफळाहून गुहे कडे व तेथून चाफळांत फेऱ्या केल्यानें वाट चांगली मळली.

भवानीच्या प्रतापानें घडलें । हो घडलें ॥ शिवाजीचें कांहीं नाहीं नडलें ॥ हो नडलें ] ॥ स्वामीचे चरण[1] हातांत, शिवाजी दिनरात, आठवी आनंदांत शिवाजी रामाला ] महशूर तीनताळांत, नऊ-खंडांत त्यांचा बोलबाला ॥ ६ ॥ ध्रु० ॥

बाजी घोरपडे बादशहापाशीं गेले, सरदार हिंमतवाले, बादशहाला बोले, धरितो शहाजीला । सरदारीबाणा दावीतो, धरुनिया देतो, वेळ काय त्याला ॥ केली युक्ति बाजी घोरपड्यान, कोमल शब्दान, पत्र लिहून, आणलें शहाजीला । इकडे दाविला पावणे-पणा, कपटाचा बाणा, शहाजीस नाहीं कळला ॥ शहाजीस मुधोळांत आणिलें, बादशहाला पत्र लिहिलें, जरुर पाठवीलें, फौज आणण्याला । हेर गुप्तरूपानें आले, शहाजीस वेढिलें, जेवण समयाला ॥ घोरपड्यानें केला असा घात, कळला वृत्तांत, मोंगलांचे हातांत, दिले शहाजीला । कैद करून घेऊनीया गेले, बादशहापाशी नेले, समोर उभा केला ॥ बादशहानें भिंत पोखरून, आंत घालून, बाहेरून चिनून, ठेविलें शहाजीला ॥ शिवाजीला द्यावे धरून, नाहीं तर मारीन; बादशहा बोले त्याला ॥चाल॥ असें वर्तमान शहाजीचें कळलें शिवाजीला ॥ हो ॥ शिवाजीनें जाऊन दिल्लीचा बादशहा मिळवीला ॥ हो ॥ मी सामील तुह्मांला परि साह्य व्हावें मजला ॥ हो ॥ विजापूरच्या बादशहावर स्वारी करूनीया चला ॥ हो ॥ असें ऐकून बादशहानें फौज दिली कुमकेला ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ विजापूरचे बादशहानें सोडून दिलें शहाजीला ॥ जी ॥ रायगडावर पोचवीले शिवाजीनें शहाजीला ॥ [2] जी ॥ स्वारी करून बाजी घोरपड्याचे वेढीलें मुधोळाला । जी ॥ आले शिवाजी ह्मणताना बाजी घोरपडा घाबरला ॥ जी ॥ घोरपड्याला वडून[3] शिवाजी छातीवर बसला । जी ॥ बाजी घोरपडे ह्मणूं लागले जीवदान द्या मजला ॥ जी ॥ शहाजीला धरून देताना वाटलें कसें तुजला । जी ॥ ॥ चाल तिसरी ॥ मग शिवाजी बोले घोरपड्याला । आधिं धरले कांहो शहाजीला ॥

१ चरण=पादुका २ प्रस्ताव प्यारीग्राप १४ पहा. ३ ओढून.

मोडणार तुह्मी मराठ्यांला। कसे साह्य होऊन यवनाला॥ घोरपडे ह्मणे अन्याय मोठा झाला। तुमच्या पुढें इलाज माझा सरला॥ असें माहीत असतां तुह्माला। कां आलां काळाच्या घरलां[१]॥ ]
मिळवणी॥ बाजी घोरपड्याचें धसकून कापलें शिर, शहाजी समोर, शिवाजी लौकर, आणवी दावण्याला॥ महाशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला॥ ७॥

शिवाजीनें घेतला सूड, बाजीचें शिरधड, केलें दोहोंकड, येऊन क्रोधाला। शहाजीला झाला आनंद, बादशहाला फंद, येत सारा कळला॥ विजापूरच्या बादशहाला कळले, कपट मज केलें, शिवाजीनें भलें, बघतो मी त्याला। मिळवीले अष्ट प्रधान, त्यांत बळवान, अफझुलखान ठरला॥ पैजचे उचलितो विडे, करुनिया चढ, होऊन निर्भीड, बोले बादशहाला। गेलेला मुलुख सर करतो, शिवाजीला धरतो, वेळ काय त्याला॥ शाहाजोरे[२] अफझुलखान हिरा, दुर्योधनासारा[३], शिवाजीवर मोहरा[४], खल्या[५] त्यांनीं ढाला। केला लक्ष फौजेचा जमाव, शिवाजीचें नांव, घेत चालला॥ आदिमाया देवी साधन, होती प्रसन्न, स्वप्नीं येऊन, अंबा सांगी त्याला। अफझुल्या आला कपटान, हेच सांगनं[६], माराया तुजला॥ चाल॥ तसी स्वप्नीं जाऊन सांगी ती देवी भोप्याला॥ हो॥ तळघरीं नेऊन मला ठेवा अफझुल्या आला॥ हो॥ लागले सारे उरमट मूर्ति फोडण्याला॥ हो॥ दिन गाजवीत अफझुल्या तुळजापुरीं गेला॥ हो॥ तळघरीं नेऊन ठेविली आधीं देवीला॥ हो॥ दुसरी मूर्त उगीच ठेवीली जाग्यावर पुजण्याला॥ हो॥ फोडीली अंबेची मूर्त मस्त असा झाला॥ हो॥ चाल दुसरी॥ चकींमें डालके भरडो म्हणे देवीला॥ जी॥ तिथून साऱ्या मूर्ति फोडीत पंढरपुरला गेला॥ जी॥ बडव्यांनीं विठोबा दुसरीकडे ठेवीला॥ जी॥ नाहीं विठूबा ह्मणून वर्दी कळली अफझुल्याला॥ जी॥ घेऊन समाचार तेथून शिवाजीवर आला॥ जी॥ अफझुल्या आला ह्मणुन देवी सांगे शिवाजीला

१ घराला २ बादशहाचा जोर ज्याच्या मागें आहे ३ सारखा ४ रोख ५ झेंडा उभा केला. ६ सांगणें

॥ जी ॥ चाल तिसरी ॥ [ कर्णाटकी करवं लष्कर । कांहीं थोडे हपशी बरोबर । पठाणांची चमके तरवार । जोर अरबी बंदुकीचा बार । शिवाय शिद्दी राहीले न्यारे । मोंगल आणि रोहिले लष्कर शेख सय्यद शूर लढणार । एका पेक्षां एक जोमदार ] ॥ मिळ० ॥ अफझुल्याची शिवाजीवर स्वारी, प्रतापगडावरी, धाडिले हालकरी[3], बोलवाया शिवाजीला । महाशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबोला ॥ ८ ॥

शिवाजीनें तोडुन मग झाडी, वाट केली थोडी[2], चौक्या त्या बुडी, बंदोबस्ताला । चौदा चौक्या दिल्या ठेऊन, सोडू नये आंत कोण, शिपाई पहाऱ्याला ॥ दिले डेरे किल्याच्या तळवटा, अफझुलखान मोठा, शिवाजी लहान पठ्ठा, धाक शिवाजीला । आदिमाया रक्षणा करी, विघ्न निवारी, सांभाळी शिवाजीला ॥ अफझुल्याचा कारभारी गोपीनाथ, शिवाजी गेले तिथ, आपला वृत्तांत, शिवाजी सांगे त्याला । तुह्मी सांगुन अफझुल्यासी, सडे भेटीसी, पाठवा त्याला ॥ गोपीनाथानें कळविलें अफझुल्यासी, सोडुनी फौजेसी, घेऊन हुजऱ्यासी जावें भेटीला । येणार शिवाजी एका हुजऱ्यानिशीं, तह करण्यासी, विचार कळविण्याला ॥ हें कबूल करून अफझुलखान, फौज घेऊन, पालखी शिणगारून, आसनारूढ झाला । फौज घेऊन गेला चौकीवर, निम्मे लष्कर, ठेवले चौकीला ॥ चौदा चौकीला निम्मे निम्मे गेले, संगें नाहीं उरलें, पालखी भुई राहिले, पुढें जाण्याला । गेला हुजऱ्यासंगें डेऱ्यांत, पाहुनीया तख्त, अफझुल्या दिपला ॥ चाल ॥ तख्ताची पाहुनि बैठक अफझुल्या दिपला ॥ हो ॥ सपसपा मारी पेचक बुकना केला ॥ हो ॥ मग जाऊन वर बसताना निम्मा आंत गेला ॥ हो ॥ आले शिवाजीमहाराज त्यावेळीं विचार काढीला ॥ हो ॥ अफझुल्या उठेना सलाम करावा कोणाला ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ केला मुजरा शिवाजी महाराजांनी भवानीस पहिला ॥ जी ॥ दुसरा नमस्कार शिवाजीचा कुळस्वामीला ॥जी॥ तिसरा नमस्कार शिवाजीचा जिजाआईला ॥ जी ॥ चौथा जोहार

१फडवें २निराळे ३जासूद. ४अरंद ठेवली. ५ डोंगराच्या तळाला ६ पालखीचे भोई.

आज अफझुल्या करतो मी तुजला ॥ जी ॥ असें म्हणतां अफझुलखानासीं क्रोध फार आला ॥ जी ॥ चाल तिसरी ॥ [ राग नाहीं अफझुल्यासीं साहिला । शिवाजीस सामोरा त्यानें पाहिला । बाहू पसरुनी उभा तो राहिला । शिद्दीला हो ह्मणे वाथलों[1] । जसा व्याघ्र मृगावरी धावला । अफझुल्यासी शिवाजी तसा गावलों[2] । शिवाजीनें क्रोध मनीं ठेवला । भवानीच्या पदीं लक्ष्य लावला । ] ॥ मिळवणी ॥ दहा रेड्यांचें बळ अफझुलखान, त्यांत मुसलमान, गाय म्हणे छान, गावली वाघाला । महाशूर तीनताळांत, नऊखंडांत त्याचा बोलबाला ॥ १ ॥

अफझुलखान उठुन झडकरी, शिवाजिला धरी, चिलखतावरी, सुर्यी[3] मारूं गेला । खरखरा वाजे हत्यार, शिवाजी हुशियार, घात म्हणे झाला ॥ बगलेंतून केला रिघाव, वाघनखाचा डाव, दोंदलावरी[4] घाव, शिवाजीनें केला । कोथळा आंवरून तसाच धरी, अफझुलखान मारी, वार शिवाजीला । खटाटोप[5] फुटुन लागे वार, कपाळावर, रक्त आलें फार, शिवाजी राजाला । मारी शिवाजी सफै समशेर, गर्दनावर, अफझुल्या ठार झाला ॥ सिद्दी धांवला शिवाजीवर, जिऊबा महाल्यां[6] फिरे, सफई तलवार, सिद्दीवर हात केला । त्यावेळीं होते महाल्याजिवबा, ह्मणुनी वाचले शिवबा, कळावें सर्वांला ॥ भुई नेती अफझुल्याची लास[7], जिवबा बघि त्यांस, सफै सरांस, भुयावर हात केला । शिवाजिचें सैन्य ठायीं ठायीं, सांपडली ह्मणे सोई, एकच केला हल्ला ॥ चाल ॥ गजावर सिंह चढे तसे, शिवाजी शेर झाले ॥ हो ॥ सारें लष्कर अफझुल्याचे मारून ठार केले ॥ हो ॥ हत्ती घोडे उंट पायदळ शिवाजीनें वढलें[8] ॥ हो ॥ मोठमोठ्या झुला, पाखरा, द्रव्य जमा केलें ॥ हो ॥ थोटी लंगडी कैक झालेली पळूनिया गेले ॥ हो ॥ अफझुल्याच्या मुलानें जाऊन बादशहाला कळविलें ॥ हो ॥

---

१ वाजूला. २ सापडला. ३ जंबिया. ४ पोटावर. ५ जिरेटोप. ६ न्हावी ७ प्रेत. ८ ओढलें, काबीज केलें.

मारिलें शिवाजीनें सारें कांहीं नाहीं उरलें ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ बादशहाला आली मग चिरड करा म्हणे स्वारी ॥ जी जी ॥ मेला इंद्रजिता सारखा वीर खेद होतो भारी ॥ जी जी ॥ अफझुल्याच्या आडानें म्यां राज्य केलें आजवरी ॥ जी जी ॥ मांडिलें विडे पैजेचे केली तैयारी ॥ जी जी ॥ सिद्दी जोहार रुस्तुम जमाल उचली लौकरी ॥ जी जी ॥ चाल तिसरी ॥ [ फौजेला वर्तमान कळले । शिवाजीवर मोर्चे वळवीले ॥ वीर वीरांशीं येऊन मिळाले । शक्ती-हीन होऊन गळले ॥ आम्हांवरचे विघ्न नाहीं टळलें । धाडस शिवा-जीचें कळलें ॥ दहा हजार सैन्य सारें जमले । मराठ्यांसी मराठे मिळाले ] ॥ मिळवणी ॥ फाजलखान त्यांचे बरोबर, घेऊन लष्कर, शिवाजीवर, मोर्चा फिरवीला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥ १० ॥ ध्रु० ॥

पन्हाळ्यावर शिवाजी होते तेव्हां, चैन नसे जीवा, जगदंबा पाहा, सुचवी राजाला । आला गलीम चालुन तुजवर, रहावें हुसी-यार, सांभाळ बानीला[1] ॥ इतक्यांत गलीम चालून आला, किल्ला वेढीला, बाहेर जाण्याला, रस्ता मग कुठला । पक्षाला[2] नाहीं रिघाव, त्यांत मानव, जाईल कसा ? तटला ॥ चार महिने वेढा दिला त्यांनी, मनुष्य कोंकणी, फिरती झाडितुनी, रस्ते पहाण्याला । मुंगीला नाहीं रिघाव, मनुष्याला वाव, होईल सांगा कुठला ॥ तह कर-ण्याचा केला मग बेत, मनुष्यें झालीं स्वस्थ, जाण्याचे रस्ते, मार्ग खुला झाला । पावनगडच्या खिंडीतून आले, रस्ते सुधरिले, सरळ रांगण्याला ॥ बाजी प्रभू राहिले राखण, बघा क्षत्रियपण, दहा हजा-रांनीं, मार सुरूं केला । तीनशे मावळे बाजी प्रभू संग, होऊन निःसंग, उभे युद्धाला ॥ शिवाजीची इषारत हीच, करीन तोफा पांच, मग तुह्मी याच, निघुन रांगण्याला । बाजीप्रभु राहिले खिंडीवर, रोखिलें लष्कर, वाट नसे त्याला ॥ चाल ॥ भले शूरमर्द बाजी प्रभू धरुन तल-वार ॥ हो ॥ कैकांचीं उडविलीं शिरें करुनियां वार ॥ हो ॥ थोटी

---

१ नांव २ पाखराला.

लंगडी कैकजण झाली पळता बेजार ॥ हो ॥ दहा हजाराचा केला धुव्वा पळाले लष्कर ॥ हो ॥ बारा गोळ्या लागल्या अंगांत किती दमदार ॥ हो ॥ अशा वीराची कीर्ती गाताना दुःख परिहार ॥ हो ॥ ॥ चाल दुसरी ॥ रक्तानें न्हाले बाजी प्रभू तरी नाहीं डंगले[1] ॥ जी जी ॥ जागविलें आईचे दूध रणांगणीं चढले ॥ जी जी ॥ फौजेची झाली दाणादाण शत्रु चरफडले ॥ जी जी ॥ रांगण्यावर तोफा पांच झाल्या प्रभुनें ऐकलें ॥ जी जी ॥ पांच तोफा होईपर्यंत खालिं नाहीं पडले ॥ जी जी ॥ चाल तिसरी ॥ [ बाजी प्रभूचा मार बघा देवडी । साऱ्या वीरांची केली त्यानें बावडी । कोणिं तुंबा हातांत घेति फावडी । कोण लावी खांद्याला कावडी । सारे पळाले लष्कर करूनिया सवडी । म्हणण्यासारखी लढाई झाली तेवढी ] ॥ मिळवणी ॥ पांच तोफा रांगण्यावर झाल्या, प्रभूनीं ऐकिल्या, कीर्ती त्यांच्या केल्या, आह्मी गायाला । महाशूर तीन ताळांत, नऊखंडांत, त्याचा बोलबाला ॥ ११ ॥

तलवार बहाद्दर बाजी प्रभू खरा, कुळामदीं हिरा, अभिमन्यूसारा[2], आला वंशाला । जागविलें कुळाचें नांव, कीर्ती गाती सर्व, देव लोकाला ॥ धन्य त्याच्या मातेची कुशी, दहा हजारासी, यवन लोकांसी, थारा नाहीं दिधला । आलविदा[3] पढत गेले माग, लागला डाग, जोहार रुस्तुमाला ॥ बाजी प्रभुनें हालविलें सारे दळ, केलें निर्मूळ, यवनांनी पळ, तेव्हां काढला । बाजी प्रभू खालीं आले तेव्हां, स्वर्गीं कळले देवा, घंटा वाजवीला ॥ विजापूरच्या बादशहाचा उडाला धीर, शत्रूचा झाला जोर, होईल कसें स्थिर, करावे काय याला । बादशहानें वकील धाडिले, चौथाई कबूल झाले, शिवाजी राजाला ॥ अशी कीर्ति शिवाजीची गाती, लिहिती वाचीती, विघ्नें त्यांची हरती, भजावें त्याला । त्याच्या वंशाचें कल्याण असो, अंतरीं ठसो, शिवाजी राजाला ॥ गोवळकोंड आणि विजापूरकर, बैसले स्थिर, संभाळुन घर, शरण राजाला ।

---

१ भ्याला. २ सारखा. ३ ताबूत विसर्जन केल्यावरचें रडगाणें.

अशी करुणा करी हरिहर, धरूनि अवतार, सांभाळी भक्ताला ॥ चाल ॥ बादशहाला पडली धास्ती दिसेना सोयी । हो ॥ यवनांचे वीरांवर शिवाजी चालून जाई । हो ॥ आजूबाजूचे[1] वीर किती मेले गणती त्यांची नाहीं । हो ॥ शिवाजीचा धाक सर्वांला जरा दम नाहीं । हो ॥ जगदंबा रक्षण करी शिवाजीच्या पायीं ॥ हो ॥ ॥ चाल दुसरी ॥ दिल्लीपर्यंत जाऊन धक्के देऊं लागले ॥ जी ॥ यवनांचे वीर होते शूर तरी पळाले ॥ जी ॥ किती एक दबकुन दबकून[2] माघारा सरले ॥ जी ॥ शिवाजीच्या पायीं मग विडे बादशहानें केले ॥जी॥ अंबेची दया शिवाजीला यवन मारले ॥ जी ॥ चहूं मुलखीं शिवाजीचें नाव यवन थंड बसले । डिवचून महा भुजंगाला गारुडी फसले । तसे झाले यवन लोकांसी आले दिस कसले । शिवाजीची आहे वेळ चढती असें त्यांस दिसले । भवानीची दया शिवाजीला त्याला भय कसलें ॥ चाल तिसरी ॥ [ शिवाजीनें करून सडी स्वारी ॥ मोठमोठ्या यवनाला मारी ॥ आदिमाया विघ्ननिवारी । शिवाजी भक्तिवान भारी ॥ अंबाचि पूजा स्वीकारी । धन्यधन्य माय ती तारी ॥ शिवाजीची सदा तैयारी । नाहीं आला कुणाचे आरीं[3] ॥ ] ॥ मिळवणी ॥ शिवाजीनें बसविला हक्क, यवनासी धाक, करिन ह्मणे खाक, सांभाळुन ॥ चाल ॥ महाशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥ ११ ॥

दक्षिणेची बाजु झाली चढती, शिवाजीची बढती, यवन सारी रडली, सर्व समयाला । दबदबा शिवाजीचा फार, भय अपार, पुढें जाण्याला ॥ शिवाजीनें बांधुनि मग जोर, किल्ले थोर थोर, होऊन बिनघोर, लागे घेण्याला । चोपुनी मुलुख केला सर, यवनांचा धीर, निघुनीया गेला ॥ पुणें प्रांत किल्ले ठायीं ठायीं, शिवाजी करी सोई, वर्दी अशी जाई, दिल्लीच्या बादशहाला । गांवा आड पेटवितो गांव, शत्रूवर धांव, लागे करण्याला ॥ अवरंगजेबासी पडल कोडं, फैजेच विड, सरदार बड बडे[4], आले पाहुण्याला । जसवंत सिंगासी अवरंगजेब बोले, तुह्मांसी नेमिले, शिवाजी धरण्याला ॥

१ दुसऱ्या तिसऱ्या दर्जाचे २ मिऊन ३ कह्यांत. ४ मोठेमोठे.

जसवंतसिंगानी शाहिस्तेखानासी, घेऊन कुमकेसी, तयारी फौजेसी, लाविली करण्याला। चला जाऊं शिवाजीला मारून, लुटारू धरून, आणू दिल्लीला ॥ चाल ॥ फौजेचा सरंजाम करून निघाले लष्कर ॥ हो ॥ बादशहाचा घेऊनिया विडा शिवाजीवर ॥ हो॥दिल्ली पासून चोपीत आले धरुन तलवार ॥हो॥ एकदम वेढिलें पुणें ठेविलें पार ॥हो॥ केला पुण्यावरति हल्ला उडविला बार ॥हो॥ ॥ चाल दुसरी ॥ दादोजी कोंडदेवाच्या वाड्यावर गेले ॥ जी ॥ केली गर्दी परंतु शिवाजी नाहींसे ठरले ॥ जी ॥ बंदोबस्त करून तिथें कोंकण पट्टीमधें शिरले ॥ जी ॥ हत्ती घोडे चढेनात घाट कितिकजण पडले ॥ जी ॥ शाहिस्तेखान आणि सिंग तेथून माघारी फिरले ॥ जी ॥ चाल तिसरी ॥ [ साऱ्या वीरांचे संशय फिटले । आयुष्याचें धरणे तुटले ॥ येथें येऊन नशीब आमचे फुटले । आलों तेव्हांच दैव आमचे उठले ॥ शत्रूचें काळीज मनीं घटलें । त्यांत यवन होते ते नटले । मरणाचे झोरे आहे खटले ]॥ मिळवणी ॥ दहाहजार सैन्य गेल झोर, शिवाजीवर, आले समोर, बरी आदमासाला । महाशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥१३॥ ॥ ध्रु० ॥ माहशूर ॥ १३ ॥

रायगड आणि प्रतापगड; दोन्हीच्या मधें चढ, सैन्याची पुढं[1], मारुन गेले ठार । शाहिस्तेखानाला कळली वर्दी, शिवाजी मोठा खर्दी[2], तरवार बहाद्दर ॥ जसवंतसिंगाला पडला दबदबा, केली त्यानी सभा, बघा मनसुबा, जमुन एकवार । शिवाजीनें विचार काढले, सिंहगडावर आले, जमले सरदार ॥ मित्रमंडळी सारी जमविली, तयारी केली, शिवाजीनें भली, निघाले पुण्यावर। मोरोपंत पिंगळे बोलतात, जाण्यांत नाहीं मात, यवनाचे झोर॥ पंतासी शिवाजी बोलले,कारण माझे झाले,जाचे हे भले, धरुनिया धीर। झाले शंकर शास्त्री भट्ट[3], करून खटपट, निघाले लौकर॥ आंत चिलखत ब्राह्मणाचा वेश, कपडा वर नेस, काढुनी पास[4], गेले चौकीवर ।

१ पुढची बाजू, बिनी. २ जबरदस्त. ३ प्रस्ताव प्यारेग्राफ १४ पहा. ४ इंग्रजी शब्द. परवाना

चौकीवाल्यानें बघुनी परवाना; वकिलाचा बाणा, दावला भरपूर ॥ आले शाहिस्तेखानाच्या वाड्याला, सैल भट दिसला, जाऊन कचेरीला, बोलणे केले सार । तुमच्या ह्मणण्याप्रमाणें आह्मी करतो, सांगाल तसें राहतो, येथुन बघा ह्मोर ॥ चाल ॥ शाहिस्तेखान ह्मणे आमचे किल्ले करावे परत ॥ हो ॥ आमच्या बरोबर कधीं लढूं नये येवढ्या वरत ॥ हो ॥ पुढें कमवूं तेही देऊं अशी द्या शर्त ॥ हो ॥ त्यामध्यें चांदखान[1] होता मोठा धूर्त ॥ हो ॥ तो म्हणे हाच शिवाजी आला वरा तूर्त ॥ हो ॥ शाहीस्तेखानासंगें चांदखानाचें दुइत[2] होतें पुर्त ॥ हो ॥ ह्मणुनि नाहिं बोलला गोष्ट सान्यांत ॥ हो ॥ ( चाल दुसरी ) केलें कबुल शिवाजीनें बेतानें बाहेर पडले ॥ जी ॥ चांदखान तसेच शिवाजीच्या पाठीवर जडले ॥ जी ॥ त्याला बघुन बघा शिवाजीनें धोरण काय केलें ॥ जी ॥ जागोजागीं शिवाजी यत्न करुनियां दमले ॥ जी ॥ होता धूर्त ह्मातारा अगदीं माग नाहीं पडल ॥ जी ॥ आड रस्ते काढुन शिवाजी एका वाड्यापाशीं भिडले ॥ जी ॥ दरवाज्यावर थाप मारतांच चांदखान जडले ॥ जी ॥ शिवाजीला सफे मारी बाण चांदखान चढले ॥ जी ॥ चाल तिसरी ॥ [चांदखान त्यांत हुषार । शिवाजीला धराया बघे वारंवार । गावला तर जिता धरणार । असा मनचा हेतु त्याच्या फार । शिवाजी मोठे दिलदार[3] । त्याच्यापुढें कोणाची नाहीं तार । विजली सारखा चमके वारंवार । चांदखान बघुन गारेगार] ॥ मिळवणी ॥ द्वारावरी शिवाजी मारी थाप, चांदखान ओढुनी चाप, बाण मारी साफ, सफाई शिवाजीला ॥ महाशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोल वाला ॥ १४ ॥

किलचकावर बसला पहिला पेट, विस्तु पडला झट, दुसरा मारी पेट, छातीवर शिवाजीला । जलादिनें शिवाजी खालीं बसले, चांदखान डसले, धराया शिवाजीला ॥ शिवाजीला आला मोठा राग, चांदखानावर लाग, मारुनीया टांग, छातिवर बसला । वाघ

---

१ पहा प्रस्ताव कलम, १४ २ द्वैत, वाकडें. ३ छातीचा, हिंमतीचा.

नख्यांनीं फोडिलें पोट, वेळ वाईट, चांदखान तुजला ॥ जंबियान तोडली मान, मारिला चांदखान, बांधुन वेतान, आडांत टाकीला। चांदखानाचा मोसबा फारक[1], शिवाजी मोठा ठक, भवानी साह्य त्याला ॥ मग जसवंतसिंगाकडे आले, शिवाजी भले, डेऱ्यापाशी गेले, शिपाई पाऱ्याला। महाराज शिपायासी बोले, वकील बघा आले, कळवा सिंगाला ॥ आला दूत शिवाजीकडचा, वर्तमान त्याचा, एकांत कळविणेचा, आहे आपणाला। जसवंतसिंगान घालुनी हाती हात, येऊनी डेऱ्यांत, विचारूं लागला ॥ 'तह केला शिवाजीनें कसा, वळला असा कसा, किल्याचा हिसा, परत कसा केला[2]।' "मराठ्यासंग लढायाच नाहीं, ह्मणुन तुमच्या पायीं[3], परत हिसा केला[4]" ॥ चाल ॥ जसवंतसिंगाचें भुलविलें मन शंकर-शास्त्रीनें ॥ हो ॥ मग शंकरशास्त्री सांगतो गोष्ट यवजून[5] ॥ हो ॥ मराठ्यावर[6] नाहीं धरणार तरवार येथून ॥ हो ॥ तुह्मी मराठ्याचा सोडला अगदीं अभिमान ॥ हो ॥ असें ह्मणतां जसवंतसिंगाचें चरकलें[7] मन ॥ हो ॥ तुह्मी सांगाल तसें ऐकतों आजपासून ॥ हो ॥ असें ह्मणतां अभय मग दिलें जसवंतसिंगानें ॥ हो ॥ यवनांचा पक्ष सोडला आजपासून ॥ हो ॥ ॥ चाल दुसरी ॥ मग ह्मणे जसवंतसिंग शिवाजी मज दावा ॥ जी जी ॥ मग ह्मणे मीच शिवाजी विचारानें रहावा ॥ जी जी ॥ असें ह्मणतां दोघांचें इमान झाले तेव्हां ॥ जी जी ॥ ह्मणे शिवाजी उद्यां तुह्मी शिकारीस जावा ॥ जी जी ॥ बरें ह्मणून शिकारीस जसवंतसिंग गेले वहावा ॥ जी जी ॥ मग सिंहगडावर शिवाजी गेले तेव्हां ॥ जी जी ॥ मित्रासहवर्तमान शिवाजी सर्वा[8] ॥ जी जी ॥ ॥ चाल तिसरी ॥ [ साऱ्यांला इकडे होता चटका। ते घालीत बसले होते घटका। कशी होईल शिवाजीची सुटका। सर्वांच्या मनीं

१ मुद्देमाल नाहींसा केला प्रेत न ओळखे असें केलें. २ हा जसवंतसिंगाचा प्रश्न. ३ तुमच्या ( जसवंतसिंगाच्या ) करितां. ४ हें शंकर शास्त्र्याचें उत्तर. ५ योजून, रचून. ६ जसवंतसिंगाला येथें मराठा असें ह्मटलें आहे. ७ दिल फाटला, मन खाऊं लागलें. ८ काळजी.

असा खटका । चांदखानाला देऊन आले झटका । दाविला मराठी फटका । शिवाजीचा इरादा नव्हे लटका । सिंहगडावर साऱ्याला हटका[१] ] ॥ मिळवणी ॥ पूर्वार्ध संपला सारा, इतिहास झाला पुरा, करून दाऊं तऱ्हा, उत्तरार्धाला । महशूर तीन ताळांत, नऊखंडांत, त्यांचा बोलबाला ॥ १५ ॥

उत्तरार्ध येथून परिसावा, स्थिर मन ठेवा, लक्ष जरा लावा, माझ्या शब्दाला । शिवाजीनें राखली ह्मणुनी, मराठ्यांची वाणी, आली उदयाला॥ शिवाजीनें जमाविल सार, लोक लहानथोर, पाहून [illegible] नेत काढला । हत्यारबंद काढले लोक पाहुनीया झोक मार्ग काढला ॥ असा जमाव करुनीया झट, उतरुनीया घाट, पुण्यावर थेट, कराया गेले हल्ला । घेतली मशाल हजार पांचशे, बैल तसे दोनशें, घाटावर तळ दिला ॥ साठ असामीचा पहिला होता पास, वराडाचा खास, परवाना घेण्यास, पुन्हां नको त्याला । आला वेशींत वऱ्हाडाचा गरका, बाजाचा कडका, गांवात निघाला ॥ तानाजी बायको झाला छान, शिवाजीराजान, ताशा अडकून, कडाक्यांत आला । लखलखाट चंद्रज्योत, मशालीच पोत, उज्याला[२] पडला ॥ आले शाहिस्तेखानाच्या वाड्या ह्मोर, पहातात लहान थोर, वऱ्हाड तिथून ह्मोर, आल बेताला । विझ-वील विझवीत मशाली गेले, बागेंत कांहीं शिरले, वाज्या ह्मोर गेला ॥ जाऊन ताशा टाकला वाड्यांत, शिरले बागेंत, शिटीची शर्त, होती सर्वांला । आले मागल्या वाटेन सार, पोखरताना घर, भांड्यावर धोंडा पडला ॥ चाल ॥ जयशंकर ह्मणुनीया सारे माडी-वर चढले ॥ हो ॥ गेले चहुकडे चौघे मारीत वर भिडले ॥ हो ॥ शाहिस्तेखानाचे मुलग्याचे दोहोखंड[३] शिवाजीनें केले ॥ हो ॥ मुलग्याची बायको घाबरली अस्मान ह्मणे पडले ॥ हो ॥ तिनें खूण दाखवितां दुसऱ्या खोलीपाशीं भिडले ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ शाहिस्तेखान घाबरे[४] बघुन शिवाजीला भ्याले ॥ जी जी ॥ और-

१ विचार. २ उजाड. ३ दोन तुकडे. ४ भित्रा

तकू बोलता कैसा बचावे हक्कताले[1] । जी जी ॥ डर लगता मेरेकू म्हणून पलगाखालीं दडले ॥ जी जी ॥ शाहिस्तेखानाच्या बायकोनें पाय शिवाजीचे धरले ॥ जी जी ॥ तानाजी येऊन शिवाजीला रागे बहु भरले ॥ जी जी ॥ शाहिस्तेखान पडू दे पाया मग ह्मणे सरले ॥ जी जी ॥ बायकोनें धरून शाहिस्तेखानासी समोर उभे केले ॥ जी जी ॥ चाल तिसरी ॥ [ यवनावरति तानाजीचा रगडा । सर्व ठायीं बसविला पगडा ॥ शाहिस्तेखानासीं उठ म्हणे दगडा । झाला बघ तुझ्यावर आगडा ॥ हात जोडून शाहिस्तेखान उघडा । कृपा करून येवढी वेळ दवडा ॥ आलें विघ्न येवढें काढा । प्राण रक्षण करून घ्यावा झाडा ] ॥ मिळवणी ॥ शाहिस्तेखान पाया पडले झट, जीवदान दिलें ऊठ, तानाजी कापी बोट, खानासी थोटा केला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ १६ ॥ ध्रु० ॥

शाहिस्तेखानासी तानाजी बोलता, शिवाजी साह्य होता, ह्मणुन राहिलास जिता, आतांच्या समयाला । आतां सांभाळ आपला जीव, निघुनिया जाव, आपल्या देशाला ॥ उद्यां निघुन जावें लौकर, नाहींतर मारीन ठार, कापतो थरथर, जातो ह्मणाला । आजपासुन इथ नाहीं येणार, सांभाळा एकवार, जिवदान द्या मजला ॥ इतके होताना वाड्याच्या भोंवति गरका[2], कळेना आपला परका, चलो ह्मणे सरका, पकडो शिवाजीला । साठ असामी बाजूवर एका झाले, शिवाजी पळाले, धरा ह्मणे त्याला ॥ एका बाजूनें पळताना झट, विस्त्याचा मोठा पाट, इंगळ मोठमोठ, सांपडायचा वेळ आला । चिमणाजीपंत[3] वीर खरा, सेनेमधें हिरा, सांगतो म्हाराजाला ॥ मी निजतो रस्त्यावर, उतरून जावा पार, मागुन येतील स्वार, धरतील सर्वांला । सारे लोक सांभाळा ह्मणे त्यासी, शेककर्त्यासी, ह्मणून इस्तवावर निजला श्री धन्य त्याच्या आईचें दूध, विस्त्याची नाहीं शुद्ध, करून पाट रुद्ध, इंगळावर

१ खुदा. २ गर्दी. ३ पहा प्रस्ताव प्यारा १४ वा.

3829

निजला । पाटीवरून उतरले झरझरा, चिमणाजीपंत खरा, जळून आंत मेला ॥ जातीचा ब्राह्मण असा खंदा, इरादी धंदा, जीवाची मर्यादा, नाहीं तयाला । शिवाजीसाठीं प्राण दिला त्यान, राखिलें इमान, प्रसंग समयाला ॥ असा वीर मिळायचा नाहीं पाहावा, दुनयासी झाला ठावा, केवढा विसावा, केला शिवाजीला । वाजे त्याच्या नांवाचा डंका, आवाज तिनी लोकां, भजावे त्याला ॥ शिवाजीनें घेतले काढून, घाटावर नेऊन, गळा पडून, रडूं लागला । वाचवून साऱ्याचा प्राण, मला सोडून, गेलास कैलासाला ॥ चाल ॥ वीरपणा गाजविला तुह्मी चिमणाजीपंत ॥ हो ॥ साठ असामी करितां मेला केवढी झाली कीर्त ॥ हो ॥ राखलीस आमची वाणी जन्मावर्त[१] ॥ हो ॥ असा वीर मिळायचा नाहीं करावी शर्त ॥ हो ॥ सिंहगडावर नेऊन पोचविलें त्याचें प्रेत ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ चिमणाजीपंताचें थडे जरूर बांधीले ॥ जी जी ॥ शिवाजीनें त्याच्या नैवेद्याला इनाम बहु दिलें ॥ जी जी ॥ हल्लींच्या वंशजाला त्यांचें इनाम चालूं झालें ॥ जी जी ॥ बाकीच्या फौजेनें इकडे पोत पेटवीले ॥ जी जी ॥ एक एका झाडाला चार चार पोत बांधून ठेवले ॥ जी जी ॥ कांहीं बैलाच्या शिंगाला बांधून हाकुनीया दिले ॥ जी जी ॥ चाल तिसरी ॥ [ शिवाजीचे वीर वेताल । मोठमोठीं राज्यें केलीं खाल[२] ॥ मोगलांचे जबर केले हाल । चढल्याले उतारले खालें[३] ॥ शाहिस्तेखान करुनी आला चाल । उजेड बघून पळाले खालें[४] ॥ ] ॥ मिळवणी ॥ रानोमाळ पळाले बैल सार । उज्याळा[५] दूर दुर, मागून लष्कर, आलें धरण्याला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ १७ ॥

शाहिस्तेखानाचें धावलें लष्कर, वीस हजार, एकूणसाठावर कराया गेले हल्ला । मशालीनें लष्कर दिसलें लईं[६], करुनीयां घाई, मारावें कसें झाला ॥ अंबाऱ्या लादून हत्तीवर, महात त्याच्यावर

१ जन्मभर. २ मोकळीं राजे काढून ताब्यांत घेतलीं. ३ खालीं ४ पूर्वेकडे. ५ उजेड. ६ मोठें

दमलें लष्कर, येऊन युद्धाला । मग तेथून फिरले माघार, मोडलें लष्कर, कळलें बादशहाला ॥ शिवाजीची खरी झाली खेप¹, सुरूं केली तोफ, डोळ्याला नाहीं झोंप, रात्रंदिस त्याला । शाहिस्तेखानाचे पेटीवलें लष्कर, पळतां बेजार, थारा नाहीं झाला ॥ बादशहानें त्याला बघतांच, बेतरप साच, वीन बोटाच, करावें काय झाला । घेतला मुलुख काढून, दिला धाडून, आल्या मार्गाला॥ शिवाजीनें हांकलें लष्कर, त्याच्या बरोबर, गेले सुरतेवर, जाऊन तळ पडला । इंग्रजांची सांभाळून छावणी, लुटारू जाऊनी, वेढिती सर्वाला ॥ सुरत लुटून द्रव्य केलें जमा, लुटण्याची झाली सीमा, अंगीं खमखमा², सर्व सैन्याला । पुतळ्या मोहरा द्रव्य जमविलें, निघुनीयां आले, आपल्या देशाला ॥ चाल ॥ जर³ जवाहीर गावले लूटींत विन मोली हिरा ॥ हो ॥ आले घेऊन आपल्या देशाला झाला पुकारा ॥ हो ॥ इंग्रजाच्या कुमकेला शिवाजीनें ठेविला होता पारा⁴ ॥ हो ॥ साहेब लोक पाहून त्यावेळीं शिवाजीला प्यारा ॥ हो ॥ बादशहाला पडली धासत विचार ह्मणे करा ॥ हो ॥ पाठवून दुसरे सरदार शिवाजीला धरा ॥ हो ॥ शिवाजीनें येऊन गडावरी विचार केला बरा ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ पाडलें नाणें नांवाचें शिवाजी राजान ॥ जी जी ॥ नऊ खंडीं नांव जाहीर राजे ह्मणवून ॥ जी जी ॥ पुढें दिल्लीरखान जयसिंग आले हिमतीन ॥ जी जी ॥ ऐंशी हजाराचा तळ दिला पुण्या भोवतीन ॥ ॥ जी जी ॥ जयसिंगाला भय शिवाजीचे मोठें दारुण ॥ जी जी ॥ जयसिंगाला सांगे शिवाजी ठेऊनियां मान ॥ जी जी ॥ तह केला ह्मणून दिलें अभय शिवाजी राजान ॥ जी जी ॥ चाल तिसरी ॥ [ जयसिंग बोले शिवाजीला । रुद्रमंडळ घेणें आहे किल्ला ॥ सहा महिने वेढीला जिल्हा । यत्न करून झालों मी ढिला ॥ करून स्वारी अशा संधीला ॥ येईल हातीं दोघाच्या गर्दीला ॥ मग शिवाजी ह्मणे फंदिला । कां आला व्यर्थ धुंदिला ॥ ] ॥ मिळवणी ॥ एकमेकांची झाली इमान भाक, शिवाजीचा धाक, करील वाटे खाक,

१ स्वारी. २ खुमखुमी, दम. ३ जरतारी कापड. ४ पाहरा.

जयसिंगाला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥ १८ ॥ धृ० ॥

जयसिंग भेटले शिवाजी संग, होऊन निःसंग, बोलण्याचा रंग, शिवाजीनें पाहिला दिलेरखानासी जयसिंग बोले, कारण आमचे झाले, भेटलो शिवाजीला ॥ बादशहाला जयसिंग लिहितो, शिवाजी तह करतो, बरें ह्मणवीतो, बादशहा दोघाला। जयसिंग बोले त्यावरी, रुद्रमंडळावरी, चला स्वारीला ॥ मग शिवाजी त्याला बोलतात, तुह्मी रहावे इथ, स्वस्थ डेऱ्यांत, मज्या पाहण्याला । आह्मी जातो रुद्रमंडळावं, घेण्याचा डाव, दावतो तुह्माला ॥ जयसिंग बोले महाराजासी, कठिण येण्यासी, किल्ला तुह्मांसी, प्रयत्न घेण्याला । सहा महिने केले आह्मी कष्ट, आला नाहीं स्पष्ट, किल्ला हाताला ॥ यत्न करून दमलो सहा महिन, दमलीं सारीं सैन्य, मार केला वैनें, आमच्या लोकांला । सामान सोडून पळूनियां आलों, किल्लेदारास भ्यालो, तया समयाला ॥ जयसिंगासी ह्माराज ह्मणतात, किल्ला हातोहात, नवल काय त्यांत, किल्ला घेण्याला । ह्मणे शिवाजी बघा माझा डाव, तलवारीचा घाव, दावतो तुह्मांला ॥ त्यांत फितूर चंद्रराव मोरे, बातमी जरूर; रुद्रमंडळावर, किल्लेदाराला । दोन हजार रुपय बक्षिसी, बातमी कळविण्यासी, दिले मोऱ्याला ॥ चाल ॥ शिवाजीनें कूच केले तिथून प्रहर रात्रीला ॥ हो ॥ ठाकोठाक जाऊन वेढिले रुद्रमंडळाला ॥ हो ॥ त्यांत रघुनाथ[3] गेले होते घरी भेटण्याला ॥ हो ॥ पहिल्या लोकांनी किल्याच्या ह्मोर गलबला केला ॥ हो ॥ होती सुचना ह्मणुन उतरले लोक मारायाला ॥ हो ॥ मागुन रघुनाथ येऊन किल्यावर चढला ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ रघुनाथरावाची किल्यावर चमके तलवार ॥ जी जी ॥ केली खतल[4] लोट[5] वाहिले रक्ताचे फार ॥ जी जी ॥ घातले ढीग मुडद्याचे बुरजा बरोबर ॥ जी जी ॥ भगवा झेंडा घेऊन रघुनाथ उभा त्यावर

१ वर २ करून ३ पहा प्रस्ताव प्यारा १४. ४ कत्तल ५ पाट

॥ जी जी ॥ किल्लेदाराच्या वाड्याला आग्नी दिली लौकर ॥ जी जी ॥ रहिमतखानासी धरुन केलें कैद रुद्रमंडळावर ॥ जी जी ॥ शिवाजीनें करुन बंदोबस्त ठेविले पाहारे[1] ॥ जी जी ॥ चाल तिसरी [ रहिमतखान प्रतापी वीर रगडा[2] । जाळला तयाचा वाडा । शिवाजीचा विचार असे पाडा । ह्मणे त्यास विचारानें धाडा । जयसिंगाला सांडणीस्वार धाडा । कचेरीला तयार केला वाडा ॥ ] मिळवणी शिवाजीनें कचेरी केली खाशी, जयसिंगासी, आणले दरबारासी, मजा पाहण्याला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ १९ ॥ ध्रु० ॥

रुद्रमंडळ किल्ला केला सर, रहिमतखान वीर, दरबारा म्होरें[3], बांधून त्यासी आणला । दिलेरखान शिवाजीसी बोले, असें कसें झालें, लढाऊ हातीं आला ॥ रहिमतखानासी ह्माराज बोले तेव्हां, माझेपाशी रहावा, नाहीं तर जावा, पोचवितों विजापूरला । असें ह्मणतां रहिमतखान खुषी, धाडा बादशहापाशी, जाणें होय मजला ॥ रहिमतखान राजासी बोलतात, तुमच्या गोटांत, फितुर लोक आहेत, सांभाळून चाला । मला नांव सांगायचें नाहीं, ऐवढें अभयी, असावें मजला ॥ महाराज आले क्रोधाला, बोलवीलें फौजेला, फितुर कोणी केला, खरें सांगावें मजला । एकमेकांकडे पाहतात सार, इतक्यांत क्रोध ह्मोर, खुशाल मोऱ्याला ॥ चंद्रराव बोले ह्माराजासी, रघुनाथरावासी, विचारा त्यासी, मागुन कां आला । रघुनाथराव बोले त्या समयीं, माहीत मला नाहीं, फितुर तो कसला, ॥ चाल ॥ बघा वेळ आज आली कसली रघुनाथरावासी ॥ हो ॥ तलवार बहाद्दर असा वीर असुन विघ्न आलें त्यासी ॥ हो ॥ नाहीं केली शिवाजीनें त्याची अगदीं चौकशी ॥ हो ॥ दिलें हांकून शिवाजीनें मारुन इतक्या फौजेनिशी ॥ हो ॥ आंगभर लागले होते वार लढाईत त्यासी ॥ हो ॥ त्रासून फिरे जंगलांत अरण्यवासी ॥ हो ॥ फिरतां फिरतां डोंगरा-

१ पाहारे. २ रगडणारा, दाबणारा ३ पुढे हा चौक, १।२ प्रतींत नाहीं.

वर गेले एक देवीसी ॥ हो ॥ झाला व्याकूळ वाऱ्यानें पडला देवळा पाशीं ॥ हो ॥ आली बहिण रघुनाथरावाची ओळखिलें त्यासी ॥ हो ॥ ( चाल दुसरी ) ॥ जागा करून भावाला ह्मणे कां हो उदासी ॥ जीजी ॥ रामचंद्रराव झाला ह्मणे वाद्यां आह्मासी ॥ जी जी ॥ आली वेळ तर उगवीन त्याच्या सूडासी ॥ जी जी ॥ स्थिर करून हकीकत सांगे पुढली भावासी ॥ जी जी ॥ दिल्लीला जातील म्हाराज बिकट वेळ त्यांसी ॥ जी जी ॥ करा सांभाळ ह्माराजांचा साह्य होतिल तुह्मांसी ॥ जी जी ॥ बैरागी होऊन रघुनाथ होते जंगलवासी ॥ जी जी ॥ ह्माराज जातील दिल्लीला पुढें कथा खासी ॥ जी जी ॥ मिळ० ॥ असा लढाऊ शिवाजी मोठा ताठ । कुणाचा नाहीं काट, शत्रुची लावी वाट, पडल्या प्रसंगाला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥ २० ॥

बादशहाला वैभव कळले सार, व्हराडाची जहागीर, किताब दिला थोर, छत्रपती केलें । बादशहानीं, कपट करुनी, शिवाजी बोलवूनी, दिल्लीला नेलें ॥ शिवाजी आणि संभाजी, दत्तो आण्णाजी, संगे तानाजी, दिल्लीला गेले । कचेरींत केला अपमान, इमान बादशहान, अगदीं बुडवीलें ॥ अपमान केला शिवाजीचा, राग आला त्याचा, वेळ बिघडण्याचा, नाहीं कोणाला कळलें । क्रोधानें शिवाजी करी खटका, बिघडली घटका, बरें नाहीं झालें ॥ बादशहानें ठेविलें अटकेंत, अंधार कोठडींत, संभाजी होते तींत, वर्तमान पहिलें । शिवाजीनें आजार काढीला, ताप येतो मला, बादशहाला कळवीलें ॥ मोठमोठे हकीम धाडीले, औषध त्यासी दिलें, नाहीं घेतलें, बाजूवर वतलें[2] । अगदीं औषध कोणाचें घेईना, कोणाचें पीना, होणार तरी कसलें ॥ तानाजीची करणी अफाट, करुन त्यांनीं थाट, पालखी भुइ आठ, भेटायासाठीं आणले । हाकीमासारी लावली दाढी, जाण्याची युक्ति काढी, शिवाजी पाशीं गेले ॥ लेव दवा म्हणतो म्हाराजासी, म्हाराज रागासी,

१ शत्रू २ ओतून टाकलें.

येऊन हकीमासी, मारतो म्हणाले । हकीमाची दाढी धरली, भुसुक दिशी आली, तानाजी हंसले ॥ तानाजीची ओळख गावली, युक्ति त्यानें केली, लवे[1] च्या केल्या चाली, पेटारे आणले । मोठमोठ्या सरदारासनी, लवे वाटूनी, खुशी सर्व केले ॥ चाल ॥ आंत निजण्यासारे पेटारे त्यांनीं करवीले ॥ हो ॥ भवत्यानें पहारे अरबांचे हत्यारबंदवाले ॥ हो ॥ हरघडी येऊन पाहतात जागे केव्हां निजले॥ हो ॥ पेटाऱ्यांत घालुन शिवसंभाजी हद्दीपार केले॥ हो ॥ दत्तो अण्णा बंदोबस्ताला आंत राहीले ॥ हो ॥ चाल दुसरी ॥ दत्तो अण्णा बिछान्यावरति लोड निजवीत ॥ जी जी ॥ शुभ्र जरीचा शेला पांघरुन घालीत त्वरीत । जी जी ॥ दत्तो अण्णा आंत बैसले पाय चेपीत ॥ जी जी ॥ पहारेकऱ्यासीं दावली हुलकावणी काय हिकमत ॥ जी जी ॥ दिल्लीवाल्याच्या त्यांनी ठेविल्या तुरी हातांत ॥ जी जी ॥ ( चाल तिसरी ) [ रघुनाथरावापाशीं थोडीं । महाराज बसण्याचीं घोडीं । बघा युक्ती जाण्याची थोडी। शुभ वेळेस दिल्लीला सोडी । बादशाही स्वारीची आडवी आली घोडीं । रघुनाथराव छाति स्वारांची फोडी । ह्मणून शिवाजी कल्पना सोडी । रघुनाथरावाची झाली फार गोडी ॥ ] ( मिळवणी ) पहारेकऱ्याला आण्णा सांगतात, म्हाराज निजल्यात, आणतो इतक्यांत, औषध म्हाराजाला । महाशूर० ॥ २१ ॥

इकडे युक्ति तानाजी करी कशी, रघुनाथरावासी, धरुन घोड्यासी, उभा केला तेव्हां । बाण भाते लाऊन पाठीला, बंदोबस्त त्याला, आधींच होता ठावा ॥ गांवाबाहेर गेले घोड्यावर बसुन, आडविल स्वारान, रघुनाथरावान, मारिले त्यासि वहावा । रघुनाथरावासी वळखिले त्यानी, पूर्वीची करणी, मार्ग झाला ठावा ॥ धोरणानें एके ठायीं जमले, स्वरुप पालटलें, दिगांबर झाले, गोसावी बुवा । येतां येतां मथुरेस आले, संभाजी नीट ठेविले, स्वस्थ ह्मणे राहावा ॥ काशीनाथ कमावीसदार, सांगून त्यासी

---

1 भेट

फार, आदर उपचार, करुन त्यासी ठेवा। मानू नये त्यासी अगदीं परका, विसांवा राखा, प्राण समजावा॥ असें ह्मणुन गेल लवकरी, इकडे पाहारेकरी, बघत्यात गादीवरी, शिवाजी नाहीं तेव्हां। पहारेकऱ्यांची वाजली टांगें, निघून गेले वाघें, कोणासी नाहीं ठावा॥ बादशहानें सोडले स्वार, शिवाजीवर, धरल्याबरोबर, बक्षिसी करवा। पांच हजार रुपये त्याला द्यावे, असें कळवावे, जाऊनी गांवोगांवा॥ मग धांवणे आले मथुरेला, पाहिलें संभाजीला, कमावीसदाराला, आडविलें तेव्हां। तुमच्या घरीं राजाचें मूल, कांहो ठेवील, आणुन आह्मां द्यावा॥ चाल॥ काशीनाथपंत ह्मणे मुलगा आमच्या भावाचा॥ आआ॥ स्वार ह्मणती मुलगा खचित आहे राजाचा॥ आआ॥ काशीनाथपंत ह्मणे मी असत्य नाहीं बोलायचा॥ आआ॥ स्वार ह्मणती इनाम तुला देतो पांच हजाराचा॥ आआ॥ घे रुपये मुलगा दे तुझ्या काय कामाचा॥ आआ॥ (चाल दुसरी)॥ माझ्या भावाचा मुलगा मी काय तुह्माला देतो॥ जी जी॥ येका ताटीं जेवा दोघेजण मग आह्मी जातो॥ जी जी॥ एका ताटीं घेऊन शंभूला काशीनाथ जेवतो॥ जी जी॥ एक वचनी ब्राह्मण त्याची कीर्ति आह्मी वर्णीतो॥ जी जी॥ गेले दूत निघुन बादशहाचे स्वस्थ मग राहतो॥ जी जी॥ ॥ मिळवणी॥ सार्वभाम पृथ्वीपालक, छत्रपति ठीक, आह्मांसी काय दुःख, पुढ्यांत जेवण्याला॥ महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला॥ २२॥

ठेऊन संभूला अरण्यांत आले, वाघानें गांठलें, तरवार किंवा भाले, नव्हते कवणाला। लहानें मारले वाघासी, शिवाजी राजासी, पंजा लागला॥ पंजानें शिवाजी आजारी, वेळ नसे बरी, मुरशेदाबादेवरी, आले वाटेला। विनायकें गरीब ब्राह्मण, त्यांच्या घरीं नेऊन, सांगिती सार त्याला॥ आमचा आजारी असु द्या तुमच्या घरीं, सांभाळा ह्मणती सारी, विनायकदेव करी, मान्य शब्दाला।

---

१ विश्वास २ फजेती झाली. ३ शिवाजी. ४ प्रस्ताव कलम १४ पहा.

सारे निघुन दक्षिणेस आले, दत्तो अण्णा बोले, तानाजी मालुसऱ्याला ॥ तुह्मी आसपास रहावें राजाकरितां, करावी व्यवस्था, सोडून कसे येतां, तुह्मी राजाला। विनायकदेव ब्राह्मण, भिक्षा मागुन, सांभाळी ह्माराजाला ॥ एके दिवशीं भिक्षा मिळाली नाहीं, करुनी थोडी सोई, आणून राजापायीं, वाढीता झाला। ब्राह्मणास उरलें कांहीं नाहीं, उपाशी त्या समयीं, रहाण्याचा वेळ आला ॥ मायलेकरें उपाशी दोघेजण, बाणीसी राखुन, शिवाजीनें मन, पाहुन गप राहिला। कोमवली[1] मुखें कां तुमचीं, गरीब ब्राह्मणांची, शिवाजी पहातो त्याला ॥ चाल ॥ विनायक देवासी शिवाजी काय बोलला। आआ ॥ कोमवली तोंडें कां तुमची सांगावे मजला। आआ ॥ शिवाजीनें मनामधें विचार आपल्या केला। आआ ॥ त्यांनीं चिठी लिहुन दिली गांवच्या कोतवालाला। आआ ॥ पांच हजार रुपये द्यावे ह्यासी गावतो[2] मग तुजला। आआ ॥ विनायकदेवापासी दिली चिठी कोतवालाला। आआ ॥ चिठी कशाची माहीत नाहीं विनायकदेवाला। आआ॥ चाल दुसरी ॥ कोतवालापाशीं देतो चिठी विनायकदेव। जी जी ॥ कोतवाल ह्मणे देवासी ह्माराज दावा। जी जी ॥ घाबरला विनायकदेव ह्मणे नाहीं ठावा। जी जी ॥ पांच हजार पाठविले घरी पाहावा। जी जी ॥ विनायक देवाचें घरी तेंव्हां झालं ठाव। जी जी ॥ कोतवालानें धरुन मग नेले शिवाजीराव। जी जी ॥ ॥ चाल तिसरी ॥ [ विनायक देव गरीब ब्राह्मण। त्याच्या अंगीं नवते मीपण। शिवाजीनें पाहुनी मन। त्यासी द्यावे वाटलें धन। त्याची कीर्ति वर्णीती जन। तेंच पुढें गावें आपण। तानाजीला पडलें स्वप्न। शिवाजीला केलें बंधन ] ॥ मिळवणी ॥ कैद करून शिवाजीसी ठेविले, तानाजीस कळलें, तानाजी मग आले, विचारी देवाला। महशूर तीन ताळांत० ॥ २३ ॥ ध्रु० ॥

ह्मणे तानाजी देवासी त्यावेळीं, शक्तिवान वळी, गांवांत कोण टोळी, सामील कर त्याला। आहेत रुपये देऊ या त्यांसी, खेळे[3]

---

१ कोमेजली. २ सांपडतो. ३ पहिलवान, कुस्ती खेळणारे.

लोकांसी; बसवू वाटेला ॥ नेण्याचा बेत त्याचा पाही, कोणते समयीं, कळायाचा नाहीं, आधीं कवणाला । यासाठीं बसावें गांडून, आणू सोडून, मारू सर्वाला ॥ पुढें गांवातील सारे मिळुन खिंडीत जाऊन, मारीती साऱ्याला । कोतवालासी तानाजी मारतांना, शिवाजी राजान, सोडून दिला त्याला ॥ शिवाजीचा किल्ला राजधानी, घेऊन मोंगलांनीं, सर करूनी, बावटा जडवीला । किल्ले सोडवितांना पहा स्पष्ट, पडले बहु कष्ट, शिवाजीराजाला ॥ शिवाजीसी जिजाबाई बोले, मित्र तुझे कसले, शिवाजी मग बोले, जीजाबाईला । नका करूं असा तुह्मी अर्थ, होईल अनर्थ, एखादे वेळेला[1] ॥ झाले तर पाहीन त्या सार, आणा माझ्या म्होर, पहाते सत्वर, शब्द असा केला । असें ह्मणतां तानाजी कड, शिपाई निर्भीड, गेले बोलवायाला ॥चाल॥ तानाजीनें धरल्या मुलग्याच्या अक्षता ॥आआ॥ ब्राह्मणासी ह्मणे तानाजी राहुंद्या आतां ॥आआ॥ महाराजासी भेटून मग लावूं लग्न तत्वता ॥ आआ ॥ असें सांगुन गेले तानाजी शिवाजीराजा करितां ॥ आआ ॥ भेटले जिजाबाईसी तानाजी ह्या वक्ता ॥ जीजी ॥ चाल ॥ त्या शिवाय मित्र आले भेटाया जिजाबाईला ॥आआ॥ येसाजी आणिक तानाजी सूर्याजी आला ॥ जीजी ॥ गणोजी भिवाजी कोंडजी त्रिंबक बाजी भेला ॥ जीजी ॥ कोंडाजी दत्ताजी भिवाजी मुदाजी भला ॥ जीजी ॥ विठूजी हिरोजी आवजी नागोजी आला ॥ जीजी ॥ म्हादजी येसाजी बाळाजी सोनदेव भला ॥जीजी॥ चांगोजी ताना सावंत मुदोजी मतवाला ॥ जीजी ॥ कृष्णाजी कल्लाजी विराजी रायाजी वायेला ॥ जीजी ॥ पिराजी तुकोजी माजी रामदेवाला ॥ जीजी ॥ तानदेव अण्णाजी जनोजी चिमणाजीपंत मेला ॥ जीजी ॥ मिळवणी ॥ कारकून मंडळ अष्टप्रधान, मोरोजी मुख्य जाण, दत्ताजी त्रिंबक जाण, अण्णाजी दत्तू रंगलां[2] ॥ महशूर० ॥ १४ ॥

नारू निळकंठराव, त्यांत छान, रामचंद्राचा मान, मुजुमदार तया समयाला । निराजी रावजी न्यायाधीश, बहिरोजी मोहिते

१ वेळेला २ शेवटचा निम्मा चौक १।२ प्रतींत नाहीं.

खास, त्रिंबक सुमंताला ॥ बाळाजी प्रभू चिटणीस, रघुनाथ पंडीत खास, त्रिंबक विठ्ठलास, खजानीस केला । निळकंठ प्रभू पारसनीस, महादाजी धैर्यास, विद्वान गणेशाला ॥ चंद्रोजी नारायण कृष्णा भैरव, बापूजी पुढें नांव, रामजी भास्कर ठाव, तेव्हां सरवाला । रायाजी आणि जनार्दन, चंद्रोजी ब्रीद जाण, कृष्णाजी ह्मणे ज्याला ॥ राघोबल्लाळ, नागोजीपंत, रायाजी प्रभु स्वस्थ, दादोजी नांवाला । पहाड किल्ले दोनशें चाळीस, जंजीरे तेरा खास, प्रकार सांगायाला ॥ भुइकोट एकशें आठ, नांव अफाट, न्यारे न्यारे घाट, सांगाया वाढला पल्ला । यासाठीं नांवें कमी केली, कवीच्या अशा चाली, प्रकार बोलण्याला ॥ चाल ॥ ही मंडळी शिवाजीसंग एक चित्तान ॥ हो ॥ देशोदेशीची लूट करुन आणिले त्यांनीं सोन ॥ हो ॥ किती तऱ्हेच्या खुणा सांगतो सत्य हें जाण ॥ हो ॥ देवराई[1] जड मोल तीन लक्ष होन ॥हो॥ धारवाडी कावेरी सीक्या घाटाचा मान ॥ हो ॥ पाकनाई आदवनी उती नहीं जाण ॥ हो ॥ ताडपत्री सादे सोजार नाणें आर्धीं घेईन ॥ हो ॥ किती नाणें होणाजीनें[2] त्याच मान ॥ हो ॥चाल दुसरी॥ आपरजीत आणि भीमरी भीसुरीन ॥ जी ॥ चंद्रावरी बिलवरी हुरमुजी म्होर सांगेन ॥ जी जी ॥ हमंतशाई आणिक महदशाई येळरी कठीण ॥ जी जी ॥ व्यंकट शाई आणिक बुटेदारी साहा देशी घेईन ॥ जी जी ॥ रुपयाचे नाणे प्रकार बघुन वाटेन ॥ जी जी ॥ कबद कवल शाकी बेदर वादी सजीन ॥ जी जी ॥ तऱ्हेदार हार बात पंजे रंगी वळवीन ॥ जी जी ॥ कापडी ठीगळी पनाळी रुपये बघुन वाटीन ॥ जी जी ॥ घडोघडी शिवाय धान्याची बाकी दाखविन ॥ जी जी ॥ जवाहीर दागदागीनें आणि गणीत सांगीन ॥ जी जी ॥ मिळवणी ॥ अशी निजामशाहीची लूट केली, मोंगल किती मेले, पळून किती गेले, देशोदेशाला[3] ॥ महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ २५

एका जीवाचे होते सारे लोक, बोले बिनधोक, लढाऊ मोठे

---

१ हीं सर्व नाण्याची नांवें आहेत. २ होनाहून. ३ हा चौक १।२ प्रतींत नाहीं.

चोख, रणीं लढण्याला। वाघाशी लाविती दौड, शत्रुवर धाड, सदा घालण्याला ॥ जिजाबाईनें बोलविले सार, झाडा सरदार, बोलणें मनोहर, दत्तो अण्णाला। तुह्मी जाऊन संभाजीला आणा, इकडे सारी सैना, जाऊं द्या लढण्याला ॥ दत्तो अण्णा जाऊन मथुरेसी, कमाविसदारासी, मानपत्र त्यासी, दाखवीता झाला। संभाजी संगे कमाविसदार आले, काम त्यासी दिलें, पागेचे राहण्याला ॥ सर्व सरदारांनी घेऊनी फौजा, करुं लागे मौजा, जाऊनीया सहजा, मारीती शत्रूला। तीनशें साठ किल्ले जिंकीले, असे वीर पाहिले, भय नाहीं त्याला ॥ कैक लोकांची केली धुळधाणी, किल्ले टाकूनी, जीव बचाऊनी, शरण शिवाजीला। जिवदान देऊन सोडले, आपलेसे केले, सर्व लोकांला ॥ चाल ॥ मारमारुन उडविला धुरळा मोंगल लोकांचा ॥ आ आ ॥ साऱ्या गडावरती लूट केली खजिना बादशहाचा ॥ आ आ ॥ पुन्हां सरंजाम शिवाजीनें केला धान्याचा ॥ आ आ ॥ काढी गडावर विहिरी आड पुष्कळ पाण्याचा ॥ आ आ ॥ जिजाबाईला वर्दी अशी कळली शब्द आनंदाचा[1] ॥ आ आ ॥ तानाजीला हुकूम दिला जिजाबाईनें लढण्याचा ॥ आ आ ॥ चाल दुसरी ॥ जिजाबाई ह्मणे कोंडण्यावर जाऊन करा हल्ला ॥ जी जी ॥ किल्ला घेऊन मज यावें सांगायाला ॥ जी जी ॥ तानाजी आणि सूर्याजी उभे शब्दाला ॥ जी जी ॥ शेलारमामा तीनशे मावळे घेऊन निघाला ॥ जी जी ॥ गेले किल्ल्याच्या तळावर विचार काढला ॥ जी जी ॥ घोरपडीला लावून साखळदंड लावल्या बुरुजाला ॥ जी जी ॥ साखळदंडावरन जाऊन लोकांनीं किल्ला वेढीला ॥ जी जी ॥ चाल तिसरी ॥ [तान्हाजी वीरांमध्यें राव। शत्रूवर मारतो घाव ॥ आधी साधोनी आपला डाव। चौमुलखीं केलें त्यानें नाव ॥ संगे बंधू सूर्याजीराव। वाघासी लावणार दावें[2] ॥ शेलारमामा ह्मणे युक्तीनें जावं। किल्ला घेऊन परत मग याव ] ॥ मिळवणी ॥ किल्ल्याला मेखा मारून, वर जाऊन, घेती दोंदून,

१ या चौकाचा पहिला अर्धाभाग ११२ प्रतींत नाहीं. पुढील भाग त्या प्रतींत २३ व्या चौकांत आहे २ दावें ( गुरें बांधण्याचें. )

तळच्या लोकांला ॥ महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ २६ ॥

उदेभान मोंगलाला किल्ला, बादशहाने दिला, ह्मणून राहीला, होता किल्ल्यावरता। शेलारमामा बंधू सूर्याजी, आणि तानाजी, हत्यारबंद सवतां। या तिघांनी विचार केला आधीं, तानाजी झाला मधीं, बघा खोल बुद्धी, लढण्याचा रस्ता। शेलारमामा उजव्या बाजूवर झाला, डाव्या बाजूला, सूर्याजी होता ॥ मघल्या बाजूने तानाजी शिरे, मुडद्याचा थर, लावले एक सारे, लढाऊ असा पुरता। लाखों मोंगल लढून ढिले केले, थोटे लंगडे झाले, पळाय नाहीं रस्ता ॥ चकचकों उडवितो शिरें, बिजलीसारी फिरे, तशीच तलवार, सफय वार करता। शिद्दी गडबडून वाड्यांत उठला, लढाऊ त्यांनीं पाहिला, तानाजी पुरता ॥ शिद्दीला बिब्यों होत्या बारा, उडीवल्या साऱ्या, कापी चरचरा, कशाला ह्मणे राहतां। शिद्दी क्रोधानें आला समोर, तानाजी उडवी शीर, स्वर्गाचा दावी रस्ता ॥ चाल ॥ उदेभान अठरा बायकांसी उडवी तया समया ॥ आ आ ॥ हक्क मरना खुदाकेवास्ते गलीम देखो आया ॥ आ आ ॥ तेल ओतून पेटविली गादी पोत केलाया ॥ आ आ ॥ आपटा पोत घेऊन या मारी उडी त्या समया ॥ आ आ ॥ केला सामना येऊन तानाजीच्या लागे चमकाया ॥ आ आ ॥ असा विरळा हो विरळा वीर आतांच्या समया ॥ आ आ ॥ स्वर्गीचे देव पाहतात येऊन त्या ठाया ॥ आ आ ॥ चाल दुसरी ॥ दोघांसी पडला प्रसंग सांभाळती वार ॥ जी जी ॥ स्वर्गाचे देव पाहतात असे वाघ रणशूर ॥ जी जी ॥ दोघे वीर न्हाले रक्तानें वार अंगावर ॥ जी जी ॥ दोघांचे सफय एक वार जानव्यावर ॥ जी जी ॥ पुष्पवृष्टी केली देवांनीं दोघांच्यावर ॥ जी जी ॥ कीर्तीचा वाजला डंका दोघांचा फार ॥ जी जी ॥ चाल तिसरी [ सुरवर पहाती अंबरीं । विमानीं

१ स्वत , जातीनें. २ शिरे. ३ सारखे. ४ कचाकच ५ मुंडकी ६ बायका. ७ डाव्या खाद्यावरून तिरका उजवे आगास निघणारा वार, यास जानव्याचा वार ह्मणतात.

वेढली नगरी । जयजयकार झाला देवद्वारी । आनंदाच्या उठल्या लहरी । अशा वीरांच्या कीर्ति दूरवरी । देवलोकीं मान बरोबरी । वीरवृत्ति हरवल्या परी । दोघांचीं प्रेतें एकसारी ॥] मिळवणी दोघांची कुळें उद्धारती, सायोज्यता मुक्ति, अशी झाली कीर्ती, देवलोकाला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥२७॥

दोही हातीं पट्टे चढवीले, सूर्याजी आले, मारुं लागले, इतक्या सैन्याला । केली कत्तल साऱ्या लोकांची, मजा तेव्हांची, फार बघण्याला ॥ सूर्याजी रणाचे शूर, कैकांचीं शिर, थडकें वरच्यावर, एकमेकांला । शिरांचे करुनियां चेंडू, पट्यांचे दांडू, लागे खेळण्याला ॥ असे मारीत आला तो डावा, शेलारमामा उजवा, मोंगलांचा दिवा, सारा मावळला । दुहींबाजूची कत्तल करून सार, आले वाड्या म्होर, बघती तानाजीला ॥ उदेभानाचे झाले दोन भाग, तानाजी त्या संग, असा प्रसंग, कसा गुदरला । पुण्याई सबळ दोघांची, एका पिंडाची, वाटते मजला ॥ तानाजींचें प्रेत लपटिलें, पालखींत बसविले, खालीं पोचवीलें, शिवाजीच्या सदरेला । उदेभानाचा झाला सुखसोहळा, आली देवकळा, दोघां पुरुषांला ॥ जिते मेले वीर पाहिले, थोटे लंगडे झाले, मोंगल पळाले, थारा नाहीं त्यांला। साऱ्या चौक्यांची बंदोबस्ती केली, ढाल उभी केली, धाक बादशहाला ॥ मोंगलांचे केलें निर्मूळ, उपटलें मूळ, रडती बुळबुळ, अलाबिदा बोला । सर करुन आले किल्ल्यासी, जिजाबाईसी, वर्तमान कळला ॥ चाल ॥ तानाजीचें जानवें गेलें कळले शिवाजीला ॥ आआ ॥ मांडलें दुःख सदरेसी धरुन प्रेताला ॥ आआ ॥ सिंह जाऊन दगड आले पदरीं अशा समयाला ॥ आआ ॥ जिजाबाईसी शिवाजी बोले घात माझा झाला ॥ आआ ॥ गेली उजवी बाजू माझा हात एक मोडला ॥ आआ ॥ माझ्यासंगें कष्ट फार पडले होते तानाजीला ॥ आआ ॥ चाल दुसरी ॥ त्याच्या मुलग्यासी

---

१ सूर्याजीची चपळाई वर्णितात. एक शिर कापल्यावर तें खालीं पडण्याचे अगोदर दुसरें उडून त्यावर आपटे २ निशाण, झेंडा.

आणून सरनोबती वस्त्रे करवीली ॥ जी जी ॥ सरनोबत तेव्हांपासून स्वाधीन त्याच्या केली ॥ जी जी ॥ अशा वीरांची कीर्ती गातांना विघ्नें पळाली ॥ जी जी ॥ शीर धरून तळहातावर नोकरी केली ॥ जी जी ॥ नाचली धडें रणीं समशेर गाजविली ॥ जी जी ॥ लहान थोर ओवी गातात अशी कीर्ति झाली ॥ जी जी ॥ मिळ० ॥ धन्य धन्य तानाजीराव, जगीं झालें नांव, देवापदीं ठाव, मिळाला दोघांना ॥ महशूर तीन ताळ्यात, नऊ खंडांत त्यांचा बोलवाला ॥२८॥

किती एक बादशहाचे सरदार, मारीले वरच्यावर, नाहीं सुमार, गणीत करण्याला । असें वर्णन करितां सारें[1], वाढल मजकूर, ह्मणून कमी केला ॥ पुढें रायगडावरी ठीक, राज्याभिषेक, पाहिली वेळ चोख, गादीवर बसण्याला । शके १५९३ सालीं, ज्येष्ठ शुद्धांतली, त्रयोदशीला ॥ राम गेले होते वनवासास, चौदा वरसास, आले अयोध्येस, गादीवर बसण्याला । तशी संधि साधली शिवाजीन, शत्रू मारून, यशवंत झाला ॥ रामा सारे[2] मंडप शृंगारी, गुढ्या उभारी, गाती नर नारी, ओव्या राजाला। दक्षिणेचं राखिलें पाणी, शिवाजीपासूनी, धर्म वाढला ॥ होम हवन यज्ञमंडपांत, ब्राह्मण करितात, आहुति हातांत, यज्ञसमयाला । घृत दुग्धाची सोडतां धार, मंत्र उच्चार, विजय राजाला ॥ पट्टाभिषेक झाला शिवाजीला, गोब्राह्मणाला, आनंद बहु झाला, स्वर्गी देवांला । धुमधुमी[3] वाजे तिन्ही लोकीं, शिवाजी झाले सुखी, मारून यवनाला ॥ चाल ॥ गागाभट्टानें केला अभिषेक शिवाजी राजावर ॥ तुळादान केलें राजानें सुवर्णासारं[4] ॥ ब्रह्मवृंदासी देति दक्षणा उघडि भांडार ॥ कावडे आले काशीचे कावड खांद्यावर ॥ गर्जति ब्राह्मण वारंवार वेद उच्चार ॥ चाल दुसरी ॥ वाढीलें सर्व ब्राह्मणांसी इच्छाभोजन ॥ ॥ जी ॥ जसें सांगावें तसें करतात गोडें पक्वान्न ॥ जी ॥ घातले यज्ञभोजन धर्मराजान ॥ जी ॥ आलें सुख तया भोजनासी देवकृपेन ॥ जी ॥ वाजला घंटा स्वर्गास सुखी देवगण ॥ जी ॥

---

१ सगळें. २ सारखे. ३ दुंदुभी. ४ सोन्याबरोबर

।। चाल तिसरी ।। [ शिव सांब शिवाची मूर्ति । शत्रूवर चाल असे पुरती ।। हिंदुपद मिळविली कीर्ति । आनंदाची सागरीं भरती ।। मंत्री चोख सारीं कामें करिती । बसविली मराठी धर्ती ।। ]
।। मिळवणी ।। असे केलें शिवाजीराजान, यज्ञभोजन, अभिषेक करून नेमिती मंत्र्यांला ।। मह्शूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ।। १९ ।। ध्रु० ।।

अष्ट प्रधानांची केली नेमणूक, राज्यावर ठीक, ज्याचे त्याला हक्क, अष्टप्रधानांला । पेशवे दिवाण पुढें उभा, राज्याला शोभा, काम बघण्याला ।। मुख्य कामें सारीं त्याच्याकडे, प्रताप मोठा चढे, नाहीं त्याच्या पुढें, इलाज कवणाला ।। पंत अमात्य जमाबंदीवर, दौलतकारभार, खचित बघण्याला ।। सरलं उरलं पुरलं केव्हां काय ठरलं, लोक आलं गेलं, नाण नगदी दिलं, वर शिक्का केला । पंत सचिव चारी दप्तर, सही त्याच्यावर, नेमला करण्याला ।। खासगी व्यवस्था मंत्रि करणार, घरचा व्यवहार, बघणें आहे फार, बारीक कामाला ।। लेणें नेसणें डागडागीने, द्यावें घ्यावें त्यानें, राजेलोकांला ।। सेनापती साऱ्या सेनेवर, कारखाने एकंदर, त्याचा मुखत्यार, स्वतः बघा करण्याला । हुकूम देणे, शिपाई ठेवणे, आणखी सोडणें, अधिकार त्याला ।। चाल ।। पंत सुमंत कुशल करी काम फार युक्तीन ।। अअ ।। परदळाची वकिली करणें शिफारस शक्तीन ।। अअ ।। राज्याचा ठेऊन अभिमान बोले अगतीन ।। अअ ।। परचक्र आलें तरी दूर करी युक्तिन ।। ।। अअ ।। असे सुमंत करी राज्यसेवा मोठ्या अगतीन ।। अअ ।।
।। चाल दुसरी ।। न्यायाधिशानें न्याय करावा सर्व प्रजेचा ।। जी ।। मुलकी फौजदारी कामदारां धाक असे त्याचा ।। जी जी ।। पंडितरावानें शास्त्र सांगावें ग्रंथ आधारानें ।। जी ।। ग्रंथ आधारानें भाषण बोध राजाला करणें ।। जी ।। चाल तिसरी ।। [ छत्रपतीनें बघुनि एकभाव, आणला विनायकदेव, या सोडून ह्मणे तुमचा गांव, आतां स्वस्थ माझ्यापाशीं राहावें । इच्छाभोजन

नित्य तुह्मी ध्यावें, स्थितिनें काम कांहीं पहावें, समजुनी मनाला घ्यावें ] ॥ मिळवणी ॥ विनायक देवास केला खजानीस, इमान पहा कसें, धर्मी राजास, कमी काय त्याला । महशूर ॥ ३० ॥ ध्रु ॥

राज्यव्यवस्था लागली सारी, निघाली स्वारी, रायगडावरी, भवानी मायेला । अष्ट मोर्चेल सूर्यपान, प्रधान भोंवत्यान, शिवबा राजाला ॥ शिवाजीसी वाटलें असे पहावा, भावार्थ समजावा, गुरु करावा, तुकारामाला । देविनें दृष्टांत दाविले, स्वामी गुरु पहिले, भजावें त्याला ॥ कर्नाटकांत व्यंकोजीराज, जमविली त्यान फौज, शिवाजीला समज, पुंडावा झाला । शिवाजीनें कुरु-नीयां स्वारी, व्यंकोजीवरी, पराभव केला ॥ फौजेची झाली दाणादाण, पळतां हैराण, व्यंकोजी राजान, विचार मनिं केला । झाली ती गोष्ट झाली बरी, स्वस्थ रहावें घरीं, जाऊं नये युद्धाला ॥ जय आले शिवाजी राजासी, सर्व ठिकाणासी, सांगून सर्वांसी, लावले व्यवस्थेला । रायगडावर फिरुनिया आले, स्वस्थ राहीले, शांति फौजेला ॥ धर्मराजा[1] सारी प्रजा सर्व राखी, रयतेला सुखी, कदा ना दुःखी, पीडा ना राज्याला । सुख शांतीनें नांदते प्रजा, धन्य शिवाजी राजा, प्रताप त्याचा कसला[2] ॥ त्यांत आजार गुडघीचा झाला, शिवाजी राजाला, विपरित काळ आला, तया समयाला । शके सोळाशें दोन वर्षांत, चैत्र शुद्धांत, पहा चतुर्द-शीला ॥ [ चाल ] ॥ सहा जणी स्त्रिया लग्नाच्या शिवाजी राजाला । आ ॥ दोन मुलगे शिवाजीराजासी राज्य करण्याला ॥ आ ॥ सईबाई निंबाळकराची संभाजी तिजला । आ ॥ शक्तिवान मोठा भारी धाक त्याप्राला । आ ॥ घरी जाऊन जित्या वाघासी भय नाहीं त्याला । आ ॥ [चाल दुसरी] ॥ सोयराबाई मोहित्याची राजा-राम मुलगा । जी जी ॥ राज्यनीति बघुनीया सारी संभाळी प्रसंगा । जी जी ॥ प्रजेचा करी सांभाळ मनाच्या जोगा । जी जी ॥ राज्यातील वैभव सर्व सांभाळी नीगा । जी जी ॥ राम लक्ष्मणाच्या

---

१ धर्मराजासारखी २ या पुढील हकीकत १।२ प्रतीत नाही.

सारी शोभा आली त्या दोघां । जी जी ॥ मिळवणी० ॥ या परी शिवाजी महाराज, करीत असे राज्य, रयतेची मौज, आनंद सर्वांला ॥ महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलचाला ॥३१॥

शिवाजी असताना ज्या व्यंकोजीचा, राज्य करण्याचा, इरादा होता त्याचा, येऊन दक्षिणेला । शिवाजीने लाविले निसा, तुझा ह्मणे हिस्सा, आह्माकडे कसला ॥ व्यंकोजीला तंजावरास, पोचविलें खास, सर्वा निजध्यास, मनामधिं बसला । व्यंकोजीची धिटाई फार, होती वारंवार, बेत बरा बसला ॥ पोचाविलें त्यासी नेऊन कोणी, मनुष्यें होतीं जुनी, अगत्य करूनी, प्रकार पहावा असला । पोचविणार रुपाजी भोसले, मानसिंगराव मोरे गेले, त्यासी पोचवायाला ॥ रंगनाथराव केळवलकर, त्यांनीं लष्कर, लाऊन दिलें सार, कज्जा नाहीं पुसला । पुढारी त्यानें सांगून पाठविलें, व्यवस्थेला लावलें, माणुस होता असला ॥ शामजी नाइक कान्हेरपंत, राज्याला करी स्वस्थ, महाराज बोले परत, माणुस तो तसला । परस्परांनीं समाधान व्हावें, आहे तें वाटून घ्यावें, रानांत कां घुसलां ॥ चाल ॥ किती वेळां पाठविलें त्यांना असें सांगून ॥ अ अ ॥ व्यंकोजीराजे बोलतात परत डागून ॥ अ अ ॥ मनासी शांति झाली कां नाहीं राज्य भोगून ॥ अ अ ॥ बोलीचा शिवाजीस चटका गेला लागून ॥ अ अ ॥ चाल दुसरी ॥ व्यंकोजीराजे आले तेव्हां मी पणाला ॥ जी ॥ शिवाजीनें विचार तेव्हां केला आपल्या चित्ताला ॥ जी ॥ कौरव पांडव मुकले प्राणासी अशा वादाला ॥ जी जी ॥ विचारानें घेऊ काढून असा ह्मणाला ॥ जी ॥ [ चाल तिसरी ] ॥ [ पुढें शिवाजी गेले यात्रेसी ॥ हो ॥ त्रिवेणीच्या तीर्थासी ॥ जी ॥ कावेरी तीरीं गोष्ट झाली खासी ॥ जाऊन बसले एकांतासी । रघुनाथ ह्मणे महाराजासी ॥ हो ॥ बसा जरा देवीच्या ध्यानासी ॥ जी ॥ आराधना करून देवि अंबेसी ॥ हो ॥ बोलविले स्वतः राजासी ॥ जी ] ॥ मिळ० ॥ देवी संचारी शिवाजीचे अंगीं, वर्तमान सांगी, तिथून पुढच्या भागीं,

कळावें सर्वांला । महशूर तीन ताळांत, नऊ खडांत, त्यांचा बोल वाला ॥ ३२ ॥

रघुनाथपंत बोलले, देवीसी विचारिलें, राज्य हें आपलें, कसें चालणार । सन शालीवाहन पंध्राशें पंचाण्णऊ, आधार खरा दाऊ, जगासी वारंवार ॥ प्रमादी नाम संवत्सरे, होता भौमवार, एकंदर सार, काढला वीचार । चैत्र बहुला त्रयोदशी, बोले विधीनिशी, भवानी सार ॥ बाळाजी आवजी चिटणीस, शिवाय वाकनीस, बघुन यादीस, लिहून ठेवलें सारं[1] । इथून राज्य ताम्र होणार, रायगड जाणार, संभाजीस मारणार ॥ धरून नेतील, फार छळतील, अखेर मारतील, होईल हाहाकार । शिवनामें होईल पुढें राजा, फडकवील ध्वजा, दिल्ली करील सर ॥ राजाराम तंजावरास, राज्य करील खास, सुख प्रजेस, विसावा फार । दोहीं राज्यें प्राप्त होतील, राज्य करतील, मराठीं सार ॥ चाल ॥ भोसले राज्याची सत्तावीस पिढ्या चालतील पावा ॥ हजार वर्षें शक चालेल त्याच्या नांवा ॥ पूर्वीची पुण्याई शिवाजीची पावा ॥ सत्तावीस कावडी काशीच्या नेल्या रामेश्वर देवा ॥ सत्तावीस जन्मीं अर्पीसी शिरकमल भवानीस तेव्हां ॥ आ आ ॥ चाल ॥ त्या पुण्यें करून शिवाजीला राज्य मिळालें ॥ जी जी ॥ सत्ताविसी पीढीचें राज्य वाक्य असें झालें ॥ जी जी ॥ सत्ताविसावा गर्भ अंध होईल ऐका असें चांगलें ॥ जी जी ॥ त्यापासून भय राजाला होईल ह्मणाले ॥ जी जी ॥ हें दाऊन गुप्त महाराजाला लिहिणें छपवीलें ॥ जी जी ॥ चाल दुसरी ॥ असा वर भवानीमायेचा ॥ हो ॥ भोसलेराज्य राहण्याचा ॥ जी जी ॥ जगीं विसावा त्यांच्या पायाचा ॥ हो ॥ भगवा झेंडा जगीं फिरण्याचा ॥ जी जी ॥ जगीं विसावा शिवाजीचा ॥ हो ॥ छत्रपती शिवाजीच्या नांवाचा ॥ जी जी ॥ लागला थारा यवनाचा हो । डंका शिवाजीच्या नांवाचा ॥ जी ॥ साधू सत्तावीस जन्माचा ॥ हो ॥ असा तपी नाहीं होण्याचा ॥ जी ॥ मिळ० ॥

---

१ सगळे.

सारी शोभा आली त्या दोघां । जी जी ॥ मिळवणी० ॥ या परी शिवाजी महाराज, करीत असे राज्य, रयतेची मौज, आनंद सर्वांला ॥ महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥३१॥

शिवाजी असताना ज्या व्यंकोजीचा, राज्य करण्याचा, इरादा होता त्याचा, येऊन दक्षिणेला । शिवाजीनें लाविले निसा, तुझा ह्मणे हिस्सा, आह्माकडे कसला ॥ व्यंकोजीला तंजावरास, पोचविलें खास, सर्वा निजध्यास, मनामधिं बसला । व्यंकोजीची धिटाई फार, होती वारंवार, बेत वरा बसला ॥ पोचविलें त्यासी नेऊन कोणी, मनुष्यें होतीं जुनी, अगत्य करूनी, प्रकार पहावा असला । पोचविणार रुपाजी भोसले, मानसिंगराव मोरे गेले, त्यासी पोचवायाला ॥ रंगनाथराव केळवलकर, त्यांनीं लष्कर. लाऊन दिलें सार, कज्जा नाहीं पुसला । पुढारी त्यानें सांगून पाठविलें, व्यवस्थेला लावलें, माणुस होता असला ॥ शामजी नाइक कान्हेरपंत, राज्याला करी स्वस्थ, महाराज बोले परत, माणुस तो तसला । परस्परांनीं समाधान व्हावें, आहे तें वाटून घ्यावें, रानांत कां घुसलां ॥ चाल ॥ किती वेळां पाठविलें त्यांना असें सांगून ॥ अ अ ॥ व्यंकोजीराजे बोलतात परत डागून ॥ अ अ ॥ मनासी शांति झाली कां नाहीं राज्य भोगून ॥ अ अ ॥ बोलीचा शिवाजीस चटका गेला लागून ॥ अ अ ॥ चाल दुसरी ॥ व्यंकोजीराजे आले तेव्हां मी पणाला ॥ जी ॥ शिवाजीनें विचार तेव्हां केला आपल्या चित्ताला ॥ जी ॥ कौरव पांडव मुकले प्राणासी अशा वादाला ॥ जी जी ॥ विचारानें घेऊ काढून असा ह्मणाला ॥ जी ॥ [ चाल तिसरी ] ॥ [ पुढें शिवाजी गेले यात्रेसी ॥ हो ॥ त्रिवेणीच्या तीर्थासी ॥ जी ॥ कावेरी तीरीं गोष्ट झाली खासी ॥ जाऊन बसले एकांतासी । रघुनाथ ह्मणे महाराजासी ॥ हो ॥ बसा जरा देवीच्या ध्यानासी ॥ जी ॥ आराधना करून देवि अंबेसी ॥ हो ॥ बोलविले स्वतः राजासी ॥ जी ] ॥ मिळ० ॥ देवी संचारी शिवाजीचे अंगीं, वर्तमान सांगी, तिथून पुढच्या भागीं,

कळावे सर्वाला । महशूर तीन ताळांत, नऊ खडांत, त्यांचा बोल वाला ॥ ३२ ॥

रघुनाथपंत बोलले, देवीसी विचारिलें, राज्य हें आपलें, कसें चालणार । सन शालीवाहन पंध्राशें पंचाण्णऊ, आधार खरा दाऊ, जगासी वारंवार ॥ प्रमादी नाम संवत्सरे, होता भौमवार, एकंदर सार, काढला वीचार । चैत्र बहुला त्रयोदशी, बोले विधीनिशी, भवानी सार ॥ बाळाजी आवजी चिटणीस, शिवाय वाकनीस, बघुन यादीस, लिहून ठेवलें सारें[1] । इथून राज्य ताम्र होणार, रायगड जाणार, संभाजीस मारणार ॥ धरून नेतील, फार छळतील, अखेर मारतील, होईल हाहाकार । शिवनामें होईल पुढें राजा, फडकवील ध्वजा, दिल्ली करील सर ॥ राजाराम तंजावरास, राज्य करील खास, सुख प्रजेस, विसावा फार । दोहीं राज्यें प्राप्त होतील, राज्य करतील, मराठीं सार ॥ चाल ॥ भोसले राज्याची सत्तावीस पिढ्या चालतील पावा ॥ हजार वर्षें शक चालेल त्याच्या नांवा ॥ पूर्वीची पुण्याई शिवाजीची पावा ॥ सत्तावीस कावडी काशीच्या नेल्या रामेश्वर देवा ॥ सत्तावीस जन्मीं अर्पीसी शिरकमल भवानीस तेव्हां ॥ आ आ ॥ चाल ॥ त्या पुण्यें करून शिवाजीला राज्य मिळालें ॥ जी जी ॥ सत्ताविसी पीढीचें राज्य वाक्य असें झालें ॥ जी जी ॥ सत्ताविसावा गर्भ अंध होईल ऐका असें चांगलें ॥ जी जी ॥ त्यापासून भय राजाला होईल ह्मणाले ॥ जी जी ॥ हें दाऊन गुप्त महाराजाला लिहिणे छपवीलें ॥ जी जी ॥ चाल दुसरी ॥ असा वर भवानीमायेचा ॥ हो ॥ भोसलेराज्य राहण्याचा ॥ जी जी ॥ जगीं विसावा त्यांच्या पायाचा ॥ हो ॥ भगवा झेंडा जगीं फिरण्याचा ॥ जी जी ॥ जगीं विसावा शिवाजीचा । हो ॥ छत्रपती शिवाजीच्या नांवाचा ॥ जी जी ॥ लागला थारा यवनाचा हो । डंका शिवाजीच्या नांवाचा ॥ जी ॥ साधू सत्तावीस जन्माचा ॥ हो ॥ असा तपी नाहीं होण्याचा ॥ जी ॥ मिळ० ॥

---

१ सगळे.

असा शिवाजी राजाचा डंका, आवाज त्रिलोका, शत्रूला धोका, शिवाजीचा झाला। महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्यांचा बोलबाला ॥ ३१ ॥

शिवाजीची कशी वर्तणुक, रयतेला सुख, नसे कधीं दुःख, गोष्ट बोलण्याला। परस्त्रिया मातेसमान, ह्याच क्रमान, वागता झाला॥ जारिणी स्त्रियांस ह्मणे माता, असा राजा होता, ह्मणून यवनावरता, शक त्याचा झाला। जार पुरुषांचें करी शासन, ताडण बंधन, हाकून देत त्याला॥ सदा भवानीशंकर तिथ, शिवाजीच्या इथ, एक वचनांत, सेना सारी त्याला। एकवचनी रामासारखा, शिवाजी सखा, सुख प्रजेला॥ त्यांच्या कुळांत बाबासाहेब पुढें, सुरतीनें फांकडे, तेज बहु पडे, शीतळ स्वरूपाला। त्यांच्या वंशीं राजाराम झाले, दयावंत भले, राज्य करण्याला॥ खासगी कारभारी त्यांचे गोविंदराव, साधिला त्यांनीं डाव, कांद्यासाठीं पाव दंडितो शिपायाला। शिपायासाठीं राजाराम भले, हुकूमापायीं गेले, विलायत पहाण्याला॥ मग चौथे शिवाजी महाराज, प्रार्थितों मी आज, गरीबाची लाज, रक्षण करण्याला। राज्याशीं होऊन विन्मुख, सोशिलें दुःख, विलाज नसे त्याला॥ शाहू छत्रपतीच्या कुळीं, भीमासारं[1] बळी, राज्यवंशावळी आलों मी गायाला। त्यांचे वंशीं शाहुची कीर्ति, विजयसंपत्ति असावी प्रभुला॥ चाल॥ पुरा वर भवानीशंकराचा शाहु राजाला॥ ह्मणुनी रक्षी आदिमाया शाहु महाराजाला॥ सत्तावीस पिढ्यांचा वर दक्षिण देशाला॥ छत्रपती शाहू महाराज दाता अनाथाला॥ अवतारिक भोळाशंकर सांभाळी सर्वांला॥ चाल दुसरी॥ युगासारी वर्तणुक करी येऊन थोडी थोडी॥ जी जी॥ गोकुळीं कृष्ण करी खेळ तशी त्यांना गोडी॥ जी जी॥ खेळ करी कृष्णासारखा लाऊनीया होडी॥ जी जी॥ अनाथाचे पालक शूर तसे दयाम्राला तोडी॥ जी जी॥ सदू नरसिंगा ह्मणे शरण जावें हरघडी॥ जी जी॥ गुरु बालनाथ ह्मणे

[1] सारखा

यवनं झालीं बापुडीं ॥ जी जी ॥ हा पोवाडा ऐकून मनांमध्यें आणी हरघडी ॥ जी ॥ त्याची उद्धरून जातील सत्तावीस पिढी ॥ जी ॥ त्याचा पुत्र विजयी होणार राजसंवगडी ॥ जी ॥ हिंदुधर्मी लोक सर्वाला लागली गोडी ॥ जी जी ॥ झुले भगवी ढाल कलगीची डफावर खडी ॥ जी ॥ कवी कृष्णराव नित्य नव्या चाली अशा काढी ॥ जी ॥ नित्य बाळा गोपाळा लक्ष्मण हात जोडी ॥ जी ॥ मिळ० ॥ मंडळीचा जमाव झाला पुरा, उत्सव केला बरा, भवानीशंकरा, सांभाळी सर्वांला । महशूर तीन ताळांत, नऊ खंडांत, त्याचा बोलबाला ॥ ३४ ॥

पोवाडा समाप्त.

---

## देशाचा पालनवाला

कवि:—कै. गोविंद.

देशाचा पालनवाला, तो शिवाजि राजा झाला ॥
धर्माचा रक्षणवाला, तो शिवाजि राजा झाला ॥
त्रिभुवनांत डमरू ज्याचे, नादतांच नंदी नाचे ॥
जो परित्राण या भूचें, शंकर भोला ॥ १ ॥
गर्जते भवानी मेधा, चमकते भवानी खांडा ॥
चाललाच भगवा झेंडा, रण-नाचाला ॥ २ ॥
तुकयाचा प्रेमळ वीणा, गहिंवरवी अंतःकरणा ॥
करुणेच्या घेउनि ताना, उठवी हरिला ॥ ३ ॥
प्रभु रामदास तो आला, राष्ट्राचा जादूवाला ॥
मावळा मंत्रिला सगळा, भालेवाला ॥ ४ ॥
रणयज्ञ-विजय-हेरंबा, पूजाया रणजगदंबा ॥
तोरणा रण-प्रारंभा, नारळ फुटला ॥ ५ ॥

त्या चंद्रराव मोऱ्याला, दास्याच्या सरदाराला ॥
भूमीच्या मूर्त न काला, जाळा जाळा ॥ ६ ॥
तो विजापूरचा कोल्हा, वाघास दावि वागूरा ॥
परि वाघनखीं तरवारा, दिसे न त्याला ॥ ७ ॥
खिंडींत शत्रुचे बाण, निज मरणावर तोलून ॥
त्राणांत भूप झेलून, बाजी पडला ॥ ८ ॥
पुण्यांत राजवाड्यांत, खड्गाची रात्र कुजबुजत
ऐकूनि मस्त शाइस्त, पळुनी गेला ॥ ९ ॥
तो पुरंदराचा झगडा, तो मुरारबाजी लढला
हाताच्या करुनी ढाला, रिपु रोधीला ॥ १० ॥
तो औरंग्या दिल्लींत, शिवपवन धरी डावांत
परि पवन डाव उडवीत, उडुनी गेला ॥ ११ ॥
मग सिंहगडाचें युद्ध, गड चढला वैभवसूर्य ॥
रक्ताचें देउनि अर्घ्य, तान्हा गेला ॥ १२ ॥
किति असे वीर वर्णावे, किति जणा पवाडे गावे ॥
कवितेनें ओवाळावें, कुणा कुणाला ॥ १३ ॥
श्रीस्वातंत्र्याची माला, वीरांनीं गुंफुनि विमला ॥
अर्पिली देश-देवाला, हर हर बोला ! ॥ १४ ॥
वैकुंठ रायगड केला, लोक तो देवगण बनला ॥
शिवराजा विष्णू झाला, वंदन त्याला ॥ १५ ॥

---

# शिवचरित्र स्फूर्ति

## लेखकः—डॉ. ना. दा. सावरकर.

आज श्रीशिवछत्रपतींना जन्मून तीनशें वर्षें होतात या तीनशें वर्षांच्या अवधींत अनेक अघटित घटना घडून आपल्या राष्ट्राचें भाग्य भरती—ओहोटीप्रमाणें ऊर्जित दशेला जाऊन पुन: आजला तें अधोगतीला गेलें आहे. या अधोगतीच्या निराशा उत्पन्न करणाऱ्या या निरुत्साहकाळीं आपल्या पूर्वजांचे देदीप्यमान पराक्रम हेंच आपणास अधःकारमय वर्तमान काळांत मार्गदर्शक होतील त्याच्या ज्वलत्प्रकाशानें आपणाला भविष्यकालचा अस्फुट पथ अत्यंत स्फुट होऊं लागेल. कोणत्याही राष्ट्रांतल्या वर्तमानकालच्या पिढ्यांचा पराक्रम हें भूतकालच्या सर्व पराक्रमी इतिहासाचें एकत्रित केलें गेलेलें फल आहे. आणि वर्तमानकालीं ज जे पराक्रम व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या हातून घडतात, त्याच्या बलावरच भविष्यकाल घडत असतो, आणि अशा रीतीनें तो काल अनादि, अनंत असणाऱ्या जगाचें रहाटगाडगें खेळवीत असतो तेव्हा अशा या कालाला हार न जातां किंवा त्याच्या पचनीं न पडतां कोणाही व्यक्तीला, कोणाही जातीला अथवा कोणाही राष्ट्राला आपलें स्वतंत्र अस्तित्व मानपानानें कायम ठेवावयाचें असेल, तर वर्तमानकालीं कांहीं तरी अद्भुत पराक्रम, कांहीं तरी अद्भुत घटना आणि कांहीं तरी अद्भुत कार्य करून दाखविणें आवश्यक असतें ज्या राष्ट्राचा वर्तमानकाल हा मैंद, भेकड, आळशी, सुर्दाड अशा पोटभरूंनींच केवळ भरलेला असतो, त्याना 'सर्वभक्षक काल—,मोठ्या आनंदानें मिटक्या मारीत–भविष्यकालीं आपल्या उदरात पचविण्याकरितां टपून बसलेला असतो अशारीतीनें त्या व्यक्तीचें, त्या जातींचें अथवा त्या राष्ट्राचें अघाशी काळानें उच्चाटन करून त्यांचा चट्टामट्टा केला, तरी बाकीचें जग त्याबद्दल यत्किंचितही पर्वा करीत नाही, आणि अशा त्या मेलेल्या जातीच्या अथवा राष्ट्राच्या मुडद्यांवरून आपापल्या सुधारणांचे रथ खुशाल भरधाव फेंकीत पुढें पुढेंच चाललेले असतें. इतकेंच नव्हे, परंतु त्यांच्या पदाघातानीं शतचूर्ण झालेल्या राष्ट्राची मातीही अनेक वेळां ठिकाणावर रहात नाहीं, आणि नाममात्र शेषसुद्धां पुसट्न जातात त्याचप्रमाणें आजपर्यंत या कालाच्या

अशाशी धांगडधिंग्यामध्यें अनेक जाती आणि अनेक राष्ट्रें पिचून पिचून आणि पचून गेलीं ! कार्थेज, रोम, ग्रीस, बॅबिलोनिया, पारसीकांचें राष्ट्र आणि इतर अनेक पूर्वीचीं एकाकालीं वैभवशाली म्हणून गाजलेलीं राष्ट्रें, त्याच्या त्या प्रचंड सस्कृतींचा आणि सामर्थ्यांचा लेशमात्रही शिल्लक न राहता, केवळ नाममात्रच आज इतिहासज्ञांस निर्देशित करावीं लागतात, परंतु या सर्व साधारण नियमाला पादतळीं तुडवून आणि कालाच्याही श्रीमुखात देऊन आज आपलें हें पुराण–पवित्र आणि पुराण–प्रसिद्ध हिंदी राष्ट्र मात्र,–जगाच्या मानवी जातीचा इतिहास जेव्हापासून ज्ञात आहे, थेट तेव्हांपासून तों अगदीं काल आजपर्यंत– आपल्या एका विशिष्ट तत्त्वज्ञानासह, विशिष्ट सुधारणासह, विशिष्ट व्यक्तित्वासह, जवळ जवळ जसेंच्या तसेंच प्रारंभींच्या सर्व गुणदोषवैशिष्ट्यासह–जणूं काय कालाच्या या आसुरी हत्याकांडाचा ज्या वेळेला त्या सर्व–समर्थ परमेश्वरासमोर निवाडा होईल, त्यावेळीं एक अत्यंत विश्वासू साक्षीदार म्हणून उभें राहण्याकरितांच कीं काय !–अजून जिवंत आहे.

परंतु आजपर्यंतचें हिंदी राष्ट्राचें आयुष्य काहीं केवळ यदृच्छेनें, विना प्रयत्न, विना आत्मयज्ञ, विना भीमपराक्रम राहिलें आहे असें नाहीं. किंवा इतर जातींना आणि राष्ट्रांना तुडवीत आणि गिळकृत करीत नाचणारा निर्घृण काळ या हिंद राष्ट्रावर फिदा होऊन केवळ दया म्हणून त्यानें आमच्या राष्ट्राला जिवंत राहू दिलें असेंही नाही. इतकेंच नव्हे, परंतु या जुनाट खोडाला जाळून पोळून टाकण्यास आततायी काळानें भगीरथ प्रयत्नही केले आहेत ज्या वज्र–कठोर आघातानें त्यानें रोम वगैरे राष्ट्रें व त्यांच्या सस्कृती रसातळाला नेल्या, त्याच प्रबळ आघातांनीं त्यानें या हिंदभूमीस अनेकवार ताडण केलें आहे. गेलीं हजार वर्षें तर हा काल या हिंदभूमीला नष्ट करण्यास जणू आकाश-पाताळ एक करून टाकीत आहे. महमद घोरीच्या स्वरूपानें पहिल्या प्रचड पंजाचा आघात या कालानें हिंदभूमीवर केला त्यानतर क्रमाक्रमानें या हिंदभूमीच्या सर्वांगावर, हिमालयाच्या केशकलापापासून तों रामेश्वराच्या पादाग्रांपर्यंत आणि ठायीं ठायीं अगाप्रत्यगांना,—मृत्यूचे वज्रकठोर प्रहार केले गेलेले आहेत ' आणि तरीही ही हिंदभूमि या प्राणघातक आघातांनीं जरी विव्हल झाली तरी मृत मात्र होऊ शकली नाहीं ! ' कारण तिला जीवनामृत पाजण्याकरिता आपल्या स्वतःचीं जीवनें तिच्या स्थंडिलावर, समराच्या यज्ञकुंडामध्यें भराभर स्वाहाकार करण्याकरितां आपल्या धीरोदात्त पूर्वजांनीं कुबेराच्या औदार्यानें अर्पण केलीं आहेत पृथ्वीराजानें

आपल्या हजारो हजार वीर सैनिकांसह समर–यज्ञामध्यें प्राण देऊन भगवती हिंददेवीचे प्राण वाचविले आहेत. त्यानंतर ठायीं ठायीं आणि प्रांतोप्रांतीं अनेक संगराणे, अनेक हरपाळ देव, अनेक शंकरदेव, अनेक माधवाचार्य, अनेक हरिहरराय आणि अनेक रामराजे या हिंदु-संस्कृतीला आणि हिंददेशाला जिवंत ठेवण्याकरितां मैंदासारखे रडत बसून, नव्हे—भ्याडासारखे कोणा तिऱ्हाइताच्या एकीवर अवलंबून शिखंडीपणानें नव्हे—' बोलाचाची भात, बोलाचीच कढी ' अशा रीतीनें केवळ स्वार्थत्यागाच्या चकाट्या–काडावर नव्हे, तर प्रत्यक्ष धनार्पण करून, प्राणार्पण करून पराक्रम गाजवून,—'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् '—मेलास तर देशाच्या कामीं मेलास म्हणून स्वर्ग, जगलास तर मरणाला न भितां देशाकरितां लढलास म्हणून राज्य, अशा निष्ठेनें ते सर्व देशवीर आणि धर्मवीर या पुराण-पवित्र देशाला जिवंत ठेवण्याकरिता मेले ' म्हणून हें राष्ट्र प्रत्यक्ष कालालाही लाथाडून आजपर्यंत एकमेवाद्वितीयतेनें जिवंत आहे, उभें आहे, चैतन्ययुक्त आहे. व पुनः एकदा भविष्यकाळामध्यें विजयाच्या गजरानें प्रवेश करण्याकरिता आज पदार्पण करण्याला सज्ज झालेलें आहे. अशा वेळीं अवश्य ती स्फूर्ति, अवश्य ती वीरता आणि अवश्य त्या यज्ञत्यागाची सिद्धता करण्यास प्रभु शिवाजीच्या तेज, शौर्य, वीरता यानीं देदीप्यमान झालेल्या चरित्रावाचून अन्य कोणतें साधन इतकें उपयोगी पडणार आहे ? म्हणून माझ्या तरुण मित्राच्या महत्त्वाकांक्षेला आकाशासही गवसणी घालण्याचें सामर्थ्य देण्याकरितां, निराशा, निरुत्साह, निष्क्रियता याच्या टाळक्यांवर पाय देऊन आपल्या जातीला आणि आपल्या राष्ट्राला पुनरपि विमुक्त आणि स्वतंत्र करण्याकरितां शिवरायाचे गुणानुवाद आम्ही मोठ्या विश्वासानें सादर करीत आहों

सतराव्या शतकामध्यें मुसलमानी सत्ता म्हणजे प्रत्यक्ष रावणी सत्तेप्रमाणेंच अतिशय प्रबल व अतिशय मदांध झाली होती हिंदुस्थानांतील सर्व हिंदु सैन्यें त्या सत्तेनें उधळून लावलीं होतीं, हिंदुध्वज मोडून टाकले होते व हिंदु सिंहासनाचा चुरा करून तालिकोटच्या भयंकर संग्रामात रक्ताच्या पुरामध्यें त्याला बुडवून टाकलें होतें. रावणाच्या वर्तनाप्रमाणेंच चवदा चौकड्यांचें ते साम्राज्य उपभोगीत होते व सर्व देवतुल्य सज्जन लोक सन्त्रस्त झाले होते हिंदुस्थानची शतकोंशतकीं, परकीयांच्या आघातानें न भंगलेली रजपुतांची ढाल या वेळीं भंगून पिंजून जाऊन अखिल हिंदुस्थान व हिंदुसमाज हा यवनाच्या हत्यारी आघाताना बळी पडला होता व कोणीहि हिंदु ' चढ ' उरला नव्हता जेथें तेथें दीनता दास्यता, हिंदूंच्या ललाटीं चिकटलेली होती.

अशा वेळीं, नितांत निराशा व नितांत दुर्बलता ज्या वेळी हिंदुस्थानभर पसरली होती त्या वेळी या दंडकारण्यांतच प्रभुशिवराय जन्माला आले एकदा तो अयोध्येचा युवराज याच दंडाकारण्यात वास्तव्य करीत होता व याच दंडकारण्यातून त्याच्या पराक्रमाचा दंडक निघून त्यानीं अधम लोक दंडिले होते. त्याच दंडकारण्यात शिवरायांचा जन्म झाला व पुन्हा एकदां, अत्याचारी सत्तेला दंड करण्याचा मान पुनः एकदां दंडकारण्याला लाभला गेला !

जगामध्यें इतर अनेक थोर पुरुष, पराक्रमी जेते व नावाजलेले मुत्सद्दी लोक उत्पन्न झाले आहेत. परंतु शिवाजी महाराजांचें चरित्र या सर्वांहून अद्भुत झालें ही कोणाला अतिशयोक्ति वाटेल. परतु विचारांतीं ती सार्थोक्ति असल्याचें प्रत्ययास येईल कार्थेजचा प्रख्यात महावीर हानिबॉल, रोमचा सीझर व जगज्जेता शिकदर हे सर्व मोठे योद्धे यात सशय नाहीं परंतु हीं सर्व परिस्थितीचीं दैववान् लेंकरें होतीं कार्थेजच्या एका वेळीं सपन्न असलेल्या प्रजासत्ताक राज्याचा द्रव्यनिधि, सर्व उत्तर आफ्रिका जिंकणारे पराक्रमी सैन्य व भूमध्य समुद्रात अजिंक्य ठरलेलें आरमार हानिबॉलला प्राप्त झालें व या आयत्या मिळालेल्या पिठावर त्यांनीं दिग्विजयाच्या रेघा काढल्या परंतु, शिवरायाना यापैकीं काहींहि आयतें लाभलें नव्हतें हानिबॉलप्रमाणें नव्हतें त्याच्याजवळ कार्थेजचें सपन्न लोकसत्ताक राज्य, सुसज्जित सैन्य किंवा समुद्रविजयी नाविकदल नव्हतें एका पराजित आणि परागदा झालेल्या सरदाराचा मुलगा, वैराण प्रदेशांतील शेंपन्नास गांवांची जहागीर, रिक्त झालेला निधी, ही काय ती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची सहाय्यता ! आणि तरीही एकाद्या किमयागारानें किमया करावी, एकाद्या जादूगारानें फुक मारावी, त्याप्रमाणें या क्षुद्र साधनांनीं एक प्रबळ आणि विस्तीर्ण सृष्टि निर्माण केली. शेंपन्नास लगोट्या मावळ्यांमधून त्यानीं किनखावी पोषाखानी व भरजरीच्या वस्त्रांनी मंडित झालेलें चतुरंग दल निर्माण केलें मराठ्यांच्या नांवानें एकादी क्षुद्र होडीहि ज्या हिंदीमहासागरामध्यें संचरत नव्हती, तेथें शिवरायांना त्याच महासागरात, सिद्दी वगैरे मुसलमानी चाच्यास व इंग्रज, पोर्तुगीज, डच इत्यादि युरोपीय नाणावलेल्या नौकाशास्त्रज्ञास धाक घालणारे एक सुसंघटित, पराक्रमी व धाडसी नौकादल निर्माण केलें ! हानीबॉलला ही सामुग्री आयती मिळाली होती व त्यावर त्यानें पराक्रम गाजविला शिवरायांनीं हीं साधनेंच मुळीं केवल आपल्या पराक्रमानें निर्माण केली. मग अधिक मोठा कोण ? अधिक धन्य कोण ?

जी गोष्ट हानिबॉलची, तीच गोष्ट सीझर व शिकंदर याची व म्हणूनच या त्रयींपेक्षांही शिवाजी महाराज अधिक थोर, अधिक पराक्रमी व म्हणूनच अधिक धन्य होत.

आणि तरीहि शिवरायांच्या कार्यांचा पवित्रपणा व दिव्यपणा आम्ही अजून जाणून बुजून या त्रयींच्या कार्यांशीं तुलला नाही केवळ पराक्रम, कर्तबगारी, धाडशीपणा याच गुणांची तुलना करून शिवाजी श्रेष्ठ ठरला परंतु हानिबॉल, सीझर, शिकंदर यांच्या ध्येयाची व शिवरायाच्या ध्येयाची तुलना तर अजून करावयाचीच आहे ही तुलना म्हणजे नरक व स्वर्ग यांचीच तुलना होईल. कारण ही जगज्जेती त्रयी दुसऱ्याचें स्वातंत्र्य हरण करण्यास, निरपराधी लोकांना व राष्ट्रांना केवळ स्वसामर्थ्याचा कंडु शमविण्याकरतां व साम्राज्यलोभाची आसुरी तृष्णा भागविण्याकरता हैराण करण्यांत मग्न झाली होती हें पापकर्म, हें ईश्वरी न्यायाच्या विरुद्ध असलेलें कर्म, या लोकांनीं केलें–व शिवरायानीं '—शिवरायानीं ईश्वरी न्याय स्थापित करण्यास, भूमाता स्वतन्त्र करण्यास आणि स्वजाति वैभवशाली तशीच पराक्रमी बनविण्यास सर्व जन्म अर्पण केला एका बाजूला जगाला छळणारा पराक्रम, दुसऱ्या बाजूला छळकांना दडून जगाला सुखी करणारा पराक्रम–एका बाजूला आसुरी लालसा–दुसऱ्या बाजूला दैवी महत्वाकांक्षा—अधिक श्रेष्ठ कोण ? अधिक महनीय कोण ? आसूरी कां दैवी ? नरकगामी कीं स्वर्गगामी ? हानिबॉल, सीझर, शिकंदर कीं शिवाजी ! काय ? अजूनहि आपल्याला संशय आहे ? तर पहा, हे इतिहासदेवते, तुला सत्याची शपथ आहे. तूं कांही साक्षीदार बोलाव हाय ' हानिबॉल सीझर, शिकंदर यांच्या वतीनें पहा हे कोण साक्षीदार पुढें सरसावत आहेत ' भूतकाळाचा काळाकुट्ट पडदा बाजूला सारून हे कोण पुढें घुसत आहेत ? पहा, ही रोमची नगरदेवता ' हानिबॉलनें केलेल्या निष्कारण खुनांनीं रक्तरंजित झालेल्या शरिरांनीं ही प्रविष्ट होत आहे ' त्या निरपराध रक्ताच्या सिंचनानें रोम लाल झालेले आहे !—आणि हें पहा पूर्व वैभवानीं सुखासमाधानांत नांदत असलेले पूर्वेकडे मिसर देशापासून तों पश्चिमेस फ्रान्स, स्पेनपर्यंतच्या देशांतील भाग्यदेवता आक्रोश करीत सीझरच्या पराक्रमाची साक्ष देण्याला पुढें येत आहेत व ऊर बडवीत त्याची कहाणी सांगत आहेत. ती पहा, एका कोपऱ्यांत त्यक्त, शापित, वंचित झालेल्या अपराधी दासीप्रमाणें सागरामध्यें बहिष्कृत केलली ती आंग्लभूमि, सीझरच्या बुटाखाली ठेचली जातांना कण्हत कण्हत सीझरच्या पराक्रमाची साक्ष देत आहे !–ते पहा, तिकडे ते पारसिकांचे जगद्विख्यात साम्राज्य दारयसासह समरांगणाच्या धुळींत मिसळलेले, शिकं-

दराला शिव्याशाप देत अतराळांत आक्रोश करीत आहे–तो पहा, तो पराक्रमी पौरस आपल्या हजारों हजार शूर योद्धयांसह स्वदेशाचें स्वातंत्र्य राखण्याच्या पवित्र कार्यांत मेघांतून पाणी धसावें तसें अगांतून रक्त वाहवीत सबंध सिंधुनदाला लाल रग देत पंजाबमधून सीझरच्या नावानें साक्ष देण्यास उभा रहात आहे ! आणि याशिवाय किती तरी अन्यायानीं तोडलेलीं शिरें, जाळलेली घरें, भंगिलेलीं सिंहासनें, पददलित केलेले राजमुकुट हानिबॉल, सीझर, शिकंदर याच्या वर्तीनें साक्ष देण्यास गर्दी करीत आहेत ! बाई, इतिहासदेवते ! पुरे, तुझे हे साक्षीदार ! एवढ्यातच हें वातावरण रक्त, मांस, सूड, याच्या प्रदर्शनानें कुद्द होऊन गेलें ! टाक तुझा तो भूतकाळाचा पडदा या बाजूला ! व तिकडे–तिकडे शिवरायांकडचे साक्षीदार येऊं लागले–येऊ द्या कोण कोण हे साक्षीदार येताहेत ! हाय ! हा पहिला साक्षीदार म्हणजे तालिकोटच्या रणामध्यें बेसावध असता खुनी हातास बळी पडलेला हा विजयनगरचा रामराजा ! विजापूरच्या वेशीवर याचें शिर टांगून ठेविलें होते ! हिंदूंच्या स्वातंत्र्याकरता हा लढत असता समरांत पडला ! तो रामराजा आज हंसत मुखानें, हृदयावरच्या खुनी सुऱ्यानें झालेल्या खोल घावाला हातानीं सावरून धरीत पुढें येत आहे ! विजयनगरचा सूड उगवला ! तालिकोटच्या रक्ताच्या पुरांत वहात गेलेलें हिंदूंचें सिंहासन व छत्रचामर, रायगडला थोपवून धरून हिंदुपदपादशाही निर्माण केली, म्हणून शिवाजीला धन्यवाद देत देत, हे महाराज रामराज पुढें येत आहेत. वाचकहो ! त्यांना उत्थान द्या ! ह्या कोण ? हाय ! चितोड नगरच्या तीन जोहारात स्वतःला यवनाच्या हातून अवमानांत होण्याचा प्रसग येऊ नये, म्हणून, चितेवर धगधगीत अग्नि पेटवून स्वतःस जाळून घेणाऱ्या ह्या रजपूत सती ! सतीनों ! तुम्हांला वंदन असो, काय ? तुम्हीं शिवरायानां आशीर्वाद देण्याला आलां आहात ? भारतरमणींचे हे हाल ज्या पापी हातानीं केले त्या हातांना छाटून टाकून, ज्या सत्तेच्या आश्रयानें हीं अधम कृत्यें केलीं गेली त्या सत्तेच्या छातीवर पाय देऊन शिवरायानें रायगडीं शुभराज्य, देवराज्य, स्थापिलें म्हणून का तुम्हीं येथें साक्षीकरिता आलात ! आणि हा प्रकाश कसला ! कोण हे ? प्रत्यक्ष पंढरीचे विठोबा ! व ही तुळजापूरची भवानी ! पंढरीनाथा आई जगदंबे ! काय, तुम्ही प्रत्यक्ष देवहि या मानवांबरोबर शिवरायाच्या साक्षीला आलात ? जगन्माते, हें वंदन घ्या ! आकाशवाणीच्या गंभीर गर्जनेंत आपण काय सांगतां ? प्रत्यक्ष तुम्हांला फोडणारा व जात्यांत भरडणारा आसुरी अफजुलखान, प्रतापगडावर शिवरायांनीं भीम पराक्रमानें रगडला, भरडला व त्याचें अखिल खलबल

दिशादिशांनां पिटून लावलें म्हणून शिवरायावर पुष्पवर्षाव करीत तुम्ही त्यांच्या बाजूची साक्ष देता ? या, या कोण तुम्ही ? सकल हिंदुशास्त्र, गंगा यमुनाच्या व तुंगभद्रा कावेरीच्या पवित्र तटाकांवर म्लेंछाकडून अनंत वर्षे पददलित, अवमानित झालीं असतां लपत छपत हिंडत होतीं, तींच सर्व हिंदु शास्त्रें गागाभट्टांच्या स्वरूपामध्यें आज एकीभूत होऊन प्रगट झालीं ? गागाभट्टांच्या पवित्र वाणीनें, तुम्ही शिवरायांना सिंहासनावर स्थापित केलेंत व तेव्हांपासून त्या सिंहासनाच्या प्रबल आश्रयाखाली तुम्ही पुनर्जीवित झालात ! म्हणून तुम्हीं साक्षीकरतां धांवत आलां काय ? आतां तर या साक्षींच्या मालिकेची गर्दी उसळली ! गंगायमुना आणि सर्व हिंदु क्षेत्रें, तोरणा, सिंहगड, प्रतापगड वगैरे सर्व पुण्यक्षेत्रें, तानाजीची दरड, बाजीची पावनखिंड, महाराष्ट्रांतील भूमीच्या अंकावरचा प्रत्येक कण व सतराव्या शतकांतला प्रत्येक क्षण, शिवरायांच्या वतीनें साक्षी देण्याला पुढें आला ! परंतु हें काय ? हें दिव्य साक्षीदारानों ! हें उत्थान कुणाला देतां ? कोण हें ? अहाहा ! प्रत्यक्ष पावनता ही ! मस्तकावर गोपीचंदनाचा टिळा, गळां तुलसीमाळा, हातांत वीणा आणि टाळ अशी ही 'पूर्ण वेदांतवाणी ' वदणारी तुकोबारायांची स्वारी ! व शेजारीं हें कोण ? भगवी छाटी, कटीं लंगोटी, हातांत कुबडी अशी घनिष्ट शरिराची दिव्यमूर्ति कोणाची ? ' जय जय रघुवीर समर्थ ! ' होय हे प्रभुरामदास ! हे समर्थ ! हे ' आनंदवन भुवना 'चे द्रष्टे ! आपण काय म्हणतां ? भगवान् ! आपण काय म्हणतां ?—,शिवरायाचें आठवावें रूप ! शिवरायाचे आठवावे प्रताप ! शिवरायाचे आठवावे साक्षेप ! भूमंडळीं ! '

पुरे, इतिहासदेवते ! पुरे, आतां याहि बाजूचे साक्षीदार ! वाचकहो ! काय दिसलें ? भूतकालच्या काळ्या कुट्ट अंधःकाराला बाजूला सारून इतिहासाच्या साक्षी घेतल्या तर काय दिसलें ? कोण श्रेष्ठ, कोण दैवी, कोण तारक ?

हे प्राचीन काळचे योद्धे व वीर सोडले व आधुनिक कालीं आलांत तरी काय दिसतें ? माझिनी ? माझिनींत तत्त्ववेत्ता होता, परंतु वीरपुरुष नव्हता गॅरिबॉल्डींत वीर पुरुष होता, तत्त्ववेत्ता नव्हता शिवाजीमध्यें तत्त्ववेत्ता होता व वीरपुरुषहि होता, म्हणून शिवाजी पूर्ण व म्हणूनच अपूर्णापेक्षा अधिक थोर.


नेपोलियन बोनापार्टानें पराक्रम केला, परंतु फ्रान्सच्या राज्यक्रांतीनें त्याला निर्माण केला. त्यानें कांही क्रांति निर्मिली नाहीं परंतु शिवरायानें स्वतःच क्रांति निर्माण केली

व तिच्या मस्तकावर अधिष्ठित होत होत रायगडावर सिंहासन उभारलें—नेपोलियननेंहि सिंहासन उभारलें-परतु तें त्याला तोललें नाहीं ! राजमुकुट घातला-परंतु तो त्याला ढिला पडला व त्याच्याच हयातींत तें सिंहासन खचून गेलें व राजमुकुट उन्मळून पडला शिवाजीनें सिंहासन कडेपठाराच्या पक्क्या पायावर उभारलें व राजमुकुट घट्टपणानें मस्तकावर धारण केला—इतका कीं प्रत्यक्ष शिवराय मेले, परंतु सिंहासन व मुकुट जगले, तगले ! व अखेर प्रत्यक्ष दिल्लीच्या तक्तालाच त्यांनीं गवसणी घातली ! मग अधिक कर्तृत्व-गार कोण ? अधिक थोर कोण ?

वॉशिंग्टनला लोकसभा व जनतेचें पाठबळ. लोकसभा होती, संघटना होती, लोक सुजाण होते—फ्रान्सचें सक्रिय साह्य होतें—मुख्य शत्रु महासागराच्या पलीकडे इतका दूर होता आणि शिवाजी संबंधीं ? त्याला लोकसभा नव्हती, त्याला संघटनेचें सहाय्य नव्हतें, सुजाण लोक विरुद्धच होते, कोणत्याहि प्रबळ राष्ट्राचें सहाय्य नव्हतें शत्रु दूर नव्हता, अगदीं निकट, उरावर, सर्वबाजूनीं शत्रू, एकच नव्हे तर अनेक शत्रू वावरत होते—नव्हे शत्रु समुदायामध्येंच ते होते आणि तरीहि त्यानीं एकाएकी अनेकांशीं युद्ध करून—केवळ सात वर्षेंच नव्हे, तर सारखीं तीस वर्षें युद्धें करून अखेर विजय मिळविला. मग श्रेष्ठ कोण ? मोठा कोण ? थोर कोण ?

हें चरित्र म्हणजे त्या शिवयशाच्या महासागरास जाऊन मिळण्याचें केवळ एक नदी—मुखच होय. या चरित्रवाचनानें शिवाजीचें सर्व चरित्र अवगत होईल असें नव्हे, हें आम्ही जाणून आहों. परंतु तें दिव्य चरित्र जाणण्याची इच्छा मात्र या अल्पचरित्र वाचनानें प्रबळ होईल, अशी आम्ही बळकट आशा करितों आणि शिवरायांच्या चरणीं माझ्या राष्ट्राच्या बालपिढीच्या वतीनें हा नम्र नजराणा अर्पण करून, तुझी स्फूर्ति दे, तुझी वीरता दे, तुझी देशप्रीति दे, अशी सगद्गद कंठानें प्रार्थना करितों.

तरुण मित्रानों ! तुम्हीही सर्वजण या शुभ वेळीं मजबरोबर ही प्रार्थना कराल का ? अशा प्रार्थनेसह केलें गेलेलें या शिव—चरित्राचें सकीर्तन, आपणां सर्वांना फल-दायी होवो, अशी स्वातंत्र्य—स्वरूप नारसिंह—रूपधारी परमेश्वराची प्रार्थना करून शिवरायाचे चरणीं हा अल्पलेख समर्पित करितों.


प्रतापगड
फासलकर
पार घाट
पार




PHOTO PRINTED AT SHREE LAXMI NARAYAN PRESS, BOMBAY NO 2

# प्रतापगडची मोहीम.

## प. न. घाटे, कॅप्टिन मोडक यांच्या टिपणांवरून.

शिवाजी महाराजाच्या आयुष्यात जे फार आणीबाणीचे प्रसंग आले त्यांपैकीं अफजलखानाशीं झालेलें युद्ध हा एक आहे. स्वराज्याचा रोपा वाढीस लागावयाचा अगर तो खुरट्न जावयाचा हें या प्रसगांतील यशापयशावर अवलंबून होतें. शिवाजीची स्वराज्याची चळवळ चिरडून टाकण्याकरता विजापुर दरबाराकडून झालेल्या प्रयत्नांपैकीं हा फार जोराचा असा प्रयत्न होता. शिवाजी महाराजाच्या त्रिशत सांवत्सरिक उत्सवाचे वेळीं याच प्रसंगाचें वर्णन थोड्याशा निराळ्या पद्धतीनें व ऐतिहासिक चिकित्सक बुद्धीनें करावें असें कोणालाही वाटेल व तें वाचणें व ऐकणें सर्वांना आवडेल यांत शंका नाहीं.

महाराजांचे स्वराज्याचे प्रयत्न त्याच्या वडिलांच्या जहागिरींत सुरू झाले असून आजूबाजूच्या प्रदेशांतील किल्ले घेऊन व विजापुरच्या सुभेदारास पराभूत करून व विजापुरास जाणारे खजिने लुटून त्यांनीं आपल्या प्रयत्नाची जाणीव विजापुर दरबारास करून दिली होती. या त्याच्या कार्यास आजूबाजूच्या मराठी जहागिरदारांचें व देशमुखांचें फारसें सहाय्य नसून त्यांपैकीं फक्त थोडे तरुण लोक त्यास मिळाले होते. त्याच्या कार्याची जोराची प्रगति एकाद्या मोठ्या विजयावर अवलंबून होती. त्याच्यापाशीं विपुल साधनसंपत्ति नव्हती, परंतु बरोबरची मंडळी ही त्याच्या प्रमाणेंच शूर, देशप्रेमी व स्वार्थत्यागी असल्यामुळें कोणत्याही धाडसी कामांत माघार घेणारी नव्हती. याच वेळीं विजापुरच्या दरबारांतील महाराजांविषयींचा दरारा वाढत चालला होता. मोगल बादशाहाच्या मध्यस्तीनें झालेल्या शहाजी भोसल्यांच्या मुक्ततेमुळें दरबारांतील शहाजींच्या विरोधी पक्षानें महाराजांचा पाडाव करण्याचा शर्थीचा प्रयत्न करण्याचें ठरविलें या पक्षाचा पुढारी अफजलखान हा होता. शारिरीक बल, शौर्य, सेनाधिपत्य वगैरे कोठल्याच बाबतींत त्याच्याहून वरचढ कोणी नव्हता. या अफजलखानानें शिवाजीस धरून आणण्याची अगर मारण्याची प्रतिज्ञा केली व तो मोठें सैन्य बरोबर घेऊन महाराजांवरील मोहिमेस निघाला प्रत्येक राजाला जरूर असणारें बातमीदारांचें जाळें महाराजाजवळ होतेंच. त्याच्या सहाय्यानें त्यांस या मोहिमेची खबर लागली. तेव्हां पुढील पहिला प्रश्न त्याजपुढें उभा राहिला तो त्याला तोंड देण्यास जागा कोणती

पसंत करावी हा होय ज्या जागेची शत्रूला अपुरी माहिती व आपला पराभव झाल्यास निघून जाण्यास सोईची, अशी प्रतापगडची जागा मुख्य तळास त्यानीं पसंत केली.

शिवाजी महाराज हे राजकारणी पुरुष होते, त्याचप्रमाणें उत्तम सेनापति होते, ही गोष्ट त्यांच्या या मोहिमेवरून सिद्ध होणार आहे सेनापतीचें काम सैन्याची योजना करणें, रणक्षेत्रें ठरविणें व शत्रूला आपण ठरविलेल्या रणक्षेत्रांत आणणें हें असून, त्याप्रमाणें जो दुसऱ्याला पेंचात टाकील तोच यशस्वी सेनापति होय. अफजलखानाचा मुख्य बेत शिवाजीला पकडण्याचा असून शहाजी राजाचें व त्याचें पूर्वीपासून वांकडें होतें. स. १६५८ च्या पावसाळ्याचे अखेरीस तो विजापुराहून निघाला, तो स १६५९ च्या चपाषष्ठीस ता. १० नोव्हेंबर रोजी शिवाजीकडून मारला गेला

शहाजीचा वडील मुलगा संभाजी याच्या मृत्यूचें कारण खानच होता. त्याशिवाय महाराजानीं मोऱ्यांच्या माणसांना दुखविलें असून तीं सर्व माणसें त्यांच्या विरुद्ध पक्षाला होती. त्या लढाईंत खान व महाराज यांचें एकमेकांना मारण्याचें ध्येय होतें. अफजलखानाच्या तयारीवरून व त्याच्या पराक्रमावरून पुष्कळ मराठे सरदार देशमुख वगैरे महाराजांना सोडून गेलेले होते यावरून रणक्षेत्र ठरविण्याचें काम खानाचेंच होतें, परंतु महाराजांनीं आपल्या कौशल्यानें आपण रणक्षेत्र ठरवून खानाला आपल्या ताब्यांत आणलें. खान विजापुराहून सोलापुर, तुळजापुर व माणकेश्वर येथपर्यंत येऊन पुणें प्रांतांत शिरणार होता. उत्तम सेनापतीचें कौशल्य आपल्या प्रांतांत लढाई करूं न देतां शत्रूच्या प्रांतांतच लढाई होऊ देणें हें असतें. त्याप्रमाणें महाराजांनीं प्रतापगडावर आपलें वास्तव्य केलें महाराजांना मारणें अथवा पकडणें हेंच खानाचें ध्येय असल्यामुळें प्रतापगडाकडेच खानाला मोर्चा फिरवावा लागला. अशा तऱ्हेनें महाराजानीं आपल्या प्रांताचें संरक्षण केलें.

माणकेश्वराहून खान करकब भोसें यावरून पंढरपुरास आला. तेथून मातबर सरदार व देशमुखांस आदिलशाहाची फर्मानें आपणास मिळण्याविषयीं पाठवून देण्यांत आलीं. नंतर शिंगणापुर, मलवडी, रहिमतपुर, सातारा, यावरून खान वांईस आला. ( जून १६५९ ) वाईवरूनच प्रतापगडास जावयाचा मार्ग आहे. या शिवाय दुसरा मार्ग नाहीं. यामुळें अर्थातच वांई ते प्रतापगड हें रणक्षेत्र ठरलें गेलें हा टापू अतिशय डोंगराळ व अडचणीचा आहे त्याच्या उत्तरदक्षिणेस एक सारखा सह्याद्रि ६०० मैल पसरलेला आहे सह्याद्रीच्या डोंगरपठाराचा भाग २० मैल किंवा कमी अधिक रुंदीचा आहे. मुख्य मधली रांग साधारण ४१५ मैल रुंदीची आहे. या रांगेला पूर्व

मध्यम असे अनेक फांटे फुटले आहेत प्रस्तुतच्या रणक्षेत्राचा टापू वाई ते प्रतापगड २४ मैलपर्यंत रुंदीचा असून उत्तरेस जावळी, चद्रगड, ते ढवळ्या घाटापर्यंत व दक्षिणेस पारघाटापासून चतुर्बेटापर्यंत सह्याद्रीचा हा सर्वच भाग विलक्षण डोंगराळ व दाट जगलाचा असा आहे, उघडे मैदान असें फार क्वचित्च आहे. या दाट जंगलांतून पार निघून जाणें अतिशय अडचणीचें व धोक्याचें आहे. तुटलेले कडे, चढउतारांच्या जागा, घनदाट झाडी, मध्येंच उंच उंच निघलेलीं डोंगरांचीं शिखरें या सर्व कारणांमुळें त्या प्रदेशातून सैन्याच्या हालचाली व्यवस्थित करण्यास त्या प्रदेशाची पूर्ण माहिती असलेल्या व त्यात नेहमीं वापरणाऱ्या माणसाचीच आवश्यकता आहे. ह्या सर्व गोष्टींवरून महाराजानीं हें रणक्षेत्र पसंत केलें व खानाला त्या रणक्षेत्राशिवाय दुसरा मार्ग राहिला नाहीं अशा तऱ्हेनें खानावर महाराजांनीं पहिला विजय मिळविला.

सेनापतीचें दुसरें लक्षण असें कीं, आपल्या तळ ठिकाणापासून मुख्य ठिकाणापर्यंतचें दळणवळण शत्रूपासून सुरक्षित राखणें हें असून, वांई तें विजापुर या प्रांतातील दळणवळण खानानें नीट राखिलें होतें. इकडे महाराजानींही राजगड ते प्रतापगड पर्यंतचे दळणवळणाचे मार्ग सुरक्षित ठेविले होते या बाबतींत दोघेही सेनापती अत्यंत दक्षतेनें वागत होते खानाजवळ महाराजांपेक्षां किती तरी पटीनें सैन्य जास्त होतें. तथापि सेनापतीनें शक्य तितकी सैन्याची कमी खराबी करून जय मिळविला पाहिजे या धोरणानें खान वागू लागला महाराज हातीं लागत नाहींत असें पाहून खानानें कपटयुद्धाचा अंगीकार केला. महाराजानीं त्याचा बेत ओळखून त्याचाच बुद्धिबलाचा डाव खेळण्यास आरंभ केला तर त्यांत खान व महाराज यांची भेट होण्याचें ठरलें. अर्थात् खानास भेटीचें ठिकाण वाई हें पाहिजे होतें व महाराजास प्रतापगड हें पाहिजे होतें दोघांचेही डाव चालले होते शेवटीं महाराजानी खानाचा वकील गोपीनाथपंत बोकील यास वश करून घेऊन भेटीचें ठिकाण प्रतापगडच ठरविलें. अशा तऱ्हेनें दुसऱ्याही डावात महाराज यशस्वी झाले, परंतु खानानें प्रतापगडावरच आपलें कार्य साधून घेण्याचें ठरविलें. महाराजाची व त्याची नुसती भेट व्हावयाची ठरलें असतां, त्यानें आपले बरोबर १२।१३ शें सैन्य नेऊन पारघाटापाशीं कोयना नदीच्या काठीं तळ दिला व काहीं सैन्य जावळीस पाठविलें गडावरून जावळी २॥ मैल व कोयना नदी २॥ मैल आहे. खानाचें सैन्य इतकें जमल्यावरून खानाचा तह करण्याचा बेत नसून महाराजास पकडण्याचाच बेत होता हें स्पष्ट दिसून येतें. महाराजांचे अनेक हेर व खुद्द खानाचा वकील याच्या पासून

मिळालेल्या माहितीवरून खानाचे बेत महाराजास पूर्ण कळले होते तरी सुद्धा इतक्या जवळ आलेल्या सैन्याशीं उघड लढाई करणें धोक्याचें होतें म्हणून महाराजांनीं वरून तहाचीं बोलणीं ठेवून आतून गुप्त तऱ्हेनें लढाईची तयारी केली. याही डावात कपटी खानास महाराजांनी चीत केलें.

एकमेक एकमेकांस पेंच घालीत होते व रणक्षेत्र ठरविणें, दळणवळणाचे मार्ग सुरक्षित राखणें, वगैरे गोष्टींत खानापेक्षां महाराजच जास्त श्रेष्ठ दिसत होते खानाचें अफाट सैन्य, व मुख्य तळाचे मागील अफाट प्रदेश, या गोष्टींचा विचार केला तर खानाचें बल महाराजापेक्षा अधिक होतें. सैन्यास धान्य वगैरे मिळविणें या सर्व गोष्टी खानास जास्त अनुकूल होत्या त्यानें कपटव्यूह रचून आपलें सैन्य गडापर्यंत आणलें. महाराजानीं खानास उघड प्रतिबंध करणें म्हणजे खानास आपण होऊन सावध करणें झालें असतें येथपर्यंत पाहिलें तर या मोहिमेंत खानासच जय मिळेल असें सर्वांस वाटणें स्वाभाविक होतें. खानाचें मुख्य सैन्य गडापासून २८ मैलावर वाई येथें होतें सैन्याचा दुसरा तळ गडापासून ३ मैलांवर कोयना नदीच्या काठीं पडला होता तिसरें सैन्य जावळीस होतें. खान एवढ्यावरच थांबला नाहीं महाराजाच्या भेटीस तो गडावर जावयास निघाला त्या वेळीं त्यानें १५०० लोक बरोबर घेतले. अर्थातच शत्रूचे सभोंवती इतकें सैन्य ठेवून गडावर १५०० लोक घेणें इष्ट नव्हतें. म्हणून महाराजानीं मोठ्या खुबीनें पण नम्रतेनें हरकत घेऊन तें सैन्य भेटीच्या ठिकाणापासून ४ फर्लांग लांब ठेवविलें अशा तऱ्हेनें खान महाराजाच्या नरड्याशींच येऊन भिडला होता. या हालचालींचा उद्देश तहाचा नसून दगा करावयाचाच होता हें महाराजानीं ओळखिलें, व अशा प्रसगीं तोडीस तोड दिली यांतच महाराजांचें राजकारण पूर्णपणें दिसून येतें.

स्वत. आपण प्रतापगडीं राहून तेथून सर्वांना हुकूम देण्याचें काम निरनिराळ्या साधनांनीं करण्याचें महाराजांनी ठरविलें. कोयनेवरील खानाचे सैन्याजवळ गुप्त तऱ्हेनें मोरोपंताचे हाताखालील पायदळ पसरून ठेविलें. जावळीचे सैन्यावर बाबाजी भोसल्यांची नेमणूक करून त्याचे घोडदळ जावळी व वांईचे दरम्यान बोचेघोळीचे घाटावर ठेविले. गडाखालील सैन्यापासून गडाचें सरक्षण करण्याकरिता कान्होजी जेधे, बादल, अण्णाजी दत्तो, पासलकर यास सैन्यासह निरनिराळ्या चौक्यांवर ठेवून पारघाटाचे दक्षिणेस बाबाजी नाईक व बाबाजी सिलीमकर यांस व उत्तरेस हैबतराव सिलीमकर यास नेमलें. कोयना कांठच्या सैन्यावर किनेश्वरच्या खोऱ्यात मोरोपंत व त्याचें पायदळ यांची

योजना केली. पायदळाचा उद्देश शत्रूस चाहूल लागूं नये असा होता. चाहूल लागल्या-शिवाय घोडदळ इतकेंजवळ ठेवणें शक्य नाहीं. ही सर्व सैन्याची मांडणी अत्यंत गुप्त तऱ्हेनें अनेक टेकड्यांच्या आश्रयानें करण्यांत आली खानाच्या हालचाली उघड स्वरूपाच्या तर महाराजांच्या हालचाली गुप्त स्वरुपाच्या होत्या. या हालचाली करणें व निरनिराळ्या सेनापतींस हुकूम सोडणें हें संकेताशिवाय शक्य नव्हतें.

ऐन लढाईच्या वेळीं कुमक पाठविण्याकरतां राखीव सैन्य ठेवणें हें एक धोरण आहे. वाईचें सैन्य हें खानाचें राखीव सैन्यच होतें असें म्हणावयास काहीं प्रत्यवाय नाहीं. कारण लढाई झाल्यास गडाखालील व कोयनेच्या कांठचे सैन्यावर बोजा पडणार अशा प्रसंगीं वाईचें सैन्य लढाईच्या वेळीं मदतीस येऊं नये असा बंदोबस्त करणें व मोरोपंत वगैरे सेनानायकास मदत करणें हें अत्यंत महत्त्वाचें काम नेताजी पालकर व बाबाजी भोसले यांचेवर सोंपविण्यात आलें. गुप्त तऱ्हेनें घोडदळ ठेवावयाचें असल्यास सैन्यापासून दूर ठेविलें पाहिजे, म्हणून या सैन्यास गडाच्या वायव्येस ९ मैलांवर कडसरचें रानांत ठेविलें होतें. या घोडदळाकडे बचावी धोरणाचे वेळीं मारोपंत, जेधे, सिलीमकर वगैरे सरदारांस मदत करणें व खानाच्या सैन्यास घाट चढू न देणें हीं कामें सोंपविलीं होतीं, व चढावाचे वेळीं वाईवर हल्ला करून खानाचें सैन्य नेस्तनाबूद करणें ही कामगिरी होती, गडापासून २४ मैलावर वाई असल्यामुळें घोडदळासच इतक्या दूरचे सैन्यावर हल्ला करणें शक्य होतें ही महाराजाची योजना पाहिल्यावर दोघेही मठ कुशल असले तरी, महाराजांनीं खाना-पेक्षां युद्धकौशल्य जास्त दाखविलें असें दिसतें.

गडाखालीं एका टेकडीवर भव्य मंडप उभारून तेथें खानाची भेट घेण्याचें ठरलें होतें. हें अंतर सुमारें गडापासून ४ फर्लोंगावर असून तेथून खालचे बाजूस ४।५ फर्लोंगावर खानाची १५०० फौज होती. गडापासून मंडपापर्यंत व मंडपापासून खानाचे फौजेपर्यंत महाराजानी वेषधारी तांबोळी, अत्तर गुलाब देणारे वगैरे सैनिक ठेवून दिले होते, व त्यांचे हस्तें त्यांनीं गडापासून खालपर्यंत दळणवळण ठेविलें होतें. त्यामुळें खानास यत्किंचित् संशयास जागा राहिली नाहीं गडाखालीं निरनिराळ्या ठिकाणच्या सरदारांना इशारे देण्याचें काम तोफाच्या आवाजानेंच करण्याचें ठरलें होतें. महाराजांच्या वेळीं लढाईत डोंगराळ प्रदेशांत तोफांचा फारसा उपयोग नव्हता. कारण तोफा नेण्याआणण्यास अवघड असून उपयोगापेक्षां त्याची अडचणच व्हावयाची. तोफांचा उपयोग महाराजांनीं सांकेतिक हुकूम करण्याकडे केला. तोफांचा मारा

शत्रूवर केला असतां आपल्याही सैन्याची नासाडी झाली असती. मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर, बाबाजी भोसले या दूरच्या सरदारांना एकादे वेळीं हुकूम सोडणें तोफांच्या आवाजाशिवाय शक्य नव्हतें. संकेत ठरवून त्याप्रमाणे तोफांचे आवाज करावयाचें ठरविलें होतें. तात्पर्य दूरच्या सैन्याकरता तोफाचे सांकेतिक आवाज, सैन्याकरतां तुताऱ्या व कर्णे यांचे आवाज, नाना वेषधारी सैनिक हे जवळपासच्या लोकांकरता, अशी महाराजांनी व्यवस्था केलेली दिसते. महाराजांनीं स्वत' खानाचे भेटीस न जातां, जिऊ महाला वगैरेंनीं आपण जातों असें सुचविलें. पण अशा रीतीनें आपला जीव बचावण्याकरितां दुसऱ्याचा धोक्यांत घालणें, व खानाशीं वंचकपणा करणें, या दोनही गोष्टी राज्यसंस्थापनेस जास्त अपायकारक होत, असा पोक्त विचार मनांत आणून, महाराजांनीं स्वतःच खानाचे भेटीस जाण्याचा निश्चय ठरविला. यावरून त्या थोर पुरुषाचें धैर्य व दूरदृष्टि किती असावी याची कल्पना होते

खानाची जय्यत तयारी, तहाची लाघवी भाषा, त्याचें सैन्य प्रतापगडापर्यंत येणें, भेटीचे वेळीं महाराजावर वार करणें वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजे महाराजांनी कप-टास कपट करून स्वत'चा बचाव नव्हे, तर स्वदेशाचा बचाव केला असें म्हणणें भाग आहे. भेटीचे वेळीं खानानें तरवारीस हात घातला. इतक्यात, तरवारीचा घाव पडण्यापूर्वीं महाराजांनीं वाघनखें खानाचे पोटात शिरलीं व खान मरून पडला.

खानाचे मृत्यूपर्यंत महाराजांची बचावाची तयारी होती. त्याच वेळीं चढाईचे प्रकार कसे करावे वगैरे सर्व गोष्टी आगाऊ ठरून गेल्या होत्या. खान पडला. तोफांचे आवाज झाले व खानाचें सैन्य एकदम चहूंकडून वेढलें गेलें कोयना काठच्या सैन्यावर मोरोपंतानें अकस्मात् हल्ला करून नायनाट केला. बाबाजी भोसल्यानें जाव-ळीचे सैन्याचा फडशा पाडला. २४ मैलांवरील वाईच्या सैन्यास ही बातमी पोहों-चण्या पूर्वींच नेताजीनें एकदम हल्ला करून तेथील सैन्याची वाताहत केली खानाचा पुत्र फाजलखान विजापुरास ही बातमी नेण्याकरताच जणू काय ह्या संकटांतून सुटला. खानाचें शीर कापून गडावर उंच ठिकाणीं लटकाविण्यांत आलें.

अफजलखान शूर व धाडशी होता. त्याच्याजवळ साधनसंपत्ति विपुल होती. शिवाजीनें स्वीकारलेल्या दिखाऊ भ्याडपणानें व नम्रतेनें त्यास यशाबद्दल पूर्ण खात्री वाटू लागली. आपण शिवाजीला फसविणार व तो आपल्या हातीं जिवत अगर मेलेला असा सांपडणार याविशयीं खानास संशय राहिला नाहीं. या फाजील खात्री-

मुळें तो बेसावध राहिला, व पराभव झाल्यास सैन्यास पुढें कसें वागावें या बद्दल त्यानें कांहींच व्यवस्था केली नाहीं. खरा नायक हा केव्हांही भावी आशेनें हुरळून जात नाहीं. चढाईचें अगर बचावाचें कसलेंही युद्ध तो सारख्याच व्यवस्थेनें करतो. पुढें येण्याऱ्या प्रत्येक प्रसंगाची तो आगाऊ तरतूद करून ठेवितो. खानाच्या वधामुळें झालेल्या गोंधळाचा महाराजांनीं पूर्ण फायदा घेतला व विजापुरच्या मोठ्या सैन्याचा थोड्याशा मराठ्यांनीं धुव्वा उडविला.

शिवाजी महाराजाचें युद्धचातुर्य व कसल्याही प्रसंगाला धैर्यानें तोंड देण्याची तयारी या दोन गुणांनींच त्यांना यश मिळत गेलें. कोणत्याही कार्याबद्दल अगाऊ भीति वाटत असली कीं यशापयशाबद्दलही मन साशंक होतें पण पूर्ण आत्मविश्वासानें व धोरणानें काम केल्यावर यश सिद्धि आपोआपच होते हें या हकीकतीवरून कळणार आहे. युद्ध-शास्त्रदृष्ट्या या प्रतापगडच्या मोहिमेचा विचार केल्यास शिवाजी महाराजांच्या कौश-ल्याची खरी कल्पना येणार आहे व इतर सर्व लढायांचेंही परीक्षण केल्यास खऱ्या नेत्यास राजकारण, मुत्सद्देगिरी व युद्धकौशल्य इत्यादि गुणांची जरूरी किती असते तें कळून येईल. हे सर्व गुण शिवाजी महाराजांचे अंगीं वसत होते, म्हणूनच ते इतक्या श्रेष्ठ दर्जाचे राजे, नेते, सेनाधिपति व लढवय्ये म्हणून प्रसिद्धीस आले

# शहाजीचा पूर्वायुःक्रम.

( गो. स. सर देसाई )

" शहाजहां योगी होऊन जुन्नरास आले. "

( सन १६२७. )

जगदीश विरंचिकु पूछत है
   कहो सृष्टि रची, रखे कोन कहां।
शशि वो रवि–पूरव–पश्चिम लों
   तुम सोय रहो सिरसिंधु महां ॥
अरु उत्तर दच्छिन रच्छनकों
   इत साहजि हैं, उत साहजहां।     रा. मा वि. च.

परमेश्वर ब्रह्मदेवास विचारतात, " तुम्हीं सृष्टि रचिली, तींत राखण कोण कोठें ठेविलेत ? " ब्रह्मदेव सांगतात, " तुम्ही खुशाल क्षीरसिंधुमध्यें निजून रहा. चंद्र आणि सूर्य आम्हीं पश्चिम दिशांना ठेविले आहेत. तसेंच उत्तर आणि दक्षिण दिशाच्या रक्षणासाठीं शहाजहा आणि शहाजी यांची नेमणूक केली आहे. "

ही जयराम कवीची उक्ति शहाजहान १६५८ त पदच्युत झाला, त्यापूर्वीची आहे. म्हणजे तत्कालीन भावना अशी कीं, उत्तरेंत जसा शहाजहान तशाच तोडीचा दक्षिणेंत शहाजी देशसरक्षण करीत आहे कवीची अतिशयोक्ति सोडूनही ह्या दोन व्यक्ती हिंदी राजकारणांत कशा खेळत होत्या तें त्यात दिसून येतें शिवाजी–औरंगजेबाचें पितृस्थान धारण करणाऱ्या या दोन व्यक्ती राजकारणांतहीं पूर्वी तसाच खेळ खेळत होत्या. दोन्ही जवळ जवळ समकालीन आहेत. शहाजीची हयात ७० वर्षें ( स. १५९४–१६६४ ); आणि शहाजहानची हयात ७४ वर्षें ( स १५९२–१६६६ ). अकबराची मोठी हांव, कीं दक्षिणदेश जिंकावा. चांदबिबी मेल्यावर त्यानें स १६०० त अहंमदनगर काबीज केलें परंतु मलिकंबरानें दौलताबाद राजधानींत निजामशहाची स्थापना करून अकबराचा उद्योग उखडून टाकिला. अर्थात् बापाचा उद्योग तडीस नेण्याची तीच हांव पुढें जहांगीरनें धारण केली. परंतु

मलिकंबरानें मालोजी व शहाजी यास हाताशीं घेऊन तितक्याच निकरानें मोगलांस तोंड दिलें. दक्षिण देश जिंकण्याचें हें बिकट काम करण्यास जहांगीरपेक्षां त्याचा मुलगा खुर्रम् हाच जास्त लायक होता शहाजीप्रमाणेंच निजामशाहींत लखुजी जाधवराव व माहूरचा उद्धवराम ( ऊर्फ उदाराम ) हे सरदार प्रमुख होते जाधवरावानें आपली मुलगी जिजाबाई नाखुषीनें शहाजीस दिली हें लग्न ( मार्ग. शु. ५, १५२७ ) म्हणजे स. १६०५ सालीं झालें तेव्हा शहाजी ११ वर्षांचा व जिजाबाई एक वर्षानें लहान होती दक्षिणदेश जिंकण्याच्या कामावर जहांगीरचे सरदार मुख्यत' खानखानान व खानजहान हे, केव्हां एकदम तर केव्हां आळीपाळीनें, नियुक्त होते. स १६२४ त थोडा वेळ महाबतखानही दक्षिणेंत या कामावर होता इ. स १६१२ त म्हणजे जिजाबाई सुमारें १७ वर्षांची असतां तिचा बाप लखुजी जाधवराव व ब्राह्मण सरदार माहूरचा उदाराम या दोघास मोगलांनीं निजामशाहींतून फोडून आपल्या नोकरींत घेतलें. ते जवळजवळ अखेरपर्यंत तिकडेच राहिले, परत निजामशाहीच्या आश्रयास बहुधा आले नाहींत. निजामशाहींत ज्या त्यांच्या जहागिरी होत्या, त्याच त्याजकडेस मोगलाईंतून कायम झाल्या.

मराठ्यांचा इतिहास म्हणजे अथपासून इतिपर्यंत त्यांचा मोगल बादशहांशीं चाललेला खेळ होय या खेळात कित्येक जोड्या विशेष ध्यानात ठेवण्याजोग्या आहेत. शहाजहान व शहाजी, औरंगजेब व शिवाजी, बहादुरशहा व शाहू, महादजी शिंदे व शहाअलम, अशा जोड्यांचे परस्पर डावपेंच या खेळांत भरलेले आहेत. पैकीं शहाजी व शहाजहान याचा खेळ सन १६२२ पासून १६३५ पावेतों १३ वर्षें चालला.

सन १६०८ सालीं मलिकंबरची चढाई ऐकून जहागीरनें खानखानान यास मुख्य सेनापति नेमून दक्षिणेंत पाठविलें, आणि त्याजबरोबर शहाजादा पर्वीज व आसफखान यास देऊन दक्षिणदेश जिंकण्याची जगी तयारी केली या वेळीं वऱ्हाड खानदेशची सुभेदारी त्यानें पर्वीज यास दिली, आणि आसफखानास त्याचा पालक नेमिलें. पर्वीजचें वय यावेळीं २० वर्षांचें होतें त्याचे अगीं मूळचेंच शहाणपण कमी त्यांतून त्यास मद्यपानाचा नाद होता. बऱ्हाणपुरांत बादशाही थाटानें राहण्यापलीकडे दुसरें त्यानें कांहीं केलें नाहीं. सन १६१५ सालीं सर टॉमस रोनें बऱ्हाणपूर येथें त्याची भेट घेतली होती. बादशाही अमलदारात एकवाक्यता नसल्यामुळें पर्वीझच्या तयारीनें मलिकंबराचें काहीं एक वाकडें झालें नाहीं. तेव्हा आसफखानानें स्वतः बादशहासच दक्षिणेंत बोलविलें, परंतु आपल्या हातून मोहिमाची दगदग होणें

नाहीं, याची खात्री वाटून बादशहानें खानजहान लोदीची मागणी स्वीकारिली आणि त्यासच दक्षिणेंत पाठविलें अकबराचा प्रसिद्ध सेनापति दौलतखान लोदी याचा मुलगा खानजहान त्यानें निरनिराळ्या ठिकाणीं लष्करी कामें केलेलीं होतीं. विशेषतः जहांगीरची त्याच्यावर मर्जी होती खानजहान बऱ्हाणपुरास पोंचला, तेव्हां खानखानाचा मलिकंबरानें पराभव करून त्याचा फन्ना उडविल्याची बातमी खानजहानास कळली. अहंमदनगर सुद्धां मलिकंबरच्या हातांत पडलें होतें. बादशहानें खानखानास परत बोलवून घेतलें. त्याच्या एवढ्या अवाढव्य मोगल फौजाचा उपयोग चपळ मराठ्यांच्या टोळधाडींपुढें कांहीं एक होईना. तेव्हां बादशहानें सन १६११ त अबदुल्लाखान या शूर सरदारास गुजराथ प्रांतावर नेमून चौदा हजार फौजेनिशीं त्यानें बागलाणातून नाशिक त्र्यंबकवरून अहंमदनगरवर जावें, आणि त्याच वेळीं खानजहान लोदीनें बऱ्हाणपुरावरून चाल करावी, आणि दोन्ही फौजानीं एकमेकाच्या सल्ल्यानें वागावें असा हुकूम केला. परंतु या प्रसगीं सुद्धा अबदुल्लाखानानें स्वतःच्या घमेंडींत राहून एकट्यानेंच चाल केली तो गुजराथेंतून पश्चिम घाट चढून अहंमदनगरच्या हद्दींत शिरला परंतु त्या डोंगराळ मुलखांत मलिकंबरच्या मराठी टोळ्यांनीं मोगलाचा धुव्वा उडवून दिला. एकदम त्यांच्या झुंडी जमा होऊन अंगावर येत, आणि लगोलग डोंगराळ वाटांनीं नाहींशा होत. मोगल फौजेची सामुग्री व सामान त्यांनीं लुटून नेलें. त्याचीं उंटें पळविलीं त्यांच्यावर बाण व फटाके सोडून किंवा जवळ आल्यास त्यांचे नाककान कापून दुर्दशा करून सोडली हीं पिशाचें समोर येऊन लढेनात किंवा त्रास देण्याचें सोडीनात. तरी मोठ्या संकटानें अबदुल्लाखान दौलताबादे पावेतों पोंचला, परंतु तेथें निभाव न लागून तो परत जाऊ लागला, तेव्हां पुन त्याच्या राहिलेल्या फौजेची मराठ्यांनीं धुळधाण उडविली. मोठ्या शिकस्तीनें जीव घेऊन तो गुजराथेंत परत आला

हें वर्तमान ऐकून बादशहाला भारी त्वेष आला, आणि पुनरपि त्यानें खानखानान यास स. १६१२ त दक्षिणेंत पाठविलें इकडे दाखल होताच खानखानानें अहंमदनगरच्या अंमलदारात फूट पाडण्याची युक्ति चालविली. आदमखान, याकुतखान, जाधवराव वगैरे निजामशाहीचे प्रसिद्ध सरदार बाळापुर येथें मोगलांस येऊन मिळाले. लखुजी जाधवराव या वेळेपासूनच म्हणजे सन १६१२ त मोगलांस मिळाला हें सिद्ध आहे. शहाजीचें व त्याचें वाकडें पडण्याचें कारण हा जाधवरावाचा राष्ट्रद्रोह होय. या वेळीं मलिकंबरानेंही जगी कारस्थान करून विजापुर व गोवळकोंडा येथील

फौजा आपल्या मदतीस आणिल्या, बाळापुरजवळ दोन तास मोठी खडाजंगीची लढाई झाली निजामशाही फौजेचा साफ फडशा उडाला. त्यांचे पुष्कळ सरदार मारले गेले त्याच्या तोफा, हत्ती, घोडे व उंट मोगलांच्या हस्तगत झाले. दुसरे दिवशीं लगोलग मोगलानीं खडकीवर चाल केली, आणि मलिकंबरानें वसविलेलें तें नवीन शहर धुळीस मिळविलें. या विजयामुळें खानखानाची अब्रू बचावली, आणि तो पुढें तीन चार वर्षें दक्षिणच्या कारभारावर राहिला, परंतु तो शत्रूपासून लांच घेऊन कामांत कुचराई करतो, अशी बादशहाचे कानावर कागाळी गेली, तेव्हां बादशहा स्वतःच दक्षिणेंत येण्यास निघाला. शहाजहानास घेऊन तो अजमिरास आला. त्याचा इतमाम व फौज फार मोठी होती. मंगळवार ता. १० नोव्हेंबर सन १६१६ या दिवशीं अजमिराहून सुमुहूर्तानें बापलेक दक्षिणेंत येण्यास निघाले या प्रसंगाचें वर्णन सर टॉमस रोनें फार चांगलें केलें आहे. निघतांना राजपुत्रास बादशहानें शहाखुर्रम अशी पदवी दिली ता. ६ मार्च १६१७ रोजीं खानखानान, खानजहान, महाबतखान इत्यादि सुप्रसिद्ध सेनापतींसह शहाजहाननें बऱ्हाणपुरात प्रवेश केला. लगोलग त्यानें भेदनीति व द्रव्यामिष या दोन हत्यारांचा उपयोग करून मलिकंबराचें पारडें हलकें केलें रायरायन विक्रमजित म्हणून एक सुप्रसिद्ध रजपूत सरदार मोठमोठीं शौर्याचीं कृत्यें करून प्रसिद्धीस आलेला शहाजहानबरोबर होता. त्यास शहाजहाननें विजापुरास आदिलशहाकडे पाठविलें. तेव्हा आदिलशहा स्वतः राजपुत्रास जाऊन भेटला. मलिकंबरानेंही बालघाटाचा प्रदेश व अहंमदनगरच्या किल्ल्या शहाजहानकडे पाठवून दिल्या. दक्षिणचें काम फत्ते झालें मुलाचा हा पराक्रम ऐकून बादशहासही फार आनंद झाला. त्यानें स्वहस्तानें दोस्तीचें पत्र लिहून आदिलशहास पाठविलें, आणि त्यास 'फर्जंद' हा किताब दिला. एक वर्षाच्या आंत ही कामगिरी फत्ते करून शहाजहान परत गेला. तो ता० १२ आक्टोबर १६१७ रोजीं माडवगड येथें बापाजवळ पोंचला. त्या प्रसंगीं बापानें त्याचा मोठा सत्कार केला, आणि त्यास शहाजहान ही पदवी दिली. तसेंच त्याजबरोबर खानजहान लोदी, अब्दुल्लाखान, महाबतखान वगैरे जे सरदार परत आले होते त्यांचा, तसेंच निजामशाहींतून व आदिलशाहींतून आलेल्या सरदारांचा बादशहानें गौरव केला. वास्तविक, हा सर्व बाहेरचा भपका होता. शहाजहानच्या बाह्य तयारीस भिऊन दक्षिणचे राजे त्यास शरण गेले. खरें म्हटलें म्हणजे, ते बिलकूल जिंकले गेले नव्हते अकबर बादशहाच्या मरण समयीं दक्षिणेंतील जितका प्रदेश मोगल बादशाहींत आला होता, त्यांत या शहाजहानच्या पराक्रमानें यत्किंचितही वाढ

झाली नव्हतीं शहाजहानची पाठ वळतांच मोगल सरदारांचीं वैमनस्यें व मलिकंबराचे डावपेंच पहिल्यासारखेच जोरानें चालू झाले.

स. १६१७ पासून जहांगीर बादशहा दम्याचे व्याधीनें जर्जर होऊन त्याची पूर्वीची सर्व तडफ नाहींशी झाली, आणि राज्याचा भार इतरावर येऊन पडला दरबारांत तेजस्वी माणसें मुख्य दोन होतीं शहाजहान व नूरजहान दोन्ही पाणीदार व महत्त्वाकांक्षी. म्हणून दोघांचें एकत्र पटणें शक्य नव्हतें. अर्थात् अधिकारासंबंधाने त्या दोघांत झगडा सुरू झाला. त्यामुळें मलिकंबर व शहाजी यांस पुढें येण्यास संधि मिळून दक्षिणचा बचाव झाला. तीन वर्षेंपावेतों खपून मलिकंबरानें विजापुर-गोवळकोंड्याशीं सख्य केलें, आणि ६० हजार मराठा फौज जमविली सं. १६२० त मलिकंबरानें उघडपणें पूर्वीचे करार मोडले, आणि मोगलांच्या ताब्यात गेलेलीं एकेक ठाणीं त्यानें पुनरपि हस्तगत केलीं. मोगलांचें ठाणें बाळापूर येथें होतें. तेथून त्यांनीं आजूबाजूस हालचाल करितांच मलिकंबरानें त्याचा समाचार घेण्यास सुरुवात केली अहंमदनगरापासून मोगलांस उत्तरेकडे मागें रेटीत त्यानें बाळापुरास वेढा घातला, त्या ठिकाणीं मोगलांची दुर्दशा होऊन ते बऱ्हाणपुरावर मागें हटले लगोलग मराठ्यांनीं चढाई करून बऱ्हाणपुरास वेढा घातला. या वेळीं मराठ्यांनीं नर्मदेपार स्वाऱ्या करून मांडवगडापर्यंतचा प्रदेश लुटून उध्वस्त केला समोरासमोर लढण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे एखाद्या ठाण्यात शत्रूस कोंडून धरून सभोंवारचा प्रदेश उध्वस्त करावयाचा, आणि शत्रूस दाणावैरणीचा तोटा पाडून त्यास हैराण करावयाचें, हा मराठ्यांचा पुढें बाजीरावाच्या वेळेस चाललेला क्रम त्याही पूर्वी शंभर वर्षें मराठ्यांनीं स्वीकारला होता, हें विशेष ध्यानांत ठेविलें पाहिजे नर्मदेच्या पार मराठ्यांच्या स्वाऱ्या केव्हा होऊं लागल्या, शिंदे होळकरच प्रथम तिकडे कसे गेले, अशा शंका पेशवाईच्या इतिहासांत निघतात, त्या वेळीं मलिकंबराच्या प्रोत्साहनानें ते उद्योग त्यापूर्वी शंभर वर्षें मराठ्यांनीं अमलांत आणले होते, ही गोष्ट मराठी इतिहासाचा अभ्यास करणारांनीं मुद्दाम लक्षात ठेविली पाहिजे मलिकंबराच्या हाताखालीं हे मराठे सरदार कोण कोण होते, आणि त्या वेळीं त्यांनीं काय काय व कसे पराक्रम केले याची शक्य तितकी हकीकत हुडकून काढणें विशेष अगत्याचें आहे. मालोजी, शहाजी व शिवाजी यांचें मुख्य अधिष्ठान मलिकंबर होय; आणि त्या अधिष्ठानाचा इतिहास संपूर्णपणें हस्तगत झाल्याशिवाय शिवाजीची जन्मतिथीच काय, पण त्याही पेक्षां जास्त महत्त्वाच्या प्रश्नाचा उलगडा आपणास करतां येणार नाहीं

बऱ्हाणपुर सुद्धां या वेळीं मोगलास सोडून द्यावें लागलें असतें. पण त्या ठिकाणीं मोगलांची सामुग्री भरपूर होती, म्हणून त्याचा निभाव लागला सहा महिने मलिकंबरचा वेढा बऱ्हाणपुरास होता. उत्तरेंतून शहाजहान फौज घेऊन आला, तेव्हांच मलिकंबर वेढा उठवून परत आला या वेढ्यांत खानखानान कोंडला गेला होता. तो वरचेवर बादशहास लिहून मदत मागतां मागतां थकला. बादशहानें पुन: शहाजहानासच दक्षिणेंत जाण्याचा हुकूम केला, पण या वेळीं बादशाही फौज कास्मीरचे हद्दीवर गुतली होती. शिवाय, आतां बापाच्या उतार वयांत आपण जवळ नसलों तर मागें काय प्रकार होईल याची त्यास धास्ती होती. त्याचा वडील भाऊ खुसरू हा फार लायक व सुस्वभाव असून बापाच्या विरुद्ध बंड केल्यामुळें कैदेंत होता त्यास आपल्या बरोबर द्याल तर मी दक्षिणेंत जातों, असें शहाजहाननें बादशहास कळविलें. तें त्यानें कबूल केलें; आणि खुसरूस घेऊन लाहोराहून शहाजहान सन १६२० त निघाला. त्यानें प्रथम मांडवगडास येऊन माळव्यांत मराठ्यांच्या टोळ्या होत्या, त्यांस नर्मदेपार हाकून दिलें, आणि आपण लगोलग बऱ्हाणपुरास आला

शहाजहानची फौज ४० हजार होती बऱ्हाणपुरास ९ दिवसांहून जास्त विश्रांति न घेतां तो निजामशाही फौजेचा पाठलाग करीत खडकीवर आला दौलताबादचे आश्रयाखालीं खडकी येथें मलिकंबरानें निजामशाहीची गादी स्थापिली होती. आदल्याच दिवशीं मलिकंबरानें निजामशहास दौलताबादच्या किल्ल्यांत सपरिवार नेऊन सुरक्षित ठेविलें होतें. निजामशहा खडकींत असता तर तो या वेळीं शहाजहानच्या हातीं पडून सगळाच कारभार आटपला असता तीन दिवसांत त्यांनीं खडकीचें नवीन शहर धुळीस मिळविलें. तेथून मोगल फौजा अहंमदनगरावर गेल्या. त्या किल्ल्यावर खंजरखान हा मोगल अधिकारी असून त्यास मलिकंबरचा वेढा पडलेला होता. तो सोडविण्यास शहाजहान दौलताबादेहून पैठणापावेतों आला; पुढील पेंच ओळखून मलिकबरनें शरण येऊन आपण ताबेदारी पत्करण्यास कबूल आहों, असें शहाजहानास कळविलें. शहाजहानचीही थोडीबहुत कुचंबणाच होती. शिवाय दक्षिणेंत फार दिवस राहण्याचें त्याच्या मनांत नव्हतें त्याच्या फौजेस पुरेशी सामुग्री जवळ नव्हती, तेव्हां पडत्या फळाची आज्ञा समजून त्यानें मलिकबराशीं तह ठरविला. गेल्या दोन वर्षांत जेवढा प्रदेश मलिकंबरनें मोगलांकडून घेतला असेल, तेवढा परत द्यावा, आणि आदिलशहानें १८ लाख, निजामशहानें १२ लाख व कुत्बशहानें २०

लाख अशी एकंदर रकम ५० लाख सालाची खडणी म्हणून बादशहास द्यावी. हा तह करून पावसाळा संपल्यावर नोव्हेंबरांत शहाजहान अहमंदनगराहून ब्न्हाणपुरास परत गेला. सन १६२१ च्या आरंभी लाहोरहून निघाल्यापासून सहा महिन्यांचे आंत शहाजहाननें दक्षिणचा कार्यभाग यशस्वी करून दाखविला, याबद्दल त्याची अत्यंत वाहवा झाली. या सालच्या ऑगस्ट महिन्यात बादशहा एकाएकीं आजारी झाला ही बातमी ब्न्हाणपुर येथें शहाजहानला कळली, आणि त्याच सुमारास म्हणजे डिसेंबर १६२१ त किंवा पुढील जानेवारींत त्याचा वडील भाऊ खुस्रू त्याजबरोबर ब्न्हाणपुरास होता, त्याचा अंत झाला. अर्थात् शहाजहानला उत्तरेंत जाण्याची अता-वीळ झाल्यामुळेंच या वेळीं दक्षिणचा कार्यभाग अपुरा राहिला अंबरानें तर केवळ वेळ मारून नेली. मराठ्यांची गनिमी काव्याची पद्धत जी त्यानें निर्माण केली, तीच शेवटीं मोगल बादशाहीस प्राणहारक होणार हें ठरून चुकल्यासारखेंच होतें.

ता० २४-३-१६२२ रोजीं शहाजहान ब्न्हाणपुराहून निघून उत्तरेस गेला; आणि प्रथम मांडवगडासच कांहीं दिवस मुकाम करून राहिला. तेथून पुढें त्यानें बंड केलें, त्याची हकीकत अशी.

सन १६२१ च्या उन्हाळ्यात शहाजहान दक्षिणेंत निजामशाहीशीं झगडत असतां दरबारांत अनेक महत्वाच्या गोष्टी घडून आल्या प्रथम नूरजहानचा ओढा शहा-जहानकडेच होता. पण सन १६२१ च्या एप्रिलांत तिनें आपली मुलगी लाडिली-बेगम इचें लग्न शहाजादा शहर्यार याजबरोबर केलें. तेव्हापासून ती आपल्या जांव-यास राज्य मिळवून देण्याच्या खटपटीस लागली. त्यापुढील ऑगस्ट महिन्यांत बादशहा एकदम अतिशय आजारी झाला, आणि नूरजहान कारभार पाहूं लागली. त्या रोगांतून तो निखालस बरा असा पुनः कधीं झालाच नाहीं. त्यामुळें भावी व्यवस्थेचे विचार सर्वांच्या मनांत घोळू लागले. इकडे याच वेळीं दक्षिणेंत शहा-जहानची सरशी होऊन त्याचें वजन अतोनात वाढलें, आणि खुस्रूचा अंत झाला तेव्हा तर नूरजहान व जहांगीर यांची मनें अत्यंत चिंताग्रस्त झालीं लगेच सन १६२२ च्या जानेवारींत नूरजहानचा बाप इतिमादुद्दौला मरण पावला. तो जिवंत असेपर्यंत कारभारांत बेबंदशाहीस जागा नव्हती नूरजहानचा भाऊ आसफखान हा बापा-सारखाच हुशार होता, परंतु त्याची मुलगी मुमताज शहाजहानास दिलेली असल्या-मुळें, तो आपलें वजन जांवयाच्या बाजूनें खर्च करूं लागला. इतक्यांत इराणच्या शहानें अफगाणिस्तानावर स्वारी करून कंदाहार हस्तगत केलें, तेव्हां नूरजहाननें बाद-

शहाचा हुकूम घेऊन शहाजहानास तावडतोब दक्षिणेंतून अफगाण कामगिरीसाठीं परत बोलाविलें तो तरी हा अतस्थ डाव समजूनच होता. ता २४-३-१६२२ रोजीं तो बऱ्हाणपुराहून निघाला, आणि मांडवगडास पोचल्यावर तेथेंच पुढील अदाज बाधण्यासाठीं त्यानें पावसाळा काढिला त्यात आपलें मनोगत बापास कळविण्यासाठीं त्यानें आपला वकील त्याजकडे पाठविला, परंतु नूरजहाननें त्याचें कांहीं चालू दिलें नाहीं उलट त्याची जहागीर सुद्धां काढून घेण्यांत आली. तेव्हा प्रत्यक्ष बापाशीं उघडपणें लढाई करण्याशिवाय त्यास गत्यंतर राहिलें नाही पुढें चार वर्षें उभयताचा झगडा चालू होता. शहाजहान बापास कबजांत घेण्यासाठीं फौजा जमवून मांडवगडाहून पुढें चालून गेला. स १६२३ च्या एप्रिलांत आगऱ्याजवळ बिलोचपुरा ( हल्लींचें रेल्वेस्टेशन ) येथें बापाच्या फौजेशीं लढाई होऊन शहाजहान पराभव पावला या लढाईंत शहाजहानचा रजपूत सरदार व साह्यकारी प्रसिद्ध रायरायन विक्रमजित् मारला गेला हा तोडरमल्लाप्रमाणेंच जहांगीरच्या वेळीं मोगल दरबारीं अग्रगण्य होता शिवाय लखुजी जाधव व उदाराम वगैरे मराठा सरदाराचीही शहाजहानास या लढाईंत मदत होतीच तथापि या पराभवानतर स १६२७ च्या ऑक्टोबरात जहागीर मरण पावला तों पावेतों चार साडेचार वर्षें शहाजहानास रानोमाळ भटकत फिरावें लागलें, तरी जहागीरनें त्याची पाठ सोडली नाहीं स १६२२ च्या मेपासून नोव्हेंबरपावेतों बादशहानें अजमीर येथें तळ देऊन शहाजादा पर्वीज व महाबतखान यास शहाजहानच्या पाठलागास पाठविलें. त्या वेळीं जाधवराव व उदाराम यांनीं गनिमी काव्यानें लढून काहीं काळ शहाजहानाचा बचाव केला तोही पळत पळत नर्मदेवरून बऱ्हाणपुरास येऊन राहिला.

जहांगीर अजमिरास तळ देऊन राहिला असें वर म्हटलेंच आहे. पण स. १६२३ च्या डिसेंबरांत तो प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें अजमिराहून परत काश्मिरास गेला इकडे महाबतखान नर्मदेवर तळ देऊन राहिला, त्यामुळें शहाजहान बऱ्हाणपुरांतून बाहेर पडला आणि मलिकबर व आदिलशहा याची मदत मागण्यास गेला पण बादशहाचा आपणावर राग होईल या भीतीनें त्यांनीं त्यास मदत केली नाहीं. जाधवराव व उदाराम यांनींही त्यास तापीवरच सोडून दिलें तेव्हा शहाजहान गोवळकोंड्यास गेला. तेथेंही त्यास साह्य न मिळाल्यामुळें त्यानें तेथून ओरिसा व बंगाल गांठिला.

इकडे मलिकंबरास ही संधि फार चांगली सापडली. बादशाही भानगडींचा फायदा घेऊन तो निजामशाहीचें वजन वाढवूं लागला. त्याची सरशी आदिलशहाला खपत नव्हती त्यांच्यांत बेबनाव होऊन प्रकरण हातघाईवर आलें. तेव्हां दोघांनींही महाबतखान नर्मदेवर होता, त्याजकडे रदबदल चालविली.

मलिकंबरानें महाबतखानास कळविलें कीं, तुम्ही निजामशहाची बाजू घेतल्यास आम्ही आपला वडील मुलगा तुमच्या नोकरीस ठेवितों. उलट पक्षीं, आदिलशहानेंही, बरोबर सरदार मुल्ला महंमद लारी यास पाच हजार फौजेसह आपण तुमचे नोकरीस पाठवितों, असें महाबतखानास कळविलें. शहाजहान दक्षिणेंत असेपर्यंत महाबतखानानें वाटाघाटींत वेळ काढिला, आणि शहाजहान बंगालकडे निघून गेल्याचें ... पाच महाबतखानानें विजापुरची बाजू घेऊन निजामशहावर चाल केली मुल्ला महंमद लारी हा विजापुरची पांच हजार फौज घेऊन महाबतखानास येऊन मिळाला हे डाव ओळखून मलिकंबर आपली तयारी अगोदरच करीत होता. प्रथम तो कुत्बशाहाशीं तह करण्याकरितां गोवळकोंड्याकडे फौज घेऊन गेला. तिकडून खंडणी घेऊन व मदतीचा करार करून त्यानें बेदरास आदिलशहाची फौज होती, त्यावर स्वारी केली; आणि तें ठिकाण हस्तगतकरून तो विजापुरावर चालून आला, आणि तेथील किल्ल्यास त्यानें वेढा घातला. आदिलशहाचें व त्याचें एवढें वांकडें कां व कसें आलें, याची मीमांसा अनेकांनीं केली आहे, ( शि च साहित्य प्र० पृ० १६—रायाराव ) आदिलशहानें मुल्ला महंमद लारी या आपल्या सरदारास बऱ्हाणपुराहून ताबडतोब परत बोलाविलें बारा लाख रुपये भरून मुल्ला महमद लारीनें परत येण्याची परवानगी मिळविली, आणि लष्करखान नावाचा मोगली सरदार बरोबर घेऊन तो मलिकंबरावर चालून आला मलिकंबर सावधच होता. त्यानें प्रथम मोगलास कळविलें कीं, आदिलशहा व निजामशहा याच्या भांडणांत तुम्हांस पडण्याचें कारण नाहीं तें न ऐकता मुल्ला महंमद लारी व लष्करखान विजापुराकडे चालून येऊं लागले, तेव्हां मलिकंबर विजापुरचा वेढा उठवून त्यांच्या मुकाबल्यास गेला. उभय सैन्यांची गांठ अहमदनगरापासून पांच कोसांवर भातवडी येथें पडली. मलिकंबराचा मुख्य आधार शहाजी होता भातवडी येथें स. १६२४ च्या नोव्हेंबरांत दोन पक्षाचें मोठें निकराचें युद्ध होऊन मुल्ला महंमद लारी ठार पडला, आणि मलिकंबरास जय मिळाला लारीचें सैन्य पळून गेलें. जाधवराव व उदाराम लारीच्या बाजूनें लढत होते, तें आरंभींच त्यास सोडून निघुन गेले. मोगलाचा लष्करखान व आदिलशहाचे इखलास-

REFBK-0003421